**<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>**

**<u>नियम 289 च्या सूचनेसंबंधी</u>**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 ची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते,नितीन गडकरी,विनोद तावडे,पाशा पटेल, केशवराव मानकर, भगवानराव साळुंखे यांनी दिलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विधानपरिषद नियम 289 अन्वये मी सूचना दिलेली आहे. ही सूचना महत्वाची यासाठी आहे की, सन 2001 मध्ये राज्य विधीमंडळ, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण विधेयक दिनांक 27-7-2001 रोजी शासनाने मांडले होते. त्यानंतर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. डिसेंबर, 2003 मध्ये हे विधेयक संमत झाले होते. 20 जानेवारी 2004 रोजी राज्यपालांनी त्याला संमती दिली होती. महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये 22 जानेवारी 2004 रोजी ते प्रसिध्दही करण्यात आले होते. 1 जानेवारी, 2004 पासून उपलब्ध होणा-या सर्व संवर्गातील रिक्त पदासाठी तसेच इतर मागासवर्ग, अनुसूचित जाती , विमुक्त जमाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्गाला थेट भरतीसाठी पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर या कायद्याने आरक्षण लागू झाले होते. राज्य शासकीय कर्मचा-यांची संख्या 10 लक्ष असून, जिल्हा परिषद,नगरपालिकतील कर्मचा-यांची संख्या 10 लक्ष असून, अनुदानित शिक्षण संस्थेमध्ये असलेल्या कर्मचा-यांची संख्या 20 लक्ष आहे, विना अनुदानित शिक्षण संस्थेतील कर्मचा-यांची संख्या 20 लक्ष आहे. एकूण 1 लच 5 हजार कर्मचारी आहेत. यापैकी इतर मागासवर्गाची कर्मचा-यांची संख्या 19 लक्ष आहे. 19 लक्ष कर्मचारी इतर मागासवर्गाचे असतांना या महाराष्ट्र राज्याने 1 जानेवारी 1970 अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग यांना बिंदू नामावली प्रमाणे थेट भरतीसाठी आरक्षण लागू केले आहे. या पदोन्नतीमध्ये वर्ग 1पर्यंत मागासवर्ग आणि मागासवर्गासाठी हे आरक्षण लागू आहे. हे आरक्षण जर लागू केले नाही तर त्यामध्ये शिक्षेचीही तरतूद करण्यात आली होती असे असतांना दुर्दैव असे आहे की, विधी व न्याय विभागाच्या एका अधिका-यांने या कायद्यातील कलम 5(1), म्हणजे कायदा लागू परंतु या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

कायद्यातील कलम 5(1) रोखून धरण्यात यावे असे आदेश दिले. असे आदेश का दिले हे समजत नाही. महात्मा फुले, आंबेडकरांच्या नावाने चालणा-या शासनातील विधी व न्याय विभागाच्य अधिका-याने हा कायदा मंजूर झाल्यानंतर सदर कायद्यातील"कलम 5(1) प्रमाणे आबीसींना देय असलेली सर्व टप्प्यातील पदोन्नती देऊ" असे लिहिले व विधानमंडळाने पारित केलेल्या कायद्याची अंमलबजावणी रोखून धरली. यामुळे क्षणाधार्थ 4 कोटी ओबीसी जनतेच्या जीवनात त्यांनी अंध:कार निर्माण केला. फले-आंबेडकरांच्या नावाने चालणा-या शासनातील एक अधिकारी जर विधानमंडळाला वेठीस धरावयास लागला तसेच घटनेलाही वेठीस धरावयास लागले आहेत. सुमारे 15 लक्ष इतर मागासवर्गाच्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावरील आरक्षण 1 जानेवारी 2004 पासून रोखून धरण्यात आलेले आहे. या सर्व प्रकरणाची जबाबदारी विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव श्री. गिलाणी हे जबाबदार आहेत. भारतीय संविधान वेठीस धरण्याचे प्रकार या राज्यात वारंवार घडत आहेत. विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव श्री. गिलानी यांनी माननीय राष्ट्रपतींनी कायद्याला दिलेल्या मंजूरीनंतर कायदा रोखून धरल्याबद्दल नागपूर अधिवेशनात त्यांच्यावर हक्कभंगही मांडण्यात आला होता. त्यावेळेचे शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांनी काही मागासवर्गीयांच्या राखीव पदावर नेमणूका करतांना बिंदू नामावली पाळली नसल्याचा अहवाल शासनास सादर झाला. सामान्य प्रशासन विभागाकडे यासंदर्भात चौकशी केली असता असे समजले की, विधी व न्याय विभागाने ओबीसींना पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊ नये असे अभिप्राय दिले होते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिवांच्या संमतीशिवाय इतर मागासवर्गीयाचे आरक्षण रोखून ठेवण्याचे आदेश दुसरा कोण देऊ शकणार आहे ? 2004 साला पासून म्हणजेच हा कायदा मंजूर झाल्यापासून इतर मागासगवर्गीयावर या राज्यात अन्याय केला जात आहे असे यावरुन दिसून येत आहे. सुदेवाने आता राज्याचे उप मुख्यमंत्री हे इतर मागासवर्गीयांचे नेते आहेत. इतर मागासवर्गीयाच्या नेत्यांकडून, त्यांच्या सरकारकडून इतर मागासवर्गी्याच्या कर्मचा-यावर अन्याय होत असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे. सभापती महोदय,विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिवांनी जर इतर मागासावर्गीयाचे आरक्षण रोखून ठेवलेले आहे तेव्हा ही बाब शासनाला मान्य आहे काय ? ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून 19 लाख इतर मागासवर्गीय कर्मचा-यांवर अन्याय करणारे हे प्रधान सचिव आहेत. जर आरक्षण रोखण्याचा कोणी प्रयत्न केला असेल तर त्याला 90 दिवसाची शिक्षा करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आलेली आहे. सभागृहापुढील सारे कामकाज बाजूला ठेवण्यात यावे आणि फुले , आंबेडकरांच्या राज्यात इतर मागासवर्गीयावर होणा-या अन्याय व अत्याचाराच्या सदर्भातील चर्चा या सभागृहात करण्यात यावी अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये चर्चेची मागणी केलेली आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे इतर मागासावर्गीय कर्मचा-यांवर आणि अधिका-यावर हे शासन सातत्याने अन्याय करीत आहे इतर मगासवर्गीय विद्यार्थ्याची फी देण्याची सवलत सुध्दा रोखण्याचे काम या शासानाने वेळोवेळी केलेली आहे.व त्या संदर्भात सभागृहात या पूर्वी चर्चा झालेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव दिला आहे त्याला पाठिंबा देऊन 289 अन्वये या विषयावर चर्चा करण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे..

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या बाबतीत शासनाचे मत काय आहे हे विचारण्यात यावे व त्यानंतर आपण निर्णय द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना या बाबतीत काय सांगावयाचे आहे ?

श्री.छगन भुजबळ :सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रश्न मांडलेला आहे त्या प्रश्नासंबंधीची काही माहिती मलासुध्दा आहे. 2004 साली विधिमंडळाने एक कायदा मंजूर केला होता. काही जणांना तो कायदा पसंत असेल तर काही जणांना तो पसंत नसेल. परंतु एकदा कायदा मंजूर केल्यानंतर त्याची अंमलबजावणी आतापर्यंत झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा प्रकारच्या कायद्याची अंमलबजावणी रोखण्याचा कोणाला अधिकार आहे काय या संदर्भात त्यांनी विवेचन केलेले आहे. एकदा कायदा केल्यानंतर त्याची अंमलजबजावणी करावयाची नसेल तर पुन्हा विधानमंडळाकडे यावे लागेल किंवा कायदा मंजूर झाला असेल तर त्याची अंमलबजावणी करावी लागेल असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे आहे. असे मला प्रथमदर्शनी समजले आहे. तेव्हा हा संपूर्ण विषय संबंधित खात्याकडून तपासून घेण्यात येईल आणि त्यानंतर निवेदन करण्यात येईल.

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये 289 च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणताही विषय नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो विषय नियम 289 च्या माध्यमातून विशद केला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. तेव्हा मी शासनाला असे सांगतो की, यासंबंधीचे निवेदन शासनाने करावे. हे निवेदन झाल्यानंतर त्यावर मी सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारण्यास परवानगी देईन. नियम 289 च्या प्रस्तावास मी अनुमती नाकारीत आहे.

-------

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ ST/ श्री. गायकवाड नंतर --- 11:10

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे.

**मोखाडा (जि.ठाणे) येथे कृषी खात्यातील अधिकाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचार**

**(1) * 733 श्री. संजय केळकर, श्री. मधुकर चव्हाण, श्री. रामनाथ मोते** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मोखाडा (जि.ठाणे) येथील तालुका कृषी कार्यालयामार्फत शासनाच्या विविध योजना राबविल्या जातात त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे माहे जुलै, 2009 मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, कृषी खात्यातील अधिकाऱ्यांनी मौजे पळसुंडा व आसपासच्या इतर गावांमध्ये खोटी हजेरी पत्रके व बनावट मजुरांच्या नावांवर तसेच खत अनुदान वाटपामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, तद्नुसार दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (1) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, हा कृषी खात्यासंबंधातील प्रश्न आहे. ठाणे जिल्ह्यातील जो आदिवासी भाग आहे, मग तो मोखाडा असेल, जव्हार असेल, तलासरी-डहाणू असेल या भागामध्ये निरनिराळ्या खात्यांमधून निरनिराळ्या योजना चालतात त्यातून आदिवासींना नाडले जाते. कृषी खात्यातर्फे बी-बियाणांचे वाटप असेल, रोपे वाटप असेल वा अन्य निरनिराळी कामे असतील, योजना असतील त्याचा लाभ घेण्यासाठी या आदिवासींना अनेक खेटे मारावे लागतात. त्यामुळे तेथील आदिवासींमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. ठाणे जिल्ह्यातील या आदिवासी भागातील पळसंडा परिसर आहे त्या संबंधातील माझा हा प्रश्न आहे. या संदर्भात मी स्वत: कृषी खात्याशी पत्र व्यवहार केलेला आहे पण त्याची उत्तरे मला अजूनही आलेली नाही. तेव्हा आता माझा प्रश्न असा आहे की, कामाच्या मजुरीचे वाटप आहे ते किती दिवसात व्हायला पाहिजे ? आणि ते वाटप आहे ते होण्यात उशीर झालेला आहे अशी माझी माहिती आहे. त्यामुळे

...... सी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र.733 ...

हा उशीर का झाला, त्याला कोण जबाबदार आहे ? या सगळ्या आदिवासी तालुक्यांमध्ये, मग तो मोखाडा तालुका असेल वा तलासरी-डहाणूचा भाग असेल, याभागामध्ये निरनिराळ्या योजनांमध्ये हे प्रकार सर्रास सुरू असतात. त्यात खोटी मस्टर्स तयार करणे, आदिवासी माणूस पोटा-पाण्यासाठी जगण्यासाठी म्हणून बाहेरजातो तर तेथे त्यांच्या नावाने दुसरेच मजूर दाखविले जातात. तेव्हा कृषी खात्यामध्ये हे जे प्रकार घडत आहेत त्याची आपण चौकशी करणार आहात का? तसेच मजुरीचे वाटप उशिरा का झाले या संबंधात देखील आपण चौकशी करणार का?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या संदर्भात आमच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. परंतु येथे सन्माननीय सदस्यांनी त्याची माहिती देऊन चौकशी करावी अशी मागणी केलेली आहे ती लक्षात घेऊन या गावांमध्ये उशिरा मजुरी का मिळाली आणि इतरही अशा वेगळ्या काही तक्रारी असतील तर त्याची देखील निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मजुरीबरोबरच या भागामध्ये या आदिवासींना खताचे देखील वाटप झालेले आहे. तेव्हा मोखाडा भागामध्ये किती खत आपण वाटले आणि किती शेतकऱ्यांना दिले गेले आणि त्यासाठी कोठल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी त्या वाटपामध्ये सहभाग घेतला होता याची माहिती आपण देऊ शकाल का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मोखाडा तालुक्यामध्ये युरिया पॅकेटचे वाटपआपण करतो. त्यात काही अनुदानावर तर काही विनाअनुदानावर देखील वाटप केले जाते. भात लावणीमध्ये युरिया पॅकेटच्या वाटपाचे मोठे स्थान आहे. त्यामुळे तेथे प्रात्यक्षिकासाठी आपल्याकडून 2660 किलो युरियाचे वाटप केलेले आहे आणि त्याशिवाय उर्वरित 8332 किलोचे वाटप विनाअनुदानातून वितरित केलेले आहे. ते वाटप तेथील स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून झालेले आहे व त्यास कृषी विभागाची मदत होती त्यामुळे कृषी विभागाकडे हा विषय आला. पण यामध्ये आपण मध्यस्थ म्हणून आपण काम केलेले आहे.

***

...... सी 3 ..



KBS/ KGS/ ST/ श्री. गायकवाड नंतर --- 11:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मोखाडा (जि.ठाणे) येथील आदिवासी पाड्यातील कुटुंबांचे रोजगारा अभावी होत असलेले स्थलांतर

**(२) *  २२१  श्री. माणिकराव ठाकरे,  श्री. सुभाष चव्हाण,  श्री. चरणसिंग सप्रा, श्री.सय्यद जमा, श्री. संजय दत्त :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.ठाणे) येथील आदिवासी पाड्यावरील आदिवासी कुटुंबाना रोजगार मिळत नसल्यामुळे या आदिवासी कुटुंबे रोजगारासाठी स्थलांतर करीत असल्याचे माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदिवासी पाड्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी, तसेच त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) नाही.
(२) व (३) मोखाडा तालुक्यातील मजुरांनी कामाची मागणी करताच त्यांना तात्काळ काम पुरविण्याच्या दृष्टीने नोव्हेंबर, २००९ मध्ये ७३०८६ एवढ्या मजुर क्षमतेची ४५९ कामे शेल्फवर होती.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, रोजगार मिळण्याच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने वेगवेगळ्या योजना केल्या आहेत. परंतु या ठिकाणी अशी काही घटनाच घडली नाही असे म्हणून आमच्या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर दिले आहे. म्हणून या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करू इच्छितो की, एमआरइजीएसच्या माध्यमातून राज्यात जी कामे येतात त्यात राज्याच्या काही जिल्ह्यात, काही भागामध्ये १०० कोटी वर खर्च होत आहे आणि काही जिल्ह्यांमध्ये २-३ कोटी देखील खर्च होत नाही. त्यामुळे जेथे जास्त खर्च होत आहे तेथे कशा पद्धतीने काम केले जात आहे हे पाहून इतर जिल्ह्यांमध्ये देखील त्या दृष्टीने प्रोत्साहन देण्यासाठी एखादी बैठक माननीय मंत्री महोदयांनी बोलवावी आणि तेथील लोकांना रोजगार देण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करील काय ?

( यानंतर श्री. सरफरे .... डी १ ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 221..

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यापूर्वी राज्यामध्ये रोजगार हमी योजना सुरु होती. त्यानंतर केंद्र सरकारची योजना आली तिला आपण एमआरईजीएस असे नाव दिले. लोकांच्या कामाच्या मागणीवर ही योजना आधारीत असल्यामुळे ज्यांना काम हवे असल्यास त्यांनी 4 नंबरचा फॉर्म ग्रामपंचायतीमध्ये भरुन दिल्यानंतर त्या मजुराचे नाव नोंदविण्यात येते. आणि त्याला एक जॉब कार्ड दिले जाते. अशाप्रकारे 4 नंबरचा फॉर्म एकाच वेळी दहा मजुरांनी भरुन दिल्यास व कामाची मागणी केल्यास त्यांना काम दिले पाहिजे. जर त्यांना शासनाने काम दिले नाही तर त्यांना निर्वाह भत्ता दिला जातो. त्यामुळे अशाप्रकारे मजुरांनी 4 नंबरचा फॉर्म भरुन दिल्यानंतर त्यांच्यासाठी काम सुरु करण्याची व्यवस्था केली जाते. या कामासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून 50 टक्के आणि शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून 50 टक्के खर्च केला जातो. माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे काही जिल्हयात काम झाले आहे तर काही जिल्हयात काम सुरु झालेले दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. भंडारा व गोंदिया या जिल्हयामध्ये पूर्वीपासून रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरांची संख्या जास्त आहे. त्या जिल्हयामध्ये मजबूतीकरण आणि बांध बंदिस्तीची कामे करण्यात आली आहेत. नंदूरबार जिल्हयामध्ये या योजनेमधून चांगले काम झालेले दिसत नाही. तसेच, विदर्भातील काही जिल्हयांमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरांची उपस्थिती कमी असते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळी परिस्थिती असेल त्यावेळी मजूर कामावर येतात. गेल्या दोन -चार वर्षांची परिस्थिती पाहिल्यास त्या वर्षी राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती होती. त्यानंतर राज्याच्या काही भागामध्ये चांगला पाऊस झाला होता. अशा परिस्थितीमुळे रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरांची उपस्थिती दिसत नाही. याशिवाय इतर जिल्हयांमध्ये सुध्दा एमआरईजीएसमार्फत अनेक कामे करुन घेण्याची संधी निश्चितपणे आहे. तशापध्दतीने आपल्याला त्या जिल्हयात कामे करुन घेता येतील, त्यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. ज्या जिल्हयांमध्ये कामांची गर आहे त्याठिकाणी जाहीरपणे दवंडी देण्यात येते. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये व दूरचित्रवाहिनीवरुन जाहिरात करण्यात येते. माननीय सदस्यांचे म्हणणे असे की, त्याकरिता आपण बैठका आयोजित करुन लोकांना ती योजना समजावून सांगणे आवश्यक आहे. तसेच, एका बाजूला रोजगार निर्माण करणे व दुसऱ्या बाजूला विकासाची कामे करणे अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यादृष्टीने कार्यवाही केली जाईल.

DGS/ ST/ KGS/

ता.प्र.क्र. 221..

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी छापील उत्तरामध्ये नोव्हेंबर 2009 मध्ये 73086 एवढया मजूर क्षमतेची 459 कामे शेल्फवर असल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षात आज किती मजूर काम करीत आहेत? कामाची मागणी करण्याकरिता 4 नंबरचा फॉर्म भरावा लागतो. ही पध्दत आपण सोपी करणार काय? फॉर्म न भरता त्यांनी आम्हाला कामाची गरज आहे अशी मागणी केल्यानंतर त्यांना आपण काम दिले पाहिजे अशी पध्दत आपण स्वीकारणार काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, फॉर्म भरुन काम मागण्याची पध्दत अत्यंत सोपी आहे. ग्रामपंचायतीमध्ये 4 नंबरचा फॉर्म मिळतो तो ग्रामसेवकाकडून भरुन घेता येतो. यासंबंधी देशाच्या पातळीवर कायदा करण्यात आला असून त्यातील तरतुदीप्रमाणे आपण ही व्यवस्था केली आहे. त्यामुळे ही पध्दत अवघड नाही. आपण नेहमी पहातो की, गरज पडेल त्यावेळी लोक रस्त्यावर येतात, त्यामुळे त्यांनी ग्रामपंचायतीमध्ये जाऊन फॉर्म भरणे ही अवघड बाब नाही. वन विभाग आणि ग्रामपंचायतीकडील माहितीनुसार मोखाडा येथे नोव्हेंबर 2009 मध्ये 1293 कामांवर 15065 मजूर उपस्थित होते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासनाने यापूर्वी जाहीर केले होते की, कामाची मागणी करणाऱ्या मजुरांना जॉब कार्ड दिले जाईल. याठिकाणी ठाणे जिल्हयातील मजूर स्थलांतरीत झाले आहेत. त्या सर्वांना जॉब कार्ड देण्याचे काम सुरु केले आहे काय? दुसरा प्रश्न असा की, जॉब कार्ड देऊन सुध्दा त्यांना रोजगार मिळाला नाही तर त्यांना निर्वाह भत्ता देण्याची तरतूद एमआरईजीएसमध्ये आहे. त्याची अंमलबजावणी झाली आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 4 नंबरचा फॉर्म भरुन दिल्यानंतरही आपण त्यांना 15 दिवस रोजगार देऊ शकलो नाही तर त्यांना निर्वाह भत्ता दिला जातो. तशी परिस्थिती अजून राज्यात निर्माण झालेली नाही. मजुरांकडून जॉब कार्डची मागणी केल्यानंतर त्यांना जॉब कार्ड दिले जाते.

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. संजय केळकर और श्री. माणिकराव ठाकरे ने ठाणे जिले के मोखाडा तालुके के बारे में कृषि विभाग और रोजगार हमी योजना से संबंधित प्रश्न पूछे है कि वहां पर आदिवासियों को मिलने वाले अनुदान और रोजगार के बारे में भ्रष्टाचार हुआ है. मेरा पहला प्रश्न यह है कि क्या शासन इस बारे में जाँच करेगा ? महाराष्ट्र में एन.आर.ई.जी.एस. और एम.आर.ई.जी.एस. को मिलाकर स्कीम चलाई जा रही है,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. सय्यद ज़मा..                                        ता.प्र.क्र.221...

जब हम इस बारे में माननीय मंत्री महोदय से सवाल पूछते हैं तो वे जबाब देते हैं कि 73086 मजूर क्षमता के काम मंजूर किए हैं. माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे ने कहा है कि अगर आप नागपुर और अमरावती विभाग की बैठक लेंगे तो ग्राम पंचायत में फॉर्म भरने के बाद खासकर गरीबों और आदिवासियों को क्या अनुभव होते हैं, इस बारे में आपको पूरी जानकारी देंगे. मेरा दूसरा प्रश्न यह है कि क्या आप यह बैठक शीघ्र लेंगे ?

(यानंतर सौ. रणदिवे(

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:20

ता.प्र.क्र.221 . . . .

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माझ्याकडे रोजगार हमी विभागाचा कार्यभार आल्यानंतर मी व्हिडिओ कॉन्फरन्सींगव्दारा सर्व आयुक्तांबरोबर आणि जिल्ह्यातील अधिकाऱ्यां बरोबर संपर्क साधून माहिती घेतलेली आहे. नोव्हेंबरला पाऊस पडण्यापूर्वीची ही स्थिती होती. त्या नंतर परिस्थिती बदलली असली तरी सन्माननीय सदस्यांनी अपेक्षा व्यक्त केली की, यासंबंधात बैठक घेऊन मार्ग काढण्यात यावा. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

----

. . . .ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2003

**(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)**

----

**गडचिरोली जिल्ह्यात पाणी टंचाईमुळे शेतकऱ्याच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान**

**(4) *2296 श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) गडचिरोली जिल्ह्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2009 या महिन्यात भीषण पाणी टंचाईमुळे शेतकऱ्याच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कोणती आर्थिक मदत करण्यात येणार आहे,
(4) तसेच गडचिरोली जिल्ह्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबविण्यात येणार आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (1) नाही.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, याठिकाणी पहिला प्रश्न असा विचारलेला आहे की, "गडचिरोली जिल्ह्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर 2009 या महिन्यात भीषण पाणी टंचाई मुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी "नाही"असे उत्तर दिलेले आहे.म्हणजेच आमच्या गडचिरोली व विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले नाही. दुसरा प्रश्न असा विचारलेला आहे की,"असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय?" तर त्याबाबतीत "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. तसेच तिसरा प्रश्न असा विचारलेला आहे की,"असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कोणती आर्थिक मदत करण्यात येणार आहे ?" त्याबाबतीत देखील "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. चौथा प्रश्न फार महत्वाचा आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"तसेच गडचिरोली जिल्ह्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबविण्यात येणार आहेत ?" या प्रश्नाच्या उत्तराच्या माध्यमातून गडचिरोली आणि विदर्भाला प्रमाणपत्र देण्यात आले आहे की, "येथे तसा प्रश्नच उद्‌भवत नाही." या परिसरात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ 11:20

1400 ते 1700 मि.मि.पाऊस पडतो. पण यावेळेस 900 मि.मि.पाऊस झाला म्हणजे जवळजवळ 59 परसेंट पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले नाही काय ? आमच्या भागामध्ये धानाचे पीक होते. मात्र यावेळेस शेतीचे नुकसान झालेले आहे हे शासनाला माहिती नाही काय ? तरी देखील नुकसान झालेले नाही असे सांगितले जात आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली असताना देखील, त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु त्याबाबतीत सुध्दा "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर देण्यात आले आहे.विदर्भामध्ये नद्यांचे प्रमाण जास्त आहे आणि याठिकाणी 60 ते 70 टक्के वन आहे. असे असतानाही सिंचनाचे अनेक प्रकल्प अनेक धरणाच्या संबंधातील बाबी वन विभागाकडे प्रलंबित आहेत.याठिकाणी पाणी पुरवठ्याची कोणतीही सुविधा नाही. याठिकाणी सिंचनाच्या,कास्तकारांच्या आणि पाणी टंचाईवर मात करण्यासाठी प्रश्न उपस्थित केलेले आहेत, परंतु त्याबाबतीत "प्रश्न उद्‌भवत नाही" अशा प्रकारची उत्तरे देण्यात आलेली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, गडचिरोली जिल्हा हा सिंचनाच्या बाबतीत "सुजलाम् सुफलाम्" आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेले प्रश्न आणि त्याची देण्यात आलेली उत्तरे याबाबतीत त्यांचा काही गैरसमज झालेला आहे असे दिसते. त्यांनी असा प्रश्न विचारलेला आहे की,"गडचिरोली जिल्ह्यात ऑक्टोबर-नोव्हेंबर 2009 या महिन्यात भीषण पाणी टंचाईमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय?" त्याबाबतीत "नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. पण आता या महिन्यात परिस्थिती उलटी झाली आहे. सुरवातीला पावसाच्या बाबतीत चिंता निर्माण झाली असली तरी, नंतर दोन महिन्यामध्ये पाऊस सुरु झाला. त्यामुळे "भीषण पाणी टंचाईमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला "नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न आणि उत्तर जोडून पाहिले तर त्यांच्या लक्षात येईल. मात्र हे खरे आहे की, गडचिरोली जिल्ह्यात जून,जुलै,ऑगस्ट या महिन्यांमध्ये पावसामध्ये अंतर पडले. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पाऊस उशीरा आला, त्यामुळे भाताच्या उत्पादकतेमध्ये घट आलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. नंतर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान ...

. . . .ई-4

श्री.बाळासाहेब थोरात . . .

झालेले आहे.यासंबंधात केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. टंचाईच्या बाबतीत सांगावयाचे तर 44 लाख हेक्टरमधील पिकाचे नुकसान झालेले आहे. गडचिरोली जिल्ह्याचे एकूण क्षेत्र 33,393 हेक्टर असून त्यामधील पिकाची उत्पादकता कमी झालेली आहे. यासंबंधात केंद्र शासनाकडून मदत म्हणून 140 कोटी रुपयांचा पहिला हप्ता आलेला असून बाकीची रक्कम येणार आहे. ज्या क्षेत्रामध्ये उत्पादन कमी झालेले आहे, त्या क्षेत्रासाठी 564 कोटी रुपये येणार आहेत, त्यामधून निश्चितपणे मदत करता येईल.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2296..

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय,ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2009 या महिन्यात भीषण पाणी टंचाईमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे त्या शेतकऱ्यांना काही मदत करण्यात येणार आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी 33 हजार हेक्टर संबंधी आधीच सांगितलेले आहे.

----

**तारांकित प्रश्न क्रमांक 2291**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/

**स्थाननिश्चितीबाबत सहसंचालक उच्च शिक्षण यांचे स्तरावर वेळेवर निर्णय होणेबाबत**

**(6) * 6 प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक 50138 ला दिनांक 11 जून, 2009 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) संलग्न महाविद्यालये किंवा विद्यापीठातून काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ किंवा निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चितीच्या संदर्भात काही अनियमितता झालेली असल्यास, ती बाब 15 दिवसाच्या आत संचालकांच्या लक्षात आणून द्यावी व कोणत्याही परिस्थितीत याबाबतचा निर्णय 15 दिवसाच्या आत करावा असे जे आदेश सर्व उच्च शिक्षण सहसंचालकांना देण्यात आले आहेत. त्यानुसार दिनांक 1 एप्रिल, 2009 ते 31 ऑगस्ट, 2009 या काळात विभागवार उच्च शिक्षण सहसंचालकाकडे जी एकूण प्रकरणे प्राप्त झाली त्यांची विभागवार वर्गवारी कशी आहे,

(2) विभागवार किती प्रकरणी वेळेच्या आत व किती प्रकरणी विलंबाने निर्णय घेण्यात आले,

(3) विलंब झाल्या प्रकरणी विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता** : (1) राज्यातील 8 विभागीय कार्यालयाकडे दिनांक 1 एप्रिल, 2009 ते 31 ऑगस्ट, 2009 या काळात खाली दिल्याप्रमाणे विभागवार एकूण प्रकरणे प्राप्त झालेली आहेत.

| अ.क्र. | विभाग | प्राप्त | निकाली | त्रुटी |
|---|---|---|---|---|
| 1 | पुणे | -- | -- | -- |
| 2 | मुंबई | 754 | 754 | -- |
| 3 | नागपूर | 435 | 435 | -- |
| 4 | अमरावती | 99 | 99 | -- |
| 5 | नांदेड | 25 | 22 | 3 |
| 6 | जळगांव | -- | -- | -- |
| 7 | कोल्हापूर | 34 | 34 | -- |
| 8 | औरंगाबाद | 55 | 55 | -- |
| | एकूण | 1402 | 1399 | 3 |

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये एकूण 1402 प्रकरणे प्राप्त झाली त्यापैकी 1399 प्रकरणे वेळेच्या आत निकाली काढण्यात आली आहेत असे म्हटले आहे.हे उत्तर मनापासून समाधानकारक आहे असे म्हटले पाहिजे. सभापती महोदय, या स्थाननिश्चिती देण्यामध्ये जो भ्रष्टाचार होत होता त्यासंदर्भात सभागृहात एक लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती आणि त्याअनुषंगाने एका जॉईंट डायरेक्टरला शिक्षा करण्यात आली होती. तसेच पंधरा दिवसात

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी निकाल लावावा असे आदेश देण्यात आले होते. रिजेक्ट करावयाचे असेल तर त्यांनी रिजेक्ट करावे पण या प्रकरणांचा निकला लावावा असे आदेश देण्यात आले होते. रिजेक्ट करावयाचे असेल तर रिजेक्ट करावे नाही तर वरिष्ठांच्या लक्षात आणून द्यावे ही गोष्ट गेली दोन-तीन वर्षे व्यवस्थित चालू आहे आणि वेळेच्या आत म्हणजे पंधरा दिवसाच्या आत ही प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. 1402 प्रकरणापैकी 1399 प्रकरणे वेळेच्या आत निकालात काढलेली आहेत ही गोष्ट खरी आहे काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे प्राप्त 1402 प्रकरणापैकी 1399 प्रकरणे निकालात निघालेली आहेत. त्याच्या व्यतिरिक्त आणखी एक
प्रकरण दि. 13.12.2009 रोजी निकालात काढलेले आहे. आणि फक्त दोन प्रकरणे शिल्लक आहेत. ती देखील कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे शिल्लक आहेत.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण आदेश दिल्याप्रमाणे ही प्रकरणे निकाली निघालेली आहेत काय? हे उत्तरावरुन स्पष्ट होत नाही म्हणून मी याठिकाणी क्लीअर करुन घेऊ इच्छितो. बाकीचे उत्तर समाधानकारक आहे. 1402 पैकी 1399 प्रकरणे 15 दिवसात निकाली काढलेली आहेत काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, "होय". खरे सांगावयाचे तर आतापर्यंत 1400 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. 15 दिवसात 1399 प्रकरणे निकाली काढलेली आहेत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, नांदेड उप विभागातील तीन प्रकरणे अद्याप अपूर्ण आहेत ती निकाली काढण्यात आलेली नाहीत. ही प्रकरणे कधी पासून प्रलंबित आहेत आणि ती पूर्ण करण्यासाठी आपल्या स्तरावर काय कारवाई करण्यात आली?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, यातील एक प्रकरण ऑलरेडी दि.30-11-2009 रोजी निकाली निघालेले आहे. जी दोन प्रकरणे बाकी आहेत त्यापैकी यशवंत महाविद्यालय, नांदेडच्या श्री. पांडेजी यांचे एक प्रकरण आहे. त्यांनी कॅटगरी बाबतचे महाविद्यालयात पहिल्यांदा जे प्रमाणपत्र दिलेले आहे ते न दिल्यामुळे शिल्लक राहिलेले आहे.आणि दुसरी केस श्रीमती शैलजा वाडेकर या स्वामीनारायण तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांची आहे. त्यांनी देखील कॅटॅगरी बाबतच्या कागदपत्राची पूर्तता केलेली नाही.या दोन्ही प्रकरणात कॅटॅगरी बाबतच्या

..4..

मा.प्र.क्र.6...

प्रा. वर्षा गायकवाड....

कागदपत्राची पूर्तता न केल्यामुळे निकाली काढण्यात आलेली नाहीत. बाकी सगळी प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, पुणे आणि जळगाव या दोन विभागातून काही माहिती प्राप्त झालेली नाही, याची कारणे समजू शकतील काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, त्यांच्याकडून प्रस्ताव आलेले नसल्यामुळे त्याबद्दलची माहिती देण्यात आलेली नाही.

---

..5..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शेती व्यवसाय तोटयात असल्याप्रकरणी करावयाची उपाययोजना**

**(7) * 1081 श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री. परशुराम उपरकर , डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. गोपीकिसन बाजोरिया** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अनियमित पाऊस/शासनाची उदासिनता, बी-बियाणे, वीजपाणी यांच्या नियोजनाचा अभाव असल्यामुळे राज्यातील शेती व्यवसाय तोटयात आल्याने राज्यात शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करीत आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शेती व्यवसाय किफायतशीर करण्यासाठी शासनाने कर्जमाफी न देता शेती व्यवसायाला पूरक असे धोरण न राबविल्याने शेती व्यवसाय तोटयात जात आहे, परिणामी काही वर्षापासून कर्जबाजारी शेतकरी नैराश्येतून आत्महत्या केल्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शेतीला उद्योगाचा दर्जा देवून वीज, पाणी, भागभांडवल, अल्प मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1), (2) व (3) या विषयाबद्दल शासनाने इंदिरा गांधी इंस्टीटयूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च व नियोजन आयोगाचे सदस्य श्री. नरेंद्र जाधव एकसदस्यीय समितीस अभ्यास करुन शिफारशी देण्याबाबत विनंती केली होती. या समितीच्या शिफारशींनुसार शासनाने नविन कार्यक्रम सुरु केले आहेत.

गेल्या दोन वर्षात शेतकऱ्यांना कर्जमाफी, अल्पदराने कर्जपुरवठा, सिंचना बरोबरच शेततळयांचा कार्यक्रम या शिवाय आंतरराष्ट्रीय निधीतून कृषिक्षेत्राचा विकास (I.F.A.D) चा दारिद्रय निर्मूलनाचा कार्यक्रम, स्वयंसेवी गटांना चार टक्के दराने कर्ज देऊन स्वयंरोजगार व आत्मनिर्भरणाच्या दृष्टिने भरीव कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, इंदिरा गांधी इन्स्टिटयुट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च व नियोजन आयोगाचे सदस्य श्री. नरेंद्र जाधव यांच्या अहवालात शेतकरी दारु पिऊन आत्महत्या करतात असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे हे खरे आहे काय? असल्यास शासनाने तातडीने त्यासंदर्भात दारुबंदीचा इलाज करण्यासाठी माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रानुसार धोरण स्वीकारणार आहे काय?

सभापती महोदय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, संबंधित अहवालामध्ये शेतकऱ्यांसाठी जोडधंदे निर्माण करावेत असे म्हटले असल्यामुळे या देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांनी जे धोरण जाहीर केले होते त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याबद्दल राज्याला सूचना दिल्या आहेत काय? दिल्या असल्यास त्याप्रमाणे राज्य शासनाने किती निधी उपलब्ध करुन दिला आहे?

...6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1081. . . .

श्री. दिवाकर रावते...

आणि कोणते संबंधित उद्योग देण्यात आलेले आहेत? माझा पाचवा प्रश्न असा की, याच सदनामधून शेतकऱ्यांना माननीय पंतप्रधान पॅकेजअंतर्गत जनावरे, दुभत्या गाई देण्याच्या संदर्भातील योजना होती. त्या गाई खासदारांनी,आमदारांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी वाटून घेतल्या याबद्दल याच सदनामध्ये माननीय मंत्रिमहोदय, श्री. अजितदादा पवार यांनी पुढच्या अधिवेशनापर्यंत त्वरित कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिले होते त्याची अंमलबजावणी कुठपर्यंत आली ते सांगावे?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1081 ...

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या शेवटच्या प्रश्नाचे उत्तर माझ्याजवळ नाही. कारण तो वेगळा विभाग आहे. परंतु यामध्ये सन्माननीय सदस्यांनी काही अत्यंत महत्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. यामध्ये जे अहवाल आतापर्यंत आलेले आहेत मग तो इंदिरा गांधी इन्स्टिट्यूटचा असेल, टाटा सामाजिक संस्थेचा असेल किंवा डॉ. नरेंद्र जाधव यांचा असेल, त्यामध्ये आत्महत्येची जी काही कारणे दाखविण्यात आलेली आहेत त्यात शेती व्यवसाय न परवडणे हे कारण तर आहेच आणि ते अर्थशास्त्राशी निगडित आहे. त्यामुळे शेतकरी तणावात राहतो. त्यामुळे हे कारण तर आहेच. परंतु त्याचबरोबर काही जी दुसरी कारणे आहेत त्यात गृहकलह आहे, आजारपण आहे तसेच व्यसन सुध्दा आहे. अशा पध्दतीने त्या कुटुंबामध्ये दोन कारणे बऱ्याच वेळा एकत्र आल्यानंतर आत्महत्या घडलेल्या आहेत. ज्या घडलेल्या आत्महत्या आहेत त्यामध्ये हे कारण दिलेले आहे. सन्माननीय महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र दिलेले आहे आणि त्याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, याबाबतीत निश्चितपणे विचार करु. त्यांनी हे सांगितलेले आहे त्यामुळे तो प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी पाच प्रश्न विचारले.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एका वेळी एक प्रश्न विचारावा. मी उद्योगाच्या संदर्भातही सांगणार आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय हे जेष्ठ मंत्री आहेत. या ठिकाणी तिसऱ्या उपप्रश्नामध्ये उपाययोजना विचारलेली आहे. हा विदर्भ आणि मराठवाड्याचा अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मुख्य जी उपाययोजना आहे तिच्यावर फोकस करण्याची गरज आहे. जी छोटी मोठी कारणे आहेत त्यांना खूप हायलाईट करावयाचे आणि त्याचा जो गाभा आहे त्याकडे दुर्लक्ष करावयाचे ही नियत काही बरोबर नाही. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी ही गोष्ट आयडेंटिफाय करुन लाल किल्ल्यावरुन जाहीर केलेले आहे. माझ्याकडे भाषणाची अधिकृत प्रत आहे. त्यांनी सांगितले की, "Reasons are many, but the prime reason is non-facility of irrigation". कारणे छोटी-मोठी असू शकतात. दुर्दैवाने त्या कारणाचे निराकरण करण्याच्या बाबतीत उपाययोजनेत आपण ढांग नंबरवर आहोत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1081 ... प्रा. बी. टी. देशमुख .....

'ढांग' हा शब्द विदर्भातला विशेष शब्द आहे. आपण मला माफ करावे. सभापती महोदय, भौतिकमध्ये 1982 चा मराठवाडा आणि विदर्भाचा एक हेक्टरचाही अनुशेष दूर झाला नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी प्रश्न विचारतो. माननीय मंत्रिमहोदयांना थोडी माहिती देतो याचे कारण असे की, त्याच्याशिवाय त्या प्रश्नाचे उत्तर येणार नाही. आपण सभागृहामध्ये माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणात अनुशेष संपुष्टात आला अशी जी भूमिका घेतली ती बरोबर नाही. ती भूमिका अजिबात बरोबर नाही. 1982 चा विदर्भाचा कोटीमधील अनुशेष 527 कोटी रुपयांचा होता तो 1994 च्या सरासरीवर 4265 कोटी रुपयांचा झाला आणि 2007 च्या अधिकृत सरासरीवर तो 8524 कोटी रुपयांचा झाला. मराठवाड्याचा कोटीमधील अनुशेष 1982 मध्ये 260 कोटी रुपयांचा होता तो 1994 मध्ये 2770 कोटी रुपयांचा झाला आणि 2007 मध्ये 3951 कोटी रुपयांचा झाला. सर्वांचे तपशील मी सांगत नाही. जी गोष्ट रुपयात आहे तीच भौतिकमध्ये आहे. हेक्टरमध्ये विदर्भाचा अनुशेष दुप्पटीच्या वर गेला आणि मराठवाड्याचा अनुशेष जवळजवळ दुप्पट झ ाला. माझे असे म्हणणे आहे की, मुळात त्याला हात घाला. ज्यांच्याजवळ 10 एकर सिंचनाची सोय आहे तो माणूस आत्महत्या करावयास जात नाही आणि ज्याच्याकडे 10 एकर कोरडवाहू शेती असते तो सतत आत्महत्येच्या छायेत वावरत असतो. मेघांनी नुसता गडगडाट केला तरी त्याची छाती दडपून जाते. पाऊस जोरात आता तरी छाती दडपते. पाऊस आला नाही तरी छाती दडपते.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी प्रश्न विचारतो. मी आपला आभारी आहे की, आपण माननीय मंत्रिमहोदयांना हे सांगण्याची संधी मला दिली. माझा प्रश्न असा आहे की, 1982 चा रुपयातील अनुशेष 2000 पर्यंत दूर करावयाचा आणि 1994 चा रुपयातील अनुशेष 2009 पर्यंत दुरुस्त करावयाचा आणि नंतर लक्षात येते की तो नऊ-नऊ पटीने वाढतो. पहिली गोष्ट अशी की, भौतिकमध्ये अनुशेष दूर करा. दुसरी गोष्ट अशी की, आपण अधिकृत यंत्रणा नेमलेली आहे.

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1081 ... प्रा. बी. टी. देशमुख ...

कायद्याने यंत्रणा दिलेली आहे. जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 च्या कलम 20 मध्ये ही जबाबदारी त्या प्राधिकरणाक्रडे सोपविलेली आहे. त्यांनी आम्हाला रिपोर्ट दिलेले आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, भौतिक अनुशेष त्यांनी काढून दिलेला आहे तो कॅल्क्युलेट करुन दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुसरी बाब अशी की, दरवर्षी त्याचे अपडेटिंग केले पाहिजे. पैसे दिल्यामुळे काही अनुशेष कमी होतो. राज्याची सरासरी वाढल्यामुळे अनुशेष वाढत जातो. दरवर्षीचे अपडेटिंग केले पाहिजे. ते शासन करणार काय ? सभापती महोदय, असे माझे छोटे छोटे दोन प्रश्न आहेत.

**सभापती** : या प्रश्नांना छोटे प्रश्न कसे म्हणता येईल ?

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्याला न्याय मिळेल.

**सभापती** : त्यादृष्टीने मी आपल्याला पाच मिनिटे बोलण्याची संधी दिली.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे.

**सभापती** : एखाद्या नवख्या सदस्याला मी संधी दिली नसती आणि त्यामुळे त्यांच्यावर मी अन्याय केला असता.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1081....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे. आपण या प्रश्नाला 5 मिनिटांचा वेळ दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. एक म्हणजे विदर्भातील अनुशेषाचे दरवर्षी भौतिकदृष्ट्या अपडेटिंग होईल काय आणि भौतिकदृष्टया जेवढा अनुशेष आहे त्याचे निर्मूलन करण्यासाठीची उपाययोजना जाहीर केली जाईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.देशमुख यांनी महत्वाचा प्रश्न येथे उपस्थित केला आहे. सन 1999 ते 2004 या 5 वर्षांमध्ये मी या प्रश्नाला उत्तरे दिलेली आहेत. हे खरे आहे की, विदर्भाचा आर्थिकदृष्ट्या अनुशेष संपलेला आहे. परंतु भौतिकदृष्ट्या अनुशेष संपलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. कोणत्याही परिस्थितीत भौतिकदृष्ट्या अनुशेष दूर केला पाहिजे या मताचा मी आहे. त्यामुळे जलसंपदा विभागामार्फत या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये 7 हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. परंतु धरणे केल्यामुळे या विभागाचा अनुशेष संपत नाही. सिंचन क्षमता किती टक्के वाढू शकते याबाबत शासनाने विचार केलेला आहे. उलट जलसंधारणाचा कार्यक्रम करणे, पाणलोट विकासाचा कार्यक्रम करणे हे देखील महत्वाचे आहे. सध्या 16 टक्के सिंचन क्षमता आहे ती जास्तीत जास्त 25 ते 35 टक्क्यांपर्यंत वाढू शकेल. पण सगळयात मूलभूत कार्यक्रम हा जलसंधारणाचा आहे. म्हणून विविध कार्यक्रम घेतले आहेत. विदर्भ पाणलोट मिशन शासनाने सुरु केले आहे. ही कामे मशिन लावून पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. 3 लाख शेततळयांचा कार्यक्रम घेतला आहे, 40-50 हजार शेततळे आतापर्यंत पूर्ण करण्यात आले आहेत. एका बाजूला धरणांची कामे करीत असताना सुध्दा जलसंधारणाला महत्व दिलेले आहे. त्या शेतकऱ्यांना पाणी दिले पाहिजे. पण ज्यावेळी दोन पावसाचा ताण पडतो त्यावेळी एक पाण्याची तरी व्यवस्था असल्याशिवाय या शेतकऱ्यांची परिस्थिती बदलू शकत नाही या मताचा मी असल्यामुळे जलसंधारणाचा मोठा कार्यक्रम व गतीमान पाणलोटाच्या इतर योजना घेतल्या आहेत. पाणलोटाची वसुंधरा नावाची योजना सुरु केली असून त्याचे ऑनलाईन मॉनेटरिंग होणार आहे. ही केंद्र सरकारची योजना आहे. या सर्व उपाययोजना करीत आहोत. एका बाजूला धरणे पूर्ण करुन अनुशेष दूर करीत असताना, जलसंधारणाच्या योजना महाराष्ट्रामध्ये विशेषत: विदर्भामध्ये शासन मोठया प्रमाणावर राबवित आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1081....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, संपूर्ण नियोजनाच्या संदर्भातील हा विषय आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या अधिक होत आहेत. त्यामुळे या विषयाचे नियोजन करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी नियोजनातील महत्वाच्या भागाचा उल्लेख केला आहे. विदर्भाचा आतापर्यंत जो अनुशेष काढण्यात आला आहे तो आर्थिक निकषावर काढलेला आहे, त्यामुळे अनुशेष दूर झाला नाही उलट तो वाढलेला आहे. यासाठी शासनाने साधने उपलब्ध करुन दिली असली तरी उपाययोजना नीटपणे करीत आहोत असा त्याचा अर्थ होत नाही. साधने उपलब्ध करुन देण्यासाठी ज्या गोष्टींची गरज आहे ती म्हणजे अनुशेष आर्थिक निकषांवर न काढता भौतिक आधार घेऊन नव्याने अनुशेष काढून त्याप्रमाणे कामे उपलब्ध करुन दिली पाहिजेत. त्यानुसार सिंचनाची व इतर क्षेत्रातील कामांची व्यवस्था करु शकलो तर तो एक प्रभावी व चांगला उपाय होऊ शकतो. त्यादृष्टीने शासन धोरण जाहीर करील काय ? मंत्रिमहोदयांना हे धोरण आता जाहीर करता येत नसेल तर सभागृहात नंतर जाहीर करतो असे त्यांनी सांगितले तरी चालेल. त्याबाबत मंत्रिमंडळामध्ये चर्चा करावी. परंतु भौतिकदृष्ट्या विदर्भाचा अनुशेष दूर केला गेला पाहिजे. त्याप्रमाणे शासनाने धोरण जाहीर करावे अशी मी शासनाला विनंती करतो. शासन तसा निर्णय घेईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या मताशी मी सहमत आहे. धरणाच्या कामातून माध्यमातून असेल किंवा जलसंधारणाच्या कामांच्या माध्यमातून असेल, भौतिक अनुशेष दूर झाला पाहिजे. परंतु सर्व अनुशेष धरणांच्या कामातून भौतिक अनुशेष दूर होत नाही. त्यामुळे वेगळया मार्गाने हा अनुशेष काढावा लागेल. या दोन्ही विभागांचा भौतिक अनुशेष संपलेला नाही. आर्थिक आधारावरील अनुशेष संपलेला आहे. भौतिक आधारावरील अनुशेष दूर करण्याच्यादृष्टीने निश्चित कार्यवाही केली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, भौतिक अनुशेष काढण्यात आलेला आहे.

**सभापती** : सन्मामाननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, मंत्रिमहोदयांनी भौतिक उद्दिष्ट्य काढावयाचे आहे असे सांगितले आहे.

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1081....

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयावर अडीच तासाची चर्चा करण्याइतपत हा विषय मोठा आहे. त्यामुळे या विषयावर अडीच तासाची चर्चा घेण्यात यावी.

प्रा.बी.टी.देशमुख : अडीच तासाची चर्चा घेणे हा वेगळी गोष्ट आहे. सभापती महोदय, मंत्रिमहोदय प्रश्नांना उत्तरे देत नाहीत. माझ्या प्रश्नाला त्यांनी उत्तर देण्याचे टाळले आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी प्रश्न विचारला त्याला चुकीचे उत्तर दिले आहे. विदर्भाचा भौतिक अनुशेष दूर झालेला नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयावर अडीच तासाची चर्चा घेण्याची सरकारकडून तयारी असेल तर मग हा विषय अंतिम आठवडा प्रस्तावात रुपांतरित करण्यात यावा. या विषयावर उद्या चर्चा घेण्यात यावी.

**सभापती** : हा विषय अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये रुपांतरित करावयाचा असेल तर तो सन्माननीय सदस्यांचा हक्क आहे, आपण जर सांगितले तर त्याप्रमाणे हा विषय अंतिम आठवडा प्रस्तावात रुपांतरित केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अडीच तासाची चर्चा सन्माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केली असल्यामुळे ती उद्या घेण्यात यावी.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची सहमती असेल तर अडीच तासाची चर्चा जरुर घ्यावी.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:40

(ता.प्र.क्र. 1081...

**सभापती** : या प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारलेल्या पूरक प्रश्नांना माननीय मंत्री महादयांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या बाबतीत काही मर्यादा आहेत. या विषयाच्या संदर्भात सविस्तर चर्चा करावयाची असेल तर ती अन्य एखाद्या आयुधाच्या माध्यमातून होऊ शकते. या संदर्भात मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर तसेच सत्ताधारी पक्षाबरोबर चर्चा करुन या विषयी वेगळया माध्यमातून चर्चा कशी घेता येईल याचा प्रयत्न करीन.

प्रा. बी.टी.देशमुख : माझे म्हणणे एवढेच आहे की, भौतिक अनुशेष दूर करणे आणि दरवर्षीचा भौतिक अनुशेष अप-टू-डेट करणे यासंबंधीचे धोरण त्या दिवशी जाहीर करण्यात येईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात :भौतिक अनुशेषासंबंधीचे उत्तर मी दिलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. एक-दोन प्रश्नामध्ये या विषयासंबंधीचे उत्तर मिळू शकणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी यासंबंधीचे धोरण जाहीर करावे अशी शासनाला विनंती केली. या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे.

**सभापती** : दोन्ही बाजूचा आग्रह विचारात घेऊन मी याबाबतीत एक तासाची चर्चा घेण्याची तजवीज करीन. त्या वेळेत आपण जरुर ही चर्चा करावी. तथापि, हा प्रश्न मी राखून ठेवणार नाही. तो राखून ठेवण्याचे काही कारण नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : चर्चेच्या वेळी संबंधित मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहावे लागेल.

श्री. माणिकराव ठाकेर : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने सदनामध्ये एक तासाची चर्चा करावी अशी आपण सूचना केली त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. या विषयामध्ये दोन-तीन बाबींचा समावेश करावा लागेल. (1) विदर्भाकरिता स्थापन केलेल्या वैधानिक विकास मंडळाची मुदत पुढील वर्षी एप्रिल महिन्यामध्ये संपत आहे. ती वाढवून देण्यासंबंधीच्या मुद्याचा त्या विषयामध्ये समावेश असावा (2) भौतिक अनुशेष काढण्याच्या दृष्टीने चर्चा व्हावी आणि (3) एकूणच विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने धोरण जाहीर करावे. या तीन मुद्यांचा समावेश त्या चर्चेमध्ये असावा.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.1081...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की, या विषयी सर्वंकष चर्चा होण्याकरिता जो वेळ लागेल तो मी आपल्या बरोबर चर्चा करुन देईन.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माध्यमिक शाळांमध्ये पट संख्येनुसार वर्गाची मान्यता कायम ठेवण्याबाबत**

**(८) * १४१४ श्री.कपिल पाटील , श्री. व्ही.यु. डायगव्हाणे , श्री. जयंत प्र.पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५२४५६ ला दिनांक ३ जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी, २००९ अन्वये माध्यमिक शाळांतील तुकडी टिकविण्याकरिता आवश्यक विद्यार्थी संख्येचे विहीत करण्यात आलेले निकष प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील तुकडी टिकविण्यासाठी लागू करण्यासंबंधीचा निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, केव्हा, व केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) व (२) प्राथमिक शाळांसाठी शासन निर्णय दि.२९ मे, २००९ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले असून डोंगरी/दुर्गम/अतिदुर्गम आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक शाळा इ. ५ वी ते ७ वी वर्गाची एकूण उपस्थिती ३५ विद्यार्थी इतकी असावी तर बिगर आदिवासी क्षेत्रासाठी ५० विद्यार्थी इतकी असावी. तसेच उच्च माध्यमिक शाळांसाठी शासन निर्णय दि.२४ फेब्रुवारी, २००९ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले असून, त्यास दि. ७ सप्टेंबर, २००९ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा फॉलो-अपचा प्रश्न आहे. 3 जुलैला हा प्रश्न विचारला होता, त्यावेळी प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसंबंधीचा निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे, असे उत्तर देण्यात आले. आपण जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांच्या संदर्भात ही अट शिथिल केल्याचे म्हटलेले आहे. माझा प्रश्न हा खाजगी माध्यमिक आणि खाजगी उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थी संख्येची अट शिथिल करावी यासंबंधीचा आहे. 2 फेब्रुवारीला माध्यमिक शाळांकरिता ही अट शिथिल केलेली आहे. डोंगराळ, अतिदुर्गम भागात ही विद्यार्थी संख्या 15, ग्रामीण भागामध्ये 20 आणि शहरी भागामध्ये 25 आहे. म्हणजे दोन-तीन तुकड्यांच्या संदर्भातील निर्णय घेतलेला आहे. हाच निर्णय खाजगी प्राथमिक आणि खाजगी उच्च माध्यमिक तुकड्या टिकविण्याच्या संदर्भात घेण्यात येईल काय ? सभापती महोदय, भरमसाठ शाळांना मान्यता देण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे विनाअनुदानित शाळांची वाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. अनुदानित शाळांतील तुकडया रद्द होत आहेत. तेव्हा प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या तुकड्यांच्या संदर्भातील अट शिथिल करुन माध्यमिकच्या धर्तीवर विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्यात येणार आहे काय ?

..4..

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नामध्ये "खाजगी" शब्द दिसत नाही. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना नवीन निर्णय लागू केलेला आहे आणि तो सर्वांना मान्य आहे. खाजगी शाळांच्या बाबतीत सुध्दा तो लागू राहील.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1414............

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने विद्यार्थी संख्येचे निकष कमी करण्याचा जो आदेश काढला हा मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी आहे. त्यामागे भूमिका अशी आहे की, मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे गट किंवा संख्या शिथील होऊन तुकडी टिकेल. मराठी माध्यमांच्या शाळांची स्थिती आज ठीक आहे. अशाच प्रकारची परिस्थिती उच्च माध्यमिक व प्राथमिक शाळांसंदर्भात आहे. प्रश्नाचे उत्तर पाचवी ते सातवीच्या संदर्भात दिले आहे. पहिली ते सातवी आणि पहिली ते चौथीपर्यंतच्या शाळा या प्राथमिक शाळा म्हणून गणल्या जातात. पाचवी ते दहावी आणि आठवी ते दहावीपर्यंतच्या शाळा माध्यमिक शाळा म्हणून गणल्या जातात. तेव्हा पहिली ते सातवी आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी सुध्दा माध्यमिक शाळांप्रमाणे निकष लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन शासन आदेश निर्गमित करणार आहे का?

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा विचार केला जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, प्राथमिक आणि माध्यमिक या शाळांमधील तुकडया टिकविण्यासाठी कमीत कमी 25 विद्यार्थी असावेत असा शासनाचा निर्णय आहे. याठिकाणी विसंगत उत्तर दिले आहे. शासन निर्णय दिनांक 2 फेब्रुवारी, 09 नुसार उत्तर दिले आहे. शासन निर्णय दिनांक 29 मे, 09 हा दुर्गम आणि डोंगराळ भागासाठी लागू आहे. हे दोन्ही शासन निर्णय वेगवेगळे आहेत. अधिकाऱ्यांना याची जाणीव आहे. तुकडया टिकविण्यासाठी जे निकष आहेत ते एका वर्गासाठी 25, दोन वर्गासाठी 50, तीन वर्गासाठी 75 याप्रमाणे आहेत. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसाठी हे निकष लागू आहेत. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न हा उच्च माध्यमिक शाळांसाठी सुध्दा हा निर्णय लागू होईल का असा आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : शासनाने दिनांक 29 मे रोजी जो जी.आर.काढला त्यानुसार तुकड्यांची संख्या 20-15-15 अशी निश्चित केली होती. डोंगरी आणि दुर्गम, आदिवासी भागातील शाळांसाठी 15-15-10 अशी संख्या निश्चित केली होती. आतापर्यंतच्या काळात बिगर आदिवासी क्षेत्रातील पाचवी ते सातवी पर्यंतच्या शाळांसाठी हे निकष 20-20-15 असे निश्चित केले आहेत. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न उच्च प्राथमिक शाळांबद्दलचा आहे. त्याबाबत जो निर्णय घेतला त्याला स्थगिती दिली आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्याचे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठरले आहे. सन्माननीय सदस्यांसमवेत बैठक आयोजित करुन आपल्या सूचना विचारात घेऊन निर्णय घेतला जाणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, तुकडया टिकविण्यापुरता हा विषय आहे. यामुळे नवीन आर्थिक भार पडणार नाही. शासनाने माध्यमिक शाळांबाबत जो जीआर काढला तो जशाच्या तसा प्राथमिक शाळांसाठी लागू केला तर प्रश्न मिटेल. यामध्ये कोणतीही अडचण नाही. मंत्रीमहोदयांनी तसे जाहीर करावे. आर्थिक भार काहीही पडणार नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : याबाबत निर्णय होता तो उच्च माध्यमिक शाळांच्या तासिकेबाबत होता. त्यामध्ये काही प्रश्न निर्माण झाले. म्हणून बैठक आयोजित करुन निर्णय घेतला जाईल.

--------

**तारांकित प्रश्न क्रमांक-1788**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील तंबाखु उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना न्याय मिळणेबाबत**

**(१०) * ५३८ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री.केशवराव मानकर, श्री. मधुकर चव्हाण :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंबाखु उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना विशेष भत्ते व इतर सोयी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शासनाने गेल्या दहा ते बारा वर्षापासून कामगारांच्या हितासाठी कोणतीही सुधारणा केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाण्याच्या तंबाखू उद्योगातील कामगारांना विशेष भत्ता म्हणून १४ रुपये ५८ पैसे प्रति दिवस व तंबाखुपासून बिडी निर्माण करणाऱ्या कामगारांना मात्र हा दर रुपये ४० प्रति दिवस प्रमाणे देण्यात येत असून हे दोन्ही उद्योग तंबाखु उद्योगांतर्गत येत असून त्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना वेगवेगळा दर लावण्यात येत असल्याने त्यांच्यावर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्योगात काम करणाऱ्या कामगारांसाठी किमान वेतन अधिनियम अंतर्गत विशेष भत्ते व वेतन वाढीसाठी समिती गठीत करुन कामगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन कार्यवाही करणार आहे काय वा करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पद्माकर वळवी, श्री.हसन मुश्रीफ यांच्याकरिता** : (१) किमान वेतनाचे दर निश्चित असून विशेष भत्त्यात प्रत्येक सहा महिन्यानंतर म्हणजेच वर्षाच्या सुरुवातीला १ जानेवारी व १ जुलै ला वाढ करण्यात येते.

(२) खाण्याचा तंबाखू व बिडी निर्माण हे दोन्ही अनुसुचित व्यवसाय तंबाखुशी निगडीत असून कामाचे स्वरुप भिन्न असल्याने किमान वेतनाचे दर तसेच विशेष भत्त्याचे दर वेगळे वेगळे आहेत.

(३) किमान वेतन निश्चितीसाठी शासनाने दि.३०/९/२००६ अन्वये महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार समिती गठित केली असून, समितीच्या सल्ल्याने वेतनाचे दर निश्चित केले जातात. विशेष भत्त्याचे दर ग्राहक मूल्य निर्देशांक विचारात घेऊन निश्चित करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ता.प्र.क्र.५३८.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. उत्तर क्रमांक-३ मध्ये "समिती" या शब्दाऐवजी "मंडळ" असे वाचावे. बाकी उत्तर छापल्याप्रमाणे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यातील तंबाखू उद्योगातील कामगारांना विशेष भत्ता म्हणून रु.१४.५८ प्रती दिवस मोबदला मिळतो तर तंबाखूपासून बिडी तयार करणाऱ्या कामगारांना दर दिवशी ४० रुपये भत्ता दिला जातो. तंबाखूच्या व्यवसायातील एकाच उद्योगात काम करणाऱ्या दोन प्रकारच्या कामगारांना मिळणाऱ्या मोबदल्यामध्ये तफावत आहे. तंबाखू उद्योगातील कामगार आणि विडी तयार करणारे कामगार हे एकाच प्रकारच्या उद्योगातील कामगार आहेत.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K-1

PFK/ KGS/ ST/ पूर्वी श्री. भोगले...... 11:50

ता.प्र.क्र.538....... श्री पांडुरंग फुंडकर ....

एका कामगाराला 14 रुपये आणि दुसऱ्या कामगाराला 40 रुपये मजुरी दिली जाते ही तफावत असण्याचे कारण काय ? तसेच ती दूर करण्याचा विचार शासन करणार काय ?

पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, खाण्याची तंबाखू आणि विडी बनविणारे कामगार असे हे दोन अनुसूचित उद्योग तंबाखूशी निगडीत असले तरी त्यांच्या कामाचे स्वरुप भिन्न आहे. त्यामुळे त्यांचे किमान वेतन व विशेष भत्त्याचे दर वेगवेगळे आहेत. तसेच यासंबंधी जे सल्लागार मंडळ शासनाने नेमलेले आहे ते मंडळ शासनाला वेतन पुनर्निर्धारणाबाबत शिफारशी करीत असते त्यानुसार शासन ते वाढवून देण्याबाबतचा निर्णय घेत असते. किमान वेतनाचे दर वाढविण्याच्या संदर्भात प्रत्येक पाच वर्षांनी आढावा घेतला जातो व ती प्रक्रिया सुरुच असून त्यानंतर शासन हे वेतन वाढविण्यासंबंधीच्या शिफारशींचा विचार करील.

श्री पांडुरंग फुंडकर : या कामगारांना जे किमान वेतन मिळते ते 14.58 रुपये एवढे आणि विडी कामगाराला मात्र 40 रुपये वेतन दिले जाते. त्याचे कारण सांगून ही तफावत शासन दूर करणार काय ? त्याचप्रमाणे वेतन सल्लागार मंडळाकडून या दोन्ही कामगारांच्या वेतनात ही तफावत ठेवण्याची कारण काय ? ही तफावत शासन दूर करणार काय ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, तंबाखूशी निगडीत हे दोन्ही उद्योग असले तरी त्यांच्या कामाचे स्वरुप भिन्न आहे. दोन्ही उद्योगातील कामाची पध्दत वेगवेगळी आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी सूचना केली त्यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, या कामगारांना किमान वेतन सल्लागार मंडळामध्ये मालक प्रतिनिधी, कामगारांचे प्रतिनिधी तसेच एनजीओ यांच्या माध्यमातून चर्चा करुन जी शिफारस अंतिमत: मान्य होईल त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासाठी शासनाने दि. 30 जून 2006 रोजी किमान वेतन सल्लागार मंडळाची नियुक्ती केली आहे तेव्हापासून आजपर्यंत या मंडळाच्या किती बैठका झाल्या ? तसेच किमान वेतन निश्चित करण्याच्या संदर्भात त्या मंडळाने कोणकोणत्या शिफारशी केल्या ?

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.538.......

श्री. पद्‌माकर वळवी : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारल्यानुसार या मंडळाच्या किती बैठका झाल्या त्यासंबंधीची माहिती घेऊन ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन. तसेच वेतन पुनर्निर्धारणाच्या संदर्भात जी कार्यपध्दती अंमलात येईल त्यानुसार जो मसुदा समोर येईल त्या अनुषंगाने शासन विचार करील.

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने बताया है कि किमान वेतन निश्चित करने के लिए एडवायजरी कमेटी बनाई गई है. मेरी जानकारी के अनुसार यह कमेटी अस्तित्व में नहीं है. इस बारे जांच करके क्या हमें सही जानकारी दी जाएगी ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि क्या महाराष्ट्र शासन द्वारा निश्चित किया गया मिनिमम वेजस इन मजदूरों के लिए लागू होता है या नहीं और वह मिनिमम वेजस उनको मिल रहा है या नहीं मिल रहा है ?

श्री. पद्‌माकर वळवी : महोदय, तंबाखू उद्योगामध्ये जोपर्यंत सल्लागार मंडळाची नवीन वेतन व भत्ते पुनर्निर्धारणाची प्रक्रिया पूर्ण होत नाही तोपर्यंत प्रचलित दरानेच ही मजुरी दिली जाते. तसेच सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेली बाब मी तपासून घेतो.

--------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सन 2004 पासून खाजगी अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक व प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव

(11) * 1385 **श्री. व्ही.यु. डायगव्हाणे , श्री.कपिल पाटील , श्री. जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 50456 ला दिनांक 3 जून, 2009 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्री मंडळासमोर सादर करण्यात आला आहे काय,

(2) असल्यास, प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व या प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(3) अद्याप प्रस्ताव सादर केला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) व (2) होय. या संदर्भातील प्रस्ताव दि.22 जानेवारी, 2008 रोजी झ ालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. बैठकीतील निर्णयानुसार वेतनेतर अनुदानाचे नवीन सूत्र निश्चित करण्याकरिता मंत्रिमंडळ उप समिती गठित करण्यात आली असून वेतनेतर अनुदानाच्या नवीन सुत्रासंदर्भात मंत्रिमंडळ उप समितीचा अहवाल तसेच या संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ ST/ KGS/ SBT/

11:55

ता.प्र.क्र.: 1385..

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, शहरी आणि ग्रामीण भागातील शाळांच्या अस्तित्वाचा हा प्रश्न आहे. वेतनेतर अनुदान 31 मार्च, 2004 पासून संपूर्णपणे बंद करण्यात आलेले आहे. सन 2008-09 मधील एका वर्षात हा प्रश्न जवळ जवळ 4-5 वेळेस हा प्रश्न सभागृहात आलेला आहे. प्रत्येक वेळेला बघू-पाहू असेच उत्तर मिळालेले आहे. शाळा चालवायची असेल, गुणवत्ता टिकवायची असेल नॉन सॅलरी ही दिली गेलीच पाहिजे. नॉन सॅलरी 4 वर्षापासून बंद केल्यामुळे प्रयोगशाळा, गंथालय, फर्निचर खरेदी करण्याचे काम बंद आहे. प्रश्न एवढाच आहे की, आपण किती वेळेस उपसमितीचे उत्तर आम्हाला सांगता? उपसमितीचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे असे आपण म्हटलेले आहे. एक महिन्याच्या आत उपसमितीचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्यात येईल आणि किमान दोन महिन्यात वेतनेतर अनुदान देण्याच्या संदर्भातील पॉझीटीव्ह निर्णय घेण्यात येईल असे उत्तर आपण देणार आहात काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शासनाने सन 2004 रोजी वेतनेतर अनुदान बंद केले होते. परंतु वेतनेतर अनुदानाची मागणी सातत्याने वाढत गेल्यामुळे मंत्रीमंडळाने यासंदर्भात एक उपसमितीचे गठण केले. या समितीमध्ये शालेय शिक्षण मंत्री,सहकार मंत्री, वित्त व नियोजन मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण राज्य मंत्री, राज्यमंत्री वित्त व नियोजन यांनी यासंदर्भात अभ्यास केल्यावर अभ्यास दिलेला असून त्यामध्ये खर्चाची सर्व माहिती सुध्दा दिलेली आहे. मागचे आर्थिक देणी द्यावयाची असेल तर त्यासाठी 572 कोटी रुपये लागणार आहे. माध्यमिकचा आणि उच्च माध्यमिकचा दर वर्षाचा भार 266 कोटी व 72 कोटी रुपये पडणार आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या वेतन अनुदानाच्या 5 टक्क्याची शिफारस या समितीने केलेली आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु असून तो लवकरात लवकर मंत्रीमंडळापुढे आणण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 1385..

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाच्या संदर्भातील प्रश्न सरळ आणि साधा आहे. आतापर्यंत हा प्रश्न सभागृहात अनेकवेळा विचारला गेलेला आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील शाचविणे अशक्य झालेले आहे. शाळांचे दर आता व्यापारी वर्गात टाकलेले असल्यामुळे अशा परिस्थितीत शाळा कशा चालऊ शकतात? आपण 5 टक्क्याची जी शिफारस केलेली आहे ती शिफारस आम्ही गेल्या दोन वर्षापासून ऐकत आहोत. दोन वर्षापासून आपण या शिफारशींची अंमलबजावणी करीत नाही. त्यामुळे आपण वेतनेतर अनुदान देण्याचा निर्णय दोन महिन्यात करणार काय? गेल्या दोन वर्षापासून शाळांना शासनाने एक रुपया सुध्दा दिलेला नाही. त्यामुळे सन 2004 च्या अगोदरची मागची थकबाकी देण्याच्या संदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन करावे व 5 टक्क्याचा जो निर्णय आहे त्याची अंमलबजावणी नंतर केली तरी चालेल. त्यामुळे मागची थकबाकी आजच्या आज दिली जाणार आहे काय याची माहिती मंत्रीमहोदयांनी सदनाला द्यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने गंभीरपणे विचार केल्यामुळेच उपसमितीचे गठण करण्यात आलेले आहे.

( सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सर्व सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलले तर मंत्रीमहोदयांना काय सांगायचे ते आपल्याला कसे काय कळेल ? कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेबांनी प्रश्न विचारावा.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी लवकरात लवकर असे उत्तर दिलेले आहे त्यामुळे लवकरात लवकर म्हणजे नक्की किती दिवसात हा अहवाल मंत्रीमंडळापुढे आणला जाणार आहे? सन्माननीय गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापक मंडळाचे एक शिष्टमंडळ राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटले होते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1385.. प्रा.बी.टी.देशमुख........

त्याचे लेखी मिनिटस माझ्याकडे आहेत. ही चूक झालेली असून वेतनेतर अनुदान ताबडतोब सुरु करण्यात येईल असे त्यावेळी सांगितले होते. 2004 साली अनुदान बंद होण्याच्या पाच वर्षे अगोदर उत्तर दिलेले होते. रामकृष्ण मोरे यांनी त्यावेळी उत्तर दिले होते. आता रामकृष्ण मोरे आणि गोविंदभाई श्रॉफ हे दोघेही हयात नाहीत. हे उत्तर देऊन किती वर्षे झाली होती हे आपल्याला कळावे याकरिता मी ही नावे सांगितलेली आहेत. ही अत्यंत संकोच वाटणारी गोष्ट आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी एका ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकाला लेखी उत्तर दिले होते. त्याचबरोबर सभागृहातसुध्दा प्रा.रामकृष्ण मोरे आणि उच्च शिक्षण मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी उत्तर दिले असून त्याचे मिनिटस माझ्याकडे आहे ते मी वाचून दाखविले होते . ते मिनिटस मी आतासुध्दा वाचून दाखवतो. त्यावेळी उत्तर देतांना त्यांनी " होय " असे उत्तर दिले होते. या संदर्भातील प्रश्न विचारण्यास आम्हाला संकोच वाटतो तरीसुध्दा उत्तर देण्याचा संकोच वाटत नाही ही संकोचाची गोष्ट आहे. या निमित्ताने माननीय सदस्यांनी स्पष्टपणे विचारले होते की,माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केल्याप्रमाणे ,तुम्ही वारंवार लेखी लिहून दिल्याप्रमाणे आणि सभागृहामध्ये डझनावारी उत्तर दिल्याप्रमाणे एक महिन्यात यासंबंधी पॉझिटीव्ह निर्णय घेण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्रीमहोदय जर देणार नसतील तर आपला निषेध करुन आम्ही सभात्याग करु. आम्ही माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांना प्रश्न विचारत आहोत परंतु इंग्लड मधील मंत्री महोदयांना प्रश्न विचारल्यासारखे आम्हाला वाटावयास लागले आहे. माननीय मंत्रीमहोदयांना खेडे माहीत नाही काय ? म्हणून माझा त्यांना असा प्रश्न आहे की, एक महिन्यात पॉझिटीव्ह निर्णय घेण्यात येईल असे स्पष्टपणे उत्तर माननीय मंत्री महोदय देणार नसतील तर आम्ही निषेध करुन सभात्याग करतो.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यासंबंधीचा निर्णय मंत्रीमंडळ घेणार आहे त्यामुळे मंत्री मंडळाने पॉझिटीव्ह निर्णय घ्यावा हे मला कसे सांगता येईल.

**सभापती** : त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, त्या दृष्टीने माझा प्रयत्न निश्चितच राहील.

एक सन्माननीय सदस्य : एक महिन्यात यासंबंधीचा पॉझिटीव्ह निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1385..

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( काही सन्माननीय सदस्यांनी सभात्याग केला )

**सभापती** : या प्रश्नाच्या संदर्भात माझ्या दालनात बैठक बोलाविण्याची मी व्यवस्था करतो. प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी : अतारांकित प्रश्नोत्तरांची सोळावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची सोळावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची सोळावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : **लेखी उत्तरे**

मु.शी. : **तारांकित प्रश्नासंबधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे**

श्री.पद्माकर वळवी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " असंघटीत कामगारांसाठी राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना राबविण्याबाबत " या विषयावरील सर्वश्री सजय दत्त, सय्यद जमा, प्रतापसिंह मोहिते - पाटील,राजन तेली, वि.प.स. व सर्वश्री सुधाकर गणगणे ,शरद रणपिसे, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 8 एप्रिल 2008 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 37302 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्रीमती फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितचा सन 2006-2007 चा तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.राजेंद्र दर्डा (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादिचा सन 2006-2007 व 2007-2008 चा अनुक्रमे एकोणतिसावा व तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन 2007-2008 चा लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा 2008-2009 चा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व जयंत प्र.पाटील यांनी "अशासकीय अनुदानित द्विलक्षी कनिष्ठ महाविद्यालयात पदव्युत्तर अर्हता असलेल्या पूर्णवेळ शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगानुसार निश्चित केलेली वेतनश्रेणी सहावा वेतन आयोग लागू करताना ती लागू न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 11 डिसेंबर 2009 रोजी नवी मुंबईतील पामबिच मार्गावरदोन शाळांच्या स्कूल बसची टक्कर होऊन दोन्ही बसमधील दहा विद्यार्थी व दोन शिक्षिका गंभीर जखमी होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ,अकोला यांनी दिनांक 20 नोव्हेंबर 2009 रोजी राज्यात आणि राज्याबाहेर प्रक्रियाकरावयाच्या मालाची ने-आण करण्यासाठी काढलेल्या निविदेत संशयास्पद व्यवहार होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "मौजे परखंदे, जिल्हा रायगड येथील नळ पाणीपुरवठा योजना गेल्या दीड वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून सुरळीत सुरू नसून सद्य:स्थितीत बंद असल्याने ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "फुकेरी ता. दोडामार्ग येथील जंगली भागात ग्रॅनाईट खाणीत शक्तिशाली सुरूंग स्फोट होत असल्याने ग्रामस्थांच्या जीवास धोका होऊन त्यांच्यात घबराट निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन

..... एन 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, पाशा पटेल यांनी "राज्यातील सेवा खंडित हजेरी सहाय्यकांना सेवा ज्येष्ठतेनुसार शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबतची माहिती माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 20 जून, 2009 रोजी मागूनही ती न्यायालयात अद्यापपर्यंत सादर न करणे, तसेच सदर यादीत विभागाने मोठ्या प्रमाणावर फेरफार करून अनियमितता करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, केशवराव मानकर, अशोक मानकर यांनी "नागपूर प्रादेशिक योजनेत नागपूर शहराच्या सीमेलगत असलेल्या एक्सप्रेस वे च्या बाह्य हद्दीपासून 5 कि.मी. अंतरावर असलेल्या गावठाणापासून 750 मीटर अंतरापर्यात रहिवास वापर अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक 29 मार्च 2008 रोजीपासून शासनाकडे प्रलंबित असणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "26/11च्या हल्ल्याप्रकरणी हेडलीची चौकशी करणाऱ्या खान, मुफ्ती सुफी, रसूल इत्यादी हैद्राबादी तरूणांनी भारतात अतिरेकी कारवाया करण्यासाठी हेडलीला मदत केली असून त्यात देशातील नामवंत व्यक्तींना ठार मारण्याची योजना आखून मोठ्या प्रमाणावर हिंसाचार घडवून आणण्याचा उद्देश आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "राज्य हातमाग महामंडळाकडून शासनाला पुरविण्यात येणारे कापड विणकराकडून न घेता खुल्या बाजारातून विकत घेऊन शासकीय व निमशासकीय कार्यालयांना पुरविण्याबाबतच्या व्यवहारात कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत

......एन 3 ...



KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 12:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते व चंद्रकांत पाटील यांनी "नालासोपारा, जिल्हा ठाणे येथे दिनांक 13.12.2009 रोजी सिद्धीविनायक ज्वेलर्स या दुकानावर तसेच नायगाव येथील ज्वेलर्सच्या दुकानावर दरोडा पडणे, दरोड्यातील आरोपींना अद्याप अटक न केल्याने परिसरातील कायदा व सुव्यवस्था बिघडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

या शिवाय नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना मी माझ्या दालनात अनुमती नाकारली आहे.

यानंतर नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने होतील.

(यानंतर श्री.सरफरे .... ओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानतर्फे आलेला निधी खर्च न होणे

**मु.शी.**: राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानतर्फे आलेला निधी खर्च न होणे बाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी "राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानतर्फे आलेला निधी खर्च न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानतर्फे महाराष्ट्र राज्यासाठी करोडो रुपयांचा निधी दरवर्षी येत असतो. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये सन 2005 ते 2009 पर्यंतची प्राप्त झालेल्या व खर्च झालेल्या निधीची आकडेवारी दिली आहे. त्यावर आपण जर दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्या लक्षात येईल की, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानतर्फे मिळणारा निधी विविध कामांसाठी वापरला जातो. त्यामध्ये उपकरणे खरेदी करणे, जननी सुरक्षा योजना, इमारत बांधकाम व दुरु स्ती इत्यादी योजनांसाठी वापरला जातो. परंतु हा निधी खालपर्यंत पोहोचविला जात नाही हे दुःख आहे. गेल्या वर्षी मोठया प्रमाणावर आलेला निधी खर्च झाला नाही. हा निधी खर्च न झाल्यामुळे पुढील वर्षी मिळणाऱ्या निधीला कट लावला जातो अशी माझी माहिती आहे. गेल्या वर्षी मिळालेल्या 800 कोटींपैकी 600 कोटी रुपये खर्च झाले. यावर्षी 600 कोटी रुपये मिळणार आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, हा निधी खर्च करण्यासाठी आपण कोणत्या प्रकारची मॉनिटरींग ॲथॉरिटी करणार आहात? दुसरा प्रश्न असा की, याकरिता आरोग्य भवनमध्ये कार्यालय असून त्याठिकाणी आयएएस दर्जाचा अधिकारी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान योजनेचे व्यवस्थापकी संचालक म्हणून काम पहातात. त्यांच्या हाताखाली एकच शासकीय अधिकारी असून बाकीचे सर्व कर्मचारी हे कंत्राटी पध्दतीवर ठेवण्यात आले आहेत. करोडो रुपयांचा निधी आपण कंत्राटी माणसांमार्फत खर्च करणे चुकीचे असल्यामुळे तो योग्य व्यक्तिमार्फत खर्च केला जाईल काय? तशाप्रकारची भूमिका शासन घेईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान संदर्भात दोन प्रश्न उपस्थित केले. सभापती महोदय, केंद्र सरकारकडून या योजनेसाठी आपल्याकडे पैसे येतात ही गोष्ट खरी आहे. त्यामध्ये राज्य शासनाचे 15 टक्के कॉंट्रिब्युशन असते. आपण जर आकडेवारी पाहिली तर सन 2005, 2006 आणि 2007 मध्ये खूप कमी निधी केंद्र सरकारकडून प्राप्त झाला. सन 2007-08 व 2008-09 मध्ये दुप्पट निधी मिळाला. महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकार मिळून प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करते. यावर्षी ऑक्टोबर 2009 पर्यंत 375 कोटी रुपये खर्च झाले व शिल्लक रक्कम 469 कोटी असल्यामुळे नोव्हेंबरपर्यंत 102 कोटी खर्च केले. बाकीचे 367 कोटी रुपये मार्च अखेरपर्यंत खर्च करण्यात येतील. माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, सन 2010-11 चा प्रकल्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. सुरेश शेट्टी..

अंमलबजावणी आराखडा तयार करीत असून तशाप्रकारचा रिॲलिस्टिक प्लॅन तयार करुन तो केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. यापूर्वी खूप मोठा कार्यक्रम तयार करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे यापुढे सिलेक्टेड आठ ते दहा फिल्डमध्ये आपण काम करणार असल्यामुळे तशाप्रकारचा प्रोजेक्ट तयार करुन तो केंद्र सरकारकडे पाठविल्यानंतर केंद्र सरकारकडून त्यासाठी आपल्याला निधी मिळेल अशाप्रकारचे आश्वासन मी आपणास देतो. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मॉनिटरींगबाबत दुसरा प्रश्न विचारला. गेल्या पाच-सहा दिवसापासून प्रत्येक जिल्हानिहाय राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानचा आढावा घेतला, बैठका घेतल्या. आणि प्रत्येक जिल्हयामध्ये करावयाच्या सुधारणासंबंधी संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे गोरगरीबांसाठी हे पैसे खर्च करुन आपण हा कार्यक्रम राबवीत आहोत. त्यासाठी मॉनिटरींग यंत्रणा सक्षम करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी कंत्राटी लोकांकडे हे काम दिले जाते असे विचारले आहे. आपण या योजनेतील पैसे हे डायरेक्ट जिल्हयातील सोसायटीला देतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:15

श्री.सुरेश शेट्टी . . . .

आणि जिल्ह्याच्या ठिकाणी तेथील सी.ई.ओ.हे संपूर्ण कार्यक्रमाच्या बाबतीत सुपर्विझन करतात. या बेसिक एन.आर.एच.एम.चा उद्देश असा आहे की, ग्रामीण भागामध्ये जे काम करतात, त्यांना डायरेक्ट पैसे द्यावयाचे आणि याबाबतीत शासन फक्त सुपर्विजन व मॉनेटरींग करते. त्यामध्ये काही चूक आढळली तर आपण त्याबाबतीत कारवाई करु हे मी सन्माननीय सदस्यांना स्पष्टपणे सांगू इच्छितो.

----

. . . .पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नक्षलग्रस्त भागातील शिक्षण सेवकांची नियुक्ती तीन वर्षासाठी करणे.

**मु.शी.**: नक्षलग्रस्त भागातील शिक्षण सेवकांची नियुक्ती तीन वर्षासाठी करण्याबाबत सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील,कपिल पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "नक्षलग्रस्त भागातील शिक्षण सेवकांची नियुक्ती तीन वर्षासाठी करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो."

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग, नागपूर येथील शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्तीबाबतचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील सर्व विभागात शिक्षण सेवकांची नियुक्ती ही दि.13-10-2000 च्या शासन निर्णयाप्रमाणे तीन वर्षासाठी केली जाते. परंतु आपण फक्त नागपूर विभागासाठी असा दुजाभाव का ठेवला आहे ? पहिल्यांदा दि. 2006-2007 रोजी दहा महिन्यासाठी नियुक्ती दिली. त्यानंतर 2007-2008 रोजी एक वर्षासाठी नियुक्ती दिली.शेवटी संबंधितांना कोर्टामध्ये जावे लागले आणि ग्रिव्हेन्स् कमिटीने असा आदेश दिला की,संबंधितांना पुढील आदेशापर्यंत तेथून हटविता येणार नाही, कमी करता येणार नाही. आता आपल्यासमोर ग्रिव्हेन्स् कमिटीचा आदेश आहे, शालेय शिक्षण विभागाचा जी.आर.आहे. इतर सर्व विभागांमध्ये तीन वर्षाशिवाय नियुक्ती देताच येत नाही. मग ही बाब नागपूर करताच का करण्यात आली ? ठाण्यामध्ये, अमरावतीमध्ये तीन वर्षासाठी शिक्षण सेवकाची नेमणूक केली आहे. एकंदर 48 पदे रिक्त असून सध्या त्यातील 35 पदे भरलेली आहेत. परंतु हे लोक कुठे काम करीत आहेत हे पाहिले पाहिजे. हे 35 शिक्षक गडचिरोली आणि देवरी यासारख्या दूर्गम भागातील, नक्षलग्रस्त एरियातील 20 शाळांमध्ये काम करतात. तेथे कोणीही काम करण्यास तयार नाहीत, तेथे काम करीत आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय,माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या लोकांची शासनाच्या जी.आर.प्रमाणे 2006-2007 पासून नियुक्ती केलेली आहे. तसेच त्यांना खंड न देता सलग त्यांना 2006-2007, 2007-2008 व 2008-2009 अशी तीन वर्षे धरुन आणि त्यांचा कार्यकाल पूर्ण झाला आहे असे समजून यांना पूर्णवेळ शिक्षक म्हणून कायम केले जाईल काय ? बाकीच्या शिक्षकांचे जेव्हा व्हावयाचे असेल तेव्हा केले जाईल. म्हणून त्यांना तुटक-तुटक अशा प्रकारे न करता, नियमाप्रमाणे त्यांचा शिक्षण सेवकाचा कालावधी ज्यांनी पूर्ण केला असेल तर त्यांना शिक्षक म्हणून आणि ज्यांनी असा कालावधी पूर्ण केला नसेल त्यांना तीन वर्षाची ऑर्डर देणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंदर्भात मी निवेदनामध्ये संपूर्ण विवेचन दिलेले आहे. पूर्वी सरळ सेवेमध्ये पदोन्नतीने पद मिळत नव्हते, आता तशा प्रकारच्या जागा रिक्त झालेल्या आहेत. त्यामुळे या 30 लोकांना सामावून घेतले जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) P-4

APR/ SBT/ KTG/ 12:15

**पृ.शी.**: भाषा संचालनालयात सहा वर्षापासून भाषा

संचालकाचे पद रिक्त असणे

**मु.शी.**: भाषा संचालनालयात सहा वर्षापासून भाषा संचालकाचे पद रिक्त असणे याबाबत ॲड. अनिल परब,श्री.परशुराम उपरकर यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, ॲड.अनिल परब,सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "भाषा संचालनालयात सहा वर्षापासून भाषा संचालकाचे पद रिक्त असणे" याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .पी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण स्वत: या निवेदनामध्ये लक्ष घातले तर या राज्यामध्ये मराठीची दुर्दैवी परिस्थिती काय आहे हे आपल्या लक्षात येईल. हे राज्य मराठी आहे,

राज्यभाषा मराठी आहे, राजभाषा नाही. या महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी भाषा संचालनालयाला गेली सहा वर्षे मराठी उमेदवार मिळत नाही ही शोकांतिका आहे. या राज्यामध्ये मराठी शिकलेले असे उच्च शिक्षित उमेदवार नाहीत काय ? असा प्रश्न निर्माण होतो. आपण राज्यभाषा संचालनालय अतिशय पोरके केलेले आहे. ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. या विषयाच्या संदर्भातील नाकर्तेपणा मुळे माझ्याकडे तीन फाईल्स् भरलेल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या, नगरपालिकेच्या,शासनाच्या मुंबईच्या प्रत्येक वर्तमानपत्रामध्ये मराठीमधून जाहिराती आल्या पाहिजेत. असे असताना सुध्दा भाषा संचालनालयामध्ये कोणी मराठी नसल्यामुळे त्या जाहिराती इंग्रजीमध्ये येत आहेत. ही बाब चुकीची आहे. आपल्याला भाषा संचालक मिळत नाहीत म्हणून तेथे जे होते, त्यांना परत एक वर्षासाठी पद दिले. या पदासाठी जे 12 उमेदवार आले होते, ते योग्य नाहीत असे सांगण्यात आले आणि दुसरीकडे आता शासनाचे अयोग्य उमेदवार या कामाचा भार सांभाळत आहेत. यानंतर दोन विषय महत्वाचे आहेत. या पदासाठी कोणती अर्हता असावयास पाहिजे ? तसेच आपल्याला या पदासाठी उमेदवार का मिळत नाहीत ? निवेदनामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे विधेयकाचा मराठी आणि हिंदी अनुवाद हा काय विषय आहे हे मला कळलेले नाही. सभापती महोदय, आपल्याकडे विधेयक मराठी मधूनच येतात. या राज्यामध्ये हिंदीचा काही संबंध आहे काय ? विधेयके मराठी आणि इंग्रजी या दोन भाषेतच येतात. सन्माननीय सदस्यांना मराठी आणि इंग्रजी भाषेमध्येच विधेयके दिली जातात. असे असताना निवेदनामध्ये दिलेले आहे की,"कारभार ठप्प झालेला आहे हे सांगताना ही बाब गंभीर आहे. याठिकाणी म्हटलेले आहे की, "यासंदर्भात नमूद करण्यात येत आहे की,भाषा संचालक हे पद जरी नियिमित भरले नसले तरी आम्ही गाडा ओढत आहोत. कसा ? भाषा संचालनालयाव्दारे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या मराठी व हिंदी भाषेच्या परीक्षांचे आयोजन, पण हिंदी भाषेच्या परीक्षेचे आयोजन कशासाठी हे मला काही कळलेले नाही. कारण जे बिगर मराठी आहेत, त्यांची मराठी भाषेची परीक्षा घेतो.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

ते तीन वेळा नापास झाले तर त्यांची पुढची पगारवाढ थांबवून ठेवण्यात येते. त्यामुळे त्यांना ती परीक्षा पास व्हावे लागते. मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षांचे आयोजन, विधानमंडळात सादर करण्यात येणाऱ्या विधेयकांचा मराठी व हिंदी अनुवाद तसेच अर्थसंकल्पाचा मराठी अनुवाद, अधिसूचना, अधिनियम, नियम निरनिराळे अहवाल यांच्या इंग्रजी मजकुरांचा मराठी अनुवाद, परिभाषा कोशाच्या पुनर्मुद्रणाचे काम ही कामे नियमितपणे चालू आहेत."म्हणजे शासकीय कामकाजात हिंदीचा काय संबंध आहे हे मला समजले नाही, असेल तर या ाबत जे रामायण या मुंबई आणि महाराष्ट्रात घडत आहे त्यासंदर्भात शासन आतापर्यंत उत्तर कां देऊ शकले नाही हा ही प्रश्न आहे. सभापती महोदय, हे अनुचित आहे, अयोग्य आहे. आम्हाला आतापर्यंत सर्व विधेयके इंग्रजी आणि मराठीतून मिळतात. आणि म्हणून या पदासाठी कोणत्या अर्हतेचा व्यक्ती असला पाहिजे? या महाराष्ट्रात एवढी दुरावस्था झालेली आहे काय की या योग्यतेचा व्यक्तीच मिळत नाही.?

प्रा. फोजिया खान : सभापती महोदय, हे खरे आहे की, 2003 पासून भाषा संचालक हे पद रिक्त आहे. पण भाषा संचालक पदाच्या विद्यमान सेवा प्रवेश नियमानुसार जे नॉमिनेशन किंवा प्रामेशनचे नियम आहेत त्याप्रमाणे हे पद प्रमोशनने भरावयाचे असेल तर त्यासाठी मास्टर डिग्री इन मराठी किंवा संस्कृत असावी लागते आणि मराठीची मास्टर डिग्री असेल तर त्यांचे संस्कृतवर प्रभुत्व असले पाहिजे. इंग्रजीचे चांगले ज्ञान असले पाहिजे. 45 वर्षापेक्षा जास्त वय असता कामा नये. बाय नॉमिनेशनने किंवा बाय प्रमोशनने हे पद भरण्यासाठी वरील पात्रता असावी लागते. असे उमेदवार उपलब्ध होत नाहीत. डेप्युटेशनने हे पद भरावयाचे असेल तर त्यासाठी संबंधित व्यक्तीला मंत्रालयामधील पाच वर्षाचा वर्ग-1 च्या पदाच्या अनुभवाची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे पात्र उमेदवार मिळत नाहीत त्यामुळे या नियमामध्ये बदल करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच वयाची मर्यादा शितिल करावी असे प्रस्तावित आहे. तसेच या पदासाठी लोकांनी आकर्षित व्हावे, यासाठी या पदाची जी उप सचिव पदाची वेतनश्रेणी आहे त्या वेतनश्रेणी ऐवजी मंत्रालयातील सह सचिव पदाची वेतनश्रेणी लागू करावी, असे प्रस्तावित आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. अनेक वर्षापासून हे पद रिक्त आहे. या पदासाठी लागणारी अर्हता या ठिकाणी सांगण्यात आलेली आहे. त्यामध्ये मराठी आणि संस्कृतच्या मास्टर डिग्रीची आवश्यकता आहे. असे सांगण्यात आले आहे या पदासाठी संस्कृतच्या मास्टर डिग्रीची आवश्यकता नाही. ती आवश्यकता नसताना ते पद रिक्त ठेवण्यासाठी, जुन्या पध्दतीत मराठी हे संस्कृताळलेले असल्यामुळे याबाबतीत पुढे हे सर्व घोळ तयार झालेले आहेत त्यामुळे हे निकष बदलण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठामध्ये या विषयामध्ये तज्ज्ञ असलेल्या व्यक्तींना डेप्युटेशनवर घेण्यात आले या पदासाठी मंत्रालयातील सह सचिवांचा आकर्षक पगारा बाबत प्रस्तावित आहे असे सांगितलेले आहे ते बरोबर आहे. पण विद्यापीठातील तज्ज्ञ व्यक्तींना डेप्युटेशनवर घेतले तर उमेदवार मिळत नाही, ही जी अडचण आहे ती दूर होईल तेव्हा शासन हे करील काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना तपासून जरुर त्यावर विचार करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या राज्याचे भाषासंचालक हे पद रिक्त असणे ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे. मला मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, या पदाची जी नैमित्तीक कामे त्यांनी या ठिकाणी सांगितलेली आहेत तेवढयापुरतेच या भाषा संचालकाचे काम आहे काय? का या भाषेसाठी काही तरी करायला पाहिजे, शासन या भाषेची वृध्दी व्हावी म्हणून काही तरी करणार आहे म्हणून या संचालक पदाचा जो काही आवाका आहे त्याचे अधिक विस्तारीकरण करुन त्याबाबत अधिक काही करता येईल काय? याचा शासन विचार करील काय?

प्रा. फोजिया खान : सभापती महोदय, शासन बिलकुल याचा विचार करील. आणि ते केलेच पाहिजे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, केंद्र शासनाने विविध राज्यांच्या भाषेतील संवर्धनासाठी निधी उपलब्ध केलेला आहे. आपल्या राज्य शासनाने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी असा निधी कधी उपलब्ध करुन घेतला का आणि घेतला असल्यास तो कधी घेतला?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजीया खान : सभापती महोदय, याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

**सभापती** : यानंतर निवेदन क्रमांक 4 घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तराने आमचे समाधान झालेले नाही. त्यामुळे शासनाचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात )

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : देवाडा खूर्द, ता. मोहाडी, जि. भंडारा येथील एलोरा पेपर मिल लिमिटेड कारखान्यातील कामगारांना पगारवाढीची थकित रक्कम न मिळणे

**मु. शी.** : देवाडा खूर्द, ता. मोहाडी, जि. भंडारा येथील एलोरा पेपर मिल लिमिटेड कारखान्यातील कामगारांना पगारवाढीची थकित रक्कम न मिळणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. पद्माकर वळवी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "देवाडा खूर्द, ता. मोहाडी, जि. भंडारा येथील एलोरा पेपर मिल लिमिटेड कारखान्यातील कामगारांना पगारवाढीची थकित रक्कम न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, देवाडा खूर्द, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा येथील एलोरा पेपर मिल लिमिटेड हा कारखाना गेल्या 30 वर्षापासून सुरु आहे आणि तेथील कामगारांनी चांगले काम केले आणि उत्पादनात सातत्याने वाढ केली त्यामुळे या कारखान्यास आयएसओ-900 मार्क त्यांनी मिळवून दिले. हा कारखाना गेली 30 वर्षे चालू आहे. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वर जे म्हटले आहे आणि नियम 93 अन्वये देण्यात आलेली सूचना याचसाठी दिलेली होती की, सहाय्यक कामगार आयुक्त, भंडारा यांचे समक्ष त्यानंतर दिनांक 13.10.2008 रोजी बैठक झाली. या बैठकीमध्ये व्यवस्थापनाने जुलै, 2004 पासूनचा वेतनातील फरक सुधारित किमान वेतन दरानुसार देण्याची मागणी मान्य केली होती. व्यवस्थापनाने आता ऑक्टोबर, 2008 पासून सुधारित किमान वेतन दराप्रमाणे वेतन देणे सुरु केले आहे. तथापि, 20 जुलै, 2004 ते सप्टेंबर, 2008 चा वेतन फरक अद्यापही दिलेला नाही. सभापती महोदय, हा वेतन फरक न दिल्यामुळे आता या महागाईच्या काळामध्ये तेथील कामगारांना चार ते साडेचार हजार रुपयांमध्ये काम करावे लागते. मागचा वेतनातील फरक त्यांना दिलेला नाही. त्यांना सुधारित वेतनश्रेणी दिलेली नाही. अशा अवस्थेमध्ये ते कामगार जगत आहेत. सन 2004 ते 2009 पर्यंतचा जो फरक आहे तो लवकरात लवकर किती दिवसात या कामगारांना देणार ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, हा वेतनातील फरक देण्यासाठी कामगार आणि व्यवस्थानाच्या वेळोवेळी बैठका झालेल्या आहेत. त्यामध्ये काही विषयावर तोडगा निघाला नाही म्हणून हा तोडगा काढण्यासाठी औद्योगिक विवाद अधिनियम, 1947 च्या कलम 33 (सी) (1) अंतर्गत सहाय्यक कामगार आयुक्त, भंडारा यांनी संबंधित संघटनेला अशी सूचना दिली होती की, त्यांनी त्या ठिकाणी आपला एक अर्ज करावा. तो अर्ज केला तर आम्ही व्यवस्थापनाला कायदेशीर नोटीस देऊ शकतो आणि निश्चितपणे यामध्ये लवकरात लवकर तोडगा काढू शकतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यादृष्टीने निश्चितपणे कामगार विभाग कामगारांना न्याय देईल आणि याबाबतीत सहाय्यक कामगार आयुक्त भंडारा व अपर कामगार आयुक्त, नागपूर यांनी मध्यस्थी केली आहे. कामगारांच्या आर्थिक लाभाच्या तक्रारीवर तोडगा काढण्यासाठी शासन पूर्ण प्रयत्नशील आहे. ते लवकरात लवकर करण्यात येईल.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, 2004 ते 2009 पर्यंतची जी वेतन फरकाची रक्कम आहे ती किती दिवसात देणार ? फरकाची रक्कम कामगारांना मिळालेली नाही आणि त्यांचे वेतन आता कमी झाले आहे. पेपर मिल संचालक आणि मजदूर मंच यांच्यामध्ये जो करार झाला त्यानुसार कामगारांच्या पगारात अंदाजे 600 रुपयांची वाढ करण्यात आली होती ती वाढ 2004 च्या शासन निर्णयान्वये कामगारांच्या पगारातून 2008 मध्ये कपात करुन कामगारांचे पगार कमी करण्यात आले. ही 600 रुपयांची कपात का केली गेली याबाबत शासनाने खुलासा करावा. 2004 ते 2009 पर्यंतच्या फरकाची रक्कम किती दिवसात देणार ? आता मध्यस्थी करणे सुरु आहे. ही मध्यस्थी किती दिवस चालणार आहे ? ही फरकाची रक्कम लवकरात लवकर किती दिवसात कामगारांना मिळणार आहे ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, निश्चितपणे लवकरात लवकर देण्याबाबतचा जो मुद्दा आहे याबाबत आम्ही अधिकाऱ्यांना सूचना देऊ की, ही बाब गांभीर्याने घ्यावी आणि लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी व्यवस्थापनाबरोबर बसावे. स्वत: शासन यामध्ये लक्ष देईल आणि कामगारांना न्याय मिळवून देईल.

---

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबईत आंध्र प्रदेश, जम्मू काश्मीर, नागालॅण्ड येथून मोठया प्रमाणात बेकायदेशीर शस्त्र परवाने आणले जाणे" या विषयावरील सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी दिनांक 22 मार्च, 2005 रोजी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वये सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी. )

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शेगांवचा विकास आराखडा अंमलात न येणे

**मु.शी.**: शेगांवचा विकास आराखडा अंमलात न येणे यासंबंधी सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जगदीश गुप्ता वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वित्त व नियोजन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"संत गजानन महाराजांच्या समाधी शताब्दी सोहळयाला सुरुवात होऊन दोन महिने होऊनही शेगांवचा विकास आराखडा अंमलात न येणे, शेगांवच्या विकासासाठी तेथील जनतेच्या भावना तीव्र असून या मुद्यावर तेथील जनता आक्रमक असणे, शेगांवचा अपेक्षित विकास न झाल्याने अद्यापही सोयीसुविधांचा अभाव असणे, याबाबत शासनाची उदासिनता, त्यामुळे तेथील जनतेवर अन्याय होत असल्याची लोकांची भावना, शेगांव येथे येणाऱ्या भाविकांची संख्या लाखाहून अधिक असल्याने 465 कोटी रुपयांचा विकास आराखडा शासनाला सादर करण्यात आला असता शासनाने केवळ 193 कोटींचा आराखडा मंजूर करणे, सदर आराखडा तेथील जनतेस मान्य नसणे, या तिर्थक्षेत्राचा पंढरपूर, आळंदी, नांदेडच्या धर्तीवर विकास न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा तेथील लोकप्रतिनिधींनी दिलेला इशारा, या प्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता."

श्री.सुनील तटकरे ( वित्त व नियोजन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाची ही लक्षवेधी सूचना आहे. संत गजानन महाराजांच्या समाधी शताब्दी सोहळयाला 100 वर्षे पूर्ण होत आहेत. 100 वर्षे पूर्ण झाल्यामुळे हा समाधी शताब्दी सोहळा शेगांवला साजरा होणार आहे. यानिमित्ताने शेगांव येथे 1 कोटीच्यावर भाविक येणार आहेत. सभापती महोदय, 1 वर्षापूर्वी आपण मला या विषयावर बोलण्याची सभागृहात परवानगी दिली होती . त्यावेळी मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे अशी मागणी केली होती की, समाधी शताब्दी सोहळयासाठी येणाऱ्या भाविकांसाठी नांदेड येथील गुरुद्वाराच्या आधारावर पैसे देऊन नागरी सुविधा निर्माण कराव्या. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी ते मान्य केले होते. त्यानुसार 453 कोटींचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी तयार करुन शासनाकडे पाठविला आहे. त्यानंतर दोन कमिटया निर्माण करण्यात आल्या. या दोन कमिटया निर्माणा करण्याचे कारण समजले नाही. एक कमिटी पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आणि एक माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आली. एका कमिटीने त्या प्रस्तावाची छाननी करावयाची आणि दुसऱ्या कमिटीने त्या प्रस्तावाला मान्यता द्यावयाची. अशारितीने 1 वर्षापासून तयार झालेल्या प्रस्तावाबाबत दिनांक 26.10.2009 रोजी कमिटी स्थापन केली गेली. आता 11 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने एक जी.आर.काढला आहे. यामध्ये संपूर्ण वर्ष गेले आहे, आता सोहळा सुरु होऊनही दोन महिने झाले आहेत. शासनाने हा आराखडा मंजूर करण्यास शासनाने विलंब केलेला आहे. आता शासनाने 193 कोटींचा आराखडा मंजूर केला आहे. हा आराखडा मंजूर केला असला तरी मी एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, 43 कोटी रुपयांची केंद्र शासनाची पाणीपुरवठा योजना यात समाविष्ट आहे. त्यापैकी 80 टक्के रक्कम केंद्र सरकार देणार आहे. उर्वरित 20 टक्क्यांपैकी राज्य सरकारने 10 टक्के दिले नाहीत, लोकवर्गणीतूनही 10 टक्के भरण्यात आले नाही. ही रक्कम संस्थेने दिलेली आहे. या 43 कोटींचा समावेश करुन हे 193 कोटी मंजूर केले आहेत. राहिलेल्या 150 कोटींपैकी फक्त 65 कोटी रुपये मान्य करुन त्या रकमेची कामे सुरु करु असे सांगितले आहे. सभापती महोदय, या विषयावर आज आपण चर्चा करीत आहोत, परंतु अद्याप एकही पैसा त्याठिकाणी पोहोचलेला नाही. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ती कमिटी असल्यामुळे व जिल्हयाला पालकमंत्री नसल्यामुळे त्या

4....



NTK/ SBT/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर....

कमिटीच्या बैठका होत नाहीत. त्यामुळे विभागीय आयुक्तांनी बैठक घेतली होती. त्यानंतर 13 डिसेंबर, 2009 रोजी राज्याच्या मुख्य सचिवांनी एक बैठक घेतली त्यावेळी सर्व विभागांबाबत चर्चा झाली आहे. चर्चेच्या अनुषंगाने आता 300 कोटींचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 300 कोटी रुपये लागणार आहेत. शासनाने 150 कोटी रुपये मंजूर केले, पण 65 कोटी रुपये दिले आहेत. उर्वरित 150 कोटी रुपये शासन त्वरित देणार आहे काय आणि त्याठिकाणी कर भरणारे अतिक्रमणधारक आहेत. ते या कामामुळे विस्थापित होणार आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न असल्यामुळे त्या बैठकीत त्यासंबंधी चर्चा झाली आहे. त्याचाही या 300 कोटींमध्ये समावेश आहे. हे 300 कोटी रुपये एक महिन्याचा आत देऊन ही कामे सुरु करण्याची आवश्यकता आहे. त्या बैठकीत मुख्य सचिवांनी आश्वासन दिलेले आहे. परंतु कामे सुरु होत नसल्यामुळे लोकांनी आंदोलन सुरु केले आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

प्रचंड जनअसंतोष निर्माण झालेला आहे. 65 कोटी रु. अद्याप पोहोचलेले नाहीत. हे पैसे ताबडतोबीने पाठवून एक महिन्याच्या आत कामे सुरु करण्यासंबंधी आपण आदेश द्यावेत. तसेच अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनाचा विचार करावा आणि 300 कोटीच्या प्रस्ताव मंजूर करावा, असे आदेश मंत्री महोदय संबंधितांना देतील काय ?

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी शासन निश्चितपणे सहमत आहे. संत गजानन महाराजांच्या समाधी शताब्दी सोहळ्याच्या संदर्भाने जो आराखडा तयार केलेला आहे तो पूर्ण करण्याच्या बाबतीत शासन कटीबद्ध आहे. मी आपल्या मार्फत सभागृहाच्या एवढेच निदर्शनास आणून देत आहे की, येत्या महिनाभरामध्ये सर्व गोष्टींना मंजुरी दिली जाईल. वित्त व नियोजन मंत्री म्हणून मी स्वत: यातील प्रत्येक गोष्टींवर लक्ष ठेवीन. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे शिखर समितीपुढे दुसरा 300 कोटीचा आराखडा आहे. त्या प्रस्तावाची छाननी करुन त्याला मान्यता देण्याच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : गेले वर्षभर हे प्रकरण चालू आहे. शासनाने निवडणुकीपूर्वी यासाठी अमूक इतके कोटी रुपये देऊ अशी घोषणा केली. पहिल्यांदा 65 कोटी आणि नंतर 193 कोटी रु. देण्यात येतील असे सांगितले. एकूण 450 कोटीचा हा प्रस्ताव आहे. सुरुवातीला 65 आणि नंतर 193 कोटी देण्याचे मान्य केलेले आहे. अद्याप मंजूर केलेले 65 कोटी रु.मिळालेले नाहीत. तेव्हा या कामाला लवकरात लवकर म्हणजे नेमकी केव्हा सुरुवात करणार ? तसेच विविध विभागांशी चर्चा करुन मुख्य सचिवांनी 300 कोटींचा प्रस्ताव तयार केलेला आहे. त्याला मंत्री महोदय मान्यता देतील काय ?

श्री. सुनील तटकरे : त्याठिकाणी 31 डिसेंबर 2009 रोजी निश्चितपणे निधी वितरित होईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे 300 कोटीचा नवीन आराखडा तयार करण्यात आलेला आहे. नियोजन विभाग त्या प्रस्तावाची छाननी करील. त्यातून ज्या गोष्टी करणे अत्यंत आवश्यक असेल त्या करण्याच्या दृष्टीने मान्यता दिली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी एका महत्वाच्या प्रश्नाकडे लक्षवेधीच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधलेले आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या वर्षी जेव्हा हा मुद्दा या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला त्यावेळी मी त्याला समर्थन देण्याकरिता उभा राहिलो होतो. या तीर्थक्षेत्राचा पंढरपूर, आळंदी, नांदेडच्या धर्तीवर विकास करणार काय असा प्रश्न या लक्षवेधीच्या संदर्भाने विचारण्यात आलेला आहे. मुद्दा असा आहे की, पंढरपूर, देहू, आळंदी या ठिकाणच्या योजना अजून साकार झालेल्या नाहीत. पंढरपूर, देहू, आळंदी या धर्तीवर असा उल्लेख असल्यामुळे तेथील योजना जणूकाही साकार झालेल्या आहेत असा त्यातून अर्थ निर्माण होतो. तेव्हा तिकडचे देखील प्रस्ताव व्हावेत अशी माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला. या अधिवेशनापूर्वी माझ्या अध्यक्षेखालील समितीने 850 कोटीच्या आराखड्याला मान्यता दिली. या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन ती कामे सुध्दा जानेवारीच्या पहिल्या आठवडयात सुरु होतील याची दक्षता घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर :माननीय मंत्री महोदयांवर माझा विश्वास आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागांशी चर्चा करुन 300 कोटीचा प्रस्ताव तयार केलेला आहे. त्या प्रस्तावाला माननीय मंत्री महोदय निश्चितपणे मान्यता देतील आणि गजानन महाराजांचे आशीर्वाद घेतील. माझा मुद्दा हा आहे की, विभागाच्या ज्या समित्या केलेल्या आहेत त्या समितीच्यामध्ये हा प्रस्ताव अडकून पडेल. पंढरपूर आणि नांदेडच्या धर्तीवर आपण जसे प्राधिकरण केलेले आहे त्याप्रमाणे शेगावचा विकास आराखडा अंमलात आणण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण नेमण्याची आवश्यकता आहे.स्वतंत्र प्राधिकरण नेमल्यामुळे सर्व विकास कामे विनाविंलब होतील. म्हणून संत गजानन महाराजांच्या समाधी शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने शेगावचा विकास आराखडा अंमलता आणण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची नेमणूक करण्यात येणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : ह्या ज्या समित्या आहेत त्या समित्यांमार्फत आराखडा तयार होत असतो. हा आराखडा मंजूर झाल्यानंतर त्या त्या विभागांनी ती ती कामे करावयाची असतात. प्राधिकरण स्थापन केले तरी ती ती कामे त्या त्या विभागामार्फतच करावी लागतील. मी सांगू इच्छितो की, येत्या तीन वर्षामध्ये कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील.

...नंतर श्री. भोगले...

अग्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U.1

SGB/ KTG/ SBT/ 12:40

लक्षवेधी सूचना क्रमांक-1......... श्री.सुनील तटकरे....

आणि ही बाब तपासून घेऊन प्राधिकरण करुन या कामाला अधिक गती मिळणार असेल तर त्या बाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : येरवडा, जि.पुणे येथील कारागृहामध्ये महिला कैद्यांसाठी खुल्या कारागृहाची व्यवस्था करणे

**मु. शी.** : येरवडा, जि.पुणे येथील कारागृहामध्ये महिला कैद्यांसाठी खुल्या कारागृहाची व्यवस्था करणे यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, चरणसिंग सप्रा, जयप्रकाश छाजेड, सय्यद जमा ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे कारागृहातील पुरुष कैद्यांसाठी खुले कारागृह अस्तित्वात असतानाही महिलांसाठी खुल्या कारागृहाची लोकप्रतिनिधींनी संबंधिताकडे वारंवार मागणी करुनही अद्याप महिलांसाठी खुले कारागृह सुरु करण्यात न येणे, खुल्या कारागृहातून कैद्यांचे मानसिक पुनर्वसन चांगल्या पध्दतीने होत असल्यामुळे ही संकल्पना जगभर लोकप्रिय होत असल्याचे आढळून येणे, पुरुषांसाठी सन १९५६ मध्ये येरवड्यात खुले कारागृह अस्तित्वात आल्यापासून या खुल्या कारागृहातून एकही कैदी पळालेला नसल्याचे आढळून येणे, महिलांसाठीही पुरुषाप्रमाणेच खुले कारागृह सुरु करण्यासाठी प्रशासनाने गेल्या चार वर्षापूर्वी प्रस्ताव शासनास सादर करणे, प्रस्तावास गेल्या वर्षी तत्वत: मान्यता मिळूनही महिलासाठी खुले कारागृह अद्याप सुरु करण्यात न येणे, खुले कारागृह सुरु करण्यासाठी प्रशासनाने १७ एकर जमीन उपलब्ध असून तेथे शेती व इतर पूरक उद्योगात या कैदी महिला काम करतील व त्यांना रोजगार मिळेल तसेच या कामाचा काही भाग प्रशासन करण्यास तयार असल्याचेही आढळून येणे, सबब, महिला कैद्यासाठी खुले कारागृह सुरु करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 12:40

लक्षवेधी सूचना क्रमांक-2........

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रासाठी पुणे येथे महिलांसाठी कारागृहाची व्यवस्था आहे. सावित्रीबाई फुले यांनी सर्वप्रथम महिलांच्या शिक्षणाची सोय पुणे शहरामध्ये केली. राज्यामध्ये आतापर्यंत महिलांना जे जे अधिकार दिले आहेत, त्यामध्ये देशातील महाराष्ट्र या प्रगत राज्याने सातत्याने पुढाकार घेतलेला आहे. दुर्दैवाने 1956 साली येरवडा कारागृहाची स्थापना होऊनही महिलांसाठी खुले कारागृह उपलब्ध नाही. महाराष्ट्रामध्ये औरंगाबाद, पैठण, मोर्शी येथे पुरुषांसाठी खुले कारागृह उपलब्ध आहे. यासाठी शासनाला कोणताही आर्थिक सहन करावा लागणार नाही. या सभागृहात एक वर्षापूर्वी सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी आश्वासन दिले होते की, पुणे येथील येरवडा कारागृहामध्ये महिलांसाठी खुल्या कारागृहाची सुरुवात केली जाईल. जन्मठेपेची शिक्षा झालेली महिला बंदी असेल, जास्तीत जास्त कालावधीची शिक्षा झालेली महिला बंदी असेल त्यांना खुले कारागृह नसल्यामुळे फक्त सात दिवस शिक्षेत माफी मिळते. खुले कारागृह उपलब्ध झाले तर जन्मठेपेची शिक्षा झालेल्या महिलेला 30 दिवस, 5 ते 14 वर्षाची शिक्षा झालेल्या महिलेला 20 दिवस आणि इतर साधारण कैदी असलेल्या महिलांना 15 दिवस वर्षाकाठी शिक्षेमध्ये सूट मिळू शकते. परंतु खुले कारागृह नसल्यामुळे अशा प्रकारची सवलत त्यांना मिळू शकत नाही. माझी शासनाला विनंती आहे की, सर्व व्यवस्था झालेली आहे, 17 एकर जागा उपलब्ध आहे, प्रस्ताव मान्य झालेला आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य घटनेमध्ये महिला व पुरुषांना समान अधिकार दिलेले आहेत. असे असताना 26 जानेवारी, 2010 रोजी महिलांच्या खुल्या कारागृहाचे उद्घाटन शासन करणार आहे का? महाराष्ट्रातील इतर सेंट्रल जेलमध्ये पुण्याच्या धर्तीवर खुले कारागृह स्थापन करण्याची योजना शासन राबविणार आहे का? महिला कैद्यांनी शिक्षा भोगल्यानंतर त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी येरवडा कारागृहात 17 एकर जागा उपलब्ध असल्यामुळे तेथे अशा महिलांसाठी आय.टी.आय.सुरु करण्याचा शासन विचार करणार आहे का?

श्री.रमेश बागवे : सन्माननीय सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने चांगला विषय सभागृहापुढे आलेला आहे. अनेक माननीय लोकप्रतिनिधी व संस्थांनी अनेक वर्षापासून ही मागणी केली होती की, महिलांसाठी खुले कारागृह असावे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, दिनांक 10 डिसेंबर, 2009 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी महिलांच्या खुल्या कारागृहाला संमती

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 12:40

श्री.रमेश बागवे..........

दिलेली आहे. याचे नोटिफिकेशन ताबडतोब काढले जाणार आहे. महिलांसाठी खुले कारागृह स्थापन करण्याची सर्व तयारी झालेली आहे. यासाठी कोणताही आर्थिक खर्च न करता पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. येरवडा सेंट्रल जेल येथे या खुल्या कारागृहाचे उद्‌घाटन 26 जानेवारी रोजी होईल.

(नंतर श्री.खर्चे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, शासनाने महिला कैद्यांच्या बाबतीत जी भूमिका घेतली ती स्वागतार्ह आहे. तसेच या लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनात सुधारणा करावयाची आहे काय ? कारण त्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्यांना 30 दिवस सुट्टी असे म्हटले आहे. ही सुट्टी महिन्याकाठी आहे की वर्षाकाठी हा पहिला प्रश्न, तसे असेल तर त्यात दुरुस्ती करावी.

श्री. रमेश बागवे : महोदय, खुल्या कैदेत ठेवले तर महिन्याला एक दिवस अशी सुट्टी देण्यात येईल.

श्री. अरविंद सावत : महोदय, शासन महिलांसाठी खुले कारागृह लवकरात लवकर करण्यात येईल असे सांगते. माझा प्रश्न असा आहे की किती दिवसात असे खुले कारागृह तयार करण्यात येणार आहे ?

श्री. रमेश बागवे : महोदय, येत्या 26 जानेवारीला महिलांसाठी असलेल्या खुल्या कारागृहाचे उद्‌घाटन करण्यात येईल.

श्री जयप्रकाश छाजेड : मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्यात 296 महिला बंदी असल्याचे सांगितले आहे. अशा खुल्या कारागृहात जर महिलांना ठेवले तर त्यांना शिक्षेत माफी देण्यासंबंधीचा हा विषय आहे. ही माफी वर्षाकाठी एक महिनयाची आहे मग या 296 महिलांमधून ज्या महिला चांगल्या वागतात परंतु केवळ पुरुषांबरोबर शिक्षा भोगत असतात म्हणून त्यांना ती माफी मिळू शकत नाही, हे खरे आहे काय ? तसेच ज्या महिला शिक्षा भोगत आहेत त्यांच्या पैकी बऱ्याच महिलांना शिक्षेतून माफी मिळणार आहे ती शासन देणार काय ? तसेच या 296 मध्ये वेगवेगळ्या गुन्ह्याखाली किती महिला शिक्षा भोगत आहेत ?

श्री. रमेश बागवे : महोदय खुल्या कारागृहामध्ये पुरुषांबरोबर शिक्षा भोगणाऱ्या महिलांना देखील या माफीचा फायदा मिळणार आहे. तसेच महिला बंदी होण्यासंबंधीची जी मानसिकता आहे ती शिक्षा भोगून आल्यानंतर पुन्हा समाजात सामावून घेण्यात यावे म्हणूनच ही खुल्या कारागृहाची संकल्पना समोर आली आहे. तसेच कोणकोणत्या गुन्ह्यांची शिक्षा या महिला भोगत आहेत याची माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

....2....

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, खुल्या कारागृहाची संकल्पना चांगली आहे परंतु आम्ही महिला आमदारांनी दोन वेळा संपूर्ण राज्यातील कारागृहांना भेटी देऊन महिलांच्या संदर्भात अनेक सूचना शासनाला केल्या आहेत, त्यांच्या अंमलबजावणीचा प्रश्न आहे. दुसरे असे की, यातील ज्या महिला बंदी आहेत त्यांच्या अनुषंगाने खास करुन ज्या महिला वेश्या व्यवसायाकडे ढकलण्याचे काम करतात त्यातून ज्या बंदी असतात, त्या गुन्ह्याखाली शिक्षा भोगणाऱ्या महिलांचा या कॅटेगरीमध्ये समावेश असू नये, त्यांना त्यातून वगळले जावे. तसेच कोणकोणत्या गुन्ह्याखाली त्या शिक्षा भोगत आहेत ही बाब तज्ज्ञांशी चर्चा करुन निश्चित करावी व त्या पध्दतीने पुढील निर्णय शासनाने घ्यावा. त्या अनुषंगाने शासन पुढील कारवाई करणार काय ?

श्री. रमेश बागवे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्यादृष्टीने विचार केला जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, खुले कारागृहात संध्याकाळी 6 वाजल्यानंतर सर्व कैद्यांना बरॅकमध्ये ठेवले जाते. त्या ठिकाणी एक जाळी आहे, त्यातून भरपूर हवा आणि मच्छर सुध्दा येतात. तसेच थंडीमुळे कैद्यांना झोपताही येत नाही. मी स्वत: दोन महिने येरवडा तुरुंगात काढलेले असल्याने मला माहिती आहे. म्हणून अशा ठिकाणी बंदिस्ती करण्याचे काम शासन करणार काय ?

श्री. रमेश बागवे : महोदय, ही सर्व बाब तपासून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, निवेदन में यह लिखा है कि येरवडा जेल में महिला कैदियों के लिए अलग से इमारत एवम् कक्ष है और इस जेल में विदर्भ छोड़कर महाराष्ट्र के सभी जेलों की महिला कैदियों को रखा जाता है. मैं यह जानना चाहता हूं कि क्या विदर्भ के अमरावती तथा नागपुर डिवीजन में महिला कैदियों के लिए अलग से इमारत की व्यवस्था है ? अगर नहीं है तो क्या महिला कैदियों के लिए अलग से इमारत की व्यवस्था की जाएगी ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, पहिल्या पासून त्या ठिकाणी वेगळी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, विदर्भसोडून आपण 26 जानेवारी रोजी अशा जेलचे उद्घाटन करणार आहोत. विदर्भातील कोणत्या जेलमध्ये महिलांसाठी खुले कारागृह केले जाणार आहे यासंदर्भात शासनाकडे काही प्रस्ताव आहे काय ? या ठिकाणी उल्लेख केल्या प्रमाणे महिलांना रोजगाराचे साधन नसल्यामुळे वाम मार्गाला त्यांना जावे लागते त्यामुळे एरवडा येथे आयटीआय सारखी संस्था आहे तशा संस्था इतरत्र तयार करुन त्या ठिकाणच्या महिलांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी काही तरी रोजगाराचे साधन मिळेल अशी व्यवस्था शासन करुन देणार आहे काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, जेलमधून बाहेर पडल्यावर जगण्यासाठी किमान कौशल्य आवश्यक असते तशा पध्दतीचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विशेष शोध मोहिम हाती घेण्यासंबंधी.

**मु. शी.** : राज्यातील बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विशेष शोध मोहिम हाती घेण्यासंबंधी यासंबंधी श्री. किरण पावसकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतून सप्टेंबर २००९ ते नोव्हेंबर २००९ या ३ महिन्याच्या कालावधीत १४४ मुले बेपत्ता असल्याची माहिती उघडकीस येणे, सन २००२ पासूनची आकडेवारी पाहिल्यास मुंबईतून दरवर्षी ५ ते ८ हजार व्यक्ती बेपत्ता होणे, सदर बेपत्ता व्यक्तीचा चोरी करण्यासाठी, मानवी अवयवांचा व्यापार करण्यासाठी अथवा निठारीसारख्या हत्याकांडासाठी वापर होत असल्याचा व्यक्त होत असलेला संशय, सन २००९ च्या सुरुवातीच्या ३ महिन्यातच सुमारे २५० मुले बेपत्ता झाल्याची उघडकीस आलेली आकडेवारी परिणामी मुंबईमधील जनतेत पसरलेले भितीचे तीव्र चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली अथवा करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/ 12:50 श्री.

किरण पावसकर : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर बोलण्याची आपण मला परवानगी दिली त्याबद्‌ल मी आपला आभारी आहे त्यामुळे या प्रश्नाच्या मुळाशी जाण्यासाठी मला दोन मिनिटाचा अवधी जास्त देण्यात यावा अशी आपल्याला विनंतीही करतो.हा विषय सभागृहात 41 वर्षापूर्वी आला होता. 1968 मध्ये ज्येष्ठ साहित्यिक श्री. दत्ताजी देशमुख यांनी हा सभागृहात मांडला होता. बेपत्ता व्यक्ती या विषयावर मंत्रालय-विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्षपद ज्यांनी भुषविले ते ज्येष्ठ पत्रकार श्री. विजय वैद्य यांनी यावर "बेपत्ता व्यक्ती शोध समिती" स्थापन केली होती. बेपत्ता व्यक्तींच्या संदर्भात आपण उत्तरात आकडेवारी दिली आहे की, बेपत्ता व्यक्तींची आकडेवारी 144 नसून 119 मुले तीन महिन्यात बेपत्ता झालेली आहेत. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मागच्या 10 वर्षामध्ये 1,64,554 व्यक्ती बेपत्ता झालेल्या आहेत. यामध्ये अजूनपर्यंत 8 हजार व्यक्तींचा शोध लागलेला नाही. ज्या व्यक्ती हयात असतात त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी आंदोलने, मोर्चे काढण्यात येतात व त्यातून त्यांना न्याय मिळतो. जे मृत्यू पावतात, अपघातात मरण पावतात त्यांना सरकारकडून नुकसानभरपाई दिली जाते. परंतु जे बेपत्ता होतात त्याच्या बाबतीत सरकारचे नक्की काय धोरण आहे ? बेपत्ता व्यक्तींची संख्या शहरीकरणामुळे नेहमी वाढतच चालली आहे. बेपत्ता झालेल्या अनेक मुलांचा शेवट वेश्याव्यवसाय, बलात्कार, बालमजूरी अशा प्रकारे होतो. हरवलेल्या व्यक्तींचा शोध करण्यासाठी, देखरेख करण्यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालकांनी विशेष समिती नेमावी असे आदेश उच्च न्यायालयाने 9 सप्टेंबर रोजी दिला होते. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने समिती नेमली आहे काय ? मिसिंग ब्यूरोने 1967 मध्ये माहिती दिली होती की, यामध्ये 45 टोळया आहेत. त्यामुळे मिसिंग ब्यूरोच्या माहितीवरुन शासनाने काही कारवाई केली आहे काय ? कारण अशाच पध्दतीची ज्योत्सना शहा समिती केंद्र शासनाकडून नेमण्यात आली होती. परंतु यावर महाराष्ट्र शासनाने कोणतीही समिती नेमली नाही. बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी शासन कोणत्या पध्दतीची कार्यवाही करणार आहे ?

श्री. रमेश बागवे : बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पुण्यामध्ये मिसींग पर्सन ब्यूरो नावाचा एक विभाग सुरु केला असून त्याचे काम सीआयडी क्राईम ब्रँचकडे दिलेले आहे. बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी प्रत्येक जिल्हयात एक पोलीस उपनिरीक्षक, 3 पोलीस अमंलदार कार्यरत आहेत. मुंबई शहरासाठी प्रत्येक ठाण्यामध्ये 1 पोलीस उपनिरीक्षक आणि 3 पोलीस अमंलदार कार्यरत आहेत. अशा पध्दतीने बेपत्ता व्यक्तींचा शोध घेतला जातो. ...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, बेपत्ता मुलांच्या शोधासाठीच ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, जेव्हा माननीय आर.आर.पाटील हे उपमुख्यमंत्री होते त्यावेळेस बालमजूरांच्या संदर्भात घोषणा करण्यात आली होती. बालमजूरांच्या पुनर्वसनाचा प्रश्न माननीय आबांनी हातात घेतला होता त्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत पुढे नेमके काय झाले याची माहिती देण्यात यावी तसेच बेपत्ता मुलांची आकडेवारी लेखी उत्तरामध्ये देण्यात आलेली आहे. त्यामुळे बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विशेष शोध मोहिम आपण हाती घेणार आहात काय? या लक्षवेधी सूचनेला न्याय द्यावयाचा असेल तर बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी कालबध्द विशेष शोध मोहिम हाती घेतली जाणार आहे काय?

यानंतर श्री. गायकवाड..

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ SBT/ ST/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 12=55

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बालमजुरांच्या संदर्भातील काम हे कामगार विभागाचे असून त्यांना मदत करणे हे पोलिसांचे काम आहे. बालमजुरांच्या विरोधात आणि भीक मागण्याच्या संदर्भात जी मुले वापरण्यात येतात त्यांच्या विरोधात मुंबई पोलिसांनी एक मोठी मोहीम सुरु केली होती त्या मोहीमेमधून 13 हजार मुलांची सुटका करण्यात आली होती.सभापती महोदय, हे काम करणा-या ब-याचशा शाखा आहेत. ब-याच वेळा पोलिसांकडून असे काम सुरु करण्यात आल्यानंतर पोलिसांवर टीका करण्यात येते. वास्तविक हे काम पोलिसांचे आहे.त्यासाठी वेगवेगळया शाखा काम करीत असतात. मुंबई शहर बाल कामगार मुक्त करण्यासाठी पुन्हा एकदा धडक मोहीम सुरु करण्यात येईल या पूर्वी जी मोहीम हाती घेण्यात आली होती त्या मोहीमेचा चांगला परिणाम झाला होता. या बाल मजुरांना प्रत्येक वेळेस ताब्यात घेतलें जात होते आणि मालक मात्र मोकळे रहात होते.परंतु दोन वर्षापूर्वी उद्योगपतींना देखील अटक करण्यात आली आणि बाल कामगारांना ताब्यात घेण्यात आले होते. त्या मुलांना चांगले जेवण आणि शिक्षण मिळावे यासाठी शासनाच्या रिमांड होममधून व्यवस्था करण्यात आली होती. काही मुले त्या त्या राज्याने परत नेली होती. मुंबईमध्ये जे बाल कामगार काम करतात ते बाल कामगार फक्त महाराष्ट्रातीलच आहेत असे नाही तर बिहार आणि पश्चिम बंगाल मधून आलेली मुलेसुध्दा जास्त आहेत असे आढळून आलेले आहे. या मोहिमेचा इतका चांगाला परिणाम झाला की, या संदर्भात महाराष्ट्र शासनाने जी भूमिका घेतली होती त्याचा मॉडेल म्हणून देश पातळीवर वापर करण्याचे केन्द्र सरकारने ठरविले होते. त्यासाठी केन्द्र सरकारच्या टीम्स सुध्दा आपल्याकडे आल्या होत्या त्याच प्रमाणे अन्य राज्यातील पोलीस अधिकारीसुध्दा यासंबंधीची माहिती घेण्यासाठी आपल्याकडे आले होते. देशातच अशा प्रकारची मोहीम केन्द्र सरकारने सुरु केलेली आहे.केन्द्र सरकारचे यासाठी आपल्याला मोठया प्रमाणावर प्रोत्साहन मिळत आहे. ज्या लहान वयात या मुलांनी खेळले पाहिजे आणि शिक्षण घेतले पाहिजे त्या वयात त्यांच्याकडून जर अमानुष पध्दतीने काम करुन घेतले जात असेल तर ते बरोबर नाही. यात सुधारणा घडवून आणण्यामध्ये थोडासा वेळ जात आहे. जरीचे काम करण्यासाठी लहान मुलांचा वापर केला जातो त्यांनी झोपू नये म्हणून मेणबत्ती आणि अगरबत्तीने त्यांच्या पाठीवर चटके दिले जातात. अशा प्रकारे अत्यंत अमानुषपणाने

त्यांच्याकडून कामे करवून घेतली जातात. लोकांना सहानुभूती वाटावी म्हणून या लहान मुलांचे कान , नाक कापून वा त्यांचे हात तोडून, त्यांना अपंग करुन लोकांसमोर आणले जाते व त्यातून जास्तीची भीक मिळावी अशी त्यांची अपेक्षा असते. अशा प्रकारच्या केसेससुध्दा आढळून आल्या आहेत. सभापती महोदय, या प्रकारांना आळा घालण्यासाठी एक स्पेशल सेल आहे आणि हा सेल अधिक कार्यरत करण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास तो अधिक सक्षम करण्यात येईल या मुलांचा कोठेही भीक मागण्यासाठी वापर करण्यात येणार नाही तसेच बालकामगार म्हणून वापर होणार नाही यासाठी महाराष्ट्रामध्ये एक धडक मोहीम घेण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, एक गंभीर आणि वेगळा विषय या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने येथे उपस्थित करण्यात आला आहे. संपूर्ण देशामध्ये वर्षभरामध्ये जवळजवळ चार ते साडेचार हजार मुले बेपत्ता झालेली आहेत. घरातील भांडणे वा इतर कारणामुळे घर सोडून ही मुले स्टेशनवर येऊन बसतात. रेल्वे स्टेशनवर आल्यानंतर त्यांना निरनिराळया प्रकारची व्यसने लागतात. त्याचबरोबर त्यांचे शोषण केले जाते. या मुलांची या त्रासापासून सोडवणूक व्हावी याकरता काही सेवा भावी संस्थासुध्दा काम करीत आहेत. "समतोल फाऊडेशन" नावाची एक संस्था या क्षेत्रात काम करीत असून त्यामध्ये मी देखील सहभागी आहे. या संस्थे मार्फत मुलांचे समुपदेशन केले जाते. या संबंधी मी थोडी विस्ताराने माहिती देत आहे. या संस्थामार्फत 400 तू 450 मुलांचे शिबिर घेऊन त्यांचे समुपदेशन करुन त्यांच्या पालकांच्या ताब्यात ही मुले देण्यात आली आहेत. अशा सामाजिक सेवा भावी संस्थाकडे फारसे पैसे नाहीत तेव्हा त्यांना आर्थिक संस्थांना सक्षम करण्यासाठी शासन मदत करणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मध्यंतरी राज्य सरकारने स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने एक मोहीम हाती घेतली होती. स्वयंसेवी संस्था आणि शासन यांनी एकत्रितपणे काम केल्याचा चांगला परिणाम झाला होता . या क्षेत्रामध्ये ज्या स्वयसेवी संस्था काम करीत आहेत त्यांना शासनाच्या वतीने कोणते सहकार्य आणि मदत हवी आहे हे पाहिले जाईल आणि ते सहकार्य आणि मदत देण्याची भूमिका स्वीकारण्यात येईल.



VTG/ KGS/ SBT/ ST/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 12=55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, रेल्वे स्टेशन , एस.टी.स्टॅन्ड आणि स्टेशनच्या जवळ असलेल्या हॉस्पिटलच्या परिसरात ही बेपत्ता मुले भटकत असतात . यासाठी भरारी पथक निर्माण करण्यात यावे अशा प्रकारची मागणी आम्ही पूर्वी केली होती त्यानुसार मुंबई शहरामध्ये ही व्यवस्था अस्तित्वात आलेली आहे. या भरारी पथकामध्ये ...

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KTG/SBT/KGS/ST. श्री. गायकवाड नंतर --- 13:00

डॉ. गोऱ्हे ....

साध्या वेषातील पोलीस, विशेषत: महिला पोलीस असतील आणि ते अशा मुलांवर लक्ष ठेवून असतील. माझा प्रश्न असा आहे की, मूल हरवले की आईवडील त्याचे छायाचित्र देतात .. आपण या निवेदनात शेवटी म्हटले आहे की, दूरदर्शवर अशी छायाचित्र जाहीर करून दाखविली जातात. परंतु एखादी मिसिंग चिड्रेनसाठीची वेबसाईट खास अशी केली तर रेल्वे स्टेशनवर असलेल्या पोलिसांना लगेच दिसू शकेल, समजू शकेल की, हे मूल मिसिंग चिड्रेनमधील आहे की नाही ? अशा पद्धतीने अद्ययावत यंत्रणा मोठ्या जंक्शंन्सवर उभारली तर फार मोठ्या प्रमाणात ही मुले आपल्याला सापडू शकतील आणि त्यातून आपल्याला यश मिळू शकेल. तर तसे आपण कराल का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, बेपत्ता मुलांची एक वेबसाईट केली जाईल तसेच ती वेळच्या वेळी अपडेट केली जाईल आणि त्याची माहिती सगळ्या पोलीस स्टेशन्सना मिळेल अशी व्यवस्था केली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे, विषय आहे. आपण या निवेदनामध्ये म्हटले आहे की, 634 मुले-मुली मिळून आल्या आहेत व अजून 199 मुले-मुली बेपत्ता आहेत. या 199 मध्ये मुले किती आणि मुली किती, त्यांचे वयोमान काय आहे ? तसेच या निवेदनात पुढे आपण असे म्हटले आहे की, जानेवारी ते मार्च 2009 या तीन महिन्याच्या काळात 593 मुले-मुली बेपत्ता झाली पण त्यातील किती सापडली याचे उत्तर आपण यात दिलेले नाही, ते कृपा करून दिले जावे. तसेच आपण या निवेदनात असेही म्हटले आहे की, काही मनोरूग्ण आहेत, काही घरातील भांडणामुळे घरातून निघून गेली आहेत वगैरे. पण अशी मुले सापडल्यानंतर त्यांचे पालक पोलिसांना कळवत नाहीत. पण याबाबतीत आपला काही फॉलोअप राहील का ? म्हणजे मूल बेपत्ता असल्याचे आपल्या पोलिसांना कळविल्यानंतर आपल्याला ते सापडून आले नसेल तर महिना-दोन महिन्यांनी त्यांच्या घरी जाऊन मूल मिळून आले आहे किंवा काय ? असे केल्याने आपल्याकडील बेपत्ता मुलांची संख्याही कमी होऊ शकेल. दुसरे असे की, आपण अशा बेपत्ता मुलांचा राज्यात शोध घेत आहात. या निवेदनात आपण या संदर्भात असे म्हटले आहे की, मुंबईत आणि राज्यात शोध घेतो पण राज्याबाहेर अशा बेपत्ता मुलांची माहिती आपण देतो काय ? त्याबाबत आपली काय व्यवस्था आहे ? जेणे करून राज्याबाहेर देखील ही मुले पळाली असतील तर त्यांचा ट्रेस करता येईल. तेव्हा त्यासाठी काही यंत्रणा आपण राबविणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, काही मुले मनोरूग्ण असल्यामुळे तर काही मुले घरातील त्रासामुळे, कधी अभ्यासाला कंटाळून आपल्या नातेवाईकांकडे पळून जाण्याची शक्यता असते. पोलीस अशा मुलांचा शोध घेतात, नातेवाईकही शोध घेतात. अशी मुले बेपत्ता झाल्याबरोबर पोलीस स्टेशन्सवर तक्रारी नोंद केल्या जातात, बेपत्ता म्हणून एक नोंद होते. परंतु नातेवाईकांकडून तो मुलगा वा मुलगी घरी आल्यानंतर त्याची माहिती पोलीस स्टेशनला कळविली जात नाही. हे सकाळी माझ्याही लक्षात आले. त्यामुळे अशा ज्या काही तक्रारी असतील त्या बाबतीत त्या घरातील मुले नातेवाईकांकडून परत आली आहेत काय याचा फॉलोअप घेतला जाईल आणि त्याचे रेकॉर्ड अपडेट केले जाईल. सभापती महोदय, ज्या मुलांचे नातेवाईक परराज्यात, दुसऱ्या राज्यात आहेत तेथेही ही मुले जाण्याची शक्यता असते. तेव्हा त्याही राज्यांमध्ये असा शोध घेतला जाईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, बेपत्ता व्यक्तींची टक्केवारी आपण काढली तर ती दरवर्षी वाढत असल्याचे आपल्याला दिसून येईल. मी आपल्या अनुमतीने आपल्या आणि माननीय मंत्री महोदयांच्या या संदर्भातील काही आकडेवारी नजरेस आणून देऊ इच्छितो. 2005 ला एकूण 9899 व्यक्ती बेपत्ता झाल्या होत्या, व त्या सर्व वयोगटातील होत्या. त्यात केवळ मुलेच आहे असे नाही., यापैकी 9000 व्यक्ती मिळाल्या, 751 व्यक्ती मिळून आलेल्या नाहीत. 2006 ला 11094 व्यक्ती बेपत्ता झाल्या आहेत आणि त्यापैकी 1495 व्यक्ती मिळून आलेल्या नाहीत. 2007 ला 10,597 बेपत्ता व्यक्ती आहेत पण न मिळालेल्यांची संख्या 2667 आहेत. 2008 ला 8000 व्यक्ती बेपत्ता आहेत. म्हणजे ही दिवसेगणिक वाढत असलेली संख्या असताना त्यासाठी आपण जुन्या पद्धतीनेच शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहोत किंवा इतर संस्थांना बरोबर घेऊन काम करीत आहोत. त्यातून हे काम पूर्ण होणारे नाही. खरे म्हटले तर यासंदर्भात जनतेचा प्रश्न एवढाच आहे की, आपण इकडे राहात असताना, हयात असताना, सेल्स टॅक्स देतो आहोत, आयकर भरतो आहोत, वॉटर टॅक्स, प्रॉपर्टी टॅक्स अशा सारखे विविध कर आपण देतो आहोत. पण 10-10 वर्षे घरातील एखादी व्यक्ती बेपत्ता झाली तर ती मृत झाली आहे एवढा तरी शासन त्यांना त्या बाबत निर्णय देईल का ? त्यांना एक शोध लावून देईल का ? ती व्यक्ती जीवंत असताना त्याच्या कडून सगळ्या पद्धतीचे टॅक्स देत असताना ती व्यक्ती बेपत्ता झाल्यानंतर ठराविक काळामध्ये ती व्यक्ती मृत झाली आहे का याची माहिती तरी शासनाकडून मिळावी एवढीच त्यांची अपेक्षा आहे. यासाठी

.... वाय 3 ...



KBS/KTG/SBT/KGS/ST. श्री. गायकवाड नंतर --- 13:00

खरोखरी अशी समिती नेमावी असे आदेश उच्च न्यायालयाने देखील आपल्याला दिले होते. तर त्या पद्धतीने आपण काही केले आहे का ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या दृष्टीने समिती नेमली जाईल आणि त्या पद्धतीने काम केले जाईल.

***

..... वाय 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : विष्णुपुरी उपसा जलसिंचन प्रकल्पावरील शेतकऱ्यांच्या 2000-2500 विद्युत पंपाच्या विद्युत जोडण्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये तोडणे.

**मु.शी.** : विष्णुपुरी उपसा जलसिंचन प्रकल्पावरील शेतकऱ्यांच्या 2000-2500 विद्युत पंपाच्या विद्युत जोडण्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये तोडणे या संबंधी श्री.कमलकिशोर कदम, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो.

" नांदेड येथील विष्णुपुरी उपसा जलसिंचन या प्रकल्पावरील शेतकऱ्यांच्या 2000 ते 2500 विद्युत पंपाचे विद्युत जोडण्या जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेशाने तोडण्यात येणे, त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांच्या ऊस, केळी व इतर पिकांचे अंदाजे 100 कोटी रूपयांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण होणे, वीज जोडण्या तोडल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाविरूद्ध पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, या प्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व या बाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अजित पवार (जलसंपदा - कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीयसदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

..... वाय 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी क्र.4 वरील जलसंपदा मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, : सभापती महोदय, विष्णुपुरी प्रकल्प हा शेतीसाठी बांधलेला उपसा जलसिंचन प्रकल्प आहे. यातील 80 टक्के पाणी हे शेतीसाठी आरक्षित केलेले आहे. या वर्षी धरण पूर्णपणे भरलेले आहे असे असतानाही नांदेड शहराला पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणार नाही अशी शक्यता आहे या काल्पनिक भीती पोटी या जलाशयाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री..कमलकिशोर कदम..

दोन्ही बाजूला असलेले अडीच ते तीन हजार इलेक्ट्रिक मोटारींचे कनेक्शन तोडण्यात आले. त्यामुळे ऊस, केळी इत्यादी जवळ जवळ 100 ते 150 कोटी रुपयांची पिके धोक्यात आली आहेत. सभापती महोदय, शहरासाठी दर माणशी दररोज 100 लिटरचा पाणी पुरवठा केला तरी 10 मिलियन क्युबिक मीटरपेक्षा जास्त पाणी लागत नाही. शहरातील माणसे फार लब्ध प्रतिष्ठित असतात. ग्रामीण भागातील माणसाला दररोज 40 लिटर पाणी दिले जाते आणि शहरातील माणसांना दुप्पट पाणी दिले जाते. पाटबंधारे खात्याचे अधिकारी धरणामध्ये 25 द.ल.घ.मी.पेक्षा जास्त पाणी उपलब्ध आहे असे सांगतात. असे असतांना नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या लहरीपणामुळे सर्व कनेक्शन्स तोडण्यात आली. त्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांचे 100 ते 150 कोटी रुपयांच्या पिकांचे नुकसान होणार आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण याचा संपूर्ण आढावा घ्यावा. काल्पनिक भीतीपोटी कुणी शेतकऱ्याला मातीत गाडण्याचे काम करीत असेल तर ते थांबविले पाहिजे. आपण ही धरणे शेतकऱ्यांसाठी बांधतो. असे असतांना शेतकऱ्याला संपविण्याचे काम करणार असाल तर ते योग्य नाही. सभापती महोदय, जलसंपदा खात्याच्या माननीय मंत्री अधिक जाणकार आहेत. त्यांनी याबाबत संपूर्ण आढावा घ्यावा, खात्री करुन घ्यावी. आणि आज शिल्लक असलेले शेतातील उभे पिक जळू देऊ नये अशी विनंती करतो. तर यासंबंधी मंत्री महोदय काय कार्यवाही करणार आहेत?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, यावर्षी मराठवाडयातील जायकवाडी, सिध्देश्वर, एलदरी, विष्णूपूरी परिसरामध्ये विशेषत: जायकवाडी,सिध्देश्वर आणि एलदरी या धरणामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी पाणी भरले. अशी परिस्थिती विदर्भातील काही भागात व मराठवाडयात निर्माण झाली. आणि म्हणून 15 जुलै 2010 पर्यंत त्या त्या शहरांना पिण्याचे पाणी आरक्षित ठेवण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत. त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्या त्या धरणातील पाणी आरक्षित ठेवण्यात आले आहे. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम साहेबांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. त्याठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेतली आणि त्यामध्ये जवळपास 2 हजारपेक्षा जास्त विजेच्या कनेक्शनमधून वीज पुरवठा बंद करा अशाप्रकारच्या सूचना देण्यात आल्या. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय सदस्यांनी मागणी केली आहे, त्या संदर्भात दिनांक 21, 22 किंवा 23 डिसेंबर 2009 रोजी नागपूर येथे जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठक घेण्याचा माझा प्रयत्न राहील. त्यामध्ये लोहा, कंधार, नायगाव व



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार..

नांदेडबाबत चर्चा केली जाईल. त्या बैठकीला माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम साहेबांना बोलाविले जाईल. तसेच, याठिकाणी आता जी गावे घेण्यात आली तेथील प्रतिनिधीत्व करीत असलेल्या लोकप्रतिनिधींना देखील बोलाविले जाईल, माझ्या विभागाच्या संबंधित सर्व अधिकाऱ्यांना व जिल्हाधिकाऱ्यांना बोलाविले जाईल. आणि नांदेड शहरासाठी जे काही पिण्याचे पाणी लागणार आहे ते आरक्षित करुन ठेवावे लागेल त्याला माननीय सदस्यांचा विरोध असण्याचे कारण नाही. सभापती महोदय, त्याठिकाणी आलेले ऊस, केळी इत्यादी पिकांचे पाणी बंद केल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणार आहे ही गोष्ट खरी आहे. कधी कधी आपले अधिकारी सुध्दा अंदाज व्यक्त करुन भविष्यात त्याठिकाणी काही अडचण निर्माण होऊ नये म्हणून आत्ताच पाणी बंद करावे असे घाबरुन सांगत असतात. आज विष्णूपूरीमधून साडे सहा लाख जनतेला पाणी दिले जाते. त्याबाबत माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की,एवढे पाणी दिले जात नाही. तरीसुध्दा ठीक आहे. त्याठिकाणी आजू बाजूच्या तालुक्यांमध्ये निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन तेथील जनावरे आणि माणसांना लागणारे पिण्याचे पाणी आरक्षित ठेवून राहिलेले पाणी काटकसरीने कसे शेतकऱ्यांना देता येईल आणि शेतकऱ्यांचे नुकसान कसे कमी करता येईल याकरिता उशिरात उशिरा 24 डिसेंबरला मुंबईमध्ये बैठक घेण्यात येईल. किंवा लवकरात लवकर 21, 22 किंवा 23 डिसेंबर रोजी नागपूर येथे बैठक घेऊन त्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, मी शासनाचा आभारी आहे. मी एवढेच निदर्शनास आणतो की, 15 ऑक्टोबर 2009 रोजी धरणामध्ये 80 मिलियन क्युबिक मीटर पाणी साठा होता. म्हणजे 100 टक्के पाणी साठा होता.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कमल किशोर कदम . . ..

100 टक्के साठा होता. आता दि.13 डिसेंबर 2009 रोजी 84.61 दशलमी पाण्यापैकी 68.34 दलघमी पाणी उपलब्ध आहे. म्हणजे दोन महिन्यामध्ये फक्त 16 टक्के पाणी खर्च झालेले आहे. पुढच्या दोन महिन्यामध्ये 16 टक्केच पाणी खर्च होईल असे गृहीत धरले तरी सुध्दा धरणामध्ये 70 टक्के पाणी शिल्लक रहाते. ही सर्व वस्तुस्थिती उपलब्ध असताना सुध्दा तेथील प्रशासनाने अडचणीची परिस्थिती निर्माण केलेली आहे. विशेषत: पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी बैठकीमध्ये कलेक्टर यांना सुस्पष्टपणे सांगितले की, धरणामध्ये 25 दलघमी पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे विजेची कनेक्शन तोडून टाकण्याच्या बाबतीत कारवाई करण्यात आली. त्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांवर शासन काही कारवाई करणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, कदाचित दि.15 जुलै 2010 पर्यंत नांदेड आणि अजुबाजूच्या भागाला पुरावयास पाहिजे याकरता जिल्हाधिकारी यांनी अशा प्रकारचा निर्णय घेतला असेल. मी मघाशीच सांगितले आहे की,मी यासंबंधात बैठक घेतो. माझ्याकडेही पाच वर्षे पाणी पुरवठा विभाग होता. त्यामुळे पाण्याच्या संदर्भातील प्रश्नांची मलाही थोडीफार माहिती आहे. त्यामुळे या बैठकीमध्ये काही मार्ग काढला जाईल आणि त्या बैठकीमध्ये चर्चा करीत असताना मला असे जाणवले की, तेथील एखाद्या ए किंवा बी किंवा सी अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक हे काम केले आहे, तर त्यांच्यावर कोणती योग्य ती कारवाई करावयाची याबाबतचा निर्णय देखील मी त्या बैठकीतच घेईन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,महाराष्ट्रामध्ये पाणी अपूरे आहे.पाण्याचे संकट आहे याची आम्हाला देखील माहिती आहे. पण याठिकाणी पाणी राखीव ठेवावे लागेल आणि त्यासाठी पंप बंद करण्याची गरज भासली तर या बैठकीनंतर 125 एकरातील पिकांना व त्या परिसरातील लोकांना पाणी मिळणार नाही. अशा वेळी शेतकऱ्यांच्या पिकाचे जे नुकसान होणार आहे, त्याबद्दल शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले होते आणि दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांनाही माहिती आहे की,धरणामध्ये नक्की किती टक्के पाणी शिल्लक आहे याचा ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये अंदाज येतो. त्यानंतर कालवा सल्लागार समितीची बैठक होते आणि त्यामध्ये शिल्लक असलेल्या पाण्याचे वाटप केले जाते. येथे अशी परिस्थिती आहे की,वरच्या भागा-

. . . .2 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तील 3-4 धरणे कमी भरलेली असल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदमसाहेबांनी उपस्थित केलेला मुद्दा लक्षात घेऊन वरच्या भागामध्ये पाण्याची काटकसर कुठे करता येईल काय ? शेतकऱ्यांना मदत करीत असताना, तसेच पिण्याचे पाणी देत असताना, नांदेड शहर आणि तेथील जे तालुके आहेत तेथे 100 टक्के पाणी न देता, 70 टक्के किंवा 80 टक्के पाणी द्यावे. तेथे 20 ते 30 टक्के पाण्याची कपात करावी अशा दृष्टीकोनातून देखील सगळा विचार केला जाईल आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे विचार करुन,पुढे जर काही प्रश्न निर्माण झाला किंवा यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे असे दिसून आले, तर ज्याप्रमाणे आतापर्यंत महाराष्ट्रातील शेतकरी अडचणी मध्ये असताना, कोणत्याही नैसर्गिक संकटामध्ये असताना किंवा पाण्याच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाला असेल तर अशा वेळी राज्य शासनाने मदतीची भूमिका स्विकारलेली आहे. त्यामुळे येथेही राज्य शासन शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीपूर्वक विचार करील.

उल्हास पवार : सभापती महोदय, मी एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. शासनाने ज्या-ज्या प्रकल्पांना महत्वाच्या व्यक्तींची नावे दिली असतील तर मग जी शासकीय पत्रके छापून येतील मग ती उत्तराच्या स्वरुपात असतील तर त्यामध्ये ती नावे यावयास पाहिजेत. याठिकाणी सध्या विष्णूपुरी प्रकल्पाच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. या प्रकल्पाला "कै.शंकरराव चव्हाण"साहेबांचे म्हणजे "शंकर सागर" असे नाव दिलेले आहे. अशा प्रकारे ज्या-ज्या प्रकल्पांना विशिष्ट व्यक्तींची नावे दिली असतील, त्या नावांचा उल्लेख शासनाच्या पत्रामध्ये छापून आली पाहिजेत. जेणेकरुन लोकांना समजले की, अमुक प्रकल्पाला या व्यक्तीचे नाव दिलेले आहे. नाहीतर आपल्याकडून जुन्या नावांचाच उद्‌घोष होत असतो. अशा प्रकारे ज्या-ज्या प्रकल्पांना विशिष्ट व्यक्तींची नावे दिली असतील ती शासकीय पत्रकामध्ये छापण्यात आली पाहिजेत अशी माझी विनंती आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

----

. . . .2 ए-3



**पृ. शी.** : सेंट जॉर्जेस रुग्णालयातील रक्तपेढी मध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा

**मु.शी.** : सेंट जॉर्जेस रुग्णालयातील रक्तपेढी मध्ये निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील,भगवान साळुंखे,नितीन गडकरी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाच्या मुंबईतील सेंट जॉर्जेस रुग्णालयातील रक्त पेढी माहे नोव्हेंबर, 2009 वा त्या सुमारास आवश्यक त्या रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने महत्वाच्या वैद्यकीय शस्त्रक्रिया अघोषितपणेपुढे ढकलण्याची आलेली वेळ, वास्तविकदृष्टया सदर हॉस्पिटलात विभागीय रक्तपेढी कार्यान्वित असूनही प्रामुख्याने थॅलेमेसिया या रक्ताच्या आजाराशी संबंधित रुग्णांना आवश्यक रक्त तुटवड्यामुळे आणि पर्यायाने शस्त्रक्रिया पुढे ढकलण्याची निर्माण झालेली अभूतपूर्व परिस्थिती, परिणामी रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्यात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची व चिडीची भावना, या बाबत राज्य शासनाने युध्दपातळीवर आवश्यक त्या रक्ताच्या पुरवठ्याची तरतूद करणे तसेच आवश्यक त्या रक्ताच्या अभावी एकही रुग्ण दगावणार नाही यासाठी भविष्यात घ्यावयाची खबरदारी, याबाबत शासनाने वेळीच दखल घेऊन केलेली वा करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 ए-4



श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी माझ्याकडे थॅलेमेसियाच्या पेशंटचे नातेवाईक आल्यानंतर त्यांनी सांगितले की, ब्लड बँकेमध्ये रक्त कमी आहे. त्यानंतर मी स्वत: जे.जे.ग्रुपच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ब्लड बँकेला भेट दिली. त्यावेळी ज्या-ज्या गोष्टी लक्षात आल्या, त्याच्या अनुषंगाने खरे म्हणजे ही लक्षवेधी सूचना देण्यात आली आहे. केवळ पेपरमधील बातमीच्या आधारावर दिलेली नाही. सभापती महोदय, आपल्यामार्फत मला माननीय मंत्री महोदयांना तीन-चार गोष्टी विचारावयाच्या आहेत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

वर्षाला जवळ जवळ बारा ते सोळा हजार बाटल्या जे.जे., सेंट जॉर्ज, जी. टी. आणि कामा या चारही रुग्णालयाला मिळून लागत असतात. सेंट जॉर्जेस रुग्णालयाला वर्षाला 6000 बाटल्या थालेसेमियाच्या रुग्णांसाठी वापरण्यात येतात. जे.जे. रुग्णालयात गेल्यानंतर असे लक्षात आले की, स्टेट ब्लड कौन्सिल आर्थिकदृष्टया अधिक सक्षम करण्याची गरज आहे. त्यांना आता नाममात्र दोन कोटी रुपये देण्यात येतात त्याऐवजी त्या ठिकाणी चार ते पाच कोटी रुपये देण्याची गरज आहे. ते देणार काय? माझा दुसरा प्रश्न असा की, सोशल वर्कर्सची संख्या कमी आहे. ही सोशल वर्कर्सची संख्या वाढविण्यात येईल काय? जेणे करुन ब्लड कॅम्पस् घेऊन रक्त उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून ते आवश्यक असतात. त्या ठिकाणचे ब्लड ट्रान्समिशन ऑफिसरचे पद रिक्त आहे, ते कधी पर्यंत भरण्यात येईल? त्या ब्लड बँकेसाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची मागणी आहे ती कधी पूर्ण केली जाईल? शंभर कोटी रुपये केंद्र शासनाकडून आलेले आहेत असे आम्ही ऐकतो. हे चार स्पेसिफिक प्रश्न आहेत. त्याप्रमाणे त्या ठिकाणी व्यवस्था झाली तर जे.जे.सारखी अतिशय महत्वाची ब्लड बॅंक आहे ती सक्षम करु त्यामाध्यमातून रक्ताची जी गरज आहे ती पूर्ण करता येईल्.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्टेट ब्लड कौन्सिलबद्दल पहिला प्रश्न विचारलेला आहे. मला आपल्या मार्फत सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, ब्लड कौन्सिल ही आरोग्य विभागाच्या अंतर्गत आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या ब्लड बँकेचा फंड वाढविण्याबाबत नक्कीच आरोग्य मंत्र्यांबरोबर चर्चा करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सोशल वर्कर्सची संख्या कमी असल्या बाबतचा प्रश्न विचारलेला आहे. ही संख्या कमी आहे, सोशल वर्कर्सची आवश्यकता आहे असे शासनाच्या निदर्शनास आले तर त्यानुसार या पदांची लवकरात लवकर नियुक्ती करण्याचा प्रयत्न करण्यात येईल्.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, यासंदर्भात गेल्या चार-पाच अधिवेशनांमध्ये अशाच प्रकारचे उत्तर मिळत आहे. सन्माननीय मंत्रिमहोदया वर्षा गायकवाड आता नव्याने आल्या आहेत. त्यामुळे आपण काही तरी ठोस उत्तर द्यावे, महिनाभरात ही पदे भरु असे काही तरी सांगाल काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अशा पदांची आवश्यकता आहे काय याबाबतीत शासन महिनाभरात प्रयत्न करील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : प्रयत्न काय करायचा? धारावीचे सगळयात जास्त पेशंट त्या ठिकाणी येतात.

**उपसभापती** : वर्षाताई येत्या वर्षात करु असे आपण सांगा. येत्या वर्षात म्हणजे 31 डिसेंबरला वर्ष संपते.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, "होय". येत्या वर्षेभरात करु.

श्री. विनोद तावडे : येत्या वर्षात म्हणजे दहा दिवसात, असे नाही. हे काही तरी सांगत आहेत.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, ही पदे भरण्याच्या संदर्भात काही नॉर्म्स असतात. जाहिरात द्यावी लागेल, अर्ज मागवावे लागतील, ही सर्व प्रोसिजर पार पाडावी लागेल. त्यामुळे येत्या वर्षात याबाबतीत नक्कीच विचार करण्यात येईल्. त्यानंतर ब्लड ट्रान्समिशन ऑफिसरच्या रिक्त पदाबाबत आपण या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. ते पद भरण्यात येईल. यंत्रसमुग्रीच्या आधुनिकीकरणाबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. ते सुध्दा करण्यात येईल. (अडथळा) येत्या वर्षभरात शासन हे नक्कीच करेल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी इतक्या सहजतेने उत्तर दिले. येत्या वर्षभरात हे करण्यात येईल असे सांगितले. पण एखाद्या रुग्णाला रक्ताची आवश्यकता असेल आणि त्याला रक्त वेळेवर मिळाले नाही तर त्या रुग्णाचा जीव जाऊ शकतो, हे माननीय मंत्रिमहोदयांनी लक्षत घ्यावे.. त्यामुळे रक्त अतिशय महत्वाचे आहे. याबाबतीत अशी उडवाउडविची उत्तरे कृपाकरुन देण्यात येऊ नयेत असे सभापती महोदय, आपल्या मार्फत मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. तावडे साहेबांनी या ठिकाणी सर्व प्रश्न उपस्थित केलेले आहेत. फक्त एक मुख्य प्रश्न असा आहे की, रक्ताचे पृथ:करण करणारी जी मशीन असते ती येथे आहे काय? हा पहिला प्रश्न आणि माझा दुसरा प्रश्न असा की, माननीय मंत्रिमहोदय, श्री. दिग्विजय खानविलकर हे ज्यावेळी या खात्याचे मंत्री होते त्यावेळी त्यांनी जे.जे.रुग्णालयामध्ये रक्तसंक्रमण परिषदेतर्फे एक मोठी महाब्लड बँक करण्यासाठी काही कोटी रुपयांची बजेटमध्ये प्रोव्हिजन केली होती. त्या रक्तसंक्रमण परिषदेचे नेमके काय झाले, त्याची सद्य:स्थिती काय आहे?

..3..

डॉ. दीपक सावंत. . .

ती चालू आहे काय? ती चालू असेल तर सेंट जॉर्जेस रुग्णालय हे जे.जे. रुग्णालयाचेच एक अंग आहे,त्यांना तिकडून रक्त पुरवठा का होत नाही?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय दस्यांनी आपण सहजतेने बोलता असे म्हटले आहे. सभापती महोदय, मला सांगायला हरकत नाही की, डब्लू.एच.ओ.च्या नॉर्म्स नुसार लोक संख्येनुसार एक टक्के गरज असते. देशाच्या स्तरावर विचार केला तर महाराष्ट्राचा वाटा 22 टक्के आहे. त्यामुळे जे.जे. आणि सेंट जॉर्जेस रुग्णालयात कुठली शस्त्रक्रिया रक्ताच्या अभावी रहात नाही. आपल्याकडे रक्ताचा पुरवठा पुष्कळ आहे. नोव्हेंबरमध्ये आपल्याकडे असलेला जुना साठा 578 बॉटल्स इतका आहे.

डॉ. दीपक सावंत : थालेसेमियाचे रुग्ण या रुग्णालयामधून परत जातात.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, थालेसेमियाच्या रुग्णांना लागणाऱ्या रक्ताच्या व्यतिरिक्त 214 बाटल्या रक्त आहे. शस्त्रक्रियांसाठी वितरित करण्यात आलेल्या रक्ताच्या बाटल्यांचे प्रमाण 100 आहे आणि इतर संस्थांना त्यांच्या मागणीनुसार वितरित केलेल्या रक्ताच्या बाटल्यांचे प्रमाण हे 78 आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ....

सभापती महोदय, आपण जर बघितले तर ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर डॉक्टर सरळ सांगतात की, रक्ताचा पुरवठा नाही त्यामुळे आपण घरी जावे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अशी जर कोणाबद्दल तक्रार असेल त्यांचे नाव सांगावे. त्यांच्या विरुध्द कारवाई करु. कोणालाही पाठीशी घालण्याची आमची इच्छा नाही. सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये जून, 2009 पासून नोव्हेंबर, 2009 पर्यंत 30 कॅन ब्लड डोनेट झाले. सभापती महोदय, 2748 बॉटल त्या ब्लड बँकेमध्ये मिळालेल्या आहेत.

श्री. विनोद तावडे : साधारणत: वर्षाला किती ब्लड लागते आणि आपण किती देतो ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, शस्त्रक्रियेच्या बाबतीत ही लक्षवेधी सूचना आहे. शस्त्रक्रियेसाठी आपल्याला 28 बॉटल्स रक्त लागते. आपण जर पाहिले तर आपल्याकडे मुबलक प्रमाणामध्ये रक्त साठा आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे थेलेसेमियाबाबत विचारत आहेत. थेलेसेमियाबाबत मी सांगितले की, नोव्हेंबरमध्ये 214 बॉटल्स दिलेल्या आहेत. थेलेसेमियाच्या रुग्णाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर जूनमध्ये आपण थेलेस्मियाच्या रुग्णांना 480 पैकी 265 बॉटल्स दिलेल्या होत्या. जुलैमध्ये 252 बॉटल्स दिल्या होत्या. ऑगस्टमश्ये 240 बॉटल्स दिल्या होत्या आणि सप्टेंबरमध्ये 227 बॉटल्स दिलेल्या होत्या. ऑक्टोबरमध्ये 247 आणि नोव्हेंबरमध्ये 214 बॉटल्स दिलेल्या होत्या. याप्रमाणे त्यांना प्रत्येक वेळी बॉटल्स देण्यात आलेल्या आहेत. त्या व्यतिरिक्त शस्त्रक्रियेसाठी सुध्दा आपल्याकडे मुबलक रक्तसाठा आहे. ते करुन सुध्दा आपल्याकडे रक्तसाठा उपलब्ध असतो. त्यामुळे समजा आपल्याला हवा असलेला एखादा दुर्मिळ गट जर मिळत नसेल तर त्यावेळेलाच आपण बाहेरच्या रुग्णालयाकडून मागतो. अन्यथा सेंट जॉर्जेस रुग्णालयाकडे रक्ताचा मुबलक साठा आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : सिन्नर येथील कारखान्यात इफेड्रिन नावाचा अंमली पदार्थ बनविला जात असल्याचे उघडकीस येणे

**मु. शी.** : सिन्नर येथील कारखान्यात इफेड्रिन नावाचा अंमली पदार्थ बनविला जात असल्याचे उघडकीस येणे याबाबत श्री. जयप्रकाश छाजेड, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मानवी आरोग्यास घातक असलेल्या 'इफेड्रिन' या औषधास अन्न, ओषध प्रशासनाने बंदी आणूनही हे अंमली पदार्थ निर्माण करणाऱ्या सिन्नर, जि. नाशिक येथील मुसळगाव औद्योगिक वसाहतीतील आशाई ड्रग्ज ॲण्ड इंटरमेजिएट या कारखान्यात बिनदिक्कतपणे बनविले जात असल्याचे मुंबई अंमली पदार्थ विरोधी पथकाने दि. 11.12.2009 रोजी टाकलेल्या धाडीत उजेडात येणे, औषध निर्माण क्षेत्रातील कारखान्यांना हा उत्पादित माल दिला जात असणे, औद्योगिक वसाहतीत औषध निर्माणाची उत्पादनाची नोंद करणाऱ्या या कारखान्याने मात्र आत जीवघेणी औषधे बनविण्याचा सपाटा लावला होता, ही गोष्ट वसाहतीच्या प्रशासनाला मात्र ज्ञात नव्हती. अंमली पदार्थ विरोधी पथकाने टाकलेल्या धाडीत तब्बल 82 किलो 550 गॅम इफेड्रिन जप्त केले. या कारवाईत 5 कोटी रुपयाचे मादक द्रव्य जप्त कण्यात येणे, औषध निर्माण क्षेत्रातील कंपन्यांमध्ये कुठल्या प्रकारचे उत्पादन घेतले जाते त्याची तपासणी करण्याकरिता एफ.डी.ए.ने (अन्न औषध प्रशासन ) त्या कारखान्यात जाऊन खात्री करणे गरजेचे असते असे आतानाही या कारखान्यात त्या विभागाचे अधिकारी तपासणीसाठी कधी गेले होते का ? किंवा या विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनच या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड ....

गोष्टींवर पांघरुन तर घातले गेले नाही ना असा प्रश्न उपस्थित होणे, या मानवी जीवाला घातक असलेल्या अंमली मादक पदार्थाला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कारवाई, या प्रकरणातील दोषींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाचे स्पष्टीकरण, त्यादृष्टीने करावयाची कार्यवाही, या अतिमहत्वाच्या विषयाकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो."

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नीरा गावातील ज्युब्लिएंट केमिकल कंपनीमधून बाहेर फेकल्या जाणाऱ्या स्प्रिटवॉश जलपदार्थापासून गावातील लोकांच्या आरोग्यावर झालेले गंभीर परिणाम

**मु. शी.** : नीरा गावातील ज्युब्लिएंट केमिकल कंपनीमधून बाहेर फेकल्या जाणाऱ्या स्प्रिटवॉश जलपदार्थापासून गावातील लोकांच्या आरोग्यावर झालेले गंभीर परिणाम याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" बारामती आणि फलटण तालुक्यातील नीरा नदीच्या काठावरील नीरा गावातील ज्युब्लिएंट केमिकल कंपनीमधून बाहेर फेकल्या जाणाऱ्या स्प्रिटवॉश या जलपदार्थापासून आजूबाजूच्या शेतीवर, काठावरील गावातील लोकांच्या आरोग्यावर झालेले गंभीर परिणाम, रसायने बनविणारी ही कंपनी विष बाहेर फेकत असून मोठ्या प्रमाणात नीरा नदी व आजूबाजूचा परिसर यामध्ये वेगाने पसरणे, नीरा नदी किनारी 40 गावे असून सदर गावांचे स्थलांतर होण्याचा निर्माण झालेला धोका, या प्रकरणी होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, बारामती आणि फलटण तालुक्यातील नीरा नदीच्या काठावरील नीरा गावातील ज्युब्लिएंट केमिकल कंपनीमधून स्प्रिटवॉश हा पदार्थ नदीमध्ये सोडला जातो त्यामुळे तिकडच्या शेतीवर आणि लोकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत. एक तर महाराष्ट्रामध्ये पाण्याची समस्या आहे आणि अशामध्ये नीरा नदीचे जे पाणी शेतीसाठी वापरावयास मिळते ते पाणी यामुळे दुषित केले जात आहे. ते दुषित केले जाऊ नये यादृष्टीने मी ही बाब विशेष उल्लेखाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

----

..5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लोणार सरोवर परिसराला जागतिक वारसा म्हणून घोषित करण्याची होत असलेली मागणी

**मु. शी.** : लोणार सरोवर परिसराला जागतिक वारसा म्हणून घोषित करण्याची होत असलेली मागणी याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" जालना येथील लोणार सरोवर परिसराला जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यासाठी मराठी विज्ञान परिषदेच्या जालना शाखेने केलेला ठराव, लोणार सरोवराच्या 750 मीटर परिसरात ना विकासक्षेत्र जाहीर व्हावे तसेच लोणार विषयक एकोन्ट संस्थेने केलेल्या अहवालाचे शासनाने पुनर्विलोकन करावे, लोणार गावातील गटाराचे पाणी सरोवरात जाऊ नये म्हणून शासनाने दुरुस्ती करावी, लोणार परिसरात अभयारण्य घोषित करावे, पर्यटन स्थळ जाहीर करावे, या परिसरातील मूर्तींचे मंदिरांचे रक्षण करावे आदि रास्त व न्याय मागण्या शासनाकडे केलेल्या असून याबाबत राज्य शासनाने काही उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे का ? याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे."

सभापती महोदय, बुलढाणा येथील जे लोणार सरोवर आहे ते जागतिक वारसा समजून घोषित करावे अशी मागणी लोणार सरोवर जतन आणि संवर्धन परिषदेमध्ये करण्यात आली आहे. यामध्ये मराठी विज्ञान परिषदेने असे सुचविले आहे की,

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

पर्यटक व्यवस्था व लोणार संशोधन संस्था निर्माण करुन जगातील ज्वालाग्रह विवरांची माहिती त्याठिकाणी अशापध्दतीने सांभाळली जाईल, तसेच पुरातत्व विभागाने या परिसरातील मंदिरे आणि मूर्तीचे जतन करण्याकडे लक्ष द्यावे आणि यासंदर्भामध्ये एकोन्ट या संस्थेने जो अहवाल दिला होता त्याचे सरकारने पुनर्विलोकन करावे याकडे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नाशिक जिल्हयातील 9 आदिवासी तालुक्यात रक्तपेशींना बाधा आणणाऱ्या सिकलसेल आजाराचे रुग्ण आढळून येणे

**मु. शी.** : नाशिक जिल्हयातील 9 आदिवासी तालुक्यात रक्तपेशींना बाधा आणणाऱ्या सिकलसेल आजाराचे रुग्ण आढळून येणे याबाबत श्री.जयप्रकाश छाजेड वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"नाशिक जिल्हयातील 9 आदिवासी तालुक्यात रक्तपेशींना बाधा आणणाऱ्या सिकलसेल आजाराचे 365 रुग्ण एका जिल्हा जिल्हा परिषदेच्या सर्वेक्षणातून आढळून येणे, जिल्हा परिषदेच्या 52 प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्षभरात विविध पातळीवर शिबिरे घेण्यात आली असता यात 6,695 व्यक्तींच्या रक्तांचे नमुने तपासण्यात येणे, यापैकी आठ रुग्ण सिकलसेलग्रस्त आढळले तर 257 रुग्णांमध्ये आजाराची लक्षणे आढळून येणे, हा आजार अनुवांशिक असून लाल रक्तपेशी नष्ट पावणे, रक्तवाहिन्या बंद पडणे, मूत्रपिंड, यकृत निकामी होणे, मेंदूला इजा झाल्यास अर्धांगवायू होणे आदी लक्षणे दिसून येत असणे, या आजारावर आजपर्यंत कोणतीच उपचार पध्दती उपलब्ध नसणे, या आजाराबाबत आदिवासी तालुक्यांमध्ये जनजागृती करण्याची गरज, यावर शासनाने तातडीने उपाययोजना करण्याकरिता मी शासनाचे विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधू इच्छितो.

-------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

3....

**पृ.शी.**: उल्हासनगर विधानसभा क्षेत्रातील उमेदवार श्री.पप्पू कलानी यांनी निवडणुकीच्या दिवशी निर्माण केलेले दहशतीचे वातावरण

**मु.शी.**: उल्हासनगर विधानसभा क्षेत्रातील उमेदवार श्री.पप्पू कलानी यांनी निवडणुकीच्या दिवशी निर्माण केलेले दहशतीचे वातावरण याबाबत श्री.विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, काल मी पुरवणी मागण्यांच्या वेळी हा विषय उपस्थित केला होता. पण त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही म्हणून मी विशेष उल्लेखाद्वारे हा विषय उपस्थित करीत आहे. विशेष उल्लेखाद्वारे मांडण्यात आलेल्या विषयाबाबत महिन्याभरात चौकशी होते असे आम्ही ऐकले आहे, गेल्या 6 वर्षात पहिल्या टर्ममध्ये असे काही अनुभवलेले नाही. विशेष उल्लेख येतात आणि जातात. तरी सुध्दा प्रक्रियेवर विश्वास असल्यामुळे आम्ही विशेष उल्लेख सूचना मांडतो.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मागील वेळचे लोकप्रतिनिधी होते. त्यासंबंधीचा हा विषय आहे. पोलीस अधिकारी विशिष्ट राजकीय नेत्याला मदत करीत असतात. श्री.पप्लू कलानी यांच्या विरोधात आमच्या पक्षाचे श्री.कुमार आयलानी हे उभे होते. दुपारनंतर मतदानात जे कार्यकर्ते ॲटिव्हली काम करीत आहेत त्याठिकाणी माणसे भरुन न्यायची, मारामाऱ्या करायच्या, मग आमच्या लोकांनी पोलीस तक्रार करीत रहायचे, त्यात 2-3 गेल्यावर एकूणच निवडणुकीची रचना डिस्टर्ब करण्याचे काम श्री.पप्पू कलानी हे काम करीत होते. त्यावेळी श्री.कुमार आयलानी यांचे अधिकृत निवडणूक प्रतिनिधी श्री.नरेंद्र राजानी यांनी डीसीपी श्री.संजय येनपुरे यांच्याकडे जाऊन

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्रागा केला की, हा सर्व प्रकार चालू असताना तुम्ही बघ्याची भूमिका कशी काय घेता ? यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी डीसीपींना फोन करुन सांगितले की, यापध्दतीने तेथे प्रकार सुरु असून आमच्या पक्षाचे निवडणूक प्रतिनिधींची तक्रार करीत आहेत. श्री.येनपुरे यांना एवढी मस्ती आहे की, आमदारांनी स्वत: फोन करुन सुध्दा त्यांनी त्या निवडणूक प्रतिनिधीच्या बकोडीला पकडून गाडीत टाकले, त्यांचा मोबाईल फोन घेतला, आईबहिणीवरुन शिव्या दिल्या, तुम्ही हे बरोबर करीत नाही असे सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी त्यांना सांगितले. श्री.राजानी यांना गाडीत टाकून स्वत:च्या कारमागे पोलिसांची गाडी ठेवून 4 तास सतत फिरवत बसले. श्री.नरेंद्र राजानी हे तेथील नगरसेवक आहेत, मान्यवर आहेत, पण कोण काय माझे बिघडवणार आहे अशा मस्तीत ते वागले. श्री.राजानी यांनी मला माझा मतदानाचा हक्क तरी बजावू देत असे सांगितल्यावर त्याला नकार दिला. स्वत: आयपीएस झाले, डीसीपी झाले याचा अर्थ आपल्याला सगळे अधिकार मिळाले या भूमिकेतून ते वावरत आहेत. या विषयाबाबत सन्माननीय गृहराज्यमंत्री येथे आहेत. आपण त्याबाबत कडक निर्देश द्यावेत. श्री.पप्पू कलानीसाठी असे जे मदत करीत आहेत त्यांना वठणीवर आणता येईल. अन्यथा अशा राजकीय नेत्यांना अशाप्रकारे पोलीस अधिकारी मदत करु लागले तर लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडतो. त्यामुळे याची नीट चौकशी झाली पाहिजे एवढीच मी आपल्यामार्फत विनंती करतो.

-----

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम अयशस्वी झाल्याची निवृत्त न्यायाधीशांमार्फत करावयाची चौकशी

**मु. शी.** : सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम अयशस्वी झाल्याची निवृत्त न्यायाधीशांमार्फत करावयाची चौकशी याबाबत डॉ. दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या हेतूने 6 ते 14 वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना सन 2010 पर्यंत उपयोगी व सुसंबध्द शिक्षणाची तरतूद करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम राज्यात 2002 पासून राबविण्यात आला. परंतु अत्यंत अपुरा निधी, योग्य नियोजनाच्या अभावामुळे उपनिर्दिष्ट उद्दिष्टे साध्य झाली नाहीत. सर्व शिक्षा अभियानांतर्गत निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टे साध्य करण्यास शासनाला अपयश आल्याने शासनाने आता इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी अध्ययन समृध्दी हा नव्याने कार्यक्रम सुरु केलेला असून लेप हा नवा प्रकल्प सुरु केला आहे. राज्यातील सुमारे 4855 शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर हा प्रकल्प ऑगस्ट 2009 पासून राबविण्यात आला आहे. सर्व शिक्षा अभियानाचा कार्यक्रम अपयशी का ठरला त्याबाबत संशोधन करता लेप हा नवीन कार्यक्रम राबविण्यात का आला याबाबतचा खुलासा शासनाने तातडीने करावा."

सभापती महोदय, राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या हेतूने वयोगट 6 ते 14 मधील विद्यार्थ्यांना 2010 पर्यन्त उपयोगी व सुसंबध्द शिक्षण मिळावे यासाठी सर्व शिक्षा अभियानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या सर्व शिक्षा अभियानाचे काय झाले याची चर्चा या सभागृहामध्ये अनेकदा झाली. अत्यंत अपुरा निधी आणि नियोजनाचा अभाव यामुळे यातील मार्गदर्शक तत्वे धाब्यावर बसविली गेली. हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याच्या बाबतीत शासनाला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत....)

पूर्णपणे अपयश आलेले आहे. त्यावर कडी म्हणून शासनाने लेप नावाचा नवीन उपक्रम सुरु केलेला आहे. लेप म्हणजे Learning Enhancement Programme. हा उपक्रम 4855 शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु झालेला आहे. असा दावा केला जात आहे की, सर्व शिक्षा अभियानातील त्रुटी लेपमुळे दूर झालेल्या आहेत. सुरुवातीला लातूर येथे पहिल्यांदा हा उपक्रम सुरु करण्यात आला. लातूरमध्ये हा उपक्रम यशस्वी झालाचा फोल दावा करण्यात आलेला आहे. या उपक्रमाच्या पर्व्ह्यू आणि स्कोपमध्ये असे म्हटलेले आहे की, गणित, विज्ञान या विषयातील विद्यार्थ्यांची गळती थांविणे, एक शिक्षकी शाळा कमी करणे आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ करणे, या सर्व मागदर्शक तत्वांना या लेपमध्ये हरताळ फासला गेला आहे. राज्य शासनाला सर्व शिक्षा अभियान हा कार्यक्रम खरोखरच राबवायचा असेल तर सर्वप्रथम एका निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमून या सर्व शिक्षा अभियानातील भ्रष्टाचार थांबवावा, अशी या विशेष उल्लेखद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

----

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.32 ते 2.00 मध्यंतर)

---

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आजच्या टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी दैनिकामध्ये पहिल्या पानावर "Ministers and Babus use Doctors" या शीर्षाखाली एक बातमी प्रसिध्द झाली आहे त्याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. फळे आणायला, भाजी आणायला, इस्त्रीचे कपडे आणायला डॉक्टर्स वापरले जातात. संबंधित मंत्रीमहोदयांना मी विचारले असता त्यांनी सांगितले की, मला काही माहिती नाही. अशा गोष्टी होत असतील, राजकीय नेते करीत असतील तर त्याची दखल घेतली पाहिजे. राजकीय नेत्यांना माहीत नसताना खूष करायला अधिकाऱ्यांकडून असे प्रकार केले जात असतील तर राजकीय नेत्यांची यामध्ये बदनामी होत आहे. गेल्या वेळी अशा प्रकारामध्ये गुंतलेले डॉक्टर्स हे शिकावू होते. यावेळी अधिकृत डॉक्टर्स इस्त्रीचे कपडे आणण्यासाठी वापरले जात असतील तर त्यामध्ये नेत्यांची देखील बदनामी होते. सगळ्याच राजकीय नेत्यांबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होतो. वस्तुस्थिती काय आहे याची स्पष्टता झाली पाहिजे, जनतेला खरी वस्तुस्थिती कळली पाहिजे.

**उपसभापती** : बातमी प्रसिध्द झाली, हे ठीक आहे. परंतु उपसभापती या नात्याने मी सांगू इच्छितो, माझा स्वत:चा अनुभव असा आहे की, प्रशासनामध्ये बरेचसे अधिकारी हे त्यांच्या वरिष्ठांनी सांगितलेले काम देखील करीत नाहीत. त्यामुळे अशी कामे करायला हे अधिकारी कसे तयार होतील हा सर्वसामान्य लोकप्रतिनिधींचा अनुभव आहे. या संदर्भातील अनुभव सांगावयाचे झाले तर टाईम्स ऑफ इंडियाच नव्हे तर सर्व वर्तमानपत्रे कमी पडतील. लोकप्रतिनिधी म्हणून आपण मुद्दा उपस्थित केला हे ठीक आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, जे चाकोरीमधील काम करायला तयार नसतील ते चाकोरीबाहेरचे काम किती करतील?

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक मागण्या

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना हे माहितच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेचा आज दुसरा व शेवटचा दिवस आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रीमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. आज जवळपास 30 सन्माननीय सदस्यांनी बोलण्याची परवानगी मागितलेली आहे. माझी आपल्याला विनंती आहे, मी नेहमी जी विनंती करीत आलो की, प्रत्येक सदस्यानी अत्यंत कमी वेळेत आपले म्हणणे मांडावे, जेणेकरुन उत्तराला देखील सन्माननीय मंत्रीमहोदयांना वेळ देता येईल. आता खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

(1) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक-एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, एच-10.

(2) गृह विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक-बी-1, बी-3, बी-5, बी-7, बी-9.

(3) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3.

(4) आदिवासी विकास विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक टी-2, टी-3, टी-5, टी-6.

(5) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**............

(6) उद्योग, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- के-3, के-7, के-9.

(7) वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास, औकाफ व माजी सैनिकांचे कल्याण विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही.2, झेड.ई-1, झेड.ई-2ए.

(8) कामगार विभागाची पूरक मागणी क्रमांक- के-4.

(9) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाची पूरक मागणी क्रमांक डी-6.

(10) महिला व बालविकास विभागाची पूरक मागणी क्रमांक- एक्स-1.

सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार आता चर्चेला सुरुवात करतील.

..2..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शासनाच्या एकूण 9446 कोटी, 82 लक्ष 31 हजार एवढ्या पूरक मागण्यांपैकी आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या पूरक मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी व त्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पूरक मागणी क्रमांक डब्ल्यू-2203, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागणीच्या अनुषंगाने मी शासनाच्या निदर्शनास आणून देणार आहे की, राज्यातील जवळपास 203 एकूण खाजगी संस्थांमध्ये काम करणाऱ्या निदेशकांचे वेतन अनुदान देण्याबाबत मागील वेळेस शासनाने जाहीर केले होते त्याचा उल्लेख मात्र आजच्या मागणीमध्ये करण्यात आलेला नाही. माझी या निमित्ताने अशी विनंती आहे की, या 203 खाजगी संस्थांना टप्प्याटप्प्याने का होईना हे वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा. कालच सभागृहात अशासकीय संस्थांच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला होता त्या अनुषंगाने शासनाने विचार करावा. त्याचबरोबर राज्यातील खाजगी आयटीआय संस्थांमध्ये जे ओबीसी तसेच मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांच्या पैकी आपण ज्याप्रमाणे मेडिकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये फी मध्ये सवलत देतो व ती रक्कम शासन बेअर करते. त्याप्रमाणे अशा आयटीआय संस्थांमध्ये सुध्दा मागासवर्गीयांसाठी 50 टक्के आणि ओबीसी विद्यार्थ्यांसाठी 50 टक्के फी मध्ये सवलत देण्याबाबत विचार करावा आणि शिष्यवत्तीचाही विचार करावा अशी माझी विनंती आहे. कारण आजच्या परिस्थितीत अशा खाजगी शैक्षणिक संस्था शिक्षणाचा 60 ते 70 टक्के भाग उचलतात अशाच एका खाजगी शिक्षण संस्थेला म्हणजेच अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेला 100 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शासनाने खास अनुदान म्हणून 3.50 कोटीला मंजुरी दिली आहे, त्याबाबत समाधान व्यक्त करतो.

यानंतर बाब क्र. 256, मागणी क्र. डब्ल्यू-4 च्या संदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, राज्यात जी खाजगी ग्रंथालये आहेत त्यामध्ये काम करणाऱ्या लोकांना अत्यंत तुटपुंजी रक्कम वेतन म्हणून मिळते, त्या ग्रंथालयासाठी वेतन अनुदान व इतर सोई करण्याची नितांत गरज आहे. कारण शासन त्यांना सध्या अत्यंत अपुरे अनुदान देत आहे, त्यात वाढ करुन शासनाने आता ही वाढीव रक्कम रु. 13.74 कोटी एवढी मान्य केली त्याबददल मी शासनाला धन्यवाद देतो. परंतु अशा खाजगी ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्यांच्या 100 टक्के मागण्या पूर्ण कराव्यात अशीही या निमित्ताने मागणी करतो.

डॉ. वसंत पवार....

महोदय यानंतर पूरक मागणी क्र. एच-7, 5054-मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च या निमित्ताने बोलताना मी असे सांगू इच्छितो की, मी खासदार असताना नाशिक जिल्ह्यातील रस्त्यांच्या संबंधी अनेक वेळा पार्लमेंटमध्ये मागणी केली होती. त्या अनुषंगाने शासनाने या मागणीमध्ये चांदवड आणि लासलगाव येथील ओव्हर ब्रिजची पुर्तता या मागणीच्या निमित्ताने केली त्याबद्दल शासनाचा मी आभारी आहे.

सभापती महोदय, पूरक मागणी क्र. टी-2, लेखाशीर्ष 2225, बाब क्र. 222, 223 व 224 च्या अनुषंगाने माझी अशी सूचना आहे की, पूर्वच्या काळात केंद्रशासनाने राज्यातील काही शिक्षण संस्थांना आदिवासी आश्रमशाळा दिल्या होत्या व केंद्रामार्फतच ते अनुदान मिळत होते. पण आता केंद्रशासनाने त्यातून हात काढून घेतल्याने गेली दहा बारा वर्षे या आदिवासी भागातील खाजगी संस्थांना अनुदान मिळत नाही. या अनुषंगाने खालच्या सभागृहात आजच विषय उपस्थित झाला होता. माझी शासनाला अशी विनंती आहे की, आदिवासी भागात केंद्राने ज्या खाजगी संस्थांना आदिवासी आश्रमशाळा मान्य केल्या त्या राज्यशासनाने ताब्यात घ्याव्यात..........

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/ 14:10

डॉ. वसंत पवार ......

जेणेकरुन त्यांना ताबडतोबीने मिळतील. वेतनेतर व वेतन अनुदान देत असतांना त्या शाळांचा दर्जा तपासून घेऊन त्यांना ग्रँट देण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. यासंदर्भात शासनाने असे उत्तर दिले आहे की, आम्ही केंद्रशासनाकडे यासंदर्भात मागणी केली होती परंतु केंद्रशासन वेतन अनुदान आणि वेतनेतर अनुदानाचा विचार करीत नाही. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अशा 25-26 शाळा आहेत परंतु वेतनेतर अनुदान आणि वेतन अनुदान मिळत नसल्यामुळे त्यांची देखभाल होऊ शकत नाही. या ठिकाणी आदिवासी मुले शिक्षण घेत आहेत त्यामुळे या विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्याचे काम महाराष्ट्र शासनाचे असल्यामुळे या 25-26 शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान त्वरित द्यावे अशी विनंती आहे. माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान 500 कोटी रुपयांचे मिळावयास पाहिजे होते. आमच्या संस्थांचे 12-12 कोटी रुपये आऊट स्टँडींग आहे. इमारत भाडे सुध्दा सन 2004 पासून मिळालेले नाही त्यामुळे त्याचीही तरतूद करण्यात यावी अशी मागणी करतो. या ठिकाणी तंत्रशिक्षणाच्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देऊन त्यावरील माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

---------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय डॉ.वसंतराव पवार )**

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 20, पृष्ठ क्रमांक 8, सागरी पोलीस ठाण्याच्या संदर्भात विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मुंबईवर अतिरेक्यांनी समुद्र मार्गे हल्ला केल्यामुळे राज्यशासनाने कोकणाच्या 720 कि.मी.पट्टीवर सागरी पोलीस ठाणे उभारण्याचे धोरण जाहीर केले आहे. सागरी पोलीस ठाणे उभे करीत असतांना राज्यशासनाने तसेच गृहखात्याने समुद्राचा कोणताही अभ्यास केलेला नाही. ज्या बोटी सागरी पोलीस ठाण्यासाठी आणल्या गेल्या आहेत त्यासंदर्भात काल सभागृहात चर्चा झाली. खुल्या समुद्रात या बोटी चालू शकत नाही. ओपन सी मध्ये या बोटींचे लँडींग होऊ शकत नाही. त्यामुळे सागरी पोलीस ठाणी क्रीकच्या ठिकाणी असली पाहिजेत यासाठी राज्यशासनाने काही तरी ठोस असे धोरण ठरविले पाहिजे. खुल्या समुद्रात बोटी ठेवण्यापेक्षा या बोटी पोलीस ठाण्याजवळ राहिल्या पाहिजेत जेणे करुन अतिरेक्यांचे हल्ले झाले किंवा अपघात घडला तर या बोटी तातडीने समुद्रात किंवा क्रिकमध्ये पोहचल्या पाहिजेत. या बोटी ओपन सीमध्ये लँड केल्या तर त्यासाठी ब्रेक वॉटर करावे लागेल व ब्रेकवॉटर करण्याची क्षमता आज तरी आपल्या बजेटमध्ये दिसत नाही. ज्या ज्या ठिकाणी क्रीक आहे त्या ठिकाणी सोय करुन किंबहूना अशा प्रकारची सोय टप्प्या-टप्पयाने करीत असतांना मुंबई हे एक टार्गेट आहे असे गृहीत धरुन मुंबईच्या आजूबाजूला जेवढे क्रीक आहेत त्या ठिकाणी सागरी पोलीस ठाणे करण्याचे धोरण शासन जाहीर करेल काय तसेच यासंदर्भात तातडीने उपाययोजना करेल काय ?

शासन बुलेट प्रुफ बोटीसाठी आणि स्पीड बोटीसाठी 150 ते 200 कोटी रुपये खर्च करीत आहे त्यामुळे या बोटींची देखभाल आणि त्या सुरक्षिततेचे धोरण ठेवण्याचे काम शासनाकडून होईल असे दिसत नाही, यांसदर्भात दक्षता घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे पूरक मागण्याच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो की, चांगले धोरण आणि चांगल्या तज्ञांचा सल्ला घेऊन धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. पालीस खात्यात किंवा गृह खात्यामध्ये समुद्राच्या संदर्भातील, बोटींच्या संदर्भातील तज्ञ आहेत असे मला वाटत नाही. नाही तर या विषयावर आम्ही सभागृहात चर्चा करु आणि पुढील 2 वर्षामध्ये या बोटी स्क्रॅपमध्ये पडलेल्या दिसतील असे होता कामा नये. सागरी पोलीस स्टेशन अलिबागला आणि समुद्र मांडवा येथे असे झाले तर ते बरोबर होणार नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने ठोस असे धोरण आखण्याची गरज आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री जयंत प्र.पाटील ..

सभापती महोदय, यानंतर मला गृह विभागाची बाब क्रमांक 33 पान नंबर 23 सबंधी बोलावयाचे आहे. कालवे आणि बंदरातील गाळ उपसणी करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे. रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यामध्ये राजपुरी बंदरातील जे.टी दुरुस्ती व खोरा बंदरातील गाळासंबंधी मला एक उल्लेख करावयाचा आहे काल सन्माननीय महसूल मंत्र्यांनी सागितले की , राज्य शासन तीन ड्रेझर्स खरेंदी करणार आहे व त्यासाठी दर वर्षी 20 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. परंतु सध्या या बंदरात जो काही गाळ साठलेला आहे तो काढण्याची व्यवस्था राज्य शासनाने ताबडतोब केली पाहिजे व त्यासाठी निधी दिला पाहिजे..अशी मी या निमित्ताने मागणी करतो . मच्छिमारांची जी लहान लहान बंदरे आहेत त्या बंदरातील गाळ काढण्याची मोहीम राज्य शासनाने घेतली पाहिजे. अशी मी राज्य शासनाला या निमित्ताने सूचना करतो.

. सभापती महोदय, यानंतर मला मत्स्यव्यवसाय विभागाची बाब क्रमांक 65 पान नंबर 49 संबंधी बोलावयाचे आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे वा फयान वादळामुळे किनाऱ्यावर मच्छिमारी करणा-या ज्या लहान मच्छिमारांचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत दिली गेली नाही. जे मोठया बोटीतून मच्छिमारी करतात ज्यांच्याकडे चार सिलेंडर्सच्या बोटी आहेत त्यांना शासनाकडून मदत करण्यात येते परंतु ज्याच्या बोटीवर सिलेंडर नाही, जे जाळयांच्या मदतीने मच्छिमारी करतात त्यांना आर्थिक सहाय्य देण्याचे धोरण राज्य सरकारने जाहीर केलेले नाही तेव्हा त्यांना मदत करण्याच्या संदर्भात तातडीने धोरण जाहीर करण्यात यावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 88 पान नंबर 84 सबंधी मला बोलावयाचे आहे .मार्ग आणि पूल यांच्या दुरुस्तीसाठी ही मागणी करण्यात आलेली आहे जे छोटे रस्ते आणि पूल आहेत त्याला साकव म्हटले जाते त्याच्या दुरुस्तीसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत तरतूद करण्यात आलेली नाही. कोकणामध्ये कधी पाऊस कमी पडतो तर कृधी कधी जास्त पडतो . या वर्षी कोकणात नोव्हेंबर अखेरपर्यत पाऊस लांबला होता त्यामुळे रस्ते मोठया प्रमाणावर नादुरुस्त झालेले आहेत तेव्हा रस्ते दुरुस्त करण्याकरिता कोकणासाठी खास





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जयंत प्र.पाटील ..

निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात यावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 96 पान नबर 88 सबंधी मला बोलावयाचे आहे. अलिबाग हे जिल्हयाचे ठिकाण असून या ठिकाणचे रेस्ट हाऊस लहान आहे तेथे फक्त दोनच सुटस आहेत. अलिबाग हे पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहे. राज्य शासनाचे मंत्री आणि अधिकारी येथे येतातच त्याचबरोबर इतर राज्यातील मंत्री व अधिकारीसुध्दा येथे येत असतात. सर्व जिल्हयामध्ये मोठे सर्किट हाऊस बांधण्यात आलेले आहे. परंतु रायगड जिल्हयामध्ये सार्किट हाऊस नसल्यामुळे ते बांधण्यात यावे अशा प्रकारचवी मागणी मी या चर्चेच्या निमित्ताने करीत आहे. येथे मोठे रेस्ट हाऊस बांधण्यात आल्यामुळे राज्यातील तसेच इतर राज्यातील अधिकारी व मंत्र्यांची येथे राहण्याची सोय होऊ शकेल.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाची बाब क्रमांक 163 पान नंबर 155 सबंधी मला बोलावयाचे आहे. अलिबाग तालुक्यातील माणकुळे, बहिरीचा पाडा आणि नारंगीचा तेर या तीन गावाची साडेतीन हजार एकर जमीन बांधबंदिस्ती बरोबर झालेली नाही म्हणून नापीक झालेली आहे. या सभागृहात अनेक वेळा हा विषय मांडला होता. या तीनही गावातील लोकांना दारिद्रय रेषेखालील कार्ड देण्यात यावीत अशी मी मागणी केली होती व त्यास शासनाने मान्यता दिली होती .या तीन गावामध्ये पूर्वी चांगले पीक येत होते परंतु आज एकही एकर जमीन पीकत नाही. त्या श्ेंतक-यांना मदत देणे बाजूला राहिले परंतु या शेतक-यांना दारिद्रय रेषे खालील कार्ड देण्याचे धोरण जाहीर केले होते त्यानुसार माजी मंत्र्यांनी 165 व्यक्तिना फक्त कार्डस दिली असून अजूनही 200 कुटुबियांना व खारलॅन्डग्रस्त श्ेंतक-यांना देण्यात आलेली नाहीत तेव्हा या व्यक्तिंना दारिद्रय रेषेखालील कार्डस देण्यात यावीत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, महिला व बाल कल्याण विभागाची बाब क्रमांक 261 पान नंबर 237 संबंधी मला बोलावयाचे आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पूरक आहार देण्याची एक योजना सुरु करण्यात आली आहे परंतु रायगड जिल्हा परिषदेमध्ये सात महिन्यापासून या कामासाठी राज्य

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जयंत प्र.पाटील ..

सरकारकडून एक पैसासुध्दा देण्यात आलेला नाही . पूरक आहार देण्यासाठी निधी न मिळाल्यामुळे तांदूळ कसा आणावयाचा व तो कसा शिजवावयाचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या तांदूळ व डाळ महाग झालेली आहे. पूर्वी 40 रुपये किलो या दराने डाळ मिळत होती परंतु आता 110 रुपये किलो या दराने डाळ विकत घ्यावी लागत आहे तांदूळसुध्दा महाग झाला आहे. तेव्हा रायगड जिल्हा परिषदेला हे पैसे तातडीने `उपलब्ध करुन द्यावेत अशी विनंती करतो आणि मला बोलण्यास संधी दिल्याबबद्दल आपणास धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत बोलताना प्रथमत: मी पृ.16, बाब क्र.14 वर बोलणार आहे. सीसी टीव्ही कॅमेरे मंत्रालयात बसवावयाचे आहेत त्यासंबंधात ही पुरवणी मागणी येथे करण्यात आली आहे. मला या संदर्भात केवळ एवढेच आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे की, हे सीसी टीव्ही कॅमेर आपण जरूर बसवा. पण मध्यंतरी निवडणुकीची आचार संहिता लागली त्यापूर्वी 15 दिवस अगोदर मंत्रालयात शिरताना कोठल्याही प्रकारचे चेकिंग होत नव्हते, कोणाला तपासणीसाठी अडविले जात नव्हते. सगळे काही आओ जाओ घर तुम्हारा अशी स्थिती होती. त्याची कारणे सांगताना लोक असे म्हणत होते की, यू.डी.च्या फाईल्स क्लिअर करावयाच्या होत्या त्यामुळे त्यासाठी येणारे लोक वजनदार बॅगा घेऊन येतात व त्यांचे चेकिंग होऊ नये यासाठीच चेकिंग होत नव्हते. पण असे झाल्यास 26/11 ची घटना घडण्यास असे वातावरण पूरक होते हे या निमित्ताने मी मुद्दाम लक्षात आणून देतो आहे इतकेच.

सभापती महोदय, त्यानंतर बाब क्र.24 च्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, 26/11 च्या विषयात एक तर 25 लाखाचे अनुदान पोलीस अधिकाऱ्यांना, म्हणजे शहीद श्री.करकरे आणि बाकीच्यांना घोषित केले होते त्यातील केवळ 10 लाख रूपये राज्य सरकारने त्यांना दिले आणि उर्वरित 15 लाख त्यांना त्यांच्या त्यांच्या सेवेत असताना शहीद झाले म्हणून 25 दिले. याबाबत पंतप्रधान कार्यालय आणि त्या कार्यालयाचे श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी मात्र राज्य सरकारला पत्र लिहिले आहे की, कर्तव्यावर असतानाचे 15 लाख वेगळे आणि या प्रसंगी घोषित केलेले 25 लाख वेगळे आहेत आणि असे एकंदर 40 लाख रूपये या शहिदांना दिले गेले पाहिजेत परंतु अद्यापी ती घटना घडून श्री.करकरे शहीद होऊन एक वर्ष तरी शहीद करकरे आणि इतरांना ही रक्कम मिळालेली नाही हे दुर्दैव आहे. सभापती महोदय, यातील 403 लोकांपैकी 115 लोकांच्या केसेस, जे या घटनेमध्ये जखमी झाले होते, दिल्लीला पोहोचल्या आणि त्यातील 63 केसेसमध्ये माहिती अपूर्ण आहे म्हणून त्या पूर्ण करून देण्यासाठी राज्य सरकारकडे परत पाठविण्यात आल्या. त्यात वारसदाराचे नाव नीट नोंदविलेले नव्हते, बँकेचा अकौंट नंबर नीट दिलेला नाही या व अशा काही गोष्टी अपूर्ण असल्याने त्या पूर्ण करण्यासाठी परत आल्या. म्हणजे वर्ष झाले, 403 लोकांना सहाय्य मिळाले पाहिजे त्यातील 115 च्याच केसेस गेल्या, त्यातील केळव 63 केसेस अपूर्ण माहिती पूर्ण करून देण्यासाठी म्हणून परत आल्या. त्या इनइलिजिबल, अपात्र

.... जेजे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत असे मानवी हक्क आयोगाला सांगितले गेले. ज्यावेळी दिल्लीतील केंद्र सरकारचे सहसचिव यांची या प्रश्नाबाबत माजी खासदार श्री.किरीट सोमय्या यांनी प्रत्यक्ष भेट घेतली तेव्हा त्यांनी सांगितले की, यातील एकही अपात्र नाही, केवळ माहिती अपुरी आहे म्हणून आम्ही त्या राज्य सरकारकडे परत पाठविल्या आहेत. म्हणजे एक वर्ष होऊन देखील 403 लोकांना जी मदत झाली पाहिजे ती होऊ शकली नाही. कारण आपल्या खात्यातील अधिकारी झोपा काढताहेत, आणि आपण ज्या घोषणा करता त्या पूर्ण होत नाहीत. माझा आग्रह आहे की ज्यांच्या टेबलवर या फाईल्स पडून राहिल्या त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात हे आज माननीय मंत्र्यांनी घोषित केले पाहिजे अशी माझी आग्रही मागणी आहे. सभापती महोदय, सबीरा खान नावाची एक महिला आहे तिच्या पायात या अतिरेकी घटनेत झालेल्या गोळीबारात गोळ्या लागल्या होत्या त्यामुळे तिची तीन ऑपरेशन्स करावी लागली. दोन आपरेशन्स तिने चालढकल होते म्हणून खाजगीरित्या हॉस्पिटलमध्ये केली. पण त्यात तिच्याकडील पैसे संपले म्हणून मग तिसरे ऑपरेशन करण्यासाठी, केंद्र आणि राज्य सरकारची मदतीची घोषणा आहे म्हणून ती जे.जे.रूग्णालयात गेली असता जे.जे. रूग्णालयवाले म्हणतात की, आमचे सरकार यासाठी पैसा देत नाही. सरकार पैसे देत नाही म्हणून सबीरा खान नावाच्या महिलेचे ऑपरेशन होत नाही. आणि राज्य सरकारच्या घोषणा, अधिकाऱ्यांनी योग्य वेळी कळविले नसल्यामुळे, किंवा घोषणा या केवळ करायच्या असतात म्हणून केल्या जातात. प्रिंटींग मिस्टेक होते तशी बोलण्याची मिस्टेक झाली असे काही असेल तर ते आज क्लिअर झाले पाहिजे आणि याबाबतचा पाठपुरावा केला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 29 - वाहनांवरील करासंबंधातील ही बाब आहे. या विषयामध्ये आरटीओचे दुचाकी संबंधातील भ्रष्टाचार प्रकरण वगैरे सगळे काही वर्तमानपत्रातून आलेले आहे. पण त्या सगळ्या संबंधित अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न त्या त्या खात्याच्या मंत्र्यांकडून होत आहे हे निदर्शनास येते आहे तर त्यावर काय कारवाई आपण केलेली आहे याची माहिती देण्याची येथे आवश्यकता आहे. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ... केके 1 ..

श्री. विनोद तावडे..

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 85 व बाब क्रमांक 90 मध्ये शासकीय कार्यालयांच्या इमारतींचे परिरक्षण व दुरुस्ती करणे या मागणीच्या निमित्ताने मला एक महत्वाचा विषय उपस्थित करावयाचा आहे. आपल्या मुंबई येथील मंत्रालयाच्या इमारतीच्या पुनर्विकासाची चर्चा माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांनी सकाळी सुयोग याठिकाणी पत्रकारांबरोबर केली. सभापती महोदय, मंत्रालयाची इमारत ज्या जमिनीवर आहे त्या जमिनीचे प्रॉपर्टी कार्ड नाही. ती जमीन रिक्लेम करुन त्यावर इमारत बांधली आहे. त्यामुळे ती जमीन कुणाच्या मालकीची आहे? ती इमारत रिडेव्हलप करण्यासाठी प्रॉपर्टी कार्ड लागेल, त्याशिवाय त्या इमारतीचे रिडेव्हलपमेंट होऊ शकत नाही. त्यामुळे ते प्रॉपर्टी कार्ड कुठे आहे? मुंबईचे मंत्रालय हे शासनाच्या मालकीचे नाही, मंत्रालयाची जमीन कुणाच्या मालकीची आहे याची स्पष्टता झाली पाहिजे. त्यामुळे प्रॉपर्टी कार्डचे वास्तव चित्र काय आहे? ते महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे. मंत्रालयाचे प्रॉपर्टी कार्ड नसेल तर या राज्याची अवस्था काय आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, याच पानावरील बाब क्रमांक 92 मध्ये वरळी, नायगाव व शिवडी येथील बी.डी.डी. चाळींच्या परिरक्षण व दुरुस्तीच्या खर्चाकरिता मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, माननीय नामदार श्री. सचिन अहिर हे या वरळी बी.डी.डी. चाळीच्या मतदारसंघातून निवडून येतात. या चाळींच्या रिडेव्हलपमेंटचा विषय अनेक वर्षे प्रलंबित असतांनाही त्यांच्या दुरुस्तीकरिता 10 कोटींची मागणी करण्यात येत आहे. तरीसुध्दा त्या इमारतींचे रिडेव्हलमेंट होत नाही. या इमारतींच्या रिडेव्हलपमेंटचे काम कोण करणार आहे? नगर विकास विभाग करणार आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग करणार आहे? त्या कामाचा मलिदा कुणाकडे जाणार आहे या कारणावरुन दोन विभागांमध्ये भांडण सुरु आहे. त्याबाबत कुणीतरी म्हणाले की, त्या कामासंबंधीच्या फाईलवर मुख्यमंत्र्यांची सही होत नाही. त्याबाबत माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, ती अर्थपूर्ण, वजनदार फाईल असल्यामुळे ती रखडली आहे. त्यामुळे तो मलिदा कोण खाणार यामध्ये बी.डी.डी. चाळीत राहणाऱ्या सर्वसामान्य गरीब दलित बांधवांना रस नाही तर त्याला स्वत:चे घर मिळाले पाहिजे.तो त्यामध्ये अडकून पडला आहे. म्हणून माझी सूचना आहे की, सर्व सामान्य माणसाला लवकरात लवकर आपण घर दिले पाहिजे. कारण ही जागा अतिशय मोक्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. विनोद तावडे..

ठिकाणी आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्यामध्ये भांडण असल्यामुळे माननीय नामदार श्री. सचिन भाऊंनी त्याबाबत न बोललेले बरे. आपल्याकडील बरीचशी खाती माननीय मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत येतात.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 155 व बाब क्रमांक 163 च्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, बी.पी.एल. ची यादी आपण केव्हातरी नीट तपासली पाहिजे. त्या यादीमध्ये मोठया प्रमाणावर गडबडी केल्या जातात.कोणत्याही गावामध्ये दौऱ्यावर गेल्यानंतर त्या गावातील माणसे बीपीएलच्या यादीत पाटलाचे नाव आहे असे सांगतात. परंतु दारिद्रय रेषेखालील माणसाचे नाव त्या यादीमध्ये नाही. यादी करणारे लोक पाटलाच्या वाडयावर बसून यादी करुन तेथूनच निघून जातात. अशाप्रकारची उदाहरणे गावोगावी सापडतात. त्याकरिता धोरणात्मक निर्णय जाहीर होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये रेशन कार्डचा घोटाळा झाला. त्याबाबत कोर्टाने अभिप्राय दिला आहे. त्यामध्ये नवी मुंबईतील लोकप्रतिनिधी किंवा मंत्री यापैकी कुणी असतील हे मला माहीत नाही. परंतु त्यांच्या नावाचा उल्लेख कोर्टाने केला आहे. या रेशन कार्डाची काय भानगड आहे? 800, 900, 1200 बोगस रेशन कार्ड तयार होतात. ते केवळ मतदानासाठी तयार होत नाहीत तर मुंबईवर हल्ला करणारे अतिरेकी नवी मुंबईमधून इंटरनेटवर सापडतात. अशाप्रकारे ते अधिकृत होतात. त्यामुळे आपण एका मतासाठी हे काम करीत असतांना कोणते दार उघडीत आहोत? कोर्टाने बोगस रेशनकार्डबाबत व्यक्त केलेल्या अभिप्रायाबाबत राज्य शासन कोणती भूमिका घेणार आहे? हे समजले पाहिजे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पान क्रमांक 288 व बाब क्रमांक 250 मध्ये दोन गोष्टी अंतर्भूत आहेत. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंची नेमणूक चालू आहे. किती दिवसांपासून हा विषय रखडला आहे? ही बाब माननीय राज्यपालांच्या अखत्यारीत आहे, ती शासनाच्या अखत्यारीत नाही हे मला मान्य आहे. मुंबई विद्यापीठाला 150 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल केंद्र सरकारकडून 100 कोटींचे अनुदान मिळाले. या विद्यापीठाची नाचक्की झालेली आहे. या विद्यापीठाच्या सिनेटमध्ये मुंबई विद्यापीठाची यावर्षीची आणि गेल्या वर्षीची ॲफिलेशन फी किती जमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. विनोद तावडे..

झाली? याचे उत्तर गेली पाच वर्षे कुलसचिव आणि कुंलगुरु देऊ शकत नाहीत. त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या आर्थिक घोटाळयाची चौकशी केली पाहिजे. त्याच्याशी आपला संबंध नाही, ते विद्यापीठ स्वायत्त आहे असे आपण म्हणाल ती गोष्ट खरी आहे. आपण सुध्दा पुणे विद्यापीठावर आहात, त्यामुळे पाच वर्षे सिनेटमध्ये जाऊन जर मार्ग निघणार नसेलतर त्याची दखल सरकारने घेतली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . .. .

त्यामुळे मुंबई विद्यापीठातील जी अनियमितता आहे, जे आर्थिक घोटाळे आहेत, त्याची चौकशी करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा मुद्दा असा आहे की, मध्यंतरी प्राध्यापकांचा संप झाला. आता सदनामध्ये कोणी प्राध्यापक सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. कदाचित त्यांचा टी.ए.,डी.ए.बाबतीत बहुदा विषय नसेल. या संपामध्ये जे प्राध्यापक सहभागी झाले नाहीत. ज्या प्राध्यापकांनी कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना शिकविले. कारण विद्यार्थ्यांचे शिक्षण बुडावे म्हणून संप न करता आंदोलन करावे असे मानणारे ही प्राध्यापक संघटना आहे, ते प्राध्यापक कामावर गेले आणि त्यांनी वर्गामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना शिकविले. आपला वेळ विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी दिला. पण त्यांना पगार मिळत नाही. जे प्राध्यापक संपावर गेले होते, त्यांनी त्यांचे वर्ग घेतल्यानंतर तुम्हाला पगार मिळेल असे सांगण्यात आले आहे. म्हणजे सरकारच्या बाजूने ज्या प्राध्यापकांनी काम केले आहे, तुम्ही त्यांचे पगार का अडवित आहात असा प्रश्न आहे. त्यांना त्यांचे पगार दिले पाहिजेत.या प्राध्यापकांना त्यांचे पगार कधी रिलीज होतील याबाबत माननीय मंत्री महोदयांनी आज उत्तराच्या भाषणामध्ये सांगणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आम्ही नेहमीच कोकणावर अन्याय होतो असे सांगत असतो. पण अनेक वेळेला पश्चिम महाराष्ट्र आणि इतर भागातील लोकांना असे वाटते की, कोकणवाले नेहमीच उठून काही मांडत असतात. प्रत्येक तालुक्यामध्ये अनुदानित महाविद्यालयांची घोषणा झाली. आमच्या कोकणामध्ये सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यामध्ये कॉलेजसाठी अर्ज केला. परंतु वैभववाडी तालुका हा बृहत आराखडयामध्ये उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभागाने समाविष्ट केलाच नाही. कारण काय तर, आतापर्यंत हा वैभववाडी तालुका कोल्हापूरच्या भागात होता. सन्माननीय माजी मंत्री श्री.विनय कोरे हे त्या भागातील आमदार होते. त्या भागामध्ये गगनबावडा तालुका होता पण त्यांनी याकडे कधी लक्षच दिले नाही. त्यामुळे अनुदानित महाविद्यालये देत असताना, आमचा कोकणातील वैभववाडी तालुका बृहत आराखडयामध्ये नसल्यामुळे येथील जी कॉलेजेस आहेत, त्यांनी अनुदानाच्या बाबतीत जी काही मागणी केली किंवा जे काही पत्र दिले असेल तर ते फेटाळून लावले जाते. त्यामुळे वैभववाडी तालुक्याचा बृहत आराखडयामध्ये कधी समाविष्ट करण्यात येईल त्यासंबंधीची घोषणा माननीय उच्च शिक्षण मंत्री आणि माननीय उच्च शिक्षण राज्यमंत्री यांनी केली..

. . . .2 एल-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . .. .

तर कोकणाला काहीतरी न्याय दिला असे होईल एवढी बाब या निमित्ताने मांडू इच्छितो.

सभापती महोदय, माझा एकच मुद्दा आहे. पान क्र.232, बाब क्र.256 यामध्ये ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा मुद्दा असून, मागच्या वेळी अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या वेळी माननीय मंत्री श्री.राजेश टोपेसाहेबांच्या बरोबर ग्रंथालय कर्मचाऱ्यांची एक बैठक सुध्दा घेण्यात आली होती. त्यावेळी आश्वासन दिले होते. सध्या टी.व्ही. आणि इतर गोष्टींमुळे लोक फारसे वाचन करीत नाहीत, वाचनाची आवड कमी झालेली आहे. पण केवळ यासाठी टी.व्ही.ला दोष न देता, जी ग्रंथालये आहेत, तेथील कर्मचारी हे खऱ्या अर्थाने वाचन संस्कृती वाढावी यासाठी खऱ्या अर्थाने काम करीत आहेत,झटत आहेत त्यांना सहावा वेतन आयोग लागू करणे तर दूरच राहिले पण किमान त्यांना जी वेतनश्रेणी मिळावयास पाहिजे, ती मिळत नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत देखील घोषणा झाली बरे होईल. तशा प्रकारच्या शासनाकडून होणाऱ्या घोषणेची हे कर्मचारी वाट पहात आहेत. मी या चर्चेच्या निमित्ताने एवढेच मुद्दे मांडू इच्छितो आणि त्याबाबतीत जर उत्तरे मिळाली तर जनतेला बरे वाटेल. एवढेच मला सांगावयाचे आहे.

----

. . . .2 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ SBT/ KTG/ 14:30

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग यामध्ये बाब क्र.87 मध्ये अनेक नवीन रस्त्यांचा समावेश केलेला आहे आणि ही बाब निश्चितपणे स्वागतार्ह आहे. परंतु अनेक ठिकाणी आंदोलने उभी रहात आहेत, त्याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, ज्यावेळेला आपण टोल जमा करतो, तेव्हा त्या रस्त्यावरुन जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांकडून टोल वसूल करण्यासाठी या कंत्राटदारांना किती तारखेपासून किती तारखेपर्यंत परवानगी दिलेली आहे त्याबाबतचा बोर्ड लावण्याची सक्ती करण्यात यावी. जेणेकरुन अनेक वेळा याची मुदत संपल्यानंतर देखील टोल वसूल करण्यात येतो आणि वाहतुकदारांची फसवणूक केली जाते. तसे होऊ नये याकरता हा बोर्ड लावला पाहिजे जेणेकरुन स्थानिक नागरिकांना याची कल्पना येऊ शकेल यादृष्टीने संबंधित विभागाने पावले उचलली पाहिजेत.

सभापती महोदय, बाब क्र.99 मध्ये बालगृह आणि इतर बांधकाम करण्याच्या बाबतीत सूचना केलेल्या आहेत आणि त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे. मला याकडे लक्ष वेधावयाचे आहे की, शासनाची जी बालगृहे आहेत, त्यांच्यासाठी देखील अधिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे.ती आतापर्यंत न झाल्यामुळे येथील मुले भिंतीला खिंडार पाडून पळून गेल्याचे प्रकार घडलेले आहेत. या घटनांचा गृह विभागाशी संबंध आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या विषयांच्या संदर्भात मग आदिवासी विभाग असेल, समाजकल्याण विभाग असेल, बालगृह असतील , त्याठिकाणी अशा इमारतींचे पुनर्निमाण करावयास पाहिजे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. गुणवत्ता सांभाळली गेली पाहिजे, याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.मुंबई पुणे हाय-वे सुरु झाल्यापासून मुंबई-पुणे जुन्या रस्त्याची काय परिसिथती आहे? हे या रस्त्यावर एखादा टँकर उलटला आणि हायवेवरुन वाहतूक होत नसेल तर या जुन्या रस्त्यावरुन वाहने जातात त्यावेळी लक्षात येते. सभापती महोदय, या मुंबई-पुणे जुन्या रस्त्याचे नूतनीकरण केले तर या रस्त्याच्या अंतर्गत जी गावे वाढत आहेत त्यांना या रस्त्याचा चांगल्या पध्दतीने उपयोग होईल याकडे मला शासनाचे ाक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 92 बोलणार आहे.यामध्ये बी.डी.डी. चाळी बांधण्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे ती अतिशय गरजेची होती. बऱ्याच वर्षापासून बी.डी.डी. चाळीमधील लोक या सुविधांपासून वंचित आहेत. अशाच पध्दतीने मुंबई शहरामधील सरकारशी संबंधित चाळीची बांधणी करण्यासाठी अशाच प्रकारची तरतूद करावी, याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय,मी बाब क्रमांक 24. पृष्ठ क्रमांक 19.वर बोालू इच्छिते. गृह विभागाबद्दल बोलावयाचे झाले तर याबाबतीत अनेक मुद्दे आहेत. यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत मी या ठिकाणी एक विशेष उल्लेखाची सूचना माडली होती. गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांशी लढतांना जे पोलीस मृत्युमुखी पडलेले आहेत त्यांच्या बाबतीत तीन प्रश्न त्यांच्या कुटुंबियांनी मांडलेले आहेत परंतु त्याबाबतीत शासनाने त्यांना कुठलाही दिलासा दिलेला नाही किवा त्याठिकाणी कुठलेही शिष्टमंडळ गेलेले नाही. त्यांचे म्हणणे असे आहे, सन 2005 नंतर जे पोलीस कर्मचारी नोकरीत रुजू झालेले आहेत त्यांच्या कुटुंबियांना देखील पेन्शन देण्यात यावे. या संदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. त्यांचा दुसरा प्रश्न निवासस्थानासंबंधीचा आहे. एखादा पोलीस मृत्युमुखी पडल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना शासकीय निवासस्थानात राहात येत नाही. गडचिरोलीमध्ये काम करणारा एखाद्या पोलीस मृत्युमुखी पडला आणि त्याचे घर जर बीड जिल्हयात असेल किंवा दुसऱ्या एखाद्या जिल्हयात असेल तर त्याच्या कुटुंबियांना जेथे राहावयाचे असेल त्या ठिकाणी निवासस्थानाची व्यवस्था केली गेली पाहिजे. त्यांचा तिसरा प्रश्न असा होता की, या पोलिसांच्या कुटुंबियांसाठी रोजगारासाठी पेट्रोलपंप किंवा अन्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उद्योग उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, नक्षलवाद्यांशी मुकाबला हा फक्त या राज्याचा प्रश्न नाही. त्यामुळे मुंबईत आतंकवाद्यांशी लढतांना शहीद झालेल्या पोलिसांच्या कुटुंबियांच्या रोजगाराच्या संदर्भात काही पावले उचललेली आहेत त्याप्रमाणे नक्षलवाद्यांबरोबर मुकाबला करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यक्रम राबविण्याची गरज आहे, अशी मला शासनाला सूचना करावयाची आहे.

सभापती महोदय, या दोन्ही सदनातील किती सदस्यांपर्यंत तो अहवाल पोहचतो हे मला माहीत नाही परंतु अतिशय कस्टाने पोलीस विभागातील अधिकारी महाराष्ट्रातील गुन्हयाच्या संदर्भात दर वर्षी "क्राईम इन महाराष्ट्र" हा अहवाल प्रकाशीत करीत असतात. या अहवालामध्ये जे मुद्दे नमूद करण्यात आलेले आहेत त्या मुद्यांमध्ये न जाता मी याठिकाणी लक्ष वेधू इच्छिते की, पोलीस रिफॉर्म करणे याबाबतीत अतिशय धक्कादायक अशी एक गोष्ट आहे. शासनाने आपल्या प्रस्तावनेमध्येच मान्य केलेले आहे की, गुन्हयांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण आठ ते नऊ टक्के आहे आणि काही गुन्हयांमध्ये हे प्रमाण फक्त पाच टक्के आहे. त्याचबरोबर 90 टक्के केसेस प्रलंबित आहेत म्हणून पोलीस रिफॉर्मसाठी तरतूद करण्यात येत असताना खास करुन गुन्हयांच्या बाबतीत न्याय मिळण्याच्या दृष्टीने यासाठी काय तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.? साक्षीदारांच्या संरक्षणाचा प्रश्न असेल, द्रुतगती न्यायालयाचा प्रश्न असेल. विशेष गुन्हयांमध्ये सरकारी वकील नेमण्याचा प्रश्न असेल यासंदर्भात अधिकाधिक तरतूद केली पाहिजे याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 30 आणि 31 वर मी बालू इच्छिते. तुरुंग या विषयाच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. सन्माननीय गृहराज्य मंत्र्यांनी येरवडयातील बालगृहाला भेट दिली होती. त्याच्या आदल्या दिवशी मी तेथे गेले होते. त्यावेळी त्या ठिकाणी जे चित्र दिसले ते असे की, या बालगुन्हेगारांची अतिशय वाईट अवस्था आहे. अतिशय सराईत गुन्हेगार आणि नवीन पहिल्यांदाच गुन्हयात सापडलेली मुले यांची सरमिसळ होते. याशिवाय यामधील भंयकर गोष्ट अशी की, अनेक पोलीस कर्मचारी मुलांना आफू, गांजा आणून देतात आणि त्यांना पळून जाण्यासाठी सुध्दा मदत करतात. आम्हाला ऐकू आले नाही असे सांगून या मुलांना मागच्या बाजूने भिंत फोडू दिली. ही भिंत पहारीने फोडण्यात आली. सभापती महोदय, या सगळया बालगुन्हेगारांसाठी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

कोंडवाडयापेक्षा अधिक चांगल्या प्रकारची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे याकडे मला गृह विभागाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, माजी निवृत्त पोलीस अधिकारी श्री. रिबेरो आणि अनेक व्यक्ती यांची पोलीस रिफॉर्म्स बद्दल सातत्याने चर्चा चाललेली असते,

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

त्यातील किती रिफॉर्म्सची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली आणि किती विषयाबद्दल निर्णय होणार आहे ही बाब गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित आहे. याबाबतीत कोणताही निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, यानंतर मला अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण या विभागाच्या बाब क्रमांक 163 आणि 164 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये किमतीला आळा घालण्यासाठी तसेच जीवनावश्यक वस्तूंची तरतूद यासाठी आपण पावले उचललेली आहेत. परंतु मला एका बाबीकडे आपले लक्ष वेधावेसे वाटते. प्रचंड मोठ्या प्रमाणात या वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. काही संशोधकांनी फूड स्टॅम्प्स बाबत सुचविलेले आहे जेणेकरुन धान्याला ज्या पळवाटा फुटतात त्याऐवजी वेगवेगळ्या कोणत्याही दुकानात ग्राहक गेला तरी त्याला धान्य मिळू शकेल. अशा प्रकाराने पावले उचलता येतील काय याचा विचार करावा. नाशिकचे श्री. मिलिंद मुरुगकर आणि श्री. रामस्वामी या दोघांनी केंद्राकडे आणि राज्याकडे या फूड स्टॅम्प्सबाबत सातत्याने सूचना दिलेल्या आहेत त्याबद्दल जर पावले उचलली गेली तर बऱ्याचशा धान्याची नासाडी आणि भ्रष्टाचाराला आळा बसू शकेल. ग्राहक संरक्षण हाही विषय यामध्ये अंतर्भूत आहे.

मला एका विषयाकडे लक्ष वेधावयाचे आहे. सभापती महोदय, अनेक मुद्दे मांडावयाचे आहेत. त्याबाबत अगदी एका एका वाक्यात मांडावयाचे झाले तरी वेळ लागेल. एक महत्वाचा प्रश्न असा आहे की, मोबाईल कंपन्यांवर कोणाचे नियंत्रण आहे ? कारण आम्ही या मोबाईल सेवांच्या बद्दल असे पाहतो की, वेगवेगळी दरपत्रके ते त्यांच्या मनानेच काही दिवसांनी बदलत असतात. एका ठिकाणी रोमिंग असते परत दुसऱ्या ठिकाणी रोमिंग लागेल की नाही ? सगळ्यात आक्षेपार्ह गोष्ट अशी की, जी आयडिया कंपनी आहे ती आपल्या ग्राहकांना इच्छा असो किंवा नसो फोन करतात. फोन करुन मराठीत संभाषण सुरु करतात. सुरुवातीला जोपर्यंत आपल्याला माहीत नसते तोपर्यंत आपल्याला असे वाटते की, खरोखरच कोणाचा तरी फोन आहे. नंतर ते सक्तीने गाणी ऐकवतात. हा काय प्रकार आहे ? म्हणून मला याबाबत ग्राहक म्हणून सुचवावेसे वाटते की, आपला अगदी महत्वाचा फोन चाललेला असतो, कोणा तरी पिडिताशी बोलत असताना यांचा फोन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

येतो. आम्ही आयडिया ॲडचे जमेल तेवढे फोन नंबर्स सेव्ह करुन ठेवलेले आहेत. परंतु परत नवीन नंबरवरुन फोन येतो. त्यांना कामधंदा नसेल परंतु ग्राहकांच्या कानामध्ये जाहिराती प्रॅक्टीकली ओतण्याचे काम या ज्या सगळ्या कंपन्या करीत आहेत त्यामध्ये ग्राहक म्हणून कोठे तरी त्यांच्यावर नियंत्रण घालण्यासाठी शासनाची ठोस भूमिका आली पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, यानंतर मला आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 224 बाबत बोलावयाचे आहे. कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीच्या संदर्भात ही बाब आहे. आदिवासी आश्रमशाळांच्या प्रश्नावर तदर्थ समिती नेमण्यात आली होती. या समितीने अनेक सूचना शासनाला दिलेल्या होत्या. सन्माननीय मंत्रिमहोदय प्रा. फौजीया खान याही त्या समितीवर होत्या. बहुतेक आदिवासी आश्रमशाळांमध्ये महिला अधिक्षिका नाहीत असे आमचे निरीक्षण होते. त्यामध्ये किती महिला अधिक्षिका नेमल्या गेल्या याबाबतीत मूल्यमापन झाले पाहिजे.

सभापती महोदय, उच्च आणि तंत्रशिक्षण विभागामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेसाठी आपण तरतूद करतो परंतु त्याला दिशा मिळणे गरजेचे आहे. याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते. उद्योग, रोजगार आणि स्वयंरोजगार याबद्दल बोलत असताना आज एसईझेडच्या निमित्ताने जो प्रचंड विद्रोह किंवा जी आंदोलने उभी आहेत त्याचे महत्वाचे कारण म्हणजे उद्योग विभागाकडून झालेली अनास्था. याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते. केंद्रामधून परवानग्या देत असताना जनतेचे मत विचारात घेतले जात नाही. माझ्याकडे कोकण विनाशकारी प्रकल्पग्रस्त समितीचे निवेदन आहे आणि उद्योग विभाग तीन तीन वर्षे झाली तरी जनतेचा जो काही विरोध आहे त्याच्यामध्ये फार मोठी हिंसा झाल्याशिवाय शांतपणे बसावयास तयार नाही किंवा त्याबद्दलची वस्तुस्थिती कळत नाही याकडे मला लक्ष वेधून त्वरित उद्योग राज्यमंत्र्यांनी रायगडमध्ये बैठक घेऊन स्वत:चे राजकीय वजन वापरुन यामध्ये लक्ष घालावे असे मला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, उद्योग विभागाकडील अजून एक मागणी आहे. गेल्या वेळच्या अधिवेशनामध्ये मोलकरणींसाठी महामंडळ स्थापन करुन अशी शासनाने मोठी घोषणा केली होती. पण या असंघटित समुहासाठी उद्योग विभागाने कोणतीही पावले उचललेली दिसत नाहीत. याकडे मला कामगार विभागाचे लक्ष वेधावेसे वाटते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाचा नंबर नेहमी शेवटी असतो आणि महिला व बालविकास विभागाला कमीतकमी पाने असतात. एका पानामध्येच महिला व बालविकास विभागाचे सगळे मुद्दे गुंडाळलेले असतात. पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतु राज्य महिला आयोगाचे सक्षमीकरण झालेले नाही. अनेक पदे रिक्त आहेत. गेल्या पाच वर्षामध्ये कॉंग्रेस पक्षाकडून भरली जाणारी तीन पदे निदान नेमली गेली परंतु राष्ट्रवादीकडून भरली जाणारी तीन पदे शेवटपर्यंत भरलीच गेली नाहीत. म्हणजे महिलांबाबतचा 50 टक्के अनुशेष असाच ठेवून देणे ही गोष्ट योग्य नाही. म्हणून राज्य महिला आयोगाचे सक्षमीकरण करुन त्यांच्यासाठी अनुदान आणि व्यवस्थेबाबत पावले उचलली गेली पाहिजेत.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

महिला संरक्षण अधिकारी, कौटुंबिक संरक्षण अधिकाऱ्यांची नेमणूक होण्यासाठी तरतूद केली पाहिजे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी बोलत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी असे म्हटले की, राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या तीन महिलांची नावे देण्यात आली नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, यासाठी पक्षाकडून नावे दिली जात नाहीत, शासनाकडून नावे दिली जातात.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझ्याकडे राष्ट्रवादी महिला आघाडीच्या महिला आल्या होत्या, त्यांनी सांगितले की, आमच्या पक्षाच्या 3 जागा भरावयाच्या आहेत. ही नावे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडून दिली जातात. त्यामुळे सन्माननीय मंत्री महोदयांनी महिला आघाडीशी बोलावे. त्यांचे म्हणणे काय आहे ते जाणून घ्यावे. प्रश्न असा आहे की, या आयोगामध्ये सक्षम कार्यकर्त्या नेमल्या गेल्या पाहिजेत, त्यात अनास्था नसावी अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 261 वर मी बोलते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी पूरक पोषण आहाराचे दर वाढवून देणे आवश्यक असल्याचे म्हटले होते. त्याची बिले प्रलंबित आहेत. त्यामुळे महिला बचत गट जेरीला आले आहेत. या महिला बचत गटाकडून काम केव्हा काढून घेतले जाते याची कंत्राटदार वाट पहात आहेत. या महिला बचत गटांना जिल्हा परिषदा, महानगरपालिकांकडून वेळेवर बिले दिली गेली पाहिजेत. त्यासाठी महिला व बालकल्याण विभागाने लक्ष दिले पाहिजे अशी विनंती करते आणि माझे दोन शब्द संपविते.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

प्रा.सुरेश नवले ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18, पान क्रमांक 17, राज्यपालांच्या सुरक्षिततेसंबंधी ही तरतूद करण्यात आली आहे. आमच्या मनामध्ये राज्यपालांच्या एकूण सुरक्षा व्यवस्थेविषयी कुतूहल आहे. राज्यपालांची व्यवस्था कशाप्रकारे असते, त्यांच्याकडे शिपाई किती आहेत, त्यांच्या पाठीमागे किती गाडया आहेत ? राज्यपाल समुद्र किनारी असलेल्या राजभवनामध्ये राहतात आणि समुद्र किनाऱ्यावरील सुरक्षा व्यवस्था लक्षात घेता मला थोडीशी चिंता वाटते. कारण मी राज्यपाल नामनियुक्त सदस्य असल्यामुळे मला राज्यपालांविषयी अधिक कणव आहे. एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 21, पान क्रमांक 18 वर बोलतो. गडचिरोली जिल्हयाचे दोन पोलीस जिल्हयामध्ये रुपांतर करण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. पोलीस खात्यामध्ये काम करणा-या कर्तव्यदक्ष अधिका-यांची संख्या अधिक आहे याच्यावर माझा विश्वास आहे. परंतु पोलीस अधिका-यांमध्ये भ्रष्ट अधिका-यांची संख्या सुध्दा जास्त आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती राहील की, अशा भ्रष्ट पोलीस अधिका-यांना नक्षलवादी भागात पाठवावे. त्यामुळे एकूण भ्रष्टाचाराचा जो प्रकार आहे त्याला आळा बसेल आणि नक्षलवाद्यांशी लढा देत असताना ते मरण पावले तर तरी काही हरकत नाही. किमान या भागातील भ्रष्टाचार तरी कमी होईल, त्यामुळे माझ्या सूचनेचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 94, पान क्रमांक 83, मार्ग व पूल या मागणीवर माझे विचार मांडतो. मराठवाडा हा मागासलेला विभाग आहे. तेथील जवळपास सर्वच जिल्हयांमध्ये 2 विश्रामगृहे असतात, एक गावाबाहेर आणि एक गावामध्ये असते. फक्त बीड जिल्हा त्याला अपवाद आहे. बीड जिल्हयात शहरामध्ये केवळ एकच विश्रामगृह आहे. त्यामुळे शासनाला या जिल्हयाला सर्वच बाबतीत उपेक्षित ठेवावयाचे आहे की काय अशी मला शंका येते. किमान एक विश्रामगृह गावाबाहेर बांधले तर आमच्यासारखा चिंतनशील माणसांना कार्यकर्त्यांचा उपद्रव होणार नाही आणि त्याच्यातून जे बाहेर येईल ते चांगले

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

प्रा.सुरेश नवले...

असेल असा मला विश्वास वाटतो. विश्रामगृहात राहून गैरप्रकार करणारे लोक आहेत. परंतु विश्रामगृहाचा चांगल्या कामासाठी उपयोग करुन घेणारे आम्हीही लोक आहोत तेव्हा माझ्या मागणीचा शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

यानंतर मी उद्योग विभागाच्या पान क्रमांक 143 वरील बाब क्रमांक 149 वर बोलतो. प्रोत्साहनपर पॅकेज देणे यासाठी ही मागणी केलेली आहे. ग्रामीण बीडमध्ये एमआयडीसीचे कार्यक्षेत्र आहे. त्याठिकाणी असलेले सर्व उद्योग आजारी आहेत. तेथे नवीन उद्योजक येण्यास तयार नाहीत. त्यामुळे मोठमोठया मल्टिनॅशनल कंपन्यांना प्रोत्साहित करुन उद्योग खात्याने त्यांना पर्यायी कार्यक्रम देऊन आकर्षित करावे. उद्योगधंद्याशिवाय मागासलेल्या भागाचा विकास होऊ शकत नाही. त्यासाठी खात्यातील आपले बौध्दिक प्राविण्य वापरावे. मराठवाडयातील बीड जिल्हा विभागाच्या मध्यभागी आहे. या जिल्हयापासून औरंगाबाद, परभणी, लातूर या जिल्हयांपासून सारख्याच अंतरावर आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. सुरेश नवले....)

परभणी तितक्याच अंतरावर आहे, उस्मानाबाद तितक्याच अंतरावर आहे. माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचे लातूरही तितक्याच अंतरावर आहे. मराठवाड्यातील ही मोठी शहरे आहेत. या भागामध्ये औद्योगिकीकरण वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने पावले उचलावीत अशी माझी या निमित्ताने शासनाला आग्रहाची विनंती आहे.

बाब क्रमांक 163, पान क्रमांकम 153. अन्नधान्य व्यवहारातील तूट भरुन काढण्यासाठी तरतूद कण्यात आलेली आहे. माननीय अब्दुल सत्तार हे अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री आहेत. काळया बाजारात जास्तीत जास्त धान्य पुरवठा करण्यामध्ये काही व्यक्ती, दलाल आणि व्यापारी काम करतात. धान्याचा काळा बाजार करणा-या या व्यक्तींना तुरुंगात डांबण्याची व्यवस्था राज्य सरकार करणार आहे की नाही असा माझा शासनाला सवाल आहे. यांना तुरुंगात डांबले तर ही जी तूट येते ती निश्चितपणे भरुन निघेल. राज्य शासनाने एक नैतिक जरब आणि धाक निर्माण केला पाहिजे. या राज्य शासनाचा नैतिक दरारा आहे यावर माझा विश्वास आहे. याबाबतीत माझ्या मराठवाड्यातील भूमिपुत्रांनी काम करावे असे मी त्यांना या निमित्ताने सांगू इच्छितो.

बाब क्रमांक 222, पान क्रमांक 211 . 6व्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार आश्रमशाळांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे. ही अतिशय आनंदाची बाब आहे. माझी राज्य शासनाला अशी विनंती आहे की, आश्रमशाळेमध्ये काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. अनेक गावातून विविध जाती धर्माची लहान मुले आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी येत असतात. या लहान मुलांचे मानसशास्त्र काय आहे हे समजून घेणारे कर्मचारी आश्रमशाळेमध्ये असणे आवश्यक आहे. परंतु या उलट आश्रमशाळेमध्ये जर विकृत मनोवृत्तीचे कर्मचारी आले तर त्याचे दुष्परिणाम आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर होतात. म्हणून आश्रमशाळेतील मुलांचे उत्तम प्रकारे संगोपन करण्यासाठी तेथील कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. हे प्रशिक्षण राज्य शासनाने द्यावे अशी मी राज्य शासनाला या निमित्ताने विनंती करतो.

बाब क्रमांक 250, पान क्रमांक 228. उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणे व लोक शिक्षण संस्था, मुंबई यांना वित्तीय अनुदान देण्यासाठी तरतूद





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. सुरेश नवले...)

करण्यात आलेली आहे. ही आनंदाची बाब आहे. उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये जी विनाअनुदान तत्वावर चालतात त्या ठिकाणी पीएच.डी. एम.फील अशा मोठ मोठया पदव्या संपादन केलेल्या व्यक्ती प्रोफेसर म्हणून काम करतात. ह्या पदव्या संपादन करण्यासाठी या लोकांनी आयुष्यातील बरीच वर्षे घालविलेली असतात. विनाअनुदान तत्वावर महाविद्यालये चालविणारे संस्थाचालक या उच्च विद्याविभूषित लोकांना हजार दोन हजार रुपये पगारावर राबवून घेतात. विनाअनुदान तत्वावर महाविद्यालये कोणाला द्यावीत आणि कोणाला नाही हा वेगळा प्रश्न आहे. माझा मुद्दा हा आहे की, ही विनाअनुदानित महाविद्यालये उच्च विद्याविभूषित लोकांना वेठबिगा-याप्रमाणे अल्पशा पगारावर राबवून घेतात. हजार दोन हजारावर हे लोक प्रपाठक म्हणून काम करतात. काही वेळा हे वेतन देखील त्यांना वेळेवर मिळत नाही. तेव्हा महाराष्ट्रातील जे उच्च शिक्षित प्रपाठक आहेत त्यांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

बाब क्रमांक 260, पान क्रमांक 237. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महिला व बालविकास कार्यक्रमाचा खर्च भागविण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. बालक आश्रम देण्याचा निर्णय झला. निवडणुकीपूर्वी बालक आश्रम दिले गेले. परंतु राज्य शासनाने अद्याप ऑडर्स काढलेल्या नाहीत. या बालक आश्रमामध्ये काम करणा-या कर्मचा-यांची नियुक्ती संस्थाचालक करतात. या कर्मचा-यांचा पगार ठरलेला नसतो. मिळणा-या अनुदानातून संस्थाचालक कर्मचा-यांना पगार देतात. या बालक आश्रमामध्ये शासनाने कायमस्वरुपी कर्मचा-यांची नियुक्ती करावी जेणेकरुन ते बालकांचे संगोपन उत्तमरीतीने करु शकतील. एवढे बोलून आणि या मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी व पूरक मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 15 वर गृह विभागाने गुप्त सेवेसाठी 8 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. पूर्वी राज्यामध्ये खबरे असायचे, ते गुप्त माहिती काढून पोलीस विभागाला पुरवित असत. त्यामुळे भविष्यात होणारे हल्ले, चोऱ्या, दरोडे रोखण्यास खूप मदत होत होती. आता या खबऱ्यांचे खून पाडले जात असल्यामुळे खबऱ्याचे काम करण्यासाठी कोणी पुढे यायला तयार होत नाही. गुप्त सेवेसाठी निधी वाढवून दिल्यास खबऱ्यांना अधिक मानधन देता येईल, पर्यायाने खबऱ्याचे काम करण्यास लोक पुढे येतील. त्यामुळे 26.11 ला झालेल्या घटनेसारखा हल्ला होणार असेल तर तो टाळता येऊ शकेल. भविष्यात होणाऱ्या हल्ल्याची माहिती अगोदर मिळू शकेल. यामध्ये पारदर्शकता असावी आणि खबऱ्यांच्या होणाऱ्या हत्या थांबविण्यासाठी शासनाने योग्य ती उपाययोजना करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 27, पृष्ठ क्रमांक 20 वर गृह विभागाने होमगार्डच्या वेतन व भत्त्यासाठी 18 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. मी शासनाला धन्यवाद देते. होमगार्ड हे कमी मानधनावर पोलीस जवानांबरोबर काम करीत असतात. त्यामुळे शासनाने जी तरतूद केली त्यामध्ये भरीव वाढ करुन होमगार्डना द्यावयाच्या भत्त्यामध्ये वाढ करावी. 26.11 ला झालेल्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी समुद्र किनाऱ्यावर पुरेशी संरक्षण व्यवस्था असावी यासाठी होमगार्डचा चांगल्याप्रकारे वापर करता येऊ शकतो. यापूर्वी देखील मी हा मुद्दा सभागृहात मांडला होता. आपण होमगार्डची भरती करतो, त्यांना समुद्रातील वा त्या परिसरातील हवामानाची पुरेशी सवय नसते. त्यांना बोटीमध्ये बसल्यानंतर चक्कर येणे, उलटी होणे असे प्रकार सुरु होतात. यासाठी शासनाने समुद्र किनारी राहणारे कोळी बांधव व त्यांच्या मुलांना चांगल्याप्रकारे प्रशिक्षण देऊन त्यांच्या माध्यमातून होमगार्डची भरती केली तर निश्चितपणे समुद्र किनाऱ्याचे संरक्षण राखणे सुलभ होईल व मच्छिमार कोळी बांधवांना देखील रोजगार मिळण्याच्या दृष्टीने याचा फायदा होऊ शकतो. होमगार्ड म्हणून त्यांची नेमणूक करुन त्यांना ओळखपत्रे दिली तर त्याचा सुध्दा त्यांना फायदा होऊ शकतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्रीमती मंदा म्हात्रे..........

सभापती महोदय, बाब क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 19 वर गृह विभागाने गडचिरोली जिल्हयातील धानोरी कॅम्प व लोहोरी येथे नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या पोलीस जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. माझी शासनाला विनंती आहे की, या शहीद झालेल्या पोलीस जवानांच्या कुटुंबियांना सुध्दा पेट्रोल पंप, गॅस एजन्सीचे वाटप कोणताही भेदभाव न करता केले जावे. शेवटी त्यांनी राष्ट्राच्या रक्षणासाठी आपल्या प्राणाची आहुती दिलेली आहे. या शहिदांच्या कुटुंबाला सावरण्याचा प्रयत्न केला जावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 62, पृष्ठ क्रमांक 49 वर पदुम विभागाने नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या मच्छिमांराना नुकसान भरपाई देण्यासाठी 13.15 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. मच्छिमारांना नुकसान भरपाई देत असताना शेतकऱ्यांप्रमाणे निकष लावावेत. पूर्णत: व अंशत: नुकसान भरपाई देत असताना मच्छिमारांनी स्वत:च्या हाताने विणलेली जाळी, लघु उद्योगातून तयार केलेली नाव विचारात घ्यावी. सागरी हवामानातील बदलामुळे बंद असलेली मासेमारी व मत्स्य दुष्काळ याचाही विचार करुन नुकसान भरपाई दिली जावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 99, पृष्ठ क्रमांक 105 वर सार्वजनिक बांधकाम विभागाने पुणे येथील मुलींच्या वसतिगृहासाठी 14 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या मुला-मुलींच्या निवासासाठी वसतिगृहाची अत्यंत आवश्यकता आहे. आज नवी मुंबई हे शहर नवीन विद्येचे माहेरघर म्हणून नावारुपाला आलेले आहे. नवीन मुंबईच्या परिसरात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींसाठी वसतिगृहाची सुविधा नसल्यामुळे त्यांची खूप आबाळ होत आहे. मी हा प्रश्न गेली तीन वर्षे सातत्याने सभागृहात मांडून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शासनाने त्वरित नवी मुंबई शहरामध्ये मुला-मुलींचे वसतिगृह बांधण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी करते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 228, पृष्ठ क्रमांक 212 वर आदिवासी विकास विभागाने एकलव्य निवासी शाळांच्या उभारणीसाठी 10 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे ही अत्यंत समाधानाची बाब आहे. निवासी शाळा निर्माण करताना तेथे सर्व सुविधा दिल्या जाव्यात.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..........

मुलींच्या निवासी शाळांमध्ये शौचालय, स्नानगृहाची सुविधा असावी, तेथील जेवणाचा दर्जा चांगल्या पध्दतीचा असावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 222, पृष्ठ क्रमांक 211 वर आदिवासी विकास विभागाने स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा चालविण्यासाठी अनुदान देण्याकरिता 64.42 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे...........

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .........

केंद्रशासनाने मान्यता दिलेल्या 35 आदिवासी आश्रमशाळा आहेत त्यांना गेल्या आठ वर्षापासून कोणतेही अनुदान मिळालेले नाही. या संस्थांचे चालक उपोषणाला बसलेले आहेत ते मला येऊन भेटले होते की आम्हाला आठ वर्षापासून अनुदान मिळत नाही, आम्ही काय करायचे. आता केंद्रशासन अनुदान देत नाही आणि राज्यशासन सुध्दा काहीच करीत नाही. अशा शाळांमध्ये जे लोक काम करतात त्यांनी पैसे भरुन नोकऱ्या घेतलेल्या आहेत त्यांची आजची परिस्थिती अत्यंत वाईट आहे, त्यांच्या समोर कसे जगावे हा प्रश्न पडलेला आहे. अशा प्रकारे शिक्षकांनाच वेतन मिळत नाही तर मुलांना कसे शिक्षण मिळत असेल आणि त्या शिक्षणाचा दर्जा काय असेल याचा विचार करणे आवश्यक आहे. या मागणीच्या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की, केंद्राने मान्य केलेल्या ज्या आश्रमशाळा आहेत त्यांना अनुदान शासनाने द्यावे अन्यथा ज्या नवीन आश्रमशाळांना मान्यता देणार त्या शाळांमध्ये त्यांना समाविष्ट करावे.

यानंतर बाब क्र. 261, पृ.क्र. 237 एकात्मिक बालविकास योजनेच्या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, कुपोषित बालकांसाठी जो पूरक आहार देण्यात येतो, आपणही त्या समितीचे अध्यक्षपद भूषविलेले असून संपूर्ण राज्याचा दौरा आपण केलेला आहे त्यात जव्हार, मोखाडा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नंदुरबारसारख्या ठिकाणी ज्यावेळेस आदिवासी माता गरोदर असल्याचे निदान होते तेव्हापासून अशा गरोदर मातांना पूरक आहार व भत्ता देण्यास सुरुवात केली तर नक्कीच कुपोषणाला आळा बसू शकतो. कारण या भागातील नवजात अर्भकांचे वजन अत्यंत कमी असते, त्यांना व त्यांच्या मातांना अशा पूरक आहाराची नितांत गरज असते. अशा आदिवासी महिलांची परिस्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी मी माननीय मंत्री महोदया श्रीमती फौजिया खान यांना घेऊन जाणार आहे. या अनुषंगाने शासनाकडे मी अशी विनंती करते की, अशा गरोदर मातांना वेळीच पूरक आहार व औषधे दिली तर कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. एवढे बोलून माझे भाषण संपविते.

--------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या बाब क्र. 62, पान क्र. 49 च्या अनुषंगाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधा पोहचलेल्यांना अनुदान देण्याच्या संदर्भात मला सूचना करावयाची आहे. नुकत्याच येऊन गेलेल्या फयान चकीवादळामध्ये मच्छिमारांच्या बोटींचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत व सानुग्रह अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाने 13.94 कोटीची पूरक मागणी मान्यतेसाठी आणलेली आहे. या आपद्ग्रस्तांना मदत देण्यासाठी शासनाने केलेल्या तरतुदीबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्याच धर्तीवर खानदेशमधील नाशिक, जळगांव, नंदुरबार आणि जळगांव या भागात केळी, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे सुध्दा नुकसान झाले त्यांना मात्र अद्याप कुठलीच मदत मिळाली नाही. अशा कापूस उत्पादक व फळ बागायतदारांना शासनाने मदत करावी अशी मी विनंती करतो.

महोदय, यानंतर अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र. 163, पान क्र. 155 संदर्भात मी शासनाचे अभिनंदन करतो. कारण अन्न धान्य व्यवसायातील तूट भरुन काढण्यासाठी शासनाने ही 127 कोटीची मागणी केलेली आहे. त्यानुसार वाढत्या किंमतीची नियमितता आणि नियंत्रण यासाठी देखील 60 कोटीची तरतूद शासनाने केली आहे. परंतु गरिबांच्या तोंडचा घास काढून घेऊन काळ्या बाजारात जे दलाल अशा धान्याची विक्री करतात त्यांना रोखण्यासाठी काहीतरी उपाययोजना करण्याची गरज आहे, अशी देखील शासनाला विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे...

जळगाव जिल्हयातील एमआयडीसीमधील एका मीलमध्ये रेशन दुकानात 50 लाख रुपये किमतीचे गहू सापडले होते. जे धान्य गरिबांसाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहे ते धान्य या मिलमध्ये सापडल्यामुळे गरिबांना अन्नापासून या मिलच्या मालकाने वंचित ठेवलेले आहे. त्यामुळे या घटनेच्या संदर्भात संबंधितांवर कठोर शासन होण्याची आवश्यकता आहे अशी सूचना मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या बाब क्रमांक 222 व 223 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारित वेतनश्रेणी देण्यासाठी 64.41 कोटी तसेच 7 कोटी 1 लक्ष रपये त्याच प्रमाणे 7.19 लक्ष रुपयांची तरतूद करुन आमच्या शिक्षकेतर बांधवाना तसेच त्या ठिकाणी काम करणा-या आमच्या कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार तरतूद केल्यामुळे मी शासनास मनापासून धन्यवाद देतो, शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, डोंगरी भागातील शिक्षक कर्मचा-यांचे थकीत देणी राहिलेली आहे त्यामुळे मी शासनाला विनंती करतो की, ज्या शाळा चांगल्या प्रकारचे काम करतात अशा शाळांची जी काही थकीत रक्कम आहे ती देण्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी मी अपेक्षा करतो.

भारतीय संविधानाच्या कलम 275(1) नुसार सहाय्य योजनेच्या अंतर्गत एकात्मिक योजनेसाठी तरतूद करण्यात आलेली असल्यामुळे मी शासनाचे आभार मानतो. शासनास धन्यवाद देतो. या ठिकाणच्या आदिवासी बांधवांसाठी चांगल्या प्रकारच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या जात आहे त्यामुळे मी शासनाचे आभार मानतो.

सभापती महोदय, आज आश्रमशाळेमध्ये जी काही मुले शिक्षण घेत आहेत त्या मुलांची मानसिकता जाणून घेण्याची गरज आहे. त्या आश्रमशाळेच्या वेळेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. पूर्वी जी वेळ ठेवण्यात आली होती ती तशीच ठेवावी असे मी शासनास सुचवू इच्छितो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 231 च्या संदर्भात मी विचार मांडणार आहे. जनजाती क्षेत्र योजनेखाली उजाड वनजमिनीवर वनांच्या पुनर्निर्मितीसाठी 75.84 कोटी रुपयांची तरतूद करण्यात

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे...

आलेली आहे. एक चांगला कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला असल्यामुळे मी शासनाने अभिनंदन करतो. आज वने नष्ट होत असतांना वन संवर्धनाचा आणि वनाची निर्मिती करण्याचा चांगला प्रयोग शासनाने हाती घेतलेला आहे. या योजनेसाठी शासनाने 75.84 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु या योननेसाठीची तरतूद अजून वाढविण्याची आवश्यकता आहे. वनाचे महत्व हे पर्यावरणासाठी आणि मानवी जीवनसाठी फार मोलाचे आहे त्यामुळे यासंदर्भात अधिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे अशी मी या निमित्ताने नम्रपणे सूचना करु इच्छितो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 77 ते 102 वर मी आता माझे विचार व्यक्त करणार आहे. इंदिरा आवास योजनेच्या अंतर्गत अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे आदिवासी बांधवासाठी अतिशय चांगली तरतूद यामध्ये करण्यात आलेली आहे. इंदिरा आवास योजनेमध्ये पूर्वी 45 हजार रुपयांचे घर बांधून मिळत होते परंतु आता या योजनेमध्ये वाढ करुन 70 हजार रुपयांचे घर बांधून देण्याची अभिनव योजना केलेली आहे. 2.24 लाख आदिवासी बांधवाना या योजनेचा लाभ होणार आहे व यासाठी 84 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो. इंदिरा आवास योजनेसाठी अधिक तरतूद करुन दिल्यामुळे इंदिरा आवास योजनेतून चांगल्या प्रकारची घरकुले मिळू शकतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. हीच बाब जनजाती क्षेत्राच्या बाहेरील उपयोजनेअंतर्गत घेतलेली असल्यामुळे ती सुध्दा बाब आनंदाची आहे.

सभापती महोदय, वसतीगृहाच्या बांधकामाच्या संदर्भात बाब क्रमांक 236 व 238 मध्ये तरतूद करण्यात आलेली असल्यामुळे मी शासनास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 248 च्या संदर्भात विचार मांडणार आहे. साखर कारखान्यांना ऊस खरेदी करता यावा यासाठी देय रक्कम बीन व्याजी कर्जाचे रुपांतर करण्यासाठी 5.24 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही तरतूद अतिशय योग्य असून या तरतुदीमुळे साखर कारखाने वाचतील व त्याचा फायदा शेतक-यांना होईल त्यामुळे शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 256 वर मी विचार मांडणार आहे. मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालये व मान्यता प्राप्त राज्य विभागीय व जिल्हा ग्रंथालय संघ

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे....

आणि संशोधन संस्था ग्रंथालये यांना परिरक्षण अनुदाने देण्यासाठी 13.74 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असल्यामुळे शासन निश्चितपणे धन्यवादास पात्र आहे. यासंदर्भात मी एक सूचना करु इच्छितो की, ग्रंथालयांच्या कर्मचा-यांचे वेतन वाढवून त्यांची वेतन निश्चिती केली तर ख-या अर्थाने ग्रंथालय योजना राबवली जाईल अशी विनंती करतो.

सभापती महोदय, आदिवासी विभागाला लागून असलेल्या चोपडा, रावेर आणि यावल हे तालुके डार्क झोनमध्ये येतात. या तालुक्यांमध्ये अतिशय गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. आदरणीय अरुणभाई गुजराथी साहेबांनी गेंल्या पाच-सहा वर्षापूर्वी एक्स्प्रेस कॅनॉलची योजना सांगितली होती त्या माध्यमातून नदीजोड, तलाव, पाझर तलाव, नाला बंधारे, गावतळे हे जर जोडले तर त्याचा निश्चितपणे फायदा होईल त्यामुळे नदीजोड आणि नाला बंधा-यांच्या बाबतीत एक्स्प्रेस कॅनॉलची योजना लघूसिंचन विभागामार्फत राबविण्याचा विचार या निमित्ताने करावा.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे ..

सभापती महोदय, अमळनेर तालुक्यातील पाडळसा धरणासाठी पुरेसा निधी न मिळाल्यामुळे त्या धरणाचे काम रखडलेले आहे तेव्हा जळगाव जिल्हयाच्या दृष्टीने हे धरण महत्वाचे असल्यामुळे या धरणासाठी निधी देण्यात यावा अशा प्रकारची सूचना करुन मी माझे भाषण संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर): सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या विविध विभागाच्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 87 पान नंबर 83 सबंधी मला प्रथम बोलावयाचे आह. केन्द्रीय मार्ग निधीतून अर्थसहाय्य केल्या जाणा-या नवीन व चालू मार्ग आणि पुलांच्या बांधकामासाठी अनुदान देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे .
सभापती महोदय, या निमित्ताने मला एका गोष्टीचा येथे उल्लेख् करावयाचा आहे. माळशेज घाट मोठा आहे आणि मुंबई गोवा मार्गावरसुध्दा अनेक ठिकाणी घाट आहे .राजमार्ग क्रमांक 17 ची दुरुस्ती करण्यासाठी अनेकदा मी पत्रव्यवहार केलेला आहे. त्या मार्गावर अनेक ठिकाणी कठडे पडलेले आहेत, दिशादर्शक फलक नाहीत ,त्याचबरोबर तेथे पट्ट्या भरण्याचे काम राहिलेले आहे. संबंधित विभागाने देखील ते मान्य केलेले आहे. ही कामे करण्यात न आल्यामुळे या घाटातील अपघातामध्ये वाढ झालेली आहे. तेव्हा या ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यता यावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, मुंबई - गोवा महामार्ग चौपदरी करण्यात यावा यासाठी पंधरा दिवसापूर्वी पत्रकारांनी एक आंदोलन केले होते. तेव्हा मुंबई ते गोवा या महामार्गावर पनवेल ते कशेळी घाटापर्यतचा पहिला टप्पा करावा आणि दुसरा टप्पा तेथून पुढे सावंतवाडी पर्यतचा करावा. मुंबई - गोवा महामार्गावर दररोज अपघात होत असल्यामुळे त्याचे चौपदरीकरण करण्यात यावेव त्यासाठी पुरेशा निधी देण्यात यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय,यानंतर बाब क्रमांक 90 पान नंबर 85 संबंधी मला बोलावयाचे आहे. शासकीय कार्यालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे.ठाण्याच्या तहसीलदार कार्यालयाची जागा फार मोठी आहे परंतु त्या जागेमध्ये मोठया प्रमाणावर अतिक्रमण करण्यात आले असून तेथे भंगार वाहने ठेवण्यात आली आहेत तसेच त्या ठिकाणी विविध फेरीवाले देखील आहेत. ठाणे तहसीलदार कार्यालयामध्ये आपली कामे करुन घेण्याकरता दररोज चार ते पाच हजार गोर गरीब लोक येत असतात . त्यांना सायकल ठेवण्यासाठी देखील जागा नाही या तहसीलदार कार्यालयाची पुनर्रचना करण्यात यावी यासाठी आम्ही पत्रव्यवहार केलेला होता. बी.ओ.टी.तत्वावर तहसील कार्यालयाचे चांगले डिझाईन करुन पुनर्रचना केली तर त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर..

ठिकाणी सुसज्ज अशा प्रकारचे कार्यालय निर्माण होऊ शकेल तेव्हा या कामासाठी सबंधित खात्याने मान्यता द्यावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्रमांक 33 पान नंबर 23 संबंधी मला बोलावयाचे आहे.कालवे आणि बंदरातील गाळ उपसण्यासाठी यंत्र खरेदी करण्यासाठी ही तरतूद करण्यात आली असून ही निश्चितच चांगली गोष्ट आहे. कोकणातील चिपळूण जवळची वशिष्टी नदी आणि राजापूरची अर्जुना नदीच्या परिसरात भेट देऊन आलो आहे. त्या ठिकाणचा गाळ काढण्यासाठी तांत्रिक विभागाकडे कोणत्याही प्रकारची मशिनरी नाही. गाळ साठल्यामुळे अतिवृष्टी झाल्यानंतर त्या भागात मोठया प्रमाणावर पूर येतो व अनेक लोकांच्या घराचे नुकसान होत असते तेव्हा गाळ काढण्याच्या यंत्रसामुग्रीचा पुरवठा करण्यात यावा अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 34 पान नंबर 85 राज्य सुरक्षा मंडळासबंधी मला बोलावयाचे आहे. नागरी संरक्षण दलाच्या बाबतीत मी सभागृहात वेळोवेळी मागणी करीत असतो. होमगार्डस प्रमाणे नागरी संरक्षण दलाकरितासुध्दा निधीची तरतूद केली पाहिजे. नागरी संरक्षण दलात अनेक सेवक काम करीत असून त्यांच्यासाठी निधीची तरतूद करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय,बाब क्रमांक 167 पान नंबर 156 संबंधी मला बोलावयाचे आहे राज्यात जी वजन मापे, काटे व इलेक्ट्रॉनिक्स तराजू वापरण्यात येतात ती स्टॅडर्ड कंपनीची नसल्यमुळे वजन मापे अधिकारी स्टॅम्पीग करुन देतात व नंतर त्याची विक्री केली जाते त्यामुळे जनतेची मोठया प्रमाणासर फसवणूक होत असते त्या बाबतीत माझ्याकडे काही तक्रार केल्यानंतर तक्रार करणा-यांची संबंधित विभागाच्या अधिका-यांबरोबर मी एक बैठकसुध्दा घेतली होती . वजन मापे निरीक्षकांनी प्राधिकृत केलेली आहेत यासाठी तसेच दुरुस्तीच्या नावाखाली लाखो रुपये उकळले जातात.व दुकानदारांना निष्कारण फसवले जाते तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांकडे मी या निमित्ताने मागणी करीत आहे की यासंबंधी चौकशी करण्यात यावी .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 236, पृ.215 - आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मुला-मुलींची वसतिगृहे बांधणे यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, या राज्यातील आश्रमशाळा, विशेषत: आदिवासी आश्रमशाळा हा इतका मोठा विषय आहे की तो पीएचडीचा विषय होऊ शकतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी याबाबत अनेक मुद्दे मांडले आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना खरोखरी आपल्याला शिकवावयाचे असेल तर त्यांना तेथे निवासासाठी इमारती बांधून दिल्या पाहिजेत, त्यांना इतर सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. या इमारती बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे निधी पाठविला असतातो 4-4 वर्षे पडून असतो त्याचा योग्य वेळेस विनियोग झाला पाहिजे. म्हणून ही बाब मी या खात्याच्या निदर्शनास या निमित्ताने आणून देत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 249 - कोकण कृषी विद्यापीठाला पीक काढणीनंतरचे तंत्र ज्ञ ाान विकसित करण्यासाठी डिग्री कोर्सनंतर डिप्लोमा कोर्स सुरू करण्याचा निर्णय 1998 साली झ ाालेला आहे. परंतु त्यासाठी जी निधीची आवश्यकता आहे तो निधीच दिलेला नाही. त्यामुळे हा निधी मिळावा म्हणून कृषी विद्यापीठ पाठपुरावा करीत आहे. तरी या निधीची ताबडतोब तरतूद व्हावी अशी मागणी मी या निमित्ताने आपल्याकडे करीत आहे तिचा अवश्य विचार व्हावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 144, पृष्ठ क्र.142 - औद्योगिक लवादाच्या संबंधातील ही बाब आहे. पण आपल्याकडील बंद पडलेल्या अुद्योगांना आणि त्यातील कामगारांना न्याय देण्यासाठी केलेले दावे वर्षानुवर्षे औद्योगिक न्यायालयात पडून आहेत त्यांचा निपटारा लवकर होण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही होण्याची गरज आहे. त्यासाठी संबंधित खात्याने निधीची तरतूद करावी. सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील अनेक लवाद पडून आहेत, त्यांचा निपटारा होत नाही. सभापती महोदय, बाब क्रमांक 149, पृष्ठ क्र.143 - उद्योग व कामगार विभागाची ही पुरवणी मागणी आहे. या संदर्भात मी सुरूवातीलाच आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, ठाणे जिल्हा हा संपूर्ण आशिया खंडामध्ये सर्वात मोठी औद्योगिक वसाहत म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु आज या ठाणे जिल्ह्यातील उद्योगांना घरघर लागली आहे आणि त्यांची स्थिती अगदी दयनीय झाली आहे. अनेक उद्योग आणि कंपन्या ठाण्यातून, राज्यातून बाहेर जाऊ लागल्या आहेत व त्या ठिकाणी

..... यूयू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोठमोठे मॉल येत आहेत. परंतु त्या उद्योगातील हजारो कामगार मात्र उद्ध्वस्त झालेला आहे. तेथील पॉयशा कंपनी, इंडियन रबर कंपनी अशा सारख्या मोठमोठ्या कंपन्या बंद पडल्या असून त्यातील कामगारांचा रोजगार गेला आहे. त्यातील अर्ध्याहून अधिक कामगार, 100 ते 150 कामगारांचा मृत्यू झाला आहे पण अजहूनही त्यांना त्यांची देणी मिळालेली नाहीत. 2007 मध्ये या संदर्भात आपण जी.आर. काढला होता की, बंद पडलेल्या कंपनीकडून त्यांच्या कामगारांची देणी जोपर्यंत चुकविली जात नाहीत, दिली जात नाहीत तोपर्यंत इतर कोणतीही देणी दिली जाता कामा नयेत. पण तरीही अजून देखील या कामगारांना त्यांची देणी पूर्णपणे मिळालेली नाहीत. आजही हे कामगार उपाशी आहेत. 10-10, 20-20 वर्षे झाली त्यांच्या कंपन्या बंद पडल्या आहेत पण अजूनही त्यांना त्यांची देणी मिळालेली नाहीत. त्या कंपन्यांच्या जमिनी विकल्या गेल्या आहेत आणि त्यावर मॉल उभे राहण्याच्या तयारीत आहेत पण कामगारांना मात्र त्यांची देणी मिळालेली नाहीत. म्हणून मी कामगार मंत्र्यांना विशेष करून विनंती करीन आणि तसे पत्रही मी त्यांना यापूर्वी दिलेले आहे की, बंद पडलेल्या कंपन्यामधील कामगारांना न्याय देण्यासाठी, आपण आपल्या दालनामध्ये सर्व संबंधितांची एक विशेष बैठक घ्यावी आणि त्यांचा हा प्रश्न सोडवावा आणि हे शासन कामगारांचे अश्रू पुसण्यास तयार असल्याचे दाखवून द्यावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 149 - आज अनेक उद्योग आपल्या राज्यातून स्थलांतरित होत आहेत. ठाणे जिल्ह्यातील रेमंड कंपनी, कॅडबरी कंपनी दुसरीकडे जाणार आहे. काही कंपन्या येथील ऑक्ट्रॉयचा भार सहन होत नाही म्हणून बाहेर जात आहेत. त्यामुळे याबाबतचे आपले धोरण आपण केव्हा जाहीर करणार आहात ? आपल्याकडील उद्योग वाढले पाहिजेत, त्यातील कामगार वाचले पाहिजेत अशा प्रकारे आपले धोरण जाहीर करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये उर्जा प्रकल्प होत असताना अनेक प्रकारचे वाद झाले आहेत, आंदोलने झाली आहेत. मी आमदार झाल्यापासून म्हणजे गेल्या अडीच वर्षापासून सतत येथे विनंती करतो आहे की, कोकणातील मुलांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने, जे आयटी पास झालेले आहेत त्यांना तेथे रोजगार मिळण्याच्या दृष्टीने आयटी पार्कची स्थापना झाली पाहिजे. प्रत्येक जिल्ह्याला किमान एक आयटी पार्क झाले पाहिजे. आज कोकण विभागातील जिल्ह्यातील 400 मुले तरी रोजगारासाठी बाहेर जात आहेत. त्यांच्यासाठी तेथे असे आयटी पार्क झाले तर त्यांना तेथेच रोजगार मिळू शकेल

..... यूयू 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर ....

म्हणून मागणी केली जात आहे पण शासन त्याबाबत कोठलाही प्रतिसाद देत नाही. इतकेच नाही तर एमआयडीसी सांगते की आमच्याकडे त्यासाठी जागाच नाही. ...

( यानंतर श्री. सरफरे ... व्हीव्ही 1 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर..

एम.आय.डी.सी. ची एवढी मोठा जागा पडून आहे. चिपळूण, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये ज्या ज्याठिकाणी जागा असेल त्याठिकाणी आय.टी. पार्क आपण सुरु केले पाहिजेत. कारण त्याठिकाणी येणारे उद्योग हे प्रदूषण निर्माण करीत नाहीत. त्याठिकाणी परदेशामधील उद्योग आपली गुंतवणूक करण्यास तयार आहेत. त्याबाबत टेलिकॉन्फरसिंग सुध्दा केले आहे. त्यामुळे निरनिराळया ठिकाणी आय.टी. पार्क आपण स्थापन केले पाहिजेत अशी मी मागणी करतो. त्याकरिता 35 एकर जागा लागत असल्यामुळे ती जागा उपलब्ध केल्यास त्याठिकाणी नवीन उद्योग सुरु होतील आणि त्यामधून रोजगाराचा प्रश्न सुटेल अशाप्रकारची सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलण्यापूर्वी मी आपणाकडे पत्राव्दारे विनंती केली होती. माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी या राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ. विजयकुमार गावित आणि राज्यमंत्री माननीय प्रा. वर्षा गायकवाड यांच्याविषयी मुद्दा मांडला. त्यासंबंधी मी बोलायला उभा आहे. त्याबाबत मी आणखी वेगळे भाष्य करु इच्छितो. आयजीबीएमसी या मेडिकल कॉलेजच्या प्राध्यापकांनी आपल्याला लायजन ऑफिसर म्हणून काम दिले जाते अशाप्रकारचा आक्षेप घेतला आहे. याबाबत मुंबईच्या टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली आहे. सर्वसाधारणपणे लोक या वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातमीवर विश्वास ठेवतात असा एक प्रघात आहे. अशाप्रकारे सरकारी सेवेत असलेले प्राध्यापक खुलेपणाने प्रेस मिडियाला जाऊन सांगतात. सभापती महोदय, आपण डॉक्टर आहात मीही डॉक्टर आहे. त्यामुळे आपल्या प्रोफेशिअन्सीबाबत मुद्दा आहे. अशाप्रकारे लायजन ऑफिसर म्हणून त्यांना काय काम सांगण्यात आले त्याचा संदर्भ याठिकाणी दिला आहे. यापूर्वीच्या मंत्रिमहोदयांनी त्यांना लिपस्टिक आणावयास सांगितले होते. त्याचप्रमाणे एका रिटायर्ड ऑफिसरने सांगितले की, आम्हाला भाजी आणावयास सांगितले, फिशकरी आणावयास सांगितले जाते. अशाप्रकारचे त्यांनी आरोप केले आहेत. ही बाब या राज्याच्या दृष्टीने चुकीची आहे, मेडिकल प्रोफेशिअन्सीच्या दृष्टीने चुकीचे आहे, मंत्रिमहोदयांच्या दृष्टीने चुकीचे, वाईट आहे. त्याबाबत या सभागृहामध्ये स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. ते चुकीचे आहे असे जर मंत्रिमहोदय सांगत असतील तर आपण त्या संबंधितांवर हक्कभंगाची सूचना कां देत नाही? ही बातमी जर चुकीची असेल तर ती बातमी तयार करणाऱ्या संबंधितांवर आपण हक्कभंगाची सूचना द्यावी. विधीमंडळामध्ये मेडिकल प्रोफेशिअन्सी आणि पोलिटिकल प्रोफेशिअन्सीची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याला सभागृहामध्ये उत्तर दिले पाहिजे. त्यासंदर्भात माननीय राज्यमंत्र्यांना काही मत मांडावयाचे असेल तर त्यांनी ते मांडावे.

**तालिका सभापती (डॉ.वसंत पवार)** : या विषयावर माननीय सभापतींनी यापूर्वी निर्णय दिलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा विधीमंडळाच्या गरिमाचा प्रश्न आहे. त्यामुळे ही जर टेबल न्यूज असेल तर तसे आपण सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी टाईम्स ऑफ इंडियामध्ये छापून आलेल्या बातमीबाबत याठिक्‌ाणी मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, वर्तमानपत्रामध्ये कॅबिनेट मंत्र्यांबाबत आणि माझ्याबाबत छापून आले आहे. वर्तमानपत्रात छापून आलेली बातमी पूर्णपणे चुकीची आहे.मी कुणालाही असे काम करण्यास सांगत नाही. त्यामुळे त्या बातमीशी माझा संबंध नाही. मी संपूर्ण दिवसभर या सभागृहामध्ये उपस्थित असते.माझ्याकडे घरी कुणी आले नसल्यामुळे मी मच्छी करी किंवा मटन करी आणण्यास सांगण्याचा प्रश्न नाही. सभापती महोदय, हे सभागृह सार्वभौम असल्यामुळे अशाप्रकारचे छोटे छोटे विषय चर्चेला येऊ नयेत असे मला वाटते. अशाप्रकारचे कुणीही आरोप करीत असतील तर त्याची याठिकाणी चर्चा होऊ नये असे मला सुचवावेसे वाटते.

डॉ. दीपक सावंत : वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी चुकीची असल्याचे मंत्रिमहोदयांना वाटत असेल तर संबंधित व्यक्ती आणि संबंधित रिपोर्टरविरुध्द आपण हक्कभंगाची सूचना देऊ शकता.

प्रा. वर्षा गायकवाड : जरुर देण्यात येईल.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला मागण्यांच्या संदर्भात बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मुद्दे मांडलेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी मघाशी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्यासाठी आपल्याकडे अगोदर लेखी स्वरुपामध्ये परवानगी मागितलेली आहे.

सभापती महोदय, पान क्र.179,बाब क्र.238 आश्रमशाळा, हॉस्टेल यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आश्रमशाळेच्या बाबतीत काय झाले? आजच्या"लोकसत्ता"च्या अंकामध्ये विदर्भातील आश्रमशाळांवर दरवर्षी 600 कोटी रुपयांचा खर्च होत असतो अशी बातमी आलेली आहे. जर गेल्या 50 वर्षामध्ये देखील या आश्रमशाळांची परिस्थिती सुधारली नसेल तर त्याला आपणच सर्वजण कारणीभूत आहोत. यासाठी या राज्यातील राज्यकर्ते, ब्युरोक्रसी कारणीभूत असेल. अनेक आश्रमशाळांच्या माध्यमातून आदिवासींच्या मुलांसाठी आदिवासी उप योजना राबविण्यात आल्या, पण त्यातील किती योजना फलद्रुप झाल्या हा एक संशोधनाचा विषय आहे. उदाहरण द्यावयाचे तर मोफत गणवेश देण्याची योजना. याबाबत सांगावयाचे तर विद्यार्थ्यांना 15 ऑगस्ट महिन्यापर्यंत गणवेश मिळावयास पाहिजेत, पण ते मिळत नाहीत. गणवेष का मिळत नाहीत ? याच्या खोलामध्ये कधी कोणी गेले आहे काय ? त्यांना बूट दिले पाहिजेत. पण त्यांना आजपर्यंत कधीही बूट मिळालेले नाहीत. त्यांना लोकरीचा स्वेटर मिळावयास पाहिजे पण तो देखील मिळत नाही. सभापती महोदय, या विद्यार्थ्यांना दुपारी जेवणामध्ये उसळ मिळावयास पाहिजे, रात्री जेवण मिळावयास पाहिजे. तसेच आठवडयातून एकदा मांसाहार मिळावयास पाहिजे,15 दिवसांनी एकदा गोड पदार्थ मिळाला पाहिजे. प्रत्येक आश्रमशाळेच्या बाहेर यासंबंधीचा सर्व तक्ता लावलेला असतो. पण तशा प्रकारे या विद्यार्थ्यांना काहीच दिले जात नाही. आम्ही विदर्भातील रायपूर येथील एका आश्रमशाळे मध्ये भेट दिली होती. पण या शाळेमधील संचालक, मुख्याध्यापक एवढा माजोरा होता. सभापती महोदय, त्यांच्यासाठी हाच शब्द वापरला पाहिजे. त्यांनी असे सांगितले की, आम्ही उसळ देत नाही. तुम्हाला काय करावयाचे ते करा. विद्यार्थ्यांना जेवणामध्ये उसळ देण्यासाठी चवळी पाठविली जाते. पण विद्यार्थ्यांना उसळ दिली जात नाही मात्र याच्या पोतीच्यापोती खाजगी लोकांना विकल्या जातात. पण चवळीची उसळ विद्यार्थ्यांच्या तोंडामध्ये जात नाही. मंत्री महोदय कोणत्याही पक्षाचे असू देत, कोणत्याही बाकावरुन हा प्रश्न उपस्थित झाला तरी सर्वांचे याबाबतीत एकच प्रश्न आहे की, आपण आश्रमशाळेतील भ्रष्टाचार का निपटून काढत नाही ? आदिवासी विकास योजनेअंतर्गत

. . . .2 डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

या सर्व प्रकारांची सी.बी.आय.चौकशी झाली. गेल्या तीन वर्षापासून यासंबंधात गुन्हे नोंदविण्यात आले. पण आदिवासी विकास विभाग आणि अन्न व नागरी पुरवठा विभाग यासंबंधात गुन्हे नोंदविण्यास तयार नाही. याबाबतीत कारवाई करण्यास तयार नाही. टेंभूसोर्णी आश्रमशाळा असू दे, टिटांभा आश्रमशाळा असू दे,टेंभवली आश्रमशाळा असू दे किंवा बिरोली, धारणीमधील आश्रमशाळा असू दे किंवा आमच्या ठाण्यातील सूर्यमाळा आश्रमशाळा असू दे, या सर्व ठिकाणी परिस्थिती सारखीच आहे. जर विद्यार्थीनींची आश्रमशाळा असेल तर तेथे 700 ते 800 मुली असतात. आपण देखील नंदूरबार भागातील आहात. त्या भागातील अक्कलकुवा, धडगाव मध्ये देखील हीच परिस्थिती आहे. त्याठिकाणी जर 700 मुली असतील तर एवढया मुलींसाठी 10 ते 15 न्हाणीघरे असतात. पण मुलींसाठी न्हाणी घरे का बांधत नाहीत. यासाठी धडक योजना का हाती घेतली जात नाही ? मुलींसाठी शौचालये बांधत नाहीत ? मुलांचा विषय सोडून द्या. मुले नदीवर जाऊन आंघोळ करु शकतात. पण मुलींसाठी न्हाणीघर आणि शौचालये न बांधण्याचे कारण काय आहे ? त्यासाठी किती खर्च येणार आहे. जो निधी दिला जातो, तो कुठे जातो ?

सभापती महोदय, पान क्र.177 बाबत सांगावयाचे तर व्हॉलंटरी एजन्सींना ग्रँट इन एड दिली जाते. या सेवाभावी संस्था काय काम करतात ? जशी एडस्च्या बाबतीत या सेवाभावी संस्थांनी वाट लावलेली आहे, तशीच आदिवासी भागामध्ये देखील सेवाभावी संस्थांनी वाट लावलेली आहे. मेळघाट मित्र असू दे, महान संस्था असू दे किंवा प्रेम संस्था असू देत, आपल्याला प्रत्येक प्रायमरी हेल्थ सेंटरमध्ये यांचे रिप्रेझेंन्टेटीव्ह दिसतात, आश्रमशाळेमध्ये भेटतात आणि तेथील अधिकाऱ्यांना ब्लकमेल करुन पैसा काढतात असा माझा आरोप आहे. त्यामुळे पहिल्यांदा ग्रँट इन एड देण्याचे बंद करण्यात यावे. केंद्र शासनाकडून पैसा मिळाला म्हणून वाटेल तसा उधळावयाचा काय ? तेथील आदिवासी मुलांच्या मुखामध्ये काहीतरी जाऊ देत. ठाण्यामध्ये सर्पदंशाने तीन बालके मरण पावली. येथील आश्रमशाळांमध्ये देखील कित्येक बालके मरण पावतात. सरपटणारी जनावरे कशामुळे येतात ? तर या आश्रमशाळांमधील खोल्यांना दरवाजे नसतात, खिडक्या नसतात, वरुन पाणी गळते म्हणून तेथे प्लॅस्टीकच्या पिशव्या बांधल्या जातात अशी आश्रमशाळांची परिस्थिती आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे... 15:30

डॉ.दीपक सावंत ...

त्यावर कोणी कां बोलत नाहीत. सभापती महोदय, मी आपल्याला या संदर्भात चिखली गावाचे एक उदाहरण सांगतो. आदिवासींना योजना माहीत नाहीत. ज्या वेळी आम्ही चिखली गावात गेलो त्यावेळे तेथे एका घरामध्ये ग्रेड-3 चे कुपोषित बालक होते. मी त्यांना विचारले की, अंगणवाडीमध्ये जाऊन अपण या मुलाला पुरक पोषण आहार का देत नाही? त्यावेळी त्या मुलाच्या वडिलांनी सांगितले की, आम्ही अंगणवाडीमध्ये जाणार नाही. मी म्हटले तुम्ही आपल्या मुलाला अंगणवडीमध्ये का नेत नाही, त्यावेळी त्याने असे सांगितले की, सरकारने माझे खावटी कर्ज माफ केले नाही. माननीय मंत्रिमहोदय, ही आताची एका महिन्यापूर्वीची गोष्ट आहे. चिखली गावातील ग्रेड-3 चे मूल आहे. त्यासंबंधात आपण चौकशी करावी. त्याच्या वडिलांचे खावटी कर्ज माफ झालेले नाही. सभापती महोदय, त्या मुलाच्या वडिलांनी असे संगितले की, माझे खावटी कर्ज माफ झाले नाही त्यामुळे मी अंगणवाडी सेविकेला मी हे क्रेडिट देणार नाही. तिच्या हातून माझे मूल मला बरे करायचे नाही. माझे मूल मेले तरी चालेल, अशा प्रकारची मानसिकता या आदिवासींची होत आहे. कारण त्यांना योजना माहीत आहेत पण त्यांच्याकडे त्या योजना पोहचत नाहीत. शासनाकडून वरच्या स्तरावर कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात येतात पण खालच्या स्तरावरपर्यंत त्या पोहचत नाहीत हे दुःख आहे.

सभापती महोदय, गेल्या चार वर्षात 50 लाख आदिवासींचे 450 कोटी रुपयाचे खावटी कर्ज माफ केलेले आहे कां नेमके. किती रुपयाचे खावटी कर्ज माफ केलेले आहे यासंबंधीचा आकडा माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये सांगावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 163 पान क्रमांक 131वर मी या ठिकाणी बोलू इच्छितो. आज या विभागात वजनमाप अधिकाऱ्यांची मोठया प्रमाणात कमतरता आहे याचे कारण असे की, यांची भरती गेल्या सात वर्षापासून झालेली नाही. मॉलमध्ये पॉकेटमधून जे धान्य मिळते् त्यावर लिहिलेले असते की, हे अर्धा किलो आहे. एक किलो आहे. पाऊण किलो आहे. एवढेच नाही तर त्यावरची एक्सपायरी डेट अनेक वेळा खोडलेली असते. बीग बाझारमध्ये सेल लावण्यात येतो. बिचारी गरीब माणसे या बीग बाझरमधील सेलकडे धवत जातात. सकाळपासून लाईन लावतात पण त्यांच्या पदरात काय मिळते.? त्यांच्या पदरात अर्धा किलोच्या बदल्यात 350 ग्राम धान्य पडते,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

यावर हे शासन लक्ष देणार आहे काय? माझी अशी विनंती आहे की, वजनमाप अधिकाऱ्यांची ताबडतोब भरती करण्यात यावी आणि सर्व मॉलमध्ये जेवढा माल आहे त्याचे मूल्यमापन करण्यात यावे तो खरोखर तेवढया कॉन्टीटीचा आणि क्वालिटीचा आहे काय हे पहाण्यात यावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 262 पान क्रमांक 238 वर मी बोलणार आहे. अंगणवाडी सेविकांचा हा प्रश्न आहे. माननीय मंत्रिमहोदय, श्री. झनकसाहेबांनी सांगितले की, अंगणवाडी सेविकांमध्ये वाढ करण्यात येणार आहे. सभापती महोदय, अंगणवाडया वाढविण्यात येणार आहेत. अंगणवाडयांसाठी इमारती बांधण्यात येणार आहेत. सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्राचा आढावा घेतला तर 40 टक्क्याहून अधिक अंगणवाडया या भाडयाच्या जागेत आहेत. त्या शेडमध्ये आहेत. त्यावर शाकारलेली छप्परे आहेत. अंगणवाडी सेविकांना गेल्या सहा महिन्यापासून पगार दिला गेला नाही मात्र इकडे पाचशे रुपये भाऊबीज भेट देण्यात येते. या अंगणवाडी सेविकांना असा किती पगार आहे? दीड हजार रुपये, दोन हजार रुपये जास्तीत जास्त साडेचार हजार रुपये पगार आहे. सभापती महोदय, बाकीच्या सर्व कर्मचाऱ्यांना पगार मिळतो. अंगणवाडी सेविका ही ग्रामविकासचा आत्मा आहे. ग्रामीण आरोग्याचा आत्मा आहे. जी अंगणवाडी सेविका या शासनाला सगळी माहिती पुरविते त्या आंगणवाडी सेविकेला पगारापासून वंचित कां ठेवण्यात आले? हा माझा प्रश्न आहे. त्यांना कधी पर्यंत पगार देण्यात येणार आहे? याचा खुलासा करण्यात यावा.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागामार्फत अनेक औषधांची खरेदी केली जाते पण आपल्याला त्याची माहिती नसते. मी कालच सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना यासंदर्भातील हिशेब करावयाला सांगितले होते. सभापती महोदय, एकाच कंपनीकडून 70 कोटी रुपयांची औषधे सर्व विभागांनी खरेदी केलेली आहेत. मी त्या कंपनीचे नाव सांगतो. हिंदुस्थान लॅबोरेटरी, अंजता फर्मा अशा चार-पाच कंपन्या आहेत. 70-70, 80-80 कोटी रुपयाची औषधे एकाच कंपनीकडून खरेदी करण्यात आलेली आहे. हिमॉल्ट या कंपनीकडूनसुध्दा औषधाची खरेदी करण्यात आली आहे. हिमॉल्टचे कॉम्पोजिशन पहिले तर ते सबस्टॅण्डर्ड कॉम्पोजिशन आहे. त्यामुळे स्त्रियांचे काय आरोग्य सुधारणार आहे? गर्भवती महिलेला त्यामधून काय आयर्न मिळणार

..3..



SMT/ ST/ KGS/

डॉ. दीपक सावंत....

आहे? सभापती महोदय, आपण या औषधासंबंधीची एक बाटली मागवून घ्यावी. नाही तर माझ्याकडे ती औषधाची बाटली आहे मी ती आपल्याला देतो. यावर महिला व बालविकास विभागाने अंकुश ठेवला पाहिजे. ती औषधें खरेदी केली जातात का आणि ती खरोखर लाभार्थ्यांपर्यंत पोहचतात काय?

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. बाब क्रमांक 143 पान क्रमांक 141 वर मी बोलणार आहे. सेवायोजन कार्यालयाचा मुद्दा आहे. मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्रात सेवायोजन कार्यालये आहेत. गरीब माणसाला पदवीधर माणसाला सुशिक्षित बेरोजगाराला एक आशेचे स्थान आहे. सेवायोजन कार्यालयातून आपल्याला काही तरी कॉल येईल आणि कधी तरी आपल्याला नोकरी मिळेल या आशेने 20-20 वर्षे सेवायोजन कार्यालयाचे कार्ड ही माणसे खिशात ठेवतात. आणि कुठे तरी खासगी कंपनीत नोकरी करतात. सभापती महोदय, पोलीस भरतीच्यावेळी या कार्डची मागणी केली जाते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

जर मुंबई महानगरपालिकेमध्ये नोकरी पाहिजे असेल तर कार्ड मागतात. नागपूर महानगरपालिकेमध्ये नोकरी पाहिजे असेल तर कार्ड मागतात. पण आज ही सेवायोजन कार्यालये बंद करुन त्या ठिकाणी करियर गाईडन्स सेंटर करण्याचा घाट राज्य शासनाने घातलेला आहे. याचाही खुलासा व्हावा. आपण त्याचे करियर गाईडन्स सेंटर करुन नका. सेवायोजन कार्यालय तसेच चालू ठेवा. लोकांना निदान नोकरी नाही पण आशेचा किरण तरी दाखवा. माझ्या खिशात कार्ड आहे, मला कधी तरी नोकरी लागेल या आशेच्या किरणावर तरी लोकांना जगू द्या एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असताना प्रथम मी पृष्ठ क्रमांक 15 वरील बाब क्रमांक 12 बाबत बोलू इच्छिते. राज्याच्या गुन्हेगारीमध्ये बीड जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. अशा परिस्थितीमध्ये सह पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी नियंत्रण कक्षात काम करीत आहेत. आठ पोलीस ठाण्यांमध्ये सहाय्यक निरीक्षक यांच्याकडून काम करुन घेतले जाते. पोलीस अधिक्षकाच्या निर्णयाबद्दल संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये उलटसुलट चर्चा सुरु आहे. सन 2000 साली पोलीस निरीक्षक, मंडल निरीक्षक हे पद आपण रद्द केलेले आहे आणि तालुक्याला पोलीस निरीक्षक हे पद मंजूर केलेले आहे. बीड शहरामध्ये पेठ बीड, शिवाजीनगर, बीड शहर आणि बीड ग्रामीण, धारुर, अंबेजोगाई ग्रामीण, वडवणी व वाहतूक शाखा या सर्व ठिकाणी सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्यावतीने आपण काम करुन घेत आहोत. आपण सहा पोलीस निरीक्षक पेट्रोलिंगच्या कामावर नियुक्त केलेले आहेत. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. पोलीस निरीक्षक उपलब्ध असताना आपण त्यांना पेट्रोलिंगच्या कामावर देत आहोत आणि फुलफ्लेज अशा पोलीस ठाण्यांना आपण पोलीस निरीक्षक देत नाही. बीड जिल्ह्याच्या अशा प्रकारच्या या निर्णयाचे गमक कळत नाही.

सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तू कायदा (इ.सी.ॲक्ट) असेल, त्याच्या सेक्शन 3 आणि 7 चे गुन्हे असतील, अवैध वाहतुकीचे गुन्हे असतील, बॉम्बे पोलीस ॲक्टखालचे गुन्हे असतील, तडीपारीची प्रकरणे असतील, खून, बलात्कार यासंदर्भातील गुन्हे असतील या सर्व बाबतीतील तपास पोलीस निरीक्षक पातळीवरच्या अधिकाऱ्यांनी करावयाचा असतो परंतु पोलीस निरीक्षक उपलब्ध असताना सुध्दा त्यांच्या नेमणुका का होत नाहीत हे कळत नाही. शासनाने याबाबतीत लक्ष घालावे. त्या ठिकाणी पोलीस पाटील यांच्या वेतनासंबंधीची अनेक वर्षाची मागणी शासनाकडे प्रलंबित आहे. यासंदर्भामध्येही निश्चितपणे लक्ष घालावे. याच बाबीच्या संदर्भात बोलत असताना मी सांगू इच्छिते की, महिला पोलिसांची भरती करीत असताना 30 टक्के महिला पोलीस कॉन्स्टेबल भरल्या जातील असे आश्वासन गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सभागृहाला दिले होते. त्याची अंमलबजावणी ताबडतोबीने करणे गरजेचे आहे. या ठिकाणी सकाळी जी लक्षवेधी सूचना आली त्यामध्ये महिलांच्या खुल्या कारागृहाची चर्चा झाली. अत्यंत स्तुत्य अशा प्रकारचा हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर करणे गरजेचे आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

ॲड. उषा दराडे ....

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 100 वरील बाब क्रमांक 106 बाबत बोलावयाचे आहे. रस्त्यांच्या बाबतीत गोदाकाठच्या सर्व गावांची अत्यंत दयनीय अवस्था आहे. तिलस्मुख, डिग्रस, पोहनेर, कासारवाडी तसेच त्या परिसरातील जी गावे असतील त्या सर्व गावांचे रस्ते ताबडतोबीने दुरुस्त करणे गरजेचे आहे. सोनीमोहा ते तेलगाव धारुर रस्ता, धारुर ते तेलगाव, मोहा-अंबेजोगाई, मोहा-शिरसाळा, कुंदेवाडीरस्ता, रोजगार हमी योजनेमध्ये अर्धवट राहिलेले रस्ते पूर्ण करणे आवश्यक आहे. बीड बार्शी रोड ते आहेर धानोरा रोड मार्गे खजिना बावडी, धारुर ते जायभायवाडी रस्ता, पाडळी जोडरस्ता, बावी देवस्थान रस्ता, शिवाजी पुतळा येथे ओव्हर ब्रिज करणे, साठे चौकामध्ये ओव्हर ब्रिज करणे, तेलगाव चौकामध्ये ओव्हर ब्रिज करणे, ही कामे तसेच अनेक रस्ते करणे अत्यंत गरजेचे आहेत. आमच्या जिल्ह्याला आता दोन मंत्री मिळालेले आहेत. बांधकाम खात्याने विशेषत: लक्ष देऊन बीड जिल्ह्यातील सर्व रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावावेत अशा प्रकारची नम्र विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मला अन्न व नागरीपुरवठा विभागाच्या बाबतीत एकच सूचना करावयाची आहे. एकीकडे बोगस कार्ड दिले जातात आणि ज्यांना पाहिजे त्यांना कार्डच मिळत नाही ही परिस्थिती असण्यामध्ये बीड जिल्हा सुध्दा अपवाद नाही. त्या ठिकाणचा पुरवठा आणि वाटप याबाबतीत नियोजन करणे गरजेचे आहे. मागच्या पाच वर्षामध्ये साधी दक्षता समितीची बैठक सुध्दा झालेली नाही. त्यादृष्टीने विचार होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, महिला आणि बालकल्याण खात्याच्या संदर्भात बोलत असताना सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी एक प्रश्न उपस्थित केला त्याबाबत सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. सचिनभाऊ अहिर यांनी खोडण्याचा प्रयत्न केला. जरी आपण शासकीय बाकांवरील सदस्य असलो तरी वस्तुस्थिती मान्य करावयास पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/ पूर्वी श्री.बरवड 15:40

ॲड.उषा दराडे....

मागील 5 वर्षामध्ये आपण राज्य महिला आयोगाचे गठन ज्या उद्देशाने केले आहे तो उद्देश सफल झ ालेला नाही. या आयोगामध्ये 6 सदस्य व अध्यक्ष आहेत. या महिला आयोगाला एवढे अधिकार आहेत की, राज्य सरकारने किंवा केंद्र सरकारने केलेल्या कायद्याला सुधारणा सुचविता येतात. अशाप्रकारची मोठी संस्था शासनाने निर्माण केलेली आहे. पण या महिला आयोगाच्या सदस्यांची 5-5 वर्षे नेमणूक होणार नसेल आणि विरोधी पक्षाकडून त्याबाबत बोलले गेले तर ते खोडून काढले जात असेल तर ते गंभीर आहे. त्यामुळे राज्य महिला आयोगाचे गठन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या राज्य महिला आयोगासमोर आर्थिक प्रश्न आहे. या आयोगासाठी आर्थिक तरतूद कमी प्रमाणात केली जाते ती वाढूवन दिली जावी अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, शासनाने प्रथम 1994 साली, त्यानंतर 2001 मध्ये महिलांसाठी धोरण जाहीर केले जाते. त्यानंतर आजपर्यंत महिलांसाठी नवीन धोरण जाहीर झालेले नाही. शासनाने महिलांकरिता धोरण जाहीर करावे अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागासंबंधी मी माझे विचार मांडते. हा विषय कदाचित धोरणात्मक निर्णयाचा होऊ शकेल. शासनाने महिला व बालकल्याण हे दोन विभाग एकमेकास का जोडले आहेत ते समजलेले नाही. बालकांची जबाबदारी महिलांची असते म्हणून हे दोन विभाग एकत्र केले आहेत काय ? त्याऐवजी हे दोन स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात यावे, त्यामुळे यासंबंधीचे प्रश्न तातडीने मार्गी लागू शकतात. शासनाने यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय लवकरात लवकर घ्यावा अशी मी मागणी करते. महिला व बालकल्याण खात्याने जेंडर सेंसेटिव्ह बजेट आणण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलावीत आणि येणाऱ्या अर्थसंकल्पात तशी तरतूद करावी अशी मी मागणी करते. त्याचप्रमाणे तुतीच्या संकुलासाठी मी अनेक वर्षापासून जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी करीत आहे. त्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मी मागणी करते आणि या मागण्यांना पाठिंबा देऊन माझे भाषण संपविते.

----

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्रमांक 87 व 88 वरील बाब क्रमांक 83 व 84 वर मी माझे विचार मांडणार आहे. आमचा विदर्भ विभाग हा रस्त्यांच्याबाबत अत्यंत मागासलेला आहे. चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयात महागार्गांची कमी काम झालेली आहेत. ही वस्तुस्थिती असताना चंद्रपूर जिल्हयातील रस्त्यांवरुन 2-2 हजार टन वजनाचे 50 ट्रक दिवसाला येणे-जाणे करीत असतात. वास्तविक जिल्हयातील रस्त्यांची अवस्था दयनीय आहे, त्या रस्त्यांवरुन बैलबंडी जाऊ शकते, राज्य मार्गाची अवस्था 1-2 महिन्यातच खराब होते. त्या रस्त्यांवरुन हे अवजड ट्रक वाहतूक करीत आहेत. त्यामुळे या रस्त्यांचा दर्जा सुधारणे आवश्यक झाले आहे. आमच्या भागात मोठमोठे उद्योग येत आहेत, त्यांच्याकडून मोठया प्रमाणात रस्त्यांवरुन वाहतूक केली जाते, पण रस्त्यांची व्यवस्था केली जात नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, ग्रामीण भागामध्ये येणाऱ्या उद्योजकांवर दडपण आणून त्यांच्याकडून 20 ते 50 कि.मी.पर्यंतचा जिल्हा मार्ग राज्य मार्गाला जोडणारा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करुन घ्यावा. कारण आमच्या भागातील रस्ते आज तयार केले की उद्या खराब होतात ही वस्तुस्थिती शासनाने लक्षात घेऊन याबाबतचा धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जैनुद्दीन जव्हेरी....

त्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद करावी. आमच्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये बल्लारपूर, राजूरा आणि चंद्रपूर ही मोठी शहरे आहेत. या शहरातून दररोज 50-50 टन राख, सिमेंट घेऊन जाणा-या 18-20 चाके असलेल्या हजारो ट्रेलरची वाहतूक होत असते. या अवजड वाहतुकीमुळे त्या शहरामध्ये रोज अपघात होत असतात. शाळेतील मुले, सायकलवरुन, स्कूटरवरुन जाणारी माणसे यांचे नेहमी अपघात होत असतात. चंद्रपूर शहरातून राजूराकडे आणि बल्लारशा व चांदाकडे जाणारे तीन मार्ग आहेत. या रस्त्याला बायपास रस्ता करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे आलेला आहे. बल्लारशा मार्गावर वारंवार अपघात होऊन लोक मृत्युमुखी पडतात. माझ्या बंधूचा देखील या रस्त्यावर अपघात झाला. त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली की, जामपासून बल्लारशाकडे जाणा-या रस्त्याचे चौपदरीकरण करावे. ते चौपदरीकरणाचे काम मंजूर होऊन त्याच्या निविदा देखील निघाल्या. माझी या निमित्ताने सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना विनंती आहे की, या रस्त्याचे काम त्यांनी ताबडतोबीने सुरु करावे. त्याच प्रमाणे चंद्रपूर हे मोठे शहर झालेले असून या शहरातील अवजड वाहतूक कमी व्हावी म्हणून तेथे बायपास रस्ता करावा.

बाब क्रमांक 148, पान क्रमांक 183. चंद्रपूरमध्ये मोठमोठे उद्योग आहेत. तेथे एमआयडीसी देखील आहे. परंतु ती एमआयडीसी पूर्णपणे बंद आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये एमआयडीसी करण्याचे शासनाचे धोरण आहे. आज परिस्थिती अशी आहे की, कोणत्याही जिल्ह्यामध्ये किंवा तालुक्यामध्ये उद्योग आले तरी त्या उद्योगामध्ये भूमिपुत्रांना नोक-या मिळत नाहीत. याचे हेही एक कारण आहे की, आजकाल डेली वेजेस आणि ठेकेदारी पध्दतीवर कामे केली जातात. रिपेरिंग किंवा कुठे वेल्डिंग करावयाचे असेल, कुठे इमारतीची दुरुस्ती किंवा बांधकाम करावयाचे असेल तर अशी कामे डेली वेजेस आणि ठेकेदारी पध्दतीवर केली जातात. परंतु आज काल मोठमोठ्या उद्योगांमधूनही डेली वेजेसवर कामगारांना राबवून घेतले जात आहे. आमच्या विदर्भामध्ये आणि चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यामध्ये तंत्र शिक्षण घेऊन इंजिनिअर्स झालेली, बी.ए., बी.कॉम, बीएस.सी पदवी घेतलेली अनेक मुले आहेत. परंतु आज त्यांना नोक-या मिळत नाहीत.इंजिनिअर्स झालेल्यांना एक दोन हजार रुपयावर राबवून घेतले जाते. शासनाने असा कडक नियम करण्याची आवश्यकता आहे की, जेव्हा एखाद्या जिल्ह्यामध्ये उद्योग सुरु होतो त्यावेळी त्या उद्योगामध्ये 80 टक्के स्थानिक लोकांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जैनुद्दीन जव्हेरी...

काम दिले पाहिजे. असा दंडक घातला तरच स्थानिक लोकांना काम मिळू शकेल. दुसरे असे की, इंटरनेटमुळेही छोटे छोटे स्थानिक उद्योग बंद पडण्याची वेळ आलेली आहे. पेपर मिल, सिमेंट कारखाने, खनिज कारखाने यांना लागणा-या लहानसहान वस्तू  छोटे छोटे उद्योग करणा-या लोकांकडून खरेदी केल्या जातात. परंतु आता इंटरनेट असल्यामुळे हे मोठे उद्योजक दिल्ली आणि अन्य मोठमोठया शहरातून वस्तू खरेदी करतात. स्थानिक लोकांकडून ते त्या वस्तू विकत घेत नाहीत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ KGS/ 15:50

श्री.जैनुद्दीन जव्हेरी........

माझी उद्योगमंत्र्यांना विनंती आहे की, मायनिंग उद्योग असो, कारखाने असोत, सिमेंट उद्योग असो त्यांच्याकडे विचारणा करावी, त्यांनी लघुउद्योगांकडून कोणत्या बाबींची खरेदी केली आहे? 10 टक्के देखील मालाची खरेदी लघुउद्योगांकडून केली जात नाही. चंद्रपूरला फ्लाय ॲशचा कारखाना आहे. ब्रिजेसचे काम करण्यासाठी नागपूरहून सामुग्रीची खरेदी केली जाते. मोठया उद्योगांकडून त्यांना आवश्यक असलेल्या सामुग्रीची खरेदी लघुउद्योगांकडून केली जात नाही. त्यांचे हात वरपर्यंत पोहोचले आहेत. दिल्ली मुंबईपर्यंत हात पोहोचलेले आहेत. ते म्हणतात, आम्ही त्याची काळजी करणार नाही. कितीही मोठे नेते आले, लोकप्रतिनिधी आले तरी आमचे कोणी काही करु शकणार नाही. आज एमआयडीसी बंद झालेली आहे. माझी उद्योगमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घालावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 141, पृष्ठ क्रमांक 142 वर कामगार विभागाची पूरक मागणी सादर केलेली आहे. कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित आहेत. स्व.इंदिराजी गांधी यांनी मोठया ऊर्जा प्रकल्पाचे भूमीपूजन करुन 30 वर्षे झाली. मोठमोठे नेते त्याठिकाणी येऊन गेले. अद्याप प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटलेले नाहीत. प्रकल्पग्रस्तांना न्यायालयात धाव घ्यावी लागली. ज्यांच्या जमिनी संपादित केल्या त्यांच्या कुटुंबातील किमान एका सदस्याला नोकरी मिळाली पाहिजे परंतु ही मागणी मान्य केली जात नाही. यासाठीच आम्ही वेगळया विदर्भाची मागणी करीत आहोत. किमान मोठमोठया कारखान्यांमध्ये स्थानिक भूमीपुत्रांना काम मिळेल. प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळेल. नवीन उद्योग असोत, सिमेंट उद्योग असोत, 30-40 वर्षे होऊन गेली परंतु प्रकल्पग्रस्तांना त्या उद्योगामध्ये नोकरी मिळालेली नाही. स्थानिक लोकांना काम मिळत नाही. कामगार क्षेत्रात रोजंदारी कामगार, ठेकेदारी पध्दतीचे कामगार असोत त्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत कामगारमंत्र्यांसमवेत बैठका होतात. कामगार मंत्र्यांना अधिकार काय आहेत? उद्योगपती बैठकीला येतात, कामगार नेते येतात, कामगारमंत्री येतात, बैठकीमध्ये समेट होतो. परंतु मंत्रीमहोदय लेखी आदेश देऊ शकत नाहीत. मंत्रीमहोदय म्हणतात आम्हाला अधिकार नाहीत. आम्ही त्या उद्योगपतींना सांगू शकत नाही. उद्योगपती म्हणतात, तुम्हाला अधिकार नाही. तुम्ही कोर्टात जा. मंत्र्यांना अधिकार आहे. कामगार नेते, उद्योगपती यांच्यासमवेत होणाऱ्या बैठकीमध्ये मंत्रीमहोदयांनी आदेश दिले, उद्योगपतींची चूक त्यांच्या निदर्शनास आणून दिली,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी........

कामगारांच्या मागण्या कशा रास्त आहेत हे त्यांना निक्षून सांगितले, कामगारांना सेवेत कायम करण्याचे आदेश दिले तर त्याचे पालन झाले पाहिजे. म्हणून माझी विनंती आहे की, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न असोत, स्थानिक लोकांना नोकरी मिळण्याचा प्रश्न असो, रोजंदारी कामगारांचा प्रश्न असो, ठेकेदारी पध्दतीच्या कामगारांचा प्रश्न असो याबाबत कामगारमंत्र्यांनी दिलेल्या आदेशांची उद्योगपतींनी अंमलबजावणी केली पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 256, पृष्ठ क्रमांक 232 वर सार्वजनिक ग्रंथालयांसाठी शासनाने 13.75 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. ही केलेली तरतूद आज राज्यात असलेल्या 6500 विद्यमान ग्रंथालयांसाठी मर्यादित दिसते. वास्तविक पाहता राज्यामध्ये नव्याने खूप ग्रंथालये जन्माला आलेली आहेत. खेड्यापाड्यामध्ये ग्रंथालये सुरु आहेत. गाव तेथे ग्रंथालय ही चळवळ शासनाने सुरु केली, तसा कायदा केला. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी दरवर्षी वाढीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे, परंतु तशी तरतूद केलेली दिसून येत नाही. ग्रामीण पातळीवर काम करणारे, ग्रंथालय चळवळ राबवित आहेत ते हताश होत आहेत. शासनाच्या अर्थसहाय्याशिवाय, शासनाच्या प्रोत्साहनाअभावी ग्रंथालये बंद पडत आहेत. यासाठी तरतूद वाढविण्याची आवश्यकता आहे. यामध्ये नवीन ग्रंथालयांचा देखील समावेश व्हावा अशी मी मागणी करतो.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .........

महोदय, बाब क्र. 250, पृ.क्र 229, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात शासनाने 3.5 कोटीची तरतूद अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेला तसेच अन्य एका संस्थेला 100 वर्षे पूर्ण झाली त्यासाठी केलेली आहे. बाकीच्या संस्थांना मात्र शासन अर्थसहाय्य करीत नाही परंतु अशा प्रकारे 100 वर्षे पूर्ण झालेल्या संस्थेला देऊन इतर सस्थांना उपेक्षित ठेवणे योग्य नाही. याचा अर्थ जवळच्याच लोकांच्या संस्थांना शासन अर्थसहाय्य करते आणि इतर संस्थांच्या बाबतीत विचार होत नाही त्यामुळे संदेश चुकीचा जातो म्हणून 100 वर्षे पूर्ण झाली हाच निकष लावावयाचा असेल तर आपल्या राज्यात डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या अनेक सस्थांना 100 वर्षे झाली त्यांचाही समावेश करावा आणि त्यांच्यासाठी तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 57, पृ.क्र. 47 च्या अनुषंगाने दारिद्र्यरेषेखालील शेतकरी कुटुंबांना वर आणण्यासाठी शासनाने 40 कोटीची तरतूद केली आहे. या योजनेचे मी स्वागत करतो परंतु त्यात फक्त एस.सी. मधील शेतकऱ्यांचाच अंतर्भाव केलेला असून तो चुकीचा आहे. कारण शेतकरी म्हणजे त्याला जात, धर्म आणि पंथ हा नसतो. अशा सर्व बीपीएल खालील शेतकऱ्यांना वर आणण्यासाठी विहिरीवर पंप बसविणे तसेच म्हशी घेण्यासाठी शासनाने मदत करावी, जेणे करुन त्यांच्या आत्महत्त्या थांबतील. या सर्वांसाठीच शासनाने तरतूद करावी अशी विनंती करतो.

यानंतर बाब क्र. 55, पान क्र. 46 च्या अनुषंगाने फलोत्पादन विकासासाठी अर्थसहाय्य करता यावे म्हणून ही तरतूद करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांना ही मदत देण्यासाठी तरतूद करण्यात आली असून ती अत्यंत अल्प आहे. या निमित्ताने मी शासनाचे लक्ष एका महत्वाच्या व्यवसायाकडे वेधण्याचा प्रयत्न करतो. आपल्या राज्यात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आहेत. राज्यातील विविध ठिकाणी म्हणजे सह्याद्री पर्वतरांगा, विंध्य, सातपुडा हे पर्वत, महादेव डोंगर तसेच कोल्हापूर भागात अशी औषधी वनस्पती आहे. कोल्हापूर भागात नरक्या नावाची अशी एक वनस्पती आहे की त्याची तस्करी होते. आपल्या राज्यात त्या वनस्पतीचा कुठल्याही प्रकारे उपयोग आपण करु शकत नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, अशा औषधी वनस्पतींची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यासाठी अर्थसहाय्य करावे, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गृह विभागाची पूरक मागणी क्र. 18, 19 आणि 20 च्या अनुषंगाने पोलीस विभागाला साधनसामुग्री आणि विविध साहित्य पुरविण्यासाठी ही तरतूद शासनाने केली आहे. गृह खात्यावर राम प्रधान समितीचा अहवाल आणि अन्य विषय प्रचंडपणे येऊन गेले. पुन्हा सोमवारी राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहाला सादर होणार आहे. आज मी एक सी.डी. सोबत आणली असून त्यामध्ये अजमल कसाबची अंडा सेलमध्ये इन कॅमेरा जबानी नोंदवून घेतली त्यावेळेस पोलीस त्यांना कोणते प्रश्न विचारत होते आणि तो काय उत्तरे देत होता याचे चित्रण मिडियावरुन दाखवित होते इतकी गटबाजी आपल्या पोलीस यंत्रणेमध्ये आहे. त्यानंतर हसन गफूर यांच्यावरील आरोप पोलिसांनी मांडले. माजी पोलीस आयुक्त ज्युलिअस रिबेरो यांची मुलाखत सुध्दा लोकमत मध्ये छापलेली आहे. एवढे सगळे पोलीस आणि सरकारला सुध्दा अंतर्मुख करायला लावणारे आहे. तसेच पोलिसांमधील ही जी गटबाजी आहे त्याचा शासनाने विचार करणे आवश्यक आहे. मागील वेळेस ज्याप्रमाणे बातमी आली होती तशीच बातमी आजही पेपरमध्ये आली आहे की, महाराष्ट्रातील काही ठिकाणांना अतिरेक्यांचा धोका आहे. आज सकाळी सभागृहाच्या पटलावर एक विषय मांडण्यात आला तो असा होता की, दि. 22 मार्च, 2005 रोजी मुंबई, आंध्र प्रदेश, जम्मू-काश्मीर, नागालँड येथून .....

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ SBT/ KTG/ ST/ 16:00

श्री.अरविंद सावंत ....

मोठया प्रमाणात बेकायदेशीर शस्त्र परवाने आणले जाणे या विषयावर महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये विषय चर्चेस आला. या सूचनेसंदर्भात आश्वासन क्रमांक 138 च्या संदर्भातील संपूर्ण प्रोसिडींग माझ्याकडे आहे. त्या चर्चेमध्ये हे शस्त्र परवाने देणा-या व्यक्तींची नावे घेण्यात आली होती. परंतु तत्कालीन गृहमंत्री म्हणाले की, "नाही, मला याची माहिती नाही." परंतु आज मात्र यासंदर्भातील नावे दिली गेली व ती नावे श्री. दिनेशकुमार श्रीकृष्ण शर्मा तसेच संतोष त्रिभुवन राय अशी असून त्यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदावर नेमणूक करण्याची शिफारस तत्कालीन माननीय आदिवासी विकास मंत्री तथा पालक मंत्री ठाणे जिल्हा यांनी त्यांच्या दिनांक 26.12.2003 च्या पत्राद्वारे केलेली आहे. हा सर्व प्रकार धक्कादायक आहे. पोलिसांच्या आणि आपल्या खात्याची तत्परता पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, हा विषय 2005 मध्ये सभागृहात मांडला गेला आणि त्याची माहिती 15 डिसेंबर, 2009 रोजी सभागृहात दिली गेली आहे. असे चालले तर पोलीस खात्याचे काम चालणार आहे काय ? त्यामुळे ज्यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदावर नेमणूक केली होती ती माणसे आज कोठे आहेत असा माझा सवाल आहे. श्री. दिनेशकुमार शर्मा आणि संतोष त्रिभुवन राय हे दोन्ही अटकेत आहेत काय ? नागालँड आणि इतर राज्यातील शस्त्रे मिळतात तसेच या शस्त्रांना संबंध देशाचा परवाना मिळतो. आज मुंबईमध्ये सिक्यूरीटी गार्डस् म्हणून जेवढी मंडळी आहेत त्या सगळयांकडे शस्त्रास्त्राच्या संदर्भात परवाने आहेत. त्या शस्त्रास्त्राचा आकडा त्या दिवशी 536 देण्यात आला होता. त्यासंदर्भात पोलीस खात्याने तपासणी केली आहे काय ? मुंबईत आज किती तरी लोक अनाधिकृत शस्त्रास्त्रांचा वापर करीत आहेत त्यामुळे यासंदर्भात आपण तपास कधी आणि कसा करणार आहात ? मुंबईवर जेव्हा आतंकवाद्यांचा हल्ला झाला तेव्हा हा हल्ला सागरी मार्गे होणार आहे यासंदर्भात केंद्राने राज्यशासनला सगळी माहिती दिलेली असतांना त्यासंदर्भात काही उपाययोजना करण्यात आली नाही.

सभापती महोदय, पोलीस खाते, कोस्टल गार्ड, नेव्ही यांना आपली हद्द किती सागरी मैलापर्यंत आहे हे कळत नाही. यासंदर्भात परवा जो प्रकार घडला त्याचा मी येथे उल्लेख करु इच्छितो. 1 डिसेंबर रोजी वसईच्या अर्नाळा समुद्रापासून थोडया अंतरावर एक जहाज नांगर टाकून उभे राहिले होते. हे जहाज 27 तास नांगर टाकून ऊभे होते. परंतु या जहाजाच्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

संदर्भात पोलीस खात्याला आणि कस्टम खात्याला सुध्दा काहीही माहिती नव्हती. हे जहाज कोणाचे आहे, कोठून आले आहे याची काही सुध्दा माहिती नव्हती. या जहाजाचे नाव आहे "अलहयात" असे आहे. या जहाजाचा नोंदणी क्रमांक जेएफडी 502520 असा आहे. या जहाजावर सात खलाशी होते या सात खलाशांचे नावे सुध्दा फार मजेशीर आहेत. या खलाशांची नावे पुढील प्रमाणे आहेत. 1) सलीम हाजी अंगारिया, 2) आदम भाई, 3)जावेद सलीम अंगारिया, 4) जाफर हुसेन कुंडलिया, 5) हसन अली कुंडलिया, 6 दादा जोसेफ भरज अशी या खलाशांची नावे आहेत. आपली किती सागरी मैलापर्यंत हद्द आहे याची माहिती पोलिसांना नाही. कस्टमच्या अधिका-यांना विचारले की, तुमच्याकडे गस्ती नौका आहे काय ? तुम्ही गस्ती नौकेतून गस्त केली होती का ? त्यावेळेस त्यांनी सांगितले की, "आम्ही 2 तारखेला गस्त केली होती, गस्त नौका 2 तारखेला गस्तीसाठी गेली आणि 3 तारखेला परत आली". वरुन असे उत्तर दिले गेले की, "गस्ती नौका वसईला असते आणि बोट अर्नाळा येथे उभी आहे त्यामुळे काय झाले याची आम्हाला माहिती नाही." सभापती महोदय, गस्त किती वेळा केली आणि केव्हा केली यासंदर्भात रजिस्टरमध्ये नोंदणी करावी लागते परंतु एक डिसेंबरला गस्त करण्यात आली नाही असे दिसून आलेले आहे. या बोटीत काय आहे असे विचारल्यावर सांगण्यात आले की, बोटीमध्ये मीठ आहे. परंतु बोटीमध्ये नक्की काय आहे यासंदर्भात कोणीही जाऊन पाहिले नाही. या बोटीवर पांढरे दिसणारे मीठ होते की, अजून काही अंमली द्रव्ये होती याची साधी चौकशी सुध्दा करण्यात आली नाही. इतका गलथान कारभार आजही पोलीस खात्यात सुरु आहे. लाचखोरीमध्ये ठाणे ग्रामीण पोलिसांचा महाराष्ट्रात हात कोणीही धरु शकणार नाही. ठाण्यामध्ये चिंचोरे गावात श्री. मनमोहन रणजितसिंग मेहता या व्यापा-याने मनोर पोलीस ठाण्याचे पोलीस बळ बेकायदेशीर रित्या उपयोगात आणून आदिवासींची राहत्या घरात जाऊन, दमदाटी केली. जसे काही पोलीस खात्याला या मेहताच्या नोकरीसाठीच ठेवले आहे. आदिवासींची बाजू ऐकूनही घ्यावयाची नाही अशा प्रकारचा कारभार सुरु आहे. त्यामुळे गृहखात्याने या ठिकाणी तरतुदी जरी केली असली तरी त्या तरतुदींचा वापर कसा होईल याबाबद्दल शंका आहे. कधी कधी असे वाटते की, लंडनचा बॉबी जसा असावा तसे आमचे पोलीस असावयास हवे. आता हवालादारांच्या हातातील काठी आम्हाला बघवत नाही, तर या हवालदाराच्या हातात कायम एक रिव्हाल्वर असले पाहिजे. परंतु दुर्दैवाने त्यांची सुध्दा अवस्था अत्यंत वाईट आहे.

यानंतर श्री. गायकवाड.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये याच सभागृहामध्ये मी नक्षलवाद्यांशी लढा देणा-या पोलिसांच्या संदर्भात एक मुद्दा मांडला होता या पोलिसांचे छायाचित्र सकाळ वा लोकमत या वर्तमानपत्राने प्रसिध्द केले होते. त्या छायाचित्रामध्ये आपला पोलीस अर्ध्या चड्डीवर होता त्याच्या पायात चप्पला होत्या. त्याचे हात खांद्यावर होते आणि त्याच्या जवळ 303 ची जुनी बंदूक होती ती चालेल किंवा नाही हे माहीत नाही अशा प्रकारचे छायाचित्र या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाले होते त्याची प्रत मी तत्कालीन सभापतीकडे दिली होती ती प्रत गृह विभागाकडे गेली असेल तेव्हा त्या बाबतीत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे ? आजही नक्षलवादी पोलिसाना मारत आहेत आणि पोलीस मृत्युमुखी पडत आहेत. त्यांच्या कुटुंबियाकडे पाहण्यास त्यांना वेळ नाही, त्यांच्या धराची अवस्था अत्यंत वाईट असून त्यांना वेळेवर वेतन दिले जात नाही. त्यांना बारा बारा तास डयुटी करावी लागते. पोलिसांना आजही त्यांच्या मापाचा गणवेश व बूट मिळत नाही हे मी याठिकाणी अत्यंत धाडसाने बोलत आहे.तेव्हा या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे किंवा नाही ? की वर्षानुवर्षापासून जे सुरु आहे तेच पुन्हा पुढे चालू ठेवावयाचे आहे या बाबतीत खुलासा करण्यात यावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो..

सभापती महोदय, यानंतर मला तंटामुक्त गावाविषयी बोलावयाचें आहे. गाव तंटामुक्त होणे ही एक चांगली योजना आहे परंतु एकदा तंटा मुक्त गाव घोषित झाल्यानंतर तेथे तंटा झाला नाही यासंबंधी पोलीस स्टेशनकडून माहिती घेऊन त्यासंबंधीचा अहवाल सादर करण्यात आला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 35 पान नंबर 24 संबंधी मला बोलावयाचे आहे. एस.टी.महामंडळाला भाग भांडवली अंशदान देण्याकरता ही मागणी करण्यात आलेली आहे. एस.टी.ची जी देय रक्कम आहे ती त्वरित देण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, एस.टी.मध्ये 15 हजार कर्मचा-यांची भरती करण्यात येणार आहे. नोकर भरतीमध्ये स्थानिक व्यक्तिना प्राधान्य देण्यात यावे या संबंधी मी मागच्या वेळीसुध्दा सभागृहात बोललो होतो आणि आता सन्माननीय सदस्य श्री जैनुद्दिन जव्हेरी यांनी देखील तोच मुद्दा मांडला आहे. राज्य शासनाचे हे महामंडळ असून त्या ठिकाणी ड्रायव्हर्स आणि कंडक्टर्सची भरती करण्यात येणार आहे ही भरती करीत असतांना एस.टी. महामंडळातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

अधिकारी एकाच वेळी सगळीकडे मुलाखती घेत नाहीत. त्यामुळे काही उमेदवार साता-यात परीक्षा देतात, काही दिवसानंतर कोकणातील एखाद्या जिल्हयात परीक्षा देतात त्यानंतर आणखी कोठे तरी परीक्षा देतात त्यामुळे स्थानिक उमेदवारांवर अन्याय होत असतो व ते नोकरी पासून वंचित राहतात म्हणून या सर्व परीक्षा जिल्हा निहाय एकाच दिवशी घेण्यात आल्या पाहिजेत. महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयामध्ये जर एकाच दिवशी परीक्षा घेण्यात आल्या तर ते उमेदवार त्या त्या जिल्हयात परीक्षा देण्यासाठी जातील आणि त्यातून स्थानिक व्यक्तिना रोजगार देण्याचे काम आपोआपच सुरळीत होईल. हे काम शासनाने करावे अशा प्रकारची मी या पूर्वी सूचना केली होती आणि आतासूध्दा मी ही सूचना करीत आहे.त्याप्रमणे शासन करील अशी मी अपेक्षा बाळगतो.

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 87 आणि 83 सबंधी बोलावयाचे आहे मार्ग आणि पुलाच्या बांधकामासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे.मुंबईमध्ये गेल्या आठवडयात वरळीच्या सी लींकवर दोन अपघात झाले होते . शासन त्याबाबतीत काही चिंता करीत आहे किंवा नाही.? मुंबईतील घाटकोपर ते पवई हा रस्ता तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले असून .त्या ठिकाणी फलायओव्हर तयार करण्यात आला आहे. कांजूरमार्ग पासून पवईच्या आय.आय.टी पासून तो रस्ता अंधेरीकडे जातो . अंधेरी ते घाटकोपर या रस्त्यावर मध्ये आय.आय.टी. व हिरानंदानीची कॉलनी आहे त्यामुळे त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असते. वरळी सी लिंकच्या संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीच्या वेळी मी हेच संगितले होते की,वरळी येथे ही सर्व वाहतूक एकत्र येईल आणि वाहतुकीची कोंडी होईल. वरळीला आलेल्या वाहतुकीला जर उजव्या बाजुला जावयाचे असेल तर त्या ठिकाणी एक दिशा मार्ग केला तर ती वाहतूक सुरळीत होऊ शकेल. सदनाच्या आणि तत्कालीन समितीच्या निदर्शनास मी ही बाब आणली होती.परंतु तसे करण्यात आले नसल्यामुळे त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे . वरळी सी लिंकवर वेगाची मर्यादा असतांनासुध्दा वेगाने वाहने चालविण्यात येत आहेत.तोच प्रकार प्रियदर्शनी जवळ घडला आहे. त्या ठिकाणच्या पुलाचे काम अजूनही होत नाही.

3..



VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 16.05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

सगळया बाजूने प्रियदर्शनी जवळ वाहने येतात आणि तेथे वाहतुकीची कोंडी होत असते . गोदीकडून येणा-या पूलावरुनसुध्दा तेथे वाहने येतात आणि वाहतुकीची कोंडी होत असते . या मुंबईतील वाहतूक कोंडी हा एक भयानक विषय असून त्यावर वेगळी चर्चा करण्याची आवश्यकता आहे. या निमित्ताने मी एक सूचना करीत आहे. मुंबईतील जड वाहनांना सकाळी आठ ते रात्री नऊ या वेळेत प्रवेश देता कामा नये. इतर राज्यामध्ये वा हिल स्टेशनमध्ये जड वाहनांना ठराविक वेळेत प्रवेश बंदी करण्यात आलेली आहे .अशा प्रकारची व्यवस्था जर मुंबईच्या बाबतीत केली तर येथील वाहतूक सुरळीत होण्यास त्याची मदत होईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

मुंबईची वाहतूक सुरळीत होण्यात त्याचा उपयोग होईल. त्या दृष्टीने प्रयत्न करून प्रियदर्शनी येथीली पूल आपण प्रथम करावा अशी मी आपल्याला विनंती करीन.

सभापती महोदय, औद्योगिक कामगार न्यायालयांच्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.झवेरी यांना मी सांगू इच्छितो की, आता याबाबत कायदाच राहिलेला नाही. एका बाजूला कामगार कायदा आहे, दुसऱ्या बाजूला एसइझेड आहे आणि तिसऱ्या बाजूला कंत्राटी कामगार पद्धत आहे. वस्तुत: आपल्या कामगार कायद्यानुसार एखाद्या कामगाराचे कामाचे 240 दिवस भरले तर त्या कामगाराला कायम सेवेत घेतले जात असे. परंतु आज तसे होत नाही, कोठेही होत नाही. एसइझेडना तर तुमचे असे हे कायदे लागूच नाहीत. त्यांना कामगार कायदाही लागू नाही. तेथे नोकर भरती करताना तेथील आयटी सेंटर्समध्ये येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला भरपूर पगार दिला जातो असा आपला समज करून दिला गेला आहे पण त्याबरोबरच त्या ठिकाणी त्या माणसाला 12-12, 14-14 तास राबवून घेतले जाते हे आपल्याला कोठेही दिसत नाही. एसइझेड मध्ये तर नोकर भरती होतानाच उमेदवाराकडून लिहून घेतले जाते की, मी कोठल्याही युनियनमध्ये सहभागी होणार नाही, कोणत्याही युनियनशी संबंध ठेवणार नाही वा युनियन स्थापन करणार नाही. त्यामुळे तुमच्यावर अन्याय झाला तरी तुम्ही त्याबद्दल आवाज उठवू शकत नाही. आवाज उठविण्याचा प्रयत्न केला तरी तुम्हाला लगेच बाहेरचा रस्ता दाखविला जातो. सभापती महोदय, आणखी महत्त्वाचे म्हणजे कंत्राटी पद्धतीने तर सारे वाटोळेच केले आहे. ज्याप्रमाणे दलाल असतात त्याप्रमाणे हे ठेकेदार असतात, त्यांची मजा असते. अडीच तीन हजार पगारामध्ये हे कंत्राटी कामगार कशा प्रकारे आपले जीवन जगत असतील हे देवालाच ठाऊक.

सभापती महोदय, पृ.144, बाब 150 - चितळी डिस्टिलरी तर आता बंद पडली आहे आणितेथील कामगारांचा पगार आणि निवृत्ती वेतन देण्याच्या बाबतीत आपली ठाम भूमिका काय आहे ती शासनाने येथे मांडावी एवढेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो. सभापती महोदय, आश्रमशाळांची दुरावस्था आणखी काय सांगावी ? ती तर वेदनेच्याही पलिकडे आहे. या ठिकाणी अनेक सदस्यांनी, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी देखील त्यावर आपले विचार व्यक्त केले आहेत त्यामुळे मी त्या विषयावर अधिक न बोलता दुसऱ्या विषयाकडे वळतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 234, पृ.214 - इंदिरा गांधी आवास योजनेखाली 2 लाख

..... 3एफ 2 ...

श्री. सावंत ....

24 हजार रूपयांची मागणी येथे केलेली आहे. या योजनेतून 323 घरे बांधण्याची आणि प्रत्येक घराचा खर्च रूपये 45 हजारावरून 70 हजार रूपयांपर्यंत वाढवून देण्याचे ठरविण्यात आले आहे. म्हणून मला येथे विचारावयाचे आहे की, 70 हजारामध्ये आपण कोणते बांधकाम करता आहात ? आणि त्याचे आयुष्यमान किती राहणार आहे ? तो माणूस त्या घरामध्ये किती काळ राहू शकणार आहे ? या प्रश्नाची उत्तरे कृपया आपण येथे द्यावीत. मला वाटते या योजनेतून आपला खाण्याचा धंदा चालूच राहणार आहे.

सभापती महोदय, महाविद्यालयाबाबतचा एक महत्त्वाचा विषय मला येथे मांडावयाचा आहे. बाब क्रमांक 250 च्या अनुषंगाने मी त्या संबंधात माझा मुद्दा मांडू इच्छितो. कारण महाविद्यालयांना सहाय्य यासाठी ही बाब येथे आणली आहे. सभापती महोदय, या सदनामध्ये बोगस कॉलेजांबद्दल मी यापूर्वीही अनेकदा सांगितले आहे. पुण्यामध्ये तर मश्रुमसारखी कॉलेजेस काढली गेली आहेत. त्यावेळी मी त्या संस्थांची नावे देखिल दिली होती. पुण्यामध्ये येऊन कोणीही कसलेही कॉलेज काढायचे, त्यात कोणते कोर्सेस आहेत, त्यासाठी कोणत्या विद्यापीठाशी ते संलग्नित आहेत वगैरे काहीही माहिती नसते किंबहुना ते पाहिलेच जात नाही. चक्क औद्योगिक वसाहतीमध्ये मेडिकल कॉलेज सुरू आहे. मला त्यावेळी तत्कालीन उच्च शिक्षण मंत्र्यांनी तीन महिन्यात यावर कारवाई करू म्हणून सांगितले होते. या संबंधात मी 29 डिसेंबर 2006 ला माननीय मुख्यमंत्री तसेच उच्च शिक्षण मंत्र्यांनाही पत्र पाठविले होते. त्यात मी संस्था व कॉलेजांची नावे दिली होती ती मी पुन्हा येथे आपल्या माहितीसाठी देऊ इच्छितो. 1) श्री चाणक्य एज्युकेशन सोसायटीच्या इंदिरा सेंट मॉर्टिनस स्कूल ऑफ मेडिसीन, बालाजी पार्क, बाणेर, पुणे., 2) शाश्वत मेडिकल ॲण्ड हेल्थ सायन्स ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, एमआयडीसी, भोसरी, इंद्रायणी नगर जवळ, पुणे., 3) सिद्धंत इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च, तळेगाव चाकण रोड, सुटुंबे, पुणे ही तीन नावे आहेत त्यात आणखी मी काही नावे सांगतो. त्यामध्ये 1) आरएसपी मॅनेजमेंट, कोथरूड., 2) एसएम इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, अरण्येश्वर,पुणे., 3) साधना सेंटर फॉर मॅनेजमेंट लीडरशीप डेव्हलपमेंट, मॉडेल कॉलनी,पुणे., 4) सन हायटेक इन्स्टिटयूट, भोसरी, 5) सूर्यदत्ता व्यवस्थापन संस्था, कर्वेनगर, 6) एनएस दीक्षित इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी,हिंजवडी., 7) टी.म.वी.मॉर्डर्न मॅनेजमेंट, येरवडा, पुणे.

( यानंतर श्री. सरफरे .... 3जी 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

या सर्व संस्थांची दिलेली नावे अधिकाऱ्यांनीही मान्य केली आहेत. त्याठिकाणी अनधिकृतपणे वैद्यकीय किंवा इंजिनिअरींगचे अभ्यासक्रम चालविले जातात हे शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. परंतु त्यांच्या विरुध्द कारवाई केली जात नाही. त्याकरिता मी ही नावे सभागृहाच्या रेकार्डवर आणली असून माननीय शिक्षण मंत्र्यांकडून त्याबाबत न्यायाची अपेक्षा करतो.

सभापती महोदय, दुग्ध व्यवसाय विभागाच्या संदर्भात मी याठिकाणी शेवटचा मुद्दा मांडून माझ ो भाषण संपविणार आहे. नागपूरच्या दूध योजनेतील 199 रोजंदारीवरील कामगारांना नियमित करा असे गेल्या पाच वर्षापासून आपण सांगत आहोत. गेल्या अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित करण्यात आला त्यावेळी मंत्रिमहोदयांनी लेखी उत्तर दिले होते. त्यासंबंधी मला असे कळविले आहे की, "वेळोवेळी शासनास आपण केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कळविण्यात येत आहे की, लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने विधानपरिषदेमध्ये चर्चा झाली. त्या दरम्यान मी आश्वासन दिले होते की, दुग्ध व्यवसाय विभागातील 199 रोजंदारीवरील मजुरांना शासन सेवेत नियमित करण्याची कारवाई दोन महिन्यात करण्यात येईल" असे दि.29 डिसेंबर 2008 रोजी कळविण्यात आले. अशा या गतिमान सरकारचे काम हलके करण्यासाठी या कर्मचाऱ्यांपैकी काही वर गेले आहेत. त्याकरिता यावर्षी पुरवणी मागण्यांमध्ये अजिबात तरतूद केलेली नाही. सभापती महोदय, याशिवाय साखर, तांदूळ, तेल इत्यादी वस्तूंच्या खरेदीसाठी 127 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. मुळात ही तरतूद खावबा लोकांसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबत आपण तातडीने कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त करुन व आपण मला संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, बाब क्रमांक 15 व पृष्ठ क्रमांक 16 मध्ये गुन्हा अन्वेषण विभागाच्या संगणकीकरणासाठी खर्चाची मागणी करण्यात आली आहे. ही अत्यंत अभिनंदणीय बाब आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सामान्य जनतेला न्याय मिळाला पाहिजे यासाठी भविष्यात गृह विभागाच्या माध्यमातून काही ठोस पावले उचलणे आवश्यक आहेत. कोणताही सामान्य माणूस तक्रार घेऊन पोलीस स्टेशनमध्ये गेला तर त्याची तक्रार घेतली जात नाही. म्हणून माझी मागणी आहे की, महाराष्ट्रातील सर्व पोलीस स्टेशन संगणकीकृत झाले पाहिजेत. तसेच, जिल्हयाच्या ठिकाणी असलेले पोलीस स्टेशन तेथील अधिक्षकांच्या कार्यालयाबरोबर जोडले गेले पाहिजेत. जेणेकरुन जिल्हयाच्या पोलीस अधिक्षकांना त्याठिकाणी बसून पोलीस स्टेशनमध्ये कुणी तक्रार नोंदविली आहे, याची अद्ययावत माहिती एकत्रितपणे मिळेल. त्यामुळे सामान्य जनतेला जो त्रास होतो तो होणार नाही. . त्या माध्यमातून या राज्यातील सर्व पोलीस स्टेशन संगणकीकृत कसे करता येतील यासाठी शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी नवीन वाहनांच्या खरेदीसाठी मागणी करण्यात आली आहे. पोलीस खात्याकडे अत्यंत चांगली व अद्ययावत वाहने असली पाहिजेत. एखाद्या चोराचा पाठलाग पोलिसाला करावयाचा असेल आणि त्याच्याकडे ढकल गाडी असेल तर ती चालू करण्यासाठी दोन तास लागतील. तोपर्यंत तो चोर पळून जातो. त्याकरिता पोलिसांना अद्ययावत वाहने दिली पाहिजेत याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 88 व पृष्ठ क्रमांक 84 मध्ये मार्ग व पूल दुरुस्तीकरिता मागणी करण्यात आली आहे. यामधून राज्यातील जनतेला निश्चितपणे चांगल्या सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत. आणि या विभागाला सुध्दा चालना मिळाली पाहिजे. याकरिता रस्ते चांगले व पक्के असले पाहिजेत. सभापती महोदय, दिवसें दिवस वाहनांची संख्या वाढत आहे, सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे रस्त्यावर नॅनो कार आली. त्यामुळे वाहनांची संख्या आणखी वाढणार आहे. त्याकरिता पक्के रस्ते असले पाहिजेत.त्याबाबत शासनाने भविष्यात ठोस निर्णय घेऊन व कामांना चालना देऊन राज्य मार्ग, मुख्य मार्ग चौपदरी करण्यासाठी कृती कार्यक्रम हाती घ्यावा अशी या माध्यमातून मागणी करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे . . . .

त्याचबरोबर आपण ज्या इमारती बांधतो,मग ती आय.टी.आय.ची इमारत असेल, पॉलिटेक्नीकची इमारत असेल किंवा रेस्ट हाऊस असेल, तहसील कार्यालय असेल अशी सगळी कार्यालये आणि ज्या इमारती आहेत त्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी असतात. त्यामुळे या प्रत्येक इमारतींचे एक मॉडेल तयार करावयास पाहिजे.अशा प्रकारे महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यामध्ये ज्या इमारती बांधावयाच्या आहेत, त्या सर्व इमारती एकाच प्रकारच्या असल्या पाहिजे यादृष्टीकोनातून शासनाच्या त्या-त्या विभागाने तयार केले आणि त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने अशा प्रकारच्या मॉडेल इमारती बांधल्या तर महाराष्ट्र शासनाला जनतेसाठी काहीतरी एक नवीन गोष्ट देता येईल आणि महाराष्ट्रामध्ये बाहेरचा कोणताही माणूस आला तर त्याला सुध्दा एखादी इमारत पाहिल्यानंतर हे रेस्ट हाऊस आहे किंवा ही आय.टी.आय.ची इमारत आहे, ही पॉलिटेक्नीकची इमारत आहे असे ओळखता येईल. अशा प्रकारे विविध इमारतींची ओळख होण्याच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक बांधकाम विभागाने एक ठोस कार्यक्रम आखावा अशी मी चर्चेच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.98, पान क्र.89 आणि बाब क्र.144, पान क्र.142 बाबत बोलावयाचे आहे. औद्योगिक कामगार न्यायालयाचे इमारतीचे भाडे देण्यासाठी 18 लाख 39 हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. माजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या सोलापूर सारख्या मोठया शहरामध्ये शासनाची कुठेही जमीन नाही काय ? परंतु शासनाची जमीन असणार आहे. म्हणून ही जमीन कुठे आहे ते शोधून काढले पाहिजे. त्याठिकाणी स्वतंत्र इमारत बांधली पाहिजे जेणेकरुन दरवर्षी लाखो रुपयांचे भाडे द्यावे लागत आहे, ते द्यावे लागणार नाहीत आणि यादृष्टीने शासनाने बचत केली पाहिजे अशी मागणी मी चर्चेच्या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.163, पान क्र.155 बाबत सांगावयाचे तर अन्नधान्य व्यवहारातील तूट भरुन काढण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. मी अन्नधान्य पुरवठा मंत्री महोदयांचे जरुर अभिनंदन करतो. परंतु सामान्य जनतेला वेळेवर रेशन मिळावे,रॉकेल वेळेवर मिळाले पाहिजे या दृष्टीकोनातून शासनाने कृती कार्यक्रम आखण्याची गरज आहे. कारण महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या हिताच्या योजना शासन योजना आखत आहे. त्यानुसार लोकांना स्वस्तामध्ये तांदूळ किंवा गहू मिळाला पाहिजे. स्वस्त दरामध्ये रॉकेल मिळाले पाहिजे यासाठी सुध्दा महाराष्ट्र शासन विविध

. . . .3 एच-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

योजना करीत आहे. परंतु या योजना सामान्य माणसापर्यंत किंवा राज्यातील शेवटच्या छोट्या माणसापर्यंत पोहोचतात की नाही हे बघणे आवश्यक आहे आणि महाराष्ट्र शासनाने याची पहाणी करण्यासाठी तशा प्रकारची यंत्रणा उभी केली पाहिजे. तसेच राज्यातील जनतेला जे दर ठरलेले आहेत, त्याप्रमाणे रॉकेल मिळते की नाही, स्वस्त धान्य मिळते की नाही हे पहाण्यासाठी एखादे फ्लाईंग स्कॉड निर्माण करावयास पाहिजे आणि त्यांनी अचानकपणे स्वस्त धान्य दुकानांना भेटी दिल्या पाहिजेत. तसेच जनतेचे यासंबंधातील म्हणणे देखील ऐकून घेतले पाहिजे. जेणेकरुन यामध्ये सुधारणा होऊ शकेल.

सभापती महोदय,बाब क्र.222,पान क्र.211 बाबत सांगावयाचे तर आश्रमशाळांच्या संबंधात अनेक सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केलेले आहे. राज्यातील आश्रमशाळा हा एक संशोधनाचा विषय झालेला आहे. आश्रमशाळांचे अनेक प्रकार आहेत. आदिवासींच्या आश्रमशाळा, व्ही.जे.एन.टी.च्या आश्रमशाळा, एस.सी.च्या आश्रमशाळा आहेत. या सगळया आश्रमशाळांचे संचलन करीत असताना, ज्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने शाळांचे संचलन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन केलेली आहे, त्याप्रमाणे आश्रमशाळा चांगल्या प्रकारे चालविल्या गेल्या पाहिजेत.मघाशी येथे उल्लेख करण्यात आला की, आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा खाद्य पुरवठा केला जातो, कोणत्या प्रकारचे जेवण दिले जाते. आज आश्रमशाळांमधील विद्यार्थी अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. त्याठिकाणी गिरणीतील जे पीठ आणले जाते ते देखील चांगले नसते. एरवी आपण गहू दळावयास देतो आणि मग त्याचे पीठ आणतो. पण याठिकाणी मात्र गिरणीमध्ये गहू दळत असताना खाली सांडलेले जे पीठ असते, ते पीठ गोळा करुन त्याच्या भाकऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या जातात. यापेक्षा दुसरी कोणतीही शोकांतिका असणार नाही. म्हणून ही परिस्थिती सुधारावयाची असेल तर या सगळया आश्रमशाळा मग त्या एन.टी.च्या किंवा व्ही.जे.एन.टी.च्या असतील किंवा आदिवासींच्या असतील, या सगळया आश्रमशाळांसाठी एक स्वतंत्र संचालनालय निर्माण केले पाहिजे. तसेच स्वतंत्र अधिकाऱ्यांची यंत्रणा तयार करावी लागणार आहे. त्याशिवाय या आश्रमशाळांचे नियमन आणि संचलन नीटपणे होणार नाही. याकरता भविष्यामध्ये एक ठोस कृती कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. याठिकाणी आदरणीय माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुतेसाहेब बसलेले आहेत. दादा, तुम्ही तुमच्या खात्यापुरता तरी हा कार्यक्रम

. . . .3 एच-3

हाती घेतलात, तर विद्यार्थ्यांच्या परिस्थितीमध्ये बदल होऊ शकेल. दादा, तुमचा नेहमीच आपल्या खात्यामध्ये वेगळा वचक राहिलेला आहे. तुम्ही या माध्यमातून सुध्दा अशा प्रकारचा वचक निर्माण करावा अशी मी आपल्याला या निमित्ताने विनंती करीत आहे. पण त्याचबरोबर आपण पहात आहोत की, याठिकाणी प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी केंद्रीय आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांचा मोर्चा येत असतो. आता देखील त्यांचा मोर्चा आलेला आहे आणि पाच-सहा शिक्षकांना अत्यवस्थ स्थितीमध्ये रुग्णालयामध्ये दाखल केलेले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/ प्रथम सौ. सावंत... 16:25

श्री. विक्रम काळे......

केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान दिले जात नाही. सभापती महोदय, माझी या निमित्ताने शासनाकडे मागणी आहे की, या बाबतीत काही तरी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या केंद्र शासनाच्या आश्रमशाळा आहेत. तुमचा तुम्ही विचार करा आमची काही जबाबदारी नाही असे म्हणून चालणार नाही. शाहू, फुले, आंबेडकराचे हे पुरोगामी राज्य आहे. आणि या आघाडी सरकारला जेव्हा दुसऱ्यांदा जनतेने विश्वासाने निवडून दिलेले आहे. तेव्हा शिक्षक हा सुध्दा एक महत्वाचा घटक आहे. त्यांना दुर्लक्षित करुन चालणार नाही. त्यामुळे 288 केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याच्या बाबतीत ठोस कृती कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने केला पाहिजे. केंद्र शासन या आश्रमशाळांना अनुदान देणार असेल तर तशा पध्दतीचा प्रस्ताव तातडीने केंद्र शासनाकडे पाठविला पाहिजे, आणि याबाबतीतील अनुदानाची मागणी केली पाहिजे त्यातून या आश्रमशाळांना दिलासा देण्याचे काम होणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 250 पान क्रमांक 228 वर मी माझे विचार मांडणार आहे. अखील भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणे आणि लोक शिक्षण संस्था मुंबई या संस्थाचा शंभर वर्षापेक्षा अधिक कालावधी झाल्यामुळे त्यांना विशेष अनुदान देण्यासंबंधीची तरतूद यामध्ये करण्यात आलेली आहे. मी याबाबतीत शासनाचे अभिनंदन करतो. परंतु याच पध्दतीने चालणाऱ्या अनेक शिक्षण संस्था या महाराष्ट्रात आहेत. सभापती महोदय, आपल्याला त्या संस्था ज्ञात आहेत. ज्या शिक्षण संस्थांना शंभर वर्षे पूर्ण झालेली आहेत किंवा ज्या स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्था आहेत अशा संस्थांना देखील विशेष अनुदान देण्याची आवश्यकता आहे. मागे एका कार्यक्रमामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुखसाहेबांनी घोषणा केली होती की, ज्या शिक्षण संस्था स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या आहेत त्यांना शासन विशेष अनुदान देईल. पण त्याबाबतची कृती झालेली नाही. उच्च शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांना माझी अशी विनंती आहे की, मराठवाडयातील मुख्यमंत्र्यांनी जी घोषणा केलेली आहे ती घोषणा पूर्ण करण्याच्यादृष्टीने ठोस पावले उचलावित. अशा ज्या शिक्षण संस्था आहेत त्यांना विशेष अनुदान देण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी आणि त्याबाबतचा निर्णय याठिकाणी घेण्यात यावा.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

सभापती महोदय, बाब क्रमांक 258, पान क्रमांक 233 वर मी बोलणार आहे. काल यासंदर्भात एक मोठा कार्यक्रम घेण्यात आला. महाराष्ट्र राज्यात जसे शासकीय आय.टी.आय.आहेत तसेच जवळपास 302 खाजगी आय.टी.आय.आहेत. परंतु या आय.टी.आय. ना कुठल्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. शासकीय आय.टी.आय.दोन-दोन, तीन-तीन शिफ्टमध्ये चालविण्याची घोषणा शासन करते. या खासगी आय.टी.आय.ना शासनानच परवानगी दिलेली आहे. हे आय.टी.आय. इमारती बांधण्यासाठी शासनाकडे पैशाची मागणी करीत नाहीत. ते मशीन-टूल्ससाठी पैशाची मागणी करीत नाहीत. ते फक्त शिक्षकांच्या वेतनासाठी पैशाची मागणी करतात तेव्हा माननीय मंत्रिमहोदय, याबाबतीत बाणेदारपणे निर्णय घ्यावा आणि भविष्यामध्ये या सगळया खासगी आय.टी.आय.ना अनुदान देण्याचे काम करावे अशी मागणी मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, तंत्र शिक्षणाच्या बाबतीत शासन चांगले निर्णय घेत आहे.पण आय.टीआय.,पॉलिटेक्निक, इंजिनियरिंग कॉलेजमध्ये कंत्राटी पध्दतीमध्ये अगदी आठ हजार रुपयावर प्राध्यापक काम करीत आहेत. आठ-आठ वर्षापासून ते त्या ठिकाणी काम करीत आहेत. त्यांच्या सेवा नियमित झाल्या पाहिजेत, या दृष्टिकोनातून सुध्दा ठोस कृती कार्यक्रम शासनाने या ठिकाणी आखावा आणि आय.टी.आय., पॉलिटेक्निक, इंजिनियरिंग कॉलेजमध्ये किंवा वरिष्ठ महाविद्यालयात काम करणारे कंत्राटी अधिव्याख्याता, अध्यापक असतील या सर्वांना शासनाने नियमित केले पाहिजे त्या बाबतचा निर्णय शासनाने ठोसपणे ध्यावा, अशी विनंती मी या निमित्ताने शासनाला करु इच्छितो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 269 पान क्रमांक 250 वर मी बोलू इच्छितो. राष्ट्रीय सेवा योजना ही अतिशय चांगली योजना महाराष्ट्र शासन राबवित आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी त्यामध्ये सहभाग घेत आहेत. गावामध्ये जाऊन लोकांची सेवा करण्याचे काम, कृती कार्यक्रम करण्याचे काम या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केले जाते. सभापती महोदय, एन.एस.एस.च्या ज्या ॲक्टीव्हिटी राबविल्या जातात त्यासाठी अनुदान वाढवून देणे गरजेचे आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

या योजना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आहेत. ग्रामीण भागातील लोकांसाठी आहेत त्यामुळे त्यांना याचा अधिक फायदा होईल यासाठी या एन.एस.एस.चे अनुदान वाढवून द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, हज समितीचा खर्च भागविण्यासंबंधीची मागणी या ठिकाणी ठेवलेली आहे. अल्पसंख्यांकाना न्याय मिळावा यासाठी या सरकारने स्वतंत्रपणे अल्पसंख्याक विभाग तयार केला. त्यासाठी स्वतंत्र मंत्री देण्यात आलेले आहेत. त्या मंत्र्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त न्याय अल्पसंख्यांकाना मिळाला पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. केंद्र सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने अतिशय चांगला आणि अभिनंदनीय निर्णय घेतलेला आहे. जे अल्पसंख्यांक विद्यार्थी इयत्ता पहिली ते इयत्ता दहावी पर्यंत शिकतील, मॅट्रीकोत्तर शिकतील त्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परंतु त्यामध्ये अशी अट घातलेली आहे की, ही शिष्यवृत्ती फक्त दहा हजार विद्यार्थ्यांना देण्यात येईल. वीस हजार विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देऊ असे करुन चालणार नाही तर या महाराष्ट्रामध्ये जेवढे अल्पसंख्यांक विद्यार्थी इयत्ता पहिले ते दहावी पर्यंत शिक्षण घेत असतील किंवा दहावीच्या नंतरचे शिक्षण घेत असतील, जेवढे विद्यार्थी शिक्षण घेत असतील त्या सगळया अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली पाहिजे याबबातचा निर्णय शासनाला घ्यावा लागेल आणि तो निर्णय शासनाने घ्यावा अशा प्रकारची विनंती मी या निमित्ताने करतो व माझे दोन-तीन मुद्दे शिल्लक राहिलेले आहेत ते वेळेअभावी तसेच ठेवतो व माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभगृहासमोर चर्चेला असलेल्या पुरवणी मागण्यांवर भाग घेत असताना प्रथम मला गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 19 वरील बाब क्रमांक 24 बाबत बोलावयाचे आहे. नक्षलवादाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे या नक्षलवाद्यांपासून आमच्या आदिवासी बांधवांना धोका निर्माण होतो. त्यामुळे त्यांच्यासाठी सुध्दा स्वतंत्र युनिट निर्माण करण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो. नक्षलवादी हल्ल्यामध्ये आमचे जे आदिवासी बांधव जखमी होतात त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यावे लागते परंतु हॉस्पिटल लांब अंतरावर असल्यामुळे त्या ठिकाणी त्यांना नेईपर्यंत त्यांचा मृत्यू होतो. त्यामुळे त्या ठिकाणी जवळच हॉस्पिटल बांधण्याची व्यवस्था करावी आणि त्यांचा जीव वाचविण्यात यावा. काही ठिकाणी नक्षलवादी सुरुंग लावतात. त्यासंदर्भात आपण अद्ययावत बॉम्बशोध पथक निर्माण करावे आणि बुलेटप्रूफ गाडीतून जाताना त्याचा सिग्नल वाजावा जेणेकरुन त्यांचा जीव वाचवून आपण त्यांना न्याय देऊ शकू.

सभापती महोदय, यानंतर मला गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 33 बाबत बोलावयाचे आहे. कोकण पॅकेजमधून मेरीटाईम बोर्डाने गाळ उपसण्यासाठी काही यंत्रे खरेदी केलेली आहेत. त्याच धर्तीवर कोकणामध्ये जे बरेच तलाव आहेत त्या तलावात अनेक वर्षापासून गाळ साचलेला आहे त्यासाठी सुध्दा काही यंत्रे खरेदी करण्यात यावीत अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मला कामगार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 141 वरील बाब क्रमांक 142 बाबत बोलावयाचे आहे. जे घर कामगार आहेत त्यांच्यासाठी स्वतंत्र अशी तरतूद करण्यात यावी. त्यांच्यासाठी विशेष कार्यक्रम तयार करण्यात यावा. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या निवासाच्या संदर्भात तसेच आरोग्याच्या संदर्भात सुविधा निर्माण करण्यासाठी व्यवस्था करावी अशी या पुरवणी मागणीच्या निमित्ताने मी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला उद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 143 वरील बाब क्रमांक 149 बाबत बोलावयाचे आहे. या ठिकाणी उद्योग विभागाने काही पॅकेजेस जाहीर केलेली आहेत. याचप्रमाणे चर्मोद्योगासाठी आपण विशेष पॅकेज घोषित करावे अशी मी विनंती करतो. महाराष्ट्रामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

आणि देशामध्ये चर्मोद्योग हा जास्तीतजास्त आयात आणि निर्यात करणारा व्यवसाय आहे. देशामध्ये अग्रगण्य असा प्रकल्प अंबरनाथ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उभा केलेला आहे. धारावी येथे छोट्या टॅनरीज आहेंत तसेच फूटवेअर उद्योग आहेत. अंबरनाथ येथील प्रकल्पामध्ये गाळे बंद असण्याचे कारण असे आहे की, या भूखंडाचे दर फार भयानक आहेत. ते दर आपल्या गटई कामगारांना परवडणारे नाहीत. त्यामुळे यासाठी सुध्दा स्वतंत्र पॅकेज जाहीर केले तर तो उद्योग त्या ठिकाणी उभा राहू शकेल आणि आमचे जे गटई कामगार आहेत त्यांना गाळे मिळू शकतील. ज्याप्रमाणे आपण छोट्या छोट्या उद्योगांसाठी पॅकेज जाहीर केलेले आहेत त्याप्रमाणे या उद्योगासाठी सुध्दा पॅकेज जाहीर करावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला वस्त्रोद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 223 वरील बाब क्रमांक 243 बाबत बोलावयाचे आहे. या ठिकाणी माननीय वस्त्रोद्योग मंत्री उपस्थित आहेत. या पुरवणी मागणीच्या संदर्भात बोलत असताना मी असे सांगेन की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक शिवाजी पार्क येथे उभे करावयाचे आहे त्यासाठी बाजूच्या इंदू मिलची जागा पाहिजे. ही मिल भारत सरकारच्या वस्त्रोद्योग विभागाकडे आहे. आम्ही चार पाच लोक माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. त्यांनी सांगितले की, मी स्वतंत्र वेळ घेऊन याबाबतीत प्रयत्न करीन. मी वस्त्रोद्योग विभागाच्या या मागणीच्या निमित्ताने माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांना विनंती करतो की, इंदू मिलची 5 ते 7 एकर जागा आपण ताब्यात घ्यावी. ती जागा ताब्यात आल्यानंतर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करता येईल. आघाडी सरकारने जाहीरनाम्यामध्ये ते जाहीर केलेले आहे. त्यामुळे ते स्मारक लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 15 वरील बाब क्रमांक 13 बाबत बोलणार आहे. निवडणुकीच्या वेळेला धातपाताच्या वार्ता मिळाव्यात म्हणून खबऱ्यांसाठी 8 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही रक्कम ऐकून कोणत्याही माणसाला प्रश्न पडेल की,

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 16:35

श्री.चंद्रकांत पाटील....

असे किती खबरे त्यावेळी महाराष्ट्रात नेमले होते ? त्यांना कशाच्या आधारावर पैसे देण्यात आले ? त्यांनी बातमी आणल्यानंतर त्याचे महत्व ओळखून दिवसाप्रमाणे की तासाप्रमाणे त्यांना पैसे दिले याची स्पष्टता झाली पाहिजे. या कामासाठी 8 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एवढी मोठी तरतूद केली आहे, पण प्रत्यक्षात 1 कोटी रुपये दिले असे होऊ शकते. कारण 8 कोटी ही फार मोठी रक्कम या खबऱ्यांवर खर्च केली जात आहे. त्याचप्रमाणे शेकडो महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शौर्य दाखविण्याची, शोध लावण्याची उर्मी आहे. कोल्हापूर शहराचे पोलीस आयुक्त श्री.जाधव यांनी पोलीस मित्र नावाचा प्रयोग सुरु केला. तो प्रयोग यशस्वी झाला आहे. खबऱ्यांसाठी एवढी मोठी रक्कम खर्च करीत असताना या रकमेच्या माध्यमातून कोल्हापूर शहरातील युवा शक्तीचा उपयोग करता येईल काय याचाही विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पोलिसांचे क्वार्टर्स, त्यांचा पगार हा एक महत्वाचा विषय आहे. पोलिसांच्या घरांची अवस्था अत्यंत दयनीय आहे असे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यामुळे सध्या ते ज्या क्वार्टर्समध्ये राहतात त्याचा एफएसआय वाढवून त्यांना चांगल्या दर्जाची मोठी घरे देता येतील असे मला सुचवावेसे वाटते. पोलीस दलामध्ये श्री.भाल हे संचालक दर्जाचे वरिष्ठ अधिकारी आहेत. त्यांच्या टेबलावर पोलिसांच्या गृहनिर्माणाचे प्रस्ताव पडून आहेत. वरळीला पोलिसांच्या इमारती आहेत. त्या इमारतींना एफएसआय वाढवून दिला तर उर्वरित जागेतून 100 कोटी रुपये मिळू शकतील. ही रक्कम पोलिसांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वापरता यावी अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, यानंतर मी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या पान क्र.149 वरील बाब क्रमांक 143 वर बोलतो. शासनाने लघु उद्योजकांसाठी 100 कोटींचे प्रोत्साहनपर पॅकेज जाहीर केलेले आहे. या रकमेतून शासन नेमके काय करणार आहे त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. जो सामान्य तरुण वर्ग आहे त्याला या योजनेचा लाभ होणार आहे काय ते सांगण्यात यावे. शासनाकडून अनेक पॅकेजेसची घोषणा केली जाते, पण संबंधित लोकांपर्यंत त्याचा लाभ पोहोचत नाही, त्यात मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. परवा राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी देखील मी बोललो होतो की, तालुक्याच्या ठिकाणी जे लघु उद्योजक आहेत त्यांना मोठया प्रमाणावर प्रोत्साहन कसे मिळेल याचाही विचार केला पाहिजे.

2...

NTK/ SBT/ KTG/

श्री.चंद्रकांत पाटील....

सभापती महोदय, यानंतर मी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 163 वरील बाब क्रमांक 155 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या मागणीद्वारे 187 कोटींची तरतूद केलेली आहे. परंतु दारिद्रय रेषेखालील लोकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्याचा पुरवठा केला जातो. त्यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. काळया बाजाराने रॉकेल विकले जाते त्याबाबतचे अनेक गुन्हे नोंदले गेले आहेत. त्यामुळे ही जी तरतूद केली आहे ती वाया जाणार आहे असे मला वाटते. सभापती महोदय, या विभागाने गेल्या 7-8 वर्षामध्ये दारिद्रय रेषेखालील कार्ड तयार केलेली नाहीत. त्यासाठी उत्पन्नाची जी मर्यादा ठेवली आहे ती कमी आहे. त्यामुळे सामान्य माणूस व मध्यमवर्गीय भरडला जात आहे. या निमित्ताने मी सूचना करतो की, दारिद्रय रेषेखालील लोकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य दिले जाते त्याप्रमाणे मध्यमवर्गीयांना त्यांचे उत्पन्न विचारात घेऊन धान्य पुरवठा करावा. दारिद्रय रेषेखालील लोकांना 2 रुपये दराने धान्य दिले जात असेल तर त्यांना 5 रुपये दराने धान्य दिले जावे. कारण मध्यमवर्गीय लोक सुध्दा महागाईने भरडले जात आहेत.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागातील एक धक्कादायक बाब मी सभागृहासमोर मांडू इच्छितो. या पुरवणी मागण्यांच्या विवरण पत्र 'अ' मध्ये कोल्हापूर जिल्हयातील कामे शून्य आहेत. 'ब' विवरणपत्रामध्ये कोल्हापूरची 342 कामे दाखविली आहेत. 'ड' विवरण पत्रामध्ये 33 कामे आहेत त्यात कोल्हापूरची कामे शून्य आहेत. या सर्व कामांमध्ये प्रामुख्याने नाशिक जिल्हयांचा समावेश केल्याचे दिसून येते. नाशिक जिल्हयातील कामे पाहिली तर रस्ते तयार करण्यासाठी कोणते निकष लावले जातात असा मला शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे ?

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 16:40

(श्री. चंद्रकांत पाटील....)

माननीय उपमुख्यमंत्री हे नाशिक जिल्ह्यातील आहेत. कोल्हापूर ते गगनबावडा हा 55 कि.मीचा रस्ता जणूकाही मृत्यूचा सापळा आहे. हा रस्ता पार करता करता जीव अगदी मेटाकुटीला येतो. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाला दिसत नाही काय ? अनेक जिल्ह्यातून 20-20 22-22 नवीन रस्त्यांची कामे घेतली जातात. पण हा रस्ता वर्षानुवर्षे त्या विभागाला दिसत नाही. कोल्हापूर जिल्हयातून बॉक्साईडची वाहतूक मोठया प्रमाणवर होते. या वाहतुकीमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील रस्ते प्रचंड प्रमाणात खराब झालेले आहे. तेव्हा या खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याचा विचार सार्वजनिक बांधकाम विभागाने करावा. अनेक महत्वाचे मुद्दे मांडायचे राहिलेले आहेत. परंतु वेळेची मर्यादा असल्यामुळे मी माझे भाषण येथे पूर्ण करतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3L-2

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

गृह विभागाच्या बाब क्रमांक 14, पान क्रमांक 16वर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, कोकणामध्ये अनेक पुरातन मंदिरे आहेत आणि त्या मंदिरांमध्ये पुरातन मूर्ती आणि मौल्यवान वस्तू आहेत. या पुरातन मूर्ती आणि मौलवान वस्तूंच्या मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होत आहे. देवगड तालुक्यातील वाडा गावातील संकेश्वर मंदिरातील 25 किलो मूर्तीची आणि विजयदुर्ग येथील रामेश्वर मंदिरातील मूर्तीची चोरी झाली. तसेच रत्नागिरी येथील मार्लेश्वर मंदिरातील मूर्तीची देखील चोरी झाली. या मूर्तींची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत फार मोठी आहे. पुरातन मंदिरातील मूर्ती आणि मौलवान वस्तूंच्या चो-या होण्याचे प्रकार वाढलेले आहेत. या होणा-या चो-यांवर नियंत्रण आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी अशी मी गृहमंत्र्यांना विनंती करतो.

गृह विभागाच्या बाब क्रमांक 16, पान क्रमांक 16 संबंधी बोलत असताना मी सांगू इच्छितो की, आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पाटणकर नावाचे पोलीस अधीक्षक आलेले आहेत. त्यांच्या पूर्वीच्या पोलीस अधीक्षकांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जुगार, मटके इत्यादी अवैध धंदे बंद केले. मात्र हे पाटणकर नावाचे पोलीस अधीक्षक आल्यानंतर हे बंद पडलेले अवैध धंदे पुन्हा राजरोस सुरु झाले आहेत. हे अवैध धंदे बंद करण्याबाबत मी स्वत: त्यांना भेटून तक्रार केली. अनेक वृत्तपत्रातून या अवैध धंद्यासंबंधी बातम्या येत असतात. या अवैध धंद्याच्या संदर्भात या एस.पी.नी " मी काही महाभारतातील संजय नाही, अवैध धंदे कोठे कोठे सुरु आहेत ते दाखवा" असे म्हटल्याचे वृत्तपत्रातून छापून आलेले आहे. या अवैध धंद्यांना प्रोत्साहन देणा-या या एस.पी.विरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? हे पोलीस अधीक्षक समुद्र किनारी कोणत्या प्रकारची देखरेख करतील असा प्रश्न निर्माण होतो. समुद्र मार्गे काही कारवाया झाल्या तर त्यावेळी ते पोलीस अधीक्षक धृतराष्ट्राची भूमिका घेतील. तेव्हा या पोलीस अधीक्षकांच्या संदर्भात शासनाने योग्य ती कारवाई करावी.

बाब क्रमांक 20, पान क्रमांक 18. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या समुद्र किनारी सी-वॉर सुरु आहे. ज्याप्रमाणे कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये सीमावाद आहे त्याप्रमाणे कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये हा सी-वार सुरु झालेला आहे. गेल्या महिन्यामध्ये वेंगुर्ला येथील समुद्रामध्ये कर्नाटकातील

.3..



MSS/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 16:40

(श्री. परशुराम उपरकर...)

मच्छिमारांनी वेंगुर्ल्याच्या गस्ती नौकेला घेरले आणि त्यातील खलाशांना आणि कर्मचा-यांना मारहाण केली. ही मारहाण करीत असताना कस्टमची बोट तेथे आली आणि त्या कस्टमच्या लोकांनी त्यांना वाचवले. परंतु कर्नाटकातील मच्छिमारांनी हा जो काही मारहाणीचा प्रकार केला त्याबाबत त्यांच्या विरुध्द कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. त्यांना सहीसलामत सोडून देण्यात आले. समुद्रामध्ये देण्याघेण्याचे व्यवहार झाले, अशी बातमी वृत्तपत्रातून छापून आलेली आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर........

म्हणजे समुद्रात पण देण्याघेण्याचे व्यवहार होत असल्यामुळे भविष्यात अतिरेकी कारवाया होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कल्याणी आणि सावित्री या दोन गस्ती नौका देण्यात आल्या आहेत त्या गस्ती न घालता केवळ समुद्र किनारी उभ्या आहेत, त्याबाबत शासनाने तातडीने योग्य ती दखल घेऊन उपाययोजना करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 19, बाब क्रमांक 23 सिंधुदुर्ग जिल्हयात निवडणुका झाल्या की, हत्या, बेपत्ता होणे, मारहाण अशा प्रकारच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. रमेश गोवेकर बेपत्ता झाला, त्याचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही. मागील निवडणुकीमध्ये अं□श राणे या एका जबाबदार मंत्र्याच्या भावाची हत्या झाली. त्या हत्येमध्ये सामील असलेले गुन्हेगार अद्याप सीआयडी विभागाला सापडलेले नाहीत.....

श्री.सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये असे म्हटले आहे की, अं□श राणे हा एका जबाबदार मंत्र्याचा भाऊ आहे. ते मंत्रीमहोदयांचे भाऊ नाहीत. दूरचे नाते असेल परंतु भाऊ नाही. त्यामुळे सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीची नोंद होऊ नये एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, अं□श राणे हा मंत्र्याचा भाऊ असल्याचा पुरावा मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

**तालिका सभापती** (डॉ.वसंत पवार) : नातेवाईक आहेत.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मागील निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद सदस्य बाळा वळंजू यांचा मुंबईमध्ये जळून मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर एका जबाबदार मंत्र्याने हा मृत्यू मोबाईल फोनच्या स्फोटामुळे झाल्याचे कथन दूरचित्रवाणीच्या वाहिनीवरुन केल्याचे आम्ही पाहिले. पोलीस तपासामध्ये हा मूत्यू आत्महत्या म्हणून दाखविण्यात आली. या मृत्युमागे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयातील जनतेमध्ये आणि कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये यामुळे घबराट निर्माण झाली आहे. नेमका हा मृत्यू कशामुळे झाला? हत्या झाली की काय हे अद्याप कोणाला कळू शकलेले नाही. याचा तपास होण्यासाठी हे प्रकरण सीआयडीकडे द्यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 16:45

श्री.परशुराम उपरकर........

सभापती महोदय, बाब क्रमांक 64, पृष्ठ क्रमांक 55 वर अन्न व नागरी पुरवठा विभागाची पूरक मागणी सादर केली गेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाच्या गोडावूनमध्ये 82 टन तूरडाळीचा साठा पडून आहे. यापूर्वी निकृष्ट दर्जाचा गहू जमिनीत गाडून टाकावा लागला. त्याच पध्दतीने या तूरडाळीची विल्हेवाट लावावी लागणार आहे. गोडावूनमध्ये पडून असलेली तूरडाळ पूर्णपणे सडली आहे. ती खाण्यालायक राहिलेली नाही. भविष्यात ही तूरडाळ जमिनीत गाडून टाकण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये जनतेचा पैसा वाया जात आहे. जनतेच्या पैशाला भगदाड पाडण्याचे काम शासनाकडून केले जात आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 62, पृष्ठ क्रमांक 49 संबंधी बोलत असताना मला सांगावयाचे आहे की, कोकणामधील मच्छिमारांकडून सातत्याने मत्स्य दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली जाते. गेली पाच वर्षे मासळीचा दुष्काळ निर्माण झालेला आहे. त्यात काही महिन्यापूर्वी फयान चक्रीवादळामुळे अनेक मच्छिमारांची जाळी वाहून गेली. मत्स्य व्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जाळी खरेदीच्या पावतीची मागणी केली जाते. मुळात कोकणच्या सागरी किनाऱ्यावरील मच्छिमार बांधव हे झावळीच्या घरामध्ये राहतात. पाच-पाच वर्षापूर्वीच्या पावत्या ते जपून ठेवू शकत नाहीत. पुरावा म्हणून पावतीची मागणी केली जात असल्यामुळे पावतीअभावी सिंधुदुर्ग जिल्हयात आठ कोटी रुपयांचे पंचनामे झाले............

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

त्यातून 4 कोटी एवढी रक्कम मंजूर झाली आणि कालपरवा मला माहिती मिळाली की, ज्यांचे नुकसान झाले त्यांच्याकडे पुरावे नसल्याने 3 कोटी रुपये शासनाकडे परत जातील. म्हणून माझी मागणी आहे की, ही मदत करण्यासंबंधीचे नियम व अटी शिथील करुन झालेल्या नुकसानीची भरपाई योग्य रित्या देण्याबाबत विचार करावा.

यानंतर बाब क्र. 143, पान क्र. 141 च्या अनुषंगाने मी असे लक्षात आणून देणार आहे की, कुडाळ एमआयडीसी आजच्या परिस्थितीत बंद आहे. तेथील जवळपास 80 टक्के उद्योग बंद आहेत त्यासाठी शासनाने उपाययोजना करावी. त्याचबरोबर एमआयडीसी मार्फत तीन वेळा चीपी येथे विमानतळाचे उद्‌घाटन झाले पण पुढील काम मात्र अद्यापही झालेले नाही. तसेच त्या ठिकाणी 933 एकर जमिनीवर पेन्सिलीने एमआयडीसी असे जे लिहिलेले आहे ते रद्द करावे अशी मागणी सतत होत असताना शासनाने मात्र त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

यानंतर बाब क्र. 166, पान क्र 165-महाराष्ट्र राज्यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे सन 2002 मध्ये शासनाने केला तरी देखील अद्यापही त्यांना रेशन कार्ड मिळाले नाहीत. यासंबंधी उच्च न्यायालयात एक निर्णय प्रलंबित होता त्याचा निकाल सन 2006 मध्ये लागला तरी देखील आज संपूर्ण राज्यात रेशन कार्डांचे वितरण न झाल्यामुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना अल्प दराने धान्य मिळत नाही अशा परिस्थिती रेशन कार्डांचे वाटप लवकरात लवकर करावे. आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात देखील मागील वर्षी रेशन कार्ड मिळण्यासाठी फॉर्मस् भरुन घेतले पण ते आता गहाळ झालेले असल्याचे सांगण्यात येते. ही प्रक्रिया आता पुन्हा नव्याने सुरु असून त्याच्या पुर्ततेसाठी जी कागदपत्रे जमा करावी लागतात त्याला 100 ते 200 रुपये खर्च करावे लागतात. हा खर्च वाचविण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी देखील या पूरक मागणीच्या निमित्ताने करतो आणि माझे भाषण संपवितो.

--------

यानंतर श्रीमती मधू जैन यांचे भाषण........श्री. तालेवार यांचेकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित ) :सभापति महोदय, मैं वर्ष 2009-10 की पूरक मांगों पर अपना समर्थन एवम् विचार प्रकट करने के लिए खड़ी हूं.

सभापति महोदय, आइटम नंबर 88, पेज नंबर 84 के तहत मैं यह कहना चाहती हूं कि जलगांव शहर यह खानदेश की आर्थिक राजधानी है. जलगांव शहर में सभी जगह पर बहुत अच्छे विकास कार्य हो रहे हैं. लेकिन मैं जलगांव की एक महत्वपूर्ण समस्या की ओर ध्यान आकर्षित करना चाहती हूं, वह समस्या है अच्छे रास्तों का न होना. आइटम नंबर 88 के अन्तर्गत मार्ग व पुल के लिए 300 करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. लेकिन इसमें जलगांव शहर का समावेश नहीं है. सार्वजनिक बांधकाम विभाग के मंत्री जी यहां मौजूद है, मेरी उनसे विनती है कि वे जलगांव की ट्रैफिक की समस्या की ओर ध्यान दें. जलगांव में 3 जगह रेल्वे क्रासिंग है जिसकी वजह से शहर के बीच में ट्रैफिक जाम हो जाता है. इसलिए उस जगह पर फ्लायओवर ब्रीज बन जाए तो ट्रैफिक की दृष्टि से अच्छा कार्य होगा. इसके साथ ही साथ मैं यह भी बताना चाहती हूं कि दो जगह ऐसे पुल है जहां पानी भर जाता है और उन पुलों की हाईट भी बहुत कम है इसलिए वहां भी नये फ्लायओवर ब्रीज बनाना जरुरी है. इसलिए माननीय मंत्री जी से मेरी विनती है कि इस तरतूद के साथ जलगांव के लिए भी तरतूद जोड़ी जाए.

सभापति महोदय,आइटम नंबर 98, पेज नंबर 89 के अन्तर्गत जलगांव एवम् पारोला में कोषागार इमारत के लिए जो तरतूद की गई है वह बहुत कम है. जितनी धनराशि की तरतूद की गई है उससे कोषागार इमारत का काम पूरा नहीं होगा इसलिए यह तरतूद बढ़ाई जाए. मेरी यह विनती है कि पारोला की कोषागार इमारत के लिए अतिरिक्त 5 लाख एवम् जलगांव की कोषागार इमारत के लिए अतिरिक्त 15 लाख रुपये की तरतूद की जाए ताकि जल्दी से जल्दी कोषागार की इमारत का काम पूरा किया जा सके. क्योंकि अगर तरतूद पूरी नहीं होगी तो काम पूरा होने में देरी होगी. इसलिए जल्दी काम हो सके इसलिए तरतूद बढ़ाई जाए.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

सभापति महोदय, आइटम नंबर 163, पेज नंबर 155 - अन्न व नागरी पुरवठा विभाग के तहत 127 करोड़ रुपये की तरतूद की गई है ताकि राशन दुकानों पर गरीब लोगों को कम दामों पर अनाज उपलब्ध किया जा सके. इस संबंध में मैं यह बताना चाहूंगी कि अनाज वितरण

.....3



SBT 16:50

श्रीमती मधु जैन......

प्रणाली बहुत खराब है. गरीब लोगों तक अनाज पहुंचता ही नहीं है. बोगस बीपीएल कार्ड बन गए हैं. पीले कार्ड ऐसे लोगों को मिले हैं जिनके पास चार-चार मकान है. दस-दस हजार रुपये किराया मिल रहा है, ऐसे लोगों के पास पीले कार्ड है, इस वजह से गरीब लोगों को अनाज नहीं मिल रहा है. इसलिए मेरी मांग है कि इस मामले की जांच की जाए और बोगस राशन कार्ड जब्त किए जाए ताकि सही लोगों तक अनाज पहुंच सके. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं. धन्यवाद.

........

यानंतर श्री रामनाथ मोते यांचे भाषण ........ (श्री.जुन्नरे यांचेकडे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या मागण्या क्रमांक 222,223,224,225 आणि 226 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

आदिवासी विभागावर या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. हा विषय अत्यंत गंभीर आहे. सध्या हे प्रकरण न्यायालयात पेंडींग असून आश्रमशाळेत काम करणारे कर्मचारी, मुख्याध्यापकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. या मुख्याध्यापकांना त्रास देण्याचे काम विभागातील संबंधित अधिकारी करीत आहे. या विभागातील संबंधित अधिकारी शाळेत येऊन शिक्षकांना शिवीगाळ करतात. 15 ऑगस्टच्या दिवशी तर शाळा सुटल्यानंतर मुले मैदानात खेळत होती त्यावेळी अधिकारी गाडीतून उतरले आणि मुलांबरोबर शिक्षक दिसले नाहीत म्हणून त्या शिक्षकाला तात्काळ सस्पेंड केले गेले. या संबंधित अधिका-यांनी शिक्षकांच्या 5-5 वेतनवाढी रोखून ठेवण्याचे काम केलेले आहे. शिक्षकांच्या संदर्भात अधिका-यांनी जो प्रकार केलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. आज विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सवलती मिळत नाहीत. विद्यार्थ्यांना जो आहार दिला जातो त्याचे वितरण शासनाकडूनच होत असते. अन्न शिजवून मुलांना देण्याचे काम शिक्षक इमाने-इतबारे करीत असतो. या आहारामध्ये खडे किंवा खराब धान्य आढळून आल्यास संबंधित अधिका-यांकडून आमच्या शिक्षक व मुख्याध्यापकांना संस्पेंड केले जाते. हा विषय गंभीर असल्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी यामध्ये तात्काळ लक्ष घालण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आदिवासी विभागामध्ये प्राथमिकच्या मुख्याध्यापकांची पदे काढून घेण्यात आली असून मुख्याध्यापकांना पदानवत करुन त्यांना सहाय्यक शिक्षक म्हणून काम करावे लागत आहे. अमरावती विभागामध्ये पदावनत करण्यात आलेल्या मुख्याध्यापकांना वेतन संरक्षण दिलेआहे. तथापि नागपूर अप्पर आयुक्त वेतनास संरक्षण देण्यास तयार नाही. वेतनास संरक्षण देण्यास शासनाचे आदेश असुनही नागपूर विभागाचे अधिकारी त्याचे पालन करीत नसून भेदभावच करीत आहे. जो नियम अमरावतीमध्ये लागू आहे तो नियम नागपूर विभागामध्ये का लागू होत नाही. त्यामुळे अमरावती प्रमाणेच नागपूर विभागात नियम लागू करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 249 वर मी माझे विचार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

मांडणार आहे. सन 2009-10 या वर्षाकरिता राखून ठेवलेल्या योजनांतर्गत नियतव्ययामधून खर्च भागविण्याकरिता 4.33 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

संत तुकडोजी महाराज विद्यापीठात सन 91 ते 99 मध्ये शिक्षकांना युजीसीने मान्यता दिलेली असून त्यांची सेवा नियमित केलेली आहे. युजीसीने मान्यता दिल्यानंतर त्यांची वेतनश्रेणी तसेच निवड वेतनश्रेणीचा लाभ देण्यास विद्यापीठाकडून टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे या विषयाकडेही माननीय मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ KGS/ ST/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 17.00

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, ग्रामीण भागातील एका तरी महाविद्यालयास अनुदान देण्यात येईल अशा प्रकारचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. पूर्वी जी काही अनुदानित महाविद्यालये सुरु झाली ती सगळी शहरी भागात आहेत परंतु ग्रामीण भागातील गोरगरीब, कष्टकरी , शेतक-यांच्या मुलाची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून ग्रामीण भागात, दुर्गम भागात अनेक संस्थांनी महाविद्यालये सुरु केलेली आहेत. शहरी भागात अनुदानित महाविद्यालये सुरु करण्यात आली आहेत मात्र ग्रामीण आणि डोंगराळ वा दुर्गम भागात सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयास अनुदान द्यावयाचे नाही हा विचार बरोबर नाही. पूर्वी् शहरी भागात अनुदानित महाविद्यालये सुरु करण्यात आली आहेत परंतु आता नव्याने मान्यता दिलेली काही महाविद्यालये ग्रामीण भागात सुरु करण्यात येत असतील तर त्यापैकी एका तरी महाविद्यालयास अनुदान देण्याची आवश्यकता आहे तेव्हा त्या दृष्टीने विचार करण्यात यावा. अशी या चर्चेच्या निमित्ताने माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे सभापती महोदय, टिटवाळयाच्या जवळ गोवेली येथे एका शिक्षण संस्थेने महाविद्यालय सुरु केले असून ते महाविद्यालय किती अडचणीमध्ये आहे हे आपल्याला सुध्दा माहीत आहे. या महाविद्यालयामध्ये 1200 ते 1400 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत एकही पैसा न घेता यासंस्थेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो व शिक्षण दिले जाते त्या संस्थेला शासनाकडून कोणं्त्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. जर या संस्थेने महाविद्यालय सुरु केले नसते तर त्या भागातील विद्यार्थ्यांना 13 किलोमिटर अंतरावर असलेल्या कल्याण येथील महाविद्यालयात शिक्षण घेणे अडचणीचे झाले असते. तेव्हा अशा संस्थांना तातडीने अनुदान देण्यात यावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 250, पान नंबर 228 सबंधी मला बोलावयाचे आहे. काही संस्थांना शासनाने अनुदान दिले असून ही आनंदाची गोष्ट आहे.त्याबद्दल मी शासनाने जरुर अभिनंदन करीत आहे. परंतु ज्या काही शैक्षणिक संस्था राजकारणाचा , राजकीय पक्षाचा वा कोणत्याही जाती धर्माचा विचार न करता शिक्षण देण्याचे काम करीत असतात . त्यांच्या शैक्षणिक कामाचा गौरव म्हणून ज्या शैक्षणिक संस्थांना 100 वर्षे पूर्ण झाली असतील त्यांना अनुदान दिले जाते. अशा प्रकारे शासानाने दोन संस्थांना अनुदान दिले असून त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

करतो. परंतु अशा प्रकारच्या अनेक संस्थांना 100 वर्षे पूर्ण झाली असून आपला शतक महोत्सव ते साजरा करीत आहेत म्हणून अशा संस्थांना जे काही थोडे फार अनुदान द्यावयाचे असेल ते त्यांना द्यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.सभापती महोदय, पेण एज्युकेशन सोसायटीने 100 वर्षे पूर्ण केल्यामुळे त्यांचा शतक महोत्सव साजरा केला जात आहे. या संस्था कोणत्या राजकीय पक्षाशी सबंधित आहेत याचा विचार न करता अशा संस्थांना काही ना काही तरी मदत करण्यात यावी.अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 254 पान नंबर 230 सबंधी मला बोलावयाचे आहे.अभियांत्रिकी महाविद्यालयांना अनुदान देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये, तंत्र निकेतनामध्ये सी.एच.बी. वर म्हणजे घडयाळी तासावर अल्प मानधनावर अनेक शिक्षक काम करीत आहेत. अनुदानित संस्थांमध्ये काम करणा-या शिक्षकांच्या संदर्भात शासनाने जी. आर. काढून त्यांच्या मानधनात वाढ केली आहे व सी.एच.बी. वरील त्यांचे मानधन वाढविले आहे. परंतु त्या जी. आर. मध्ये "अशासकीय "हा शब्द वापरण्यात आला असल्यामुळे व शासकीय महाविद्यालयातील तंत्रनिकेतनामधील प्राध्यापकांचा त्यात समावेश करण्यात आलेला नसल्यामुळे सी.एच.बी.वर काम करणा-याच्या मानधनात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही तेव्हा त्यांच्याही मानधनात वाढ करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागण् करतो.

सभापती महोदय,बाब क्रमांक 256 पान नंबर 232 संबंधी मला बोलावयाचे आहे. ग्रंथालयांना अनुदान देण्यासबंधी ही पूरक मागणी करण्यात आली असून सन्माननीय मंत्री माननीय श्री. राजेश टोपे यांच्या बरोबर एक बैठक होऊन या संदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळी त्यांनी दोन गोष्टी मान्य केल्या होत्या.या ग्रंथालयात काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांच्या पेन्शनचा तसेच त्यांच्या वेतनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येईल. असे त्यांनी सागितले होते तेव्हा याबाबतीत सुध्दा विचार करण्याची आवश्यकता असल्यामुळे हा विचार करण्यात यावा अशी मी या चर्चेच्या निमत्ताने मागणी करतो.

3...



VTG/ KTG/ KGS/ ST/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 17.00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय,या राज्यामध्ये ग्रंथालयासबंधी एक कायदा करण्यात आलेला आहे त्यात सुधारणा करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री व्यंकाप्पा पत्की यांनी या संदर्भात एक अहवाल शासनाला दिला होता . याबाबतीत जो ड्राफट तयार केला होता तो त्यांनी शासनाकडे दिला परंतु तो अजूनही शासनाने स्वीकारलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी जो अहवाल सादर केला आहे त्या अहवालाच्या अनुषंगाने या कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा ही सुधारणा शासनाने लवकरात लवकर करावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 257, पान नंबर 232 संबंधी मला बोलावयाचे आहे आय.टी.आय.मधील कर्मचा-यांच्या वेतन अनुदानासाठी 61 लाख 74 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगात आय.टी.आय.ला व तंत्र शिक्षण विभागाला अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. या क्षेत्रात काम करणा-या अनेक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतन,ग्रेड पे, वेतन संरचना इत्यादी संबंधी ज्या काही समस्या आहेत त्या बाबतीत शासनाला निवेदन सादर करण्यात आलेले आहे. तेव्हा त्याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी आणि विना अनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये काम
करणा-यांसाठी ....

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

त्यांना तुम्ही वेतन देत नाही, वेतनेतर अनुदान देत नाही परंतु इतर संस्था ज्या आहेत. विशेषत: औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत त्यामध्ये मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, आदिवासी, व्हीजेएनटी समाजाचे विद्यार्थी देखील शिक्षण घेत असतात त्यामुळे त्यांनाही आपण काही आर्थिक सहाय्य केले तर त्यांना देखील काही प्रमाणात शुल्क भरता येऊ शकेल किंवा त्यांच्या शुल्काची भरपाई तरी आपण करावी. सभापती महोदय, या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्याच्याबाबतीत सकारात्मक विचार आपण करावा अशी विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

***

..... 3क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला आपण या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी थोडा वेळ काढून दिला त्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो.

सभापती महोदय, पृ.223, बाब क्र.247 - शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य म्हणून 75 कोटीची पुरवणी मागणी येथे करण्यात आली आहे. मला वाटते शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या आणि जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे याचा उलगडा आपण येथे करू शकाल का ? कारण जो निधी आपण या पुरवणी मागण्यांद्वारा देत आहात त्यातून आपण या सरकारी कर्मचाऱ्यांची एक प्रकारे थट्टाच करीत आहात. शासकीय कर्मचारी एकूण किती आहेत, जिल्हा परिषद कर्मचारी किती आहेत, त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था रजिस्टर्ड झालेल्या अशा किती आहेत ? याचा आपण विचार केला आहे काय ? याची माहिती तरी आपल्याकडे उपलब्ध आहे का ? आज शासकीय वसाहत वांद्रे येथे आहे. या शिवाय पोलिसांची वसाहत आहे, त्यांची परिस्थिती काय आहे ? त्यांना आपण चांगले इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून दिले आहे काय ? आपल्या सेवेत असणाऱ्या या लोकांना आपण चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिले, राहण्यासाठी घरे दिली तर ते आपले काम, आपले कर्तव्य चांगल्याप्रकारे करू शकतील. परंतु सरकार त्याकडे लक्ष देत नाही. अर्थात हे झाले पर्मनंट म्हणजे कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांच्या बाबत. पण जे केवळ अधिवेशन काळापुरते वा विशिष्ट कामासाठी म्हणून तात्पुरत्या स्वरूपात आपल्या सेवेत येतात, जिल्हा परिषदांमध्ये कंत्राटी म्हणून घेतले जातात त्यांची परिस्थिती तर याहून बिकट आहे. तेव्हा या सर्वांसाठी 75 कोटीचा निधी जो आपण दिला आहे त्यापेक्षा अधिक, जास्तीत जास्त वाढवून देता येईल काय याचाही आपण विचार करावा आणि त्यांना जास्त निधी उपलब्ध करून द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, पृ.143, बाब क्र.149 - आपण उद्योगांसाठी 100 कोटीची प्रोत्साहनपर योजना आणली. पॅकेज दिले आहे, त्यात लघु, मध्यम व मोठे उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यपालांच्या मागील भाषणामध्ये आणि माननीय मुख्यमंत्र्यांनीही घोषणा केली होती की 700 कोटीचे प्रकल्प आपल्याकडे आले आहेत. परंतु खरोखरी असे नवीन प्रकल्पकिती आले, त्यातून किती रोजगार उपलब्ध झाला तसेच त्याचवेळी राज्यातील किती जुने प्रकल्प बंद झाले वा होत आहेत आणि त्यापैकी किती आपण वाचविले आहेत, त्यातून किती कामगार बेरोजगार झाले आहेत

..... 3क्यू 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पावसकर .....

वा होणार आहेत ? याचा आपण विचार केला आहे काय ? तसेच नवीन येणाऱ्या प्रकल्पांच्या बाबतीत त्यांचा निसर्ग आणि पर्यावरण यावर काय परिणाम होणार आहे याचा अभ्यास केला आहे काय ? तसेच राज्यातील एमआयडीसी आज कोलॅप्स झालेल्या आहेत किंवा काही ठराविक एमआयडीसी आज चालू असतीलही पण अशा केवळ 15 ते 25 टक्केच चालू असतील. बाकी एमआयडीसीच्या वसाहती आज बंद पडत चालल्या आहेत. तेव्हा या 100 कोटीमध्ये केवळ नवीन येणाऱ्या प्रकल्पांना आपण प्रोत्साहन देणार आहात का ?

सभापती महोदय, पृ.49, बाब क्र.62 - फयानग्रस्त मच्छिमारांना सहाय्य करण्यासाठी 14 कोटीची पूरक मागणी येथे केलेली आहे. या मच्छिमारांना सरकारने जरूर मदत दिली परंतु जे बेपत्ता मच्छिमार आहेत त्यांच्या पुनर्वसनासाठीची रक्कम यामध्ये नाही. त्याचा विचार सरकार करणार नाही का ? आपण केवळ मोठमोठे आकडे दाखवून कामे करून घेता. वस्तुत: मत्स्य व्यवसायहा पारंपारिक पद्धतीने चालविला जातो. या व्यवसायाला चालना देण्यासाठी, तो आधुनिक पद्धतीने करण्यासाठी त्यांच्या मुलांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्यासाठी कृषी विद्यापीठांच्या धर्तीवर मत्स्य व्यवसाय विद्यापीठ उभारण्याचा विचार सरकारने करणे आवश्यक आहे. जेणे करून या मच्छिमारांना आणि त्यांच्या व्यवसायाला आपल्याला मदत करता येईल. त्यांच्या पुढील पिढीला तांत्रिक गोष्टी पुरविता येतील. ...

( यानंतर श्री. सरफरे ... 3आर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावस्कर...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 15 आणि बाब क्रमांक 13 वर गृह विभागाची मागणी करण्यात आली आहे. दिनांक 26/11 च्या हल्ल्यानंतर गुप्त वार्ता विभागावर टीका करण्यात आली. त्यानिमित्ताने खबऱ्यांमार्फत गुप्त माहिती मिळविण्यासाठी याठिकाणी 8 कोटींची मागणी करण्यात आली आहे. वाढलेली लोकसंख्या आणि वाढलेले शहरीकरण, आणि मुंबई शहराचा वाढलेला व्याप पहाता 8 कोटींची करण्यात आलेली मागणी कमी आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे बाब क्रमांक 23 वर देखील गुन्हे आणि गुन्हेगारांचा माग काढणारी संपर्क यंत्रणा तयार करण्यासाठी साडे चार कोटींची मागणी करण्यात आली आहे. या दोन मागण्यांमधील फरक मला समजला नाही. गुन्हे आणि गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी खबरे वापरले जातात. त्यामुळे दुसरी कोणती यंत्रणा आहे काय? असेल तर त्यासाठी हा साडे चार कोटींचा अल्प निधी कां दाखविण्यात आला? त्यामधून आपण काय साध्य करणार आहात? हे सभागृहाला समजले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 20 मध्ये मुंबई पोलीस दलासाठी शस्त्रे व दारुगोळा यासाठी 25 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, पोलीस दलासाठी मंजूर करण्यात आलेल्या कोणत्याही निधीचा योग्यप्रकारे विनियोग होत नाही. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये आपल्या पोलिसांचे बळी गेले. त्यांच्याकडे पुरेसा शस्त्रसाठा आणि दारुगोळा नसल्यामुळे हे झाले. त्याचप्रमाणे नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये एखादा पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी शहीद होतो त्यावेळी त्याचे शव दोन-दोन दिवस त्यांच्या कुटुंबियांच्या ताब्यात देऊ शकत नाही ही शोकांतिका आहे. याठिकाणी आपण 25 कोटींचा निधी मागितला आहे तो जर आणखी वाढविता आला तर वाढवावयास हरकत नाही. त्यामधून आपल्याला पोलिसांची होणारी उपेक्षा कमी करता येईल.

सभापती महोदय, पोलिसांचे मनोधैर्य आणि मनोबल वाढविले पाहिजे असे आपण नेहमी सांगत असतो. वरळीच्या पोलीस वसाहतीमधील 70 इमारतींमध्ये पोलीस कर्मचारी आज रहात आहेत. मुंबईचे पोलीस आयुक्त श्री. डी.शिवानंदन यांनी 15 दिवसापूर्वी वरळी येथील पोलिसांच्या मुलांसाठी अद्ययावत मराठी व इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्याबाबत घोषणा केली. त्याबाबतचा ढाचा वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आला होता. त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. किरण पावस्कर...

त्याचबरोबर हे देखील निदर्शनास आणतो की, वरळीच्या पोलीस वसाहतीमधील इमारतींची अवस्था वाईट असून त्या खोल्यांच्या छतामधून पाण्याची गळती होत असते.तसेच, त्याठिकाणी सुख सुविधांची बोंबाबोंब आहे. अशाप्रकारे या 70 इमारतींमध्ये निकृष्ट स्वरुपाचे राहणीमान असल्यामुळे आतापर्यंत 336 पोलीस कर्मचारी विविध आजारांनी मरण पावले. वरळीच्या या पोलीस वसाहतीबाबत प्रत्येक अधिवेशनामध्ये चर्चा केली जाते. त्यावर माननीय गृहमंत्र्यांकडून आश्वासन मिळते. परंतु त्यासाठी निधी कसा उपलब्ध करणार आहात? आणि तो कशाप्रकारे वापरला जाणार आहे हे सभागृहाला समजले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

(यानंतर हिंदी भाषण श्री. शर्मा)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद ज़मा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित): सभापति महोदय, सप्लीमेंटरी डिमांड्स का समर्थन करते हुए मैं मुख्य रुप से लेबर और इन्डस्ट्री डिपार्टमेंट के ऊपर अपने विचार आपके सामने पेश करना चाहता हूँ. अभी जो सप्लीमेंटरी डिमांड्स पेश की गईं हैं, उनमें तो कुछ बदल होने वाला नहीं है, लेकिन आने वाले बजट में तरतूद की जाए, इसके लिए मैं 2-3 पॉइंट्स के ऊपर बोलना चाहता हूँ.

सभापति महोदय, सब से पहले लेबर डिपार्टमेंट की बाब क्रमांक 141 से 144 के बारे में मैं यह कहना चाहता हूँ कि लेबर डिपार्टमेंट का बजट बहुत कम है, इसको बढ़ाया जाए. पिछले साल से हर जिले में नए उद्योग केन्द्र बन रहे हैं, लेकिन श्रम मंत्रालय की बिल्डिंग नहीं है. हर जिले में किराए की जगह पर कार्यालय बनाए गए हैं और कर्मचारियों की संख्या बहुत कम है. पिछले कुछ समय में हमने कानून तो बनाए हैं, हमने सुरक्षा गार्डों के लिए कानून बनाया है, मोलकरिन के लिए कानून बनाया है, लेकिन इन कानूनों को अमल में लाने के लिए हमारे पास मॅन पावर नहीं है, इसलिए हम इन कानूनों को लागू नहीं करा सकते हैं. मेरी सरकार से मांग है कि श्रम विभाग में जो वेकेन्सी हैं, उनको तुरन्त भरा जाए. लेबर कोर्ट, इन्ड्रस्ट्रियल कोर्ट में हजारों की संख्या में पिछले 15-20 साल से केस पेन्डिंग हैं, कोई निर्णय नहीं हो पा रहा है. इसलिए कोर्ट के प्रिसाइडिंग ऑफिसर्स की वेकेन्सी अविलम्ब भरने का प्रयास करना चाहिए. मेरी सरकार से मांग है कि लेबर डिपार्टमेंट के केस निपटाने के लिए फास्ट ट्रॅक कोर्ट बनाने चाहिए. अगर किसी की नौकरी चली जाती है और उसकी सुनवाई फास्ट ट्रॅक कोर्ट में होगी तो उसको जल्दी न्याय मिल सकेगा और उसको नौकरी वापस मिल सकती है. इस तरह से लोगों को फायदा होगा.

सभापति महोदय, यह बात ठीक है कि एम.आई.डी.सी. की जो जमीन बेकार पड़ी हुई है, उसका उपयोग एस.ई.जेड. के लिए करना चाहिए, लेकिन एस.ई.जेड. में श्रम कानून लागू नहीं होते हैं. वहां पर काम करने वाली महिलाओं से 12 घंटे तक काम कराते हैं, उनको पगार थोड़ी ज्यादा मिलती है, लेकिन उनको सोशल सिक्योरिटी नहीं है, उनको संरक्षण नहीं है. इसलिए मेरी शासन से मांग है कि एस.ई.जेड. में श्रम कानून लागू होने चाहिए.

. . 3S-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद ज़मा जारी

सभापति महोदय, महाराष्ट्र में और खास तौर से हमारे विदर्भ में कोल माइनिंग बहुत ज्यादा हैं और यह एक बड़ा इन्डस्ट्रियल एरिया है. यवतमाल जिले के वणी क्षेत्र में, नागपुर, भंडारा और गोंदिया में इन्डस्ट्रियल एरिया बढ़ रहा है और यहां पर पावर हाउस आ रहे हैं, यहां पर बड़े इन्डस्ट्रियल टाउन आ रहे हैं, इसलिए इस एरिया का डिपवलपमेंट करने लिए स्पेशल एरिया डिवलपमेंट अथॉरिटी बनानी चाहिए. सभी उपलब्ध फंड्स को एक जगह पर लाकर इंटीग्रेटेड डिवलपमेंट होना चाहिए. कोल माइनिंग के आस-पास वहां पर रहने वाले लोगों और किसानों को बहुत तकलीफ होती है. वहां की सड़क खराब हो जाती है, पानी का स्तर नीचे चला जाता है, पॉलूशन बढ़ जाता है और वहां का वातावरण खराब हो जाता है और उनकी कोई व्यवस्था नहीं होती है. मध्यप्रदेश के कोरबा और सिंगरौली में इंटीग्रेटेड डिवलपमेंट किया गया है, इसलिए वहां पर कोई समस्या नहीं है. इसलिए मेरी शासन से विनंती है कि इस क्षेत्र के लिए स्पेशल एरिया डिवलपमेंट अथॉरिटी का निर्माण किया जाए.

सभापति महोदय, अल्पसंख्यक विकास विभाग के लिए इस साल सिर्फ 210 करोड़ रुपए का बजट है. यह तरतूद बहुत कम है, इसलिए इस तरतूद को बढ़ाने की आवश्यकता है. माननीय प्रधानमंत्री के 15 पॉइंट प्रोग्राम में डायरेक्शन दिया गया है कि बजट का हॅड वाइज एलोकेशन होना चाहिए, प्रत्येक हॅड में अलग अलग तरतूद होनी चाहिए. इस पर अमल करने के लिए महाराष्ट्र शासन ने अक्टूबर 2006 में जी.आर. भी निकाला है, लेकिन किसी भी डिपार्टमेंट में इस पर अमल नहीं होता है. शिक्षा के क्षेत्र में अल्पसंख्यक समुदाय के लिए सरकार पूरा ध्यान नहीं दे रही है. उच्च शिक्षण और तंत्र शिक्षण विभाग में अल्पसंख्यक संस्थाओं के लिए कोई प्रावधान नहीं किया गया है. मेरा शासन से अनुरोध है कि इन विभागों में अल्पसंख्यको के लिए अलग से अधिक से अधिक राशि का प्रावधान किया जाए. मेरी सरकार से यह भी मांग है कि बजट का एलोकेशन हॅड वाइज होना चाहिए और ग्रामीण क्षेत्र में जहां पर अल्पसंख्यक समुदाय बड़ी संख्या में है, वहां पर बजट की तरतूद बढ़ानी चाहिए.

सभापति महोदय, मदरसा टीचर्स के वेलफेयर के लिए बोर्ड बनाना चाहिए और उनको सरकारी सुविधाएं मिलनी चाहिए. महाराष्ट्र के पिछले मुख्यमंत्री ने कहा था कि अगर वक्फ बोर्ड की जमीन का मिसयूज हुआ है, अगर वक्फ बोर्ड की जमीन गलत तरीके से दी गई हैं तो उस

. . . 3S-3



. . . . . श्री. सय्यद ज़मा जारी

जमीन को वापस लेने के लिए विशेष कानून बनाएंगे. इस तरह का कानून सरकार को जल्दी से जल्दी बनाना चाहिए. पूरक मागणी का समर्थन करते मैं अपना भाषण समाप्त करता हूँ. धन्यवाद.

. . . . . .

यानंतर मराठी भाषण (कु. थोरात.)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी गृह विभागाच्या पूरक मागण्यांवर चर्चा करीत असताना काही गोष्टी सभागृहासमोर मांडू इच्छिते. बाब क्रमांक 21. पान क्रमांक 18. वेतन या विषयावर मी बोलू इच्छिते. सभापती महोदय, गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात 14 पोलीस अधिकारी मारले गेले. आपण याचा गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही? या संबंधीचा विचार करण्याची वेळ महाराष्ट्रावर आणि मुंबईवर आली आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. बाळासाहेब देसाईपासून कल्याणराव पाटलापर्यंत आणि या देशाचे आजचे कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार यांच्या पर्यंतचे गृहविभागाचे कामकाज माझ्या सारखीने कदाचित जवळून पाहिले नसेल पण लांबून मी जरुर पाहिले आहे. त्यावेळी आपली मान लाजने खाली जाईल आणि आपल्याला सगळयांची माफी मागावी लागेल अशा प्रकारचे कुठलेही कृत्य किंवा कुठलीही घटना आपल्याला बघायला मिळाली नाही आणि ती बघायला मिळू नये असे मला वाटते. सभापती महोदय, पोलीस यंत्रणा आपल्या सगळयांचे सरक्षण करते. तीन-तीन दिवस ही माणसे घरी जात नाहीत. त्यांच्या जेवणाचा ठिकाणा नसतो. त्यांच्या विश्रांतीचा ठिकाणा नसतो अशा वेळी ही माणसे काम करीत असतात आणि आपल्या संरक्षणाचे काम करीत असतांना त्यांना आपला जीव गमवावा लागतो अशा वेळी त्यांच्या कुटुबांवर येणारे संकट हे अत्यंत गंभीर प्रकारचे असते. आम्ही सगळेजण हो ला हो मिळवितो. पुढारी त्यामध्ये कदाचित मी देखील असेन. आपण सगळेजण होला हो मिळवतो. त्यांच्यापर्यंत जाऊन पोहचतो त्यांना आश्वासन देतो पण पुढे काहीही होत नाही, अशा प्रकारचे एक विदारक चित्र आपल्याला बघायला मिळते. सभापती महोदय, या पोलिसांना न्याय देण्यासाठी एखाद्या वर्ग-1 च्या अधिकाऱ्याची नियुक्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांच्यासाठी वेगळे बजेट तयार करण्यात यावे. याचे कारण असे की, ही माणसे आपला प्राण गमवतात त्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना कुठल्याही प्रकारची मदत मिळत नाही. याकरिता वर्ग-1 अधिकाऱ्यांच्या माध्यमातून या मृत पोलिसांच्या कुटुंबियाना काय मदत करावयास पाहिजे यासंबंधीचा गोषवारा तयार करावा. कारण आज जे गृहमंत्री आहेत ते उद्या नसतील. उद्या दुसरे गृहमंत्री असतील. म्हणून गृह विभागाच्या आय.ए.एस. अधिकाऱ्यांना माझी विनंती आहे की त्यांनी यामध्ये लक्ष घालावे आणि पोलिसांना न्याय द्यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/

श्रीमती अलका देसाई....

सभापती महोदय, बाब क्रमांक 23 पान क्रमांक 19. यावर मी बोलू इच्छिते. गुन्हा आणि गुन्हेगागरांचा माग काढण्यासाठी एक संपर्क यंत्रणा असावी यासाठी या पुरवणी मागणीमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, आम्हा सगळयांना घरे मिळतात असे मी म्हटले तर अलका देसाई कठोर बोलतात असे म्हटले जाते पण ही वस्तुस्थिती आहे. पोलीस दहा ते बारा तास नोकरी करतो त्यानंतर तो जेव्हा आपल्या घरी जातो तेव्हा 15x20 च्या खोलीमध्ये त्याचे संपूर्ण कुटुंब राहात असल्यामुळे त्याला झोपायलाही जागा नसते. त्यामुळे पुन्हा डयुटीवर आल्यानंतर त्याच्यामध्ये काम करण्याची ताकद नसते. सभापती महोदय, पोलीस यंत्रणेला गृहनिर्माण विभागामार्फत चांगली घरे देण्यासाठी प्रोव्हिजन करावी अशी माझी सूचना आहे. सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये यासंदर्भात एक बातमी छापून आलेली आहे. पोलीस प्रतिक्षेच्या यादीत. सभापती महोदय, शासनामार्फत बाकीच्या लोकांना घरे दिली जातात मात्र पोलिसांना घरे देतांना मात्र मागे-पुढे पाहिले जाते. असे होऊ नये, अशी मी शासनाला विनंती करते. सभापती महोदय, आपण मला या ठिकाणी दोन बाबींवर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करते.

----

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असताना आपल्या आदेशाप्रमाणे मी दोन मिनिटांमध्ये माझ्या दोन सूचना मांडणार आहे. मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 15 वरील बाब क्रमांक 13 बाबत बोलणार आहे. पुणे शहरातील जी पोलीस यंत्रणा आहे त्याचे कामकाज चालण्याच्या दृष्टीने प्रत्येक पोलीस स्टेशनच्या अंतर्गत पोलीस चौक्या आहेत. परंतु गेल्या काही वर्षामध्ये पुणे शहरातील पोलीस चौक्या बंद करुन त्या परिसरातील नागरिकांना जर एखादी तक्रार द्यावयाची असेल तर त्यांना सात ते आठ किलोमीटरवरील पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार द्यावी लागते. माझी गृह विभागाला विनंती आहे की, आज त्या ठिकाणी पोलीस चौक्यांच्या ज्या जागा आहेत त्याला कुलुपे लावलेली आहेत. पूर्वी एका पोलीस चौकीला एक पोलीस फौजदार आणि आठ ते दहा कॉन्स्टेबल असावयाचे. ही पध्दत पुन्हा सुरु करावी. त्याचप्रमाणे त्या पोलीस चौकीमध्ये जो टेलिफोन असतो तो अनेक पोलीस चौक्यांमध्ये बंद अवस्थेमध्ये आहे. जर गृह खात्याकडे पैसे कमी असतील तर मी स्वत: माझ्या आमदार निधीतून पुणे शहरातील पोलीस चौक्यांना जे टेलिफोन लागतील त्याची तरतूद करुन देण्यास तयार आहे परंतु सर्वसामान्य लोकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी गृह खात्याने पावले उचलावीत अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, पोलिसांच्या चांगल्या कामगिरीबद्दल कॉन्स्टेबल असतील किंवा इतर अधिकारी असतील त्यांना शासनाकडून विशेष बक्षिसाठी रक्कम दिली जाते. यामध्ये शासनाकडून बक्षीस जाहीर केले जाते परंतु गेल्या चार ते सात वर्षामध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत ज्या ज्या पोलीस अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना बक्षिसाची रक्कम जाहीर केलेली आहे ती रक्कम त्यांना अजूनपर्यंत मिळालेली नाही. ती रक्कम मुळातच 50 रुपये, 100 रुपये, 250 रुपये अशी आहे. बदलत्या परिस्थितीमध्ये ही बक्षिसाची रक्कम सुध्दा दुप्पट करावी आणि थकलेली बक्षिसाची रक्कम शासनाने अदा करावी अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आता बराच वेळ झालेला आहे त्यामुळे मला असे वाटते की, आता 20 मिनिटांची सुट्टी घ्यावी.

( सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** : संसदीय प्रणालीमध्ये विरोधी पक्षाचा देखील मानसन्मान करावयाचा असतो. मला असे वाटते की, पुरवणी मागण्यांवरील चर्चेला माननीय मंत्रिमहोदयांचे संक्षिप्त उत्तर घेऊन नंतर सुट्टी घेऊ.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेचे उत्तर संपल्यानंतर आपण सुट्टी घ्यावी.

**उपसभापती** : ठीक आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी आपले उत्तराचे भाषण थोडक्यात संपवावे. सुरुवातीला माननीय गृहराज्यमंत्री उत्तर देतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तर येणार नाही. माननीय मंत्रिमहोदय सांगतील, या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अमूक अमूक सन्माननीय सदस्य बोलले. चर्चेत भाग घेतलेल्या सन्माननीय सदस्यांची नावे ते सन्मानाने वाचतात. परंतु प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. या ठिकाणी मागण्यांवर बोलत असताना गृह विभागाच्या संदर्भात या विभागाच्या कामकाजाच्या माध्यमातून सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या गृह खात्याच्या बाबतीत सत्ताधारी पक्षाकडून हे खाते कसे नासलेले आहे आणि ते गृह खाते कसे सांभाळू शकत नाहीत याबाबत बोलले गेले. त्यामुळे गृह खात्याच्या बाबतीत माननीय राज्यमंत्री काय उत्तर देणार ? या ठिकाणी एकाही प्रश्नाचे उत्तर मिळणार नाही. त्यामुळे माननीय माननीय मंत्रिमहोदयांनी मागण्यांचे क्रमांक वाचून मागण्या संमत कराव्यात एवढे सांगावे आणि उत्तर संपवावे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल सत्तार ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर जवळपास सर्वच सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली आहे, त्याचे मी मनापासून स्वागत करतो, सगळयांचे आभार मानतो. या विभागाच्या बाब क्रमांक 86 ते 113 पर्यंत 918 कोटींच्या एकूण 28 पुरवणी मागण्या आहेत. सभागृहाला मी विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या संमत करण्यात याव्यात. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. मी सर्व सन्माननीय सदस्यांचा आभारी आहे. या सर्व मुद्यांना मी 8 दिवसात लेखी उत्तरे पाठविणार आहे. परंतु आदिवासी विकास विभागासंबंधी दोन महत्वाच्या सूचना याठिकाणी करण्यात आल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, बांधकाम विभाग हे या विभागातून स्वतंत्र करण्याची सूचना केली गेली. तसा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळासमोर आणत आहोत. आदिवासी विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांमधून विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे जेवण देत आहोत. त्याचप्रमाणे मे व जून महिन्यात शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविला जाणार आहे. आदिवासी विभागाच्या शाळांमधून 4.25 लाख मुले शिक्षण घेत आहेत. त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मोठा निधी खर्च केला जात आहे. यावर्षी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्याचा कार्यक्रम सुरु केला आहे. त्यानुसार 1100 खाजगी शाळा चालविल्या जात आहेत, त्या शाळा उत्तम प्रकारे चालू आहेत. त्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद केलेली आहे. आदिवासींच्या घरकुल योजनेसाठी 122 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. परंतु अशाप्रकारे थोडी थोडी घरे बांधून हा कार्यक्रम पूर्ण होऊ शकणार नाही, त्यामुळे जागतिक बँकेकडे शासनाने एक प्रस्ताव पाठविला आहे. त्यातून 6 लाख आदिवासींना 4-5 वर्षामध्ये घरकुलांचे वाटप होईल. सभागृहाला मी विनंती करतो की, आदिवासी विकास विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.अब्दुल सत्तार ( अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा खात्याच्या बाब क्रमांक 163 ते 167 वरील 188 कोटी 49 लाख रुपयांच्या मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. या मागण्यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांना शासनाच्यावतीने लेखी उत्तर देण्यात येईल. मी सभागृहाला विनंती करतो की, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने संमत कराव्यात, एवढे बोलून मी येथेच थांबतो.

----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव काळे यांनी भाग घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मुंबई विद्यापीठामध्ये आर्थिक घोटाळा झाला असा मुद्दा मांडला आहे. त्याबाबत मी चौकशी केली असता यासंबंधी शासनाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही. परंतु सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार पुढील महिन्यात चौकशी केली जाईल. त्याचप्रमाणे वैभववाडी तालुक्यातील कॉलेजला अनुदान दिले जात नाही असे त्यांनी म्हटले आहे. परंतु यासंबंधी 2008 मध्ये शासनाने वाणिज्य शाखेचा समावेश केला असल्यामुळे हा प्रस्ताव टास्क फोर्सकडे गेलेला नाही. परंतु त्यांच्या सूचनेबाबत विचार केला जाईल. तसेच कॉलेजचा संप झाला त्यावेळी जे कर्मचारी संपावर गेले होते त्यांचे पगार अडविण्यात आले आहेत. याबाबत माहिती घेतली जाईल आणि यासंबंधी जर बेकायदेशीर झाले असेल तर त्याबाबत देखील कार्यवाही केली जाईल.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

(प्रा. वर्षा गायकवाड....)

सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी खाजगी आयटीआयमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती द्यावी अशी सूचना केली. शासकीय आयटीआयमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती दिली जात नाही. त्यामुळे खाजगी आयटीयआयमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तेव्हा उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

----

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 12 ते 28, 30 ते 32 आणि 34 अशा एकूण्ण 31 पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये या सदनातील सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत प्र. पाटील, विनोद तावडे, अरविंद सावंत, विक्रम काळे, डॉ. नीलम गो-हे, प्रा. सुरेश नवले आदी सदस्यांनी भाग घेऊन मौलिक सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. पोलीस खात्याच्या कारभाराच्या संदर्भात या ठिकाणी बोलत असताना काही सन्माननीय सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यामध्ये काही ठिकाणी जुगार, मटका यासारखे अवैध धंदे सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबतीत ताबडतोबीने तपास करुन कारवाई केली जाईल.

अनेक सन्माननीय सदस्यांनी नक्षलवाद्यांचा आणि नक्षलग्रस्त भागाचा प्रश्न उपस्थित केला. या नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी 3233 कर्मचा-यांची पदे निर्माण केलेली आहेत. निरनिराळया नक्षलग्रस्त भागात आमचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी शहीद झालेले आहेत. या शहीद झ ाालेल्यांच्या वारसांना 25 लाख रु. तसेच कुटुंब कल्याण निधी, सुरक्षा विषयक निधी आणि अंत्यसंस्कारासाठी 5 हजार या प्रमाणे एकूण 27 लाख 25 हजार रु.ची आर्थिक मदत केलेली आहे.तसेच मी या सभागृहास सांगू इच्छितो की, नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी सक्षम अशी यंत्रणा सज्ज केलेली आहे. पोलिसांना बुलेटप्रूफ जाकिटे देणे, अत्याधुनिक शस्त्रे देणे, फोर्स् वन तयार करणे इत्यादी गोष्टी शासनाने केलेल्या आहेत.

गृह विभागाच्या 141 कोटी 44 लाख 19 हजार रुपयाच्या मागण्या सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या मौलिक सूचना केलेल्या आहेत त्यांचा शासनस्तरावर निश्चितपणे विचार केला जाईल. जनतेचे रक्षण करण्यास आणि गुन्हेगारांना शासन करण्यास हे शासन कटीबद्ध आहे. तेव्हा गृह विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामगार विभागाच्या बाब क्रमांक 143,144 आणि 145 या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.अरविंद सावंत, विक्रम काळे, सुभाष चव्हाण, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, सय्यद जमा यांनी कामगार विषय मौलिक सूचना केल्या, मार्गदर्शन केले. कामगारांना न्याय देण्यासाठी कामगार विभाग प्रयत्नशील आहे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांना लेखी उत्तर दिले जाईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी मोलकर्णींसाठी मंडळ स्थापन करण्याबाबतचा मुद्दा मांडला. शासन याबाबतीत लवकरात लवकर कार्यवाही करील. तेव्हा कामगार विभागाच्या पूरक मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान (वस्त्रोद्योग व अल्पसंख्याक विकास मंत्री) : सभापती महोदय, वस्त्रोद्योग विभागाच्या पूरक मागणी, बाब क्रमांक 246, अल्पसंख्याक विकास विभागाच्या पूरक मागणी, बाब क्रमांक 268 वर अनेक सन्माननीय मौलिक सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, श्री.सुभाष चव्हाण यांनी काही सूचना केलेल्या आहेत, मार्गदर्शन केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी दादर येथील चैत्यभूमी शेजारी असलेल्या इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक त्वरित व्हावे अशी मागणी केली. जरुर त्याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याचा शासनाने निर्णय घेतला, परंतु त्या जागेबाबत मध्यंतरी अडचण निर्माण झाली. ती जागा केंद्र शासनाच्या एन.टी.सी.च्या माध्यमातून मिळविण्यास शासन प्रयत्नशील आहे. तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभे राहिले पाहिजे यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न सुरु आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांची केंद्र सरकारच्या संबंधित लोकांशी बैठक देखील झ ालेली आहे. येत्या काळात हा प्रश्न सुटेल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक त्याठिकाणी उभारण्याचा निर्णय घेतला आहे तो पूर्णत्वास जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी अल्पसंख्याक विभागाला सूचना केली की, बजेटमध्ये वाढीव तरतूद केली पाहिजे. सभागृहाला ज्ञात आहे की, दोन वर्षापूर्वीच अल्पसंख्याक विकास विभाग या राज्यामध्ये अस्तित्वात आला. पहिल्या वर्षी बजेटमध्ये 165 कोटी रुपयांची तरतूद झालेली होती. विभागाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी अनेक प्रकारच्या योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. योजनांचा लाभ संपूर्ण राज्यातील अल्पसंख्याक समाजाला मिळवून देण्यास सुरुवात झाली आहे. यावर्षी 210 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुढील काळात सुध्दा अल्पसंख्याक समाजाचा उध्दार होईल अशाच योजना राबविण्यासाठी शासन प्रयत्नशील राहणार आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना लक्षात घेऊन येणाऱ्या काळामध्ये चांगली पावले उचलली जातील. मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो की, वस्त्रोद्योग विभाग आणि अल्पसंख्याक विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून पूरक मागण्या सभागृहासमोर ठेवल्यानंतर अनेक सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना करण्याचे काम केले आहे. त्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. विशेषकरुन एसईझेडबद्दल चर्चा करण्यात आली. लघुउद्योगांबाबत अशी भूमिका मांडली गेली की, शासन काहीच करीत नाही. यापूर्वी महाराष्ट्रामध्ये उद्योगधंदे वाढीस लागावेत म्हणून शासनाने हमी दिली होती. इतर राज्यामध्ये जे उद्योगधंदे येतात, त्यांना तिथे मिळणाऱ्या इन्सेटिव्हपेक्षा जास्त इन्सेटिव्ह आपल्या राज्यात देण्याची भूमिका राज्य स्तरावर घेण्यात आली. परंतु ते इन्सेटिव्ह न देऊ शकल्यामुळे आवश्यक तो प्रतिसाद मिळाला नाही. आपण इन्सेटिव्ह जाहीर करतो त्याप्रमाणे त्याची पूर्तता केली पाहिजे, त्यादृष्टीने आपण पॅकेज तयार करण्याचे काम केले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांची ही भूमिका आहे त्याप्रमाणे विशाल प्रकल्प धोरण देखील जाहीर करण्याचे काम केले. इतकेच नव्हे तर 169 योजना आणि प्रकल्पांना मंजुरी दिली. त्या उद्योगांच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना रोजगार देण्याचे काम केले. तरुण आणि स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पाहिजे हा केवळ वाक्यप्रयोग राहता कामा नये. म्हणून नवीन भूमिका घेण्याच्या मी प्रयत्नात आहे. एमआयडीसी तयार होत असताना त्या एमआयडीसी परिसरात कम्पलसरी इंडस्ट्रीयल ट्रेनिंग देण्याचा मानस आहे. म्हणजे दोन वर्षानंतर येणाऱ्या इंडस्ट्रीच्या अनुषंगाने आज ट्रेनिंग दिले तर कौशल्यप्राप्त तरुणांना नोकरी देता येईल. नवनवीन फॅकल्टीज करु शकलो तर स्थानिकांना रोजगार मिळेल अशी मी अपेक्षा बाळगून आहे. सन्माननीय सदस्यांनी बीड व विदर्भामध्ये उद्योगधंद्यांना चालना मिळाली पाहिजे अशी मागणी केली आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .........

तशी चालना देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न उद्योग विभागाच्या माध्यमातून केला जाईल. तसेच ठाणे जिल्हयातील अनेक कंपन्या बंद होत असून तेथील कामगारांना त्यांची देणी सुध्दा मिळत नाही अशा प्रकारची भावना सुध्दा सभागृहात व्यक्त करण्यात आली. मी या निमित्ताने सांगणार आहे की, कोणतीही कंपनी बंद करावयाची असेल तर त्याला कामगार विभागाची एनओसी आवश्यकच असते, त्याशिवाय तो उद्योग बंद करता येत नाही असा आपण कायदा केलेला आहे. म्हणून या कामगारांना संरक्षण देण्याची भूमिका उद्योग विभाग घेणार आहे. विदर्भातील उद्योगांनाही चालना दिली पाहिजे अशा प्रकारची मागणी येथे करण्यात आली. त्या अनुषंगाने मला असे आश्वासन द्यावयाचे आहे की, लघु उद्योगांना चालना देत असताना विदर्भात केवळ टेक्स्टाईलच्याच मागे लागून आपल्याला चालणार नाही तर आता बांबू सारखा उद्योग सुध्दा निर्माण करु शकतो याचाही शासन गांभीर्याने विचार करीत आहे, जेणेकरुन नवीन इंडस्ट्रीज तयार होतील. तसेच हे उद्योग कसे वाढतील यासाठीही प्रयत्न करण्यात येतील, अशी देखील शासनाची मानसिकता आहे. आपल्या माध्यमातून विशेष करुन एसईझेड च्या संदर्भात सांगण्यात आले. या एसईझेडसाठी बळबरीने जमिनी घेण्यात आल्या असेही येथे सांगितले परंतु मी सभागृहाला सांगू इच्छितो की, भविष्यात अशा प्रकारे जमिनी न घेता ज्यांच्या जमिनी आपण संपादित करणार आहोत त्यांना 15 टक्के विकसित जमिनीचे प्लॉट्स देण्याचीही शासनाची भूमिका आहे. एवढे सांगतो आणि उद्योग विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

---------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री) : महोदय, सन 2009-2010 च्या पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी मौलिक विचार मांडले तसेच अत्यंत सुंदर चर्चाही सभागृहात झालेली आहे. त्यात प्रामुख्याने सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत प्र.पाटील, परशुराम उपरकर, अरविंद सावंत, किरण पावसकर यांनी तसेच अन्य सदस्यांनी देखील भाग घेतला व चांगल्या सूचना केल्या. या निमित्ताने मी नमूद करु इच्छितो की, चक्रीवादळामुळे कोकणातील जनतेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. विशेष करुन किनारपट्टीला देखील मोठा फटका बसला असून अनेक मच्छिमारांची जिवीत हानी झालेली आहे. अशा सर्व बाधित लोकांना सर्वतोपरी सहाय्य करण्याचे शासनाचे धोरण आहे. मत्स्यव्यवसाय विभाग हा तसा दुर्लक्षित राहिलेलाच विभाग आहे असे म्हटले तरी चालेल. कारण मागील दहा पंधरा वर्षाच्या काळात या विभागासाठी अत्यंत अपुरी तरतूद होत होती पण राज्यामध्ये हा व्यवसाय वाढीस लागण्याच्या दृष्टीने कोस्टल फिशरीज, इनलँड फिशरीजसाठी 6 टक्के तरतूद करावी असे केंद्रशासनाचे धोरण आहे आणि त्या अनुषंगाने केंद्रशासनाची त्यांची एक योजनाही सादर केली आहे. कोस्टल फिशरीज डेव्हलप करीत असताना मुंबई आणि कोकणातील जो भाग आहे तेथे मोठ्या प्रमाणावर जेट्टी निर्माण करुन तेथील मच्छिमारांना त्यांच्या व्यवसायासाठी उपयोगी पडणारी साधनसामुग्री उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आमचा विभाग वाटचाल करीत आहे. तसेच आयएसओ कडून प्रमाणपत्र मिळविण्याचेही आमच्या विभागाचे प्रयत्न आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांनी प्रामाणिकपणे मच्छिमारी करणाऱ्यांच्या मुलांना प्रशिक्षण देण्याची मागणी केली त्याचाही शासन जरुर विचार करील. तसेच ज्या मच्छिमार संस्था आहेत त्यांच्यासाठी कुठलीही नियमावली नाही तशी नियमावली तयार करण्याच्या दृष्टीने ज्या पध्दतीचे धोरण मध्य प्रदेश सरकारने आखले त्याच पध्दतीने शासनही विचार करील. तसेच गुजरात सरकारने कोस्टल फिशरीज पॅटर्न सुरु केला त्या अनुषंगाने आपल्या राज्यात देखील हा व्यवसाय उभारण्याचा संकल्प आम्ही घेतलेला आहे. तद्वतच विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये अनुक्रमे वैनगंगा आणि गोदावरी सारख्या मोठ्या नद्या आहेत, ज्यांच्या 250 उपनद्या आहेत. त्याचबरोबर माजी मालगुजारी तलाव, शेततळी सुध्दा मोठया प्रमाणात असून हे सर्व व्यवसायाला चालना देणारी नैसर्गिक साधनसामुग्री आहे म्हणून या भागात मागणी होत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत .....

तो सेक्टर जर विकसित केला तर त्यातून 20 हजार कोटींचा व्यवसाय उभा राहू शकतो व त्यातून 10 हजार लोकांना रोजगार मिळू शकतो. त्यामुळे नागपूर येथील पशू व मत्स्य विद्यापीठाच्या मार्फत मुंबईला जसे पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स आहे तसेच नागपूरलाही करण्याच्या संदर्भात कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे अशी माहिती मला मिळालेली आहे. नॅशनल फिशरीज आणि राज्यसरकार हे संयुक्तपणे फिशरीजचा व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने कार्यरत आहेत. या ठिकाणी चर्चा करतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या असून त्या सर्व सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. एवढे बोलून सभागृहाने सन 2009-10 या वर्षाच्या मत्स्य व्यवसाय विकास विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष झनक (महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या सन 2009-10 च्या पूरक मागणी क्रमांक 260, 261 व 62 या मागण्यांवर चर्चा करतांना सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले, डॉ. दीपक सावंत तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी अतिशय चांगल्या मौलिक सूचना केलेल्या असल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या मौलिक सूचना केलेल्या आहेत त्यांचा निश्चित विचार केला जाईल, त्यामुळे सभागृहाला विनंती करतो की, बाब क्रमांक 260,261व 262 या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

**उपसभापती** : सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक मी आता 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 5.53 ते 6.05 पर्यंत स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

**( सभापती स्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.** डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

**मु.शी.**

L.C. BILL NO. XIII OF 2009

( A BILL FURTHER TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 1989 AND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

प्रा. वर्षा गायकवाड ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ):सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 13 - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, 1989 व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम 1989 च्या कलम 12 च्या पोट कलम 7 मध्ये तसेच महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 च्या कलम 12 च्या पोट कलम 7 मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणण्यात आले आहे.

सभापती महोदय, या तरतुदीत नमूद केलेल्या परिस्थितीमध्ये एखाद्या कुलगुरुचा काम करण्याचा कालावधी सहा महिन्यापेक्षा जास्त नसेल अशा प्रकारच्या कुलगुरुंना निवडण्याचा अधिकार पूर्णपणे कुलपतींना म्हणजेच माननीय राज्यपालांना देण्यात आलेला आहे . या विधेयकान्वये फक्त एक सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुसार "सहा महिन्या पेक्षा अधिक नसेल "या ऐवजी "बारा महिन्यापेक्षा अधिक नसेल" अशी सुधारणा करण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र व्द्यिापीठ हे लोणारे येथे असून दुसरे शिवाजी विद्यापीठ हे कोल्हापूर येथे आहे.या दोन्हीही विद्यापीठांमध्ये कुलगुरुंची पदे रिक्त झाली आहेत . डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशात्र विद्यापीठाच्या कुलगुरुंचे पद दिनांक 8.4.2009 रोजी रिक्त झाले असून कोल्हापूरच्या

.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड ...

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंचे पद दिनांक 2.3.2009 ला रिक्त झाले आणि माननीय कुलपतीनी प्रभारी कुलगुरु नेमण्याच्या बाबतीत ऑर्डर काढली होती. त्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या कुलगुरुची ऑर्डर दिनांक 12.4.2009 रोजी काढली असून कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंची ऑर्डर दिनांक 3.3.2009 रोजी काढली होती. माननीय कुलपतींनी सहा महिन्यांसाठी त्यांना प्रभारी कुलगुरु म्हणून नेमले होते. मधल्या काळात आपण एक विधेयक मंजूर केले होते त्यानुसार एक निवड समिती गठीत करण्यात आली होती. सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, अशा प्रकारे कुलगुरुंच्या निवडीसाठी एक निवड समिती गठीत करण्यात आली होती व कुलगुरुच्या निवडीची प्रक्रिया या समिती मार्फत पार पाडली जात असे. या समितीमध्ये बदल झाला असून पूर्वीची जी मोठी समिती होती त्या ऐवजी छोटी समिती तयार करण्यात आली आहे. त्याचबरोबर या प्रकियेमध्ये सुध्दा काही बदल करण्यात आले होते. त्यामुळे सहा महिन्याच्या कालावधीमध्ये रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे हा कालावधी 12 महिन्यांपर्यत करण्यात यावा एवढाच बदल या विधेयकात करण्यात आला आहे . सहा महिन्या पर्यत प्रभारी कुलगुरुंचे पद असेल तर त्या ऐवजी 12 महिन्यापर्यत प्रभारी कुलगुरुंचे पद असेल एवढाच बदल या विधेयकात करण्यात आलेला आहे. हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

प्रश्न प्रस्तुत झाला

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम 1989 आणि महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 यामध्ये अधिक सुधारणा करण्यासाठी म्हणून हे विधेयक येथे आणले आहे. सर्वसाधारणत: महाराष्ट्र विद्यापी अधिनियमांतर्गत हे विद्यापीठ तसेच महाराष्ट्रातील सगळी तंत्रशास्त्र विद्यापीठे या अधिनियमामध्ये येतात. यासचे मूळ आपण सांगण्याचा प्रयत्न केला. त्यात असे म्हटले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यातील कुलगुरू पदे या आधीच रिक्त झाली होती. कुलगुरू पदांच्या भरतीसाठी योग्य नावाची शिफारस करण्यासाठी म्हणून एक समिती गठित करण्यात आली होती. हे जे आपण लिहिले आहे त्यात देखील शुद्ध लेखनाची चूक आहे. येथे 'घटित' शब्द लागू पडत नाही तर 'गठित' शब्द लागू होतो., हे आपण लक्षात घ्यावे. असो. आपल्याला कुलगुरू पदासाठी योग्य नावाची शिफारस करण्यासाठी एक समिती नेमावी लागली आणि तत्कालीन विद्यमान परिस्थितीत कुलगुरू पदावर असलेल्या व्यक्तीची जी काही कालमर्यादा असेल त्याच्या आत योग्य नावाची शिफारस ती समिती करू शकली नाही म्हणून त्या समितीला आणखी कालमर्यादा देण्यासाठी कायद्यात बदल करण्यासाठी म्हणून आपण हे विधेयक येथे आणले आहे असे आपण येथे आम्हाला हे विधेयक येथे आणण्यामागील हेतू सांगितला. या विधेयकाच्या माध्यमातून ज्या ज्यावेळी योग्य व्यक्ती त्या वेळेत मिळत नाही तेव्हा आहे त्या व्यक्तीलाच योग्य व्यक्ती मिळेपर्यंत त्या पदावर राहण्यास मुदतवाढ दिली जाते. अर्थात ही व्यवस्था तात्पुरती असते. जसे नवीन मंत्रिमंडळ येईपर्यंत जुन्या मुख्यमंत्र्यांना आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला तात्पुरती व्यवस्था म्हणून कार्यभार सांभाळायला सांगितले जाते तसे. त्यामुळे मी आता या पदावर तात्पुरता आहे त्यामुळे मला धोरणात्मक काही बोलता येत नाही, करता येत नाही असे पदावरील ती व्यक्ती सांगत असते पण प्रत्यक्षात मात्र ती सर्व काही निर्णय घेत असते, आपल्या कारकीर्दीचा पूर्ण उपयोग आणि उपभोग घेत असते. अशा वेळी जे घोटाळे निर्माण होतात व ते समोर आणून दाखविल्यानंतरही शासन काही निर्णय घेत नाही अशी उदाहरणे या विधेयकाच्या निमित्ताने येथे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. कित्येकदा अशा वेळी गंभीर परिस्थितीही निर्माण होत असते. या बाबतीत मी व्हीजेटीआय या संस्थेचे आणि संस्थेच्या संचालकाचे उदाहरण सांगणार आहे. त्यावरून कोणत्या पद्धतीचे संचालक असावेत याचेही मार्गदर्शन आपल्याला होऊ शकेल. थोडक्यात

....4बी 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

अशा पदांवर बसणारी व्यक्ती या विद्यापीठाच्या माध्यमातून तंत्रज्ञानामध्ये पुढील पिढी घडविणार असल्याने असे धोरण राबविणारी व्यक्ती मिळाली तर ती चांगली गोष्ट होते. पण ती व्यक्ती भ्रष्टाचारी निघाली तर ती व्यक्ती तिचे आणि तिच्या सहकाऱ्यांचे पोट भरण्याचाच प्रयत्न करते आणि त्यातून तेथील विद्यार्थ्यांचे मात्र वाटोळे होते. असे झाल्यास त्या भ्रष्टाचाराबाबतचे उत्तर मला माननीय राज्यमंत्र्यां कडून अपेक्षित आहे. तसेच आपण यासाठी जी समिती गठित केली आहे त्या समितीकडे देखील याचे निकष गेले पाहिजेत या दृष्टीने मी माझा हा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, व्हीजेटीआयचे संचालक हे संस्थानिक झाले आहेत अशा प्रकारची बातमी आली होती. ...

( यानंतर श्री.सरफरे .... 4सी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते।

ते कोण आहेत? ते डॉ. के. जी. नारायणखेडकर या नावाचे सर्वोच्च पदावर असलेले संचालक आहेत. आपण आता सर्व विद्यापीठांना स्वायत्तता दिली आहे. परंतु ती अनिर्बंध नाही. त्यावर कायद्यान्वये सरकारचे नियंत्रण आहे. त्यामुळे धोरणात्मक भूमिका त्यांनी ठरवायची, खर्च देखील त्यांनीच बघावयाचे, शैक्षणिक धोरणात्मक जी भूमिका असेल तिची कार्यवाही त्यांनी करावयाची अशी आपली सर्व क्षेत्रामध्ये शैक्षणिक पध्दत आहे. डॉ. नारायणखेडकर यांची मुदत संपून चार वर्षे झाली तरीही ते त्याठिकाणी आहेत. खरे म्हणजे ते चार वर्षापूर्वी गेले पाहिजेत. आता त्यांच्या लक्षात आले आहे की, आपण अजून कितीही वर्षे राहू शकतो. तरीसुध्दा शासन काही करीत नाही याची त्यांना खात्री कां झाली आहे? आपण त्यांना वाढीव मुदतीचा फायदा दिला, तो त्यांनी सन्मार्गी, सत्कारणी लावला. तो स्वत:साठी लावला की, विद्यापीठासाठी लावला? तो याठिकाणी सांगण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, मी या मंडळामध्ये एक वर्ष संचालक म्हणून काम केले आहे. त्यांच्यावर मार्च महिन्यामध्ये भ्रष्टाचाराचे आरोप झाले आहेत. मंत्रिमहोदयांनी माझे मुद्दे लिहून घेण्यापेक्षा त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना लिहून घेण्यास सांगावे. याचे कारण या विधेयकावर बोलतांना मी कोणते मुद्दे मांडणार आहे याबाबत लेखी पत्र दिले असून त्यामध्ये उत्तराची अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यामुळे आपले अधिकारी सर्व तयारी करुन आपल्याकडे देतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या विषयावर टप्पाटप्प्याने येण्यापूर्वी आमच्या विद्यार्थी सेनेने विद्यार्थ्यांच्या व्यथा मांडण्यासाठी एकसंघपणे संघर्ष निर्माण केला. त्यावेळी व्हीजेटीआयचे संचालक डॉ. के.जी. नारायणखेडकर यांनी त्या संघटनेला, संघटीत संघर्षाला अजिबात थारा दिला नाही. शेवटी हाणामारीपर्यंत प्रकरण गेले. विद्यार्थी आणि संचालक यांच्यामध्ये फार मोठा संघर्ष झाला. त्याचे वृत्त दिनांक 20.11.2009 च्या "सामना" वर्तमानपत्रामध्ये छापून आले. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या संघटनेच्या काही मागण्या मान्य केल्या. त्या संघर्षामुळे कोंडलेल्या परिस्थितीतून सुटका करुन घेण्यासाठी त्यांनी मागण्या मान्य केल्या त्या आजही मान्य केल्या आहेत. अशाप्रकारे मुजोरपणा करणारी प्रवृत्ती शिक्षणाच्या सर्वोच्च स्थानी बसते त्यावेळी त्या विद्यापीठापासून विद्यार्थ्यांचे किती व कसे हाल होतात? आणि म्हणून 20 तारखेच्या बातमीनंतर सर्व मंडळींनी दि.25.11.2009 रोजी नामदार श्री. राजेश टोपे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते..

"व्हीजेटीआय या जगन्मान्य संस्थेची दुर्दशा व अनास्था" या नावाखाली एक पत्र दिले.ते पत्र दोन पानी असल्यामुळे याठिकाणी वाचायला मला पाऊण तास लागेल. त्यामध्ये अनैतिकता काय काय निर्माण झाली आहे? हे सर्व दिले आहे. त्याचे उत्तर आपण दिले तर बरे होईल. मंत्रिमहोदयांच्या कार्यालयात त्या पत्राची प्रत दिली असल्यामुळे त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा करीत आहेत. ती करीत असतांना त्या पत्राचे काय केले? त्यामधून आपण त्यांना कोणते समाधान दिले? हे सांगणे आवश्यक असतांना मी पुन्हा एक वर्ष मागे यासाठी जातो की, हा सर्व अनैतिकतेचा भाग आहे. त्यासाठी शासनाने वित्तीय संस्था सल्लागार म्हणून श्री. अनिल काळे यांची एक सदस्य चौकशी समिती नेमली. त्या समितीने भ्रष्टाचाराचा अहवाल विधीमंडळाच्या पटलावर ठेवला. त्यामुळे ती या सभागृहाची मालमत्ता झाली. आता मी मंत्रिमहोदयांना अधिकृतपणे विचारतो की, दि.10.3.2008 रोजी हा अहवाल विधीमंडळाच्या पटलावर ठेवला. त्यामध्ये संस्थेच्या भ्रष्टाचाराचे विविध नमुने आपण आम्हाला दिले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . .. .

कार्यालयीन आदेश क्र.डब्ल्युबीपी-2007/(5/07)/तांशि-6, दिनांक 21 मे 2007 अन्वये श्री.अ.न. काळे, वित्तीय व्यवस्थापन सल्लागार, राज्य प्रकल्प सुलभता गट, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व श्री.दिपक जडिये, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पथकास वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिटयुट, मुंबई या संस्थेतील वित्तीय व व्यवस्थापकीय कारभार तसेच टेक्विप कार्यक्रमांतर्गत सदर संस्थेस मंजूर झालेल्या निधीचा गैरवापर व अन्य शैक्षणिक बाबी संदर्भात चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत आदेश देण्यात आले होते." पुढे असे म्हटलेले आहे की,"वरील आदेशानुसार संस्थेच्या मागील 5 वर्षाच्या कारभारासंबंधी दि.5 एप्रिल 2007 रोजी विधी मंडळात उपस्थित झालेल्या निम्न बाबीसंबंधी संस्थेतील अभिलेख तपासून तथा संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी विचारपूस करुन सोबत जोडल्याप्रमाणे अहवाल सादर करीत आहोत." अशा प्रकारे येथील भ्रष्टाचाराच्या संदर्भात आपणच नेमलेल्या समितीचा अहवाल विधीमंडळाला सादर करण्यात आला. त्यानुसार यामध्ये ज्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे, त्यांच्यावर कारवाई करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. तशा प्रकारे आपण संबंधितांवर कारवाई केलेली आहे काय ? मी भ्रष्टाचाराचा संपूर्ण अहवाल वाचणार नाही, पण भ्रष्टाचाराचे जे काही नमुने देण्यात आलेले आहेत, त्यासंबंधातील कारवाई बाबत अहवालामध्ये मत मांडण्यात आलेले आहे.ते मी निश्चितपणे नोंदविण्याचा प्रयत्न करीन.आपल्याकडे अहवाल आहे.तसेच याठिकाणी "विद्यार्थीनी वसतिगृहाच्या बांधकामा"संबंधीचा संदर्भ आहे. यासाठी एकूण 2 कोटी 61 लाख 35 हजार 493 रुपयांच्या निधीची यासाठी गुंतवणूक करुन तो वापरण्यात आला. यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात या अहवालामध्ये मत व्यक्त करण्यात आलेले आहे."एम-टेक स्टायपेंड अकाऊंट"या संदर्भात जो परिच्छेद देण्यात आलेला आहे, त्यामध्ये पूर्ण आकडेवारी दिलेली आहे. त्यानंतर त्यांनी असे मत मांडलेले आहे की, "विद्यार्थ्यांची सही मूळ अभिलेखातील सहीशी जुळत नाही" म्हणजे विद्यार्थ्यांच्या नावाने खोट्या सह्या करण्यात आल्या आहेत.पुढे असे म्हटलेले आहे की,"सदर विद्यार्थी संस्थेत दीर्घ कालावधीवर गैरहजर असूनही त्याला विद्यावेतन पात्रतेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे."जो विद्यार्थी गैरहजर आहे, त्याला प्रमाणपत्र दिले आणि त्याच्या नावाच्या खोट्या सह्या करुन पैसे घेण्यात आले. तेव्हा आपण किती उच्च दर्जाचे शिक्षण प्रमुख नेमलेले आहेत ते पहा.ते विद्यार्थ्यांसमोर कोणता आदर्श निर्माण करीत आहेत ते लक्षात घ्यावे. या विद्यार्थ्यांनी शिक्षण

. . . .4 डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . .. .

घेतल्यानंतर भावी आयुष्यामध्ये कशा प्रकारे भ्रष्टाचार करावा याची माहिती त्यांना येथील संचालकांच्या माध्यमातून झालेली आहे.पुढे असेही म्हटलेले आहे की,"विद्यावेतन पात्रता प्रमाणपत्रावर संबंधित शिक्षक व विभाग प्रमुखाच्या सह्या बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत संबंधित शिक्षक व विभाग प्रमुख सह्यांच्या पडताळणीसाठी तयार आहेत."म्हणजे संबंधित शिक्षक व विभाग प्रमुख ही बाब खोटी आहे यासाठी पडताळणी करण्यास तयार आहेत.

सभापती महोदय, पुढचा मुद्दा हा "संचालकांच्या वाहन खरेदीतील भ्रष्टाचार" याबाबत आहे. हा एक मोठा विषय आहे. वाहन खरेदीच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणाबाबत असे म्हटलेले आहे की,"संस्थेच्या संचालकांनी इनोव्हा कार माहे डिसेंबर 2006 मध्ये भाडेपट्टी तत्वावर दरपत्रक/ निविदा न मागविता घेण्यात आलेली आहे. वाहनाची किंमत (पथ कर, इतर सुटे सामान व व्याज मिळून) रु.15,35,950/- असून ती मासिक रु.30,719/- अशा 50 हप्त्यामध्ये द्यावयाची आहे. अशा प्रकारे वाहन खरेदीच्या बाबतीत जो भ्रष्टाचार झालेला आहे, त्याचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच पुढे "टाटा इस्टेट कार निर्लेखन व संचालकांनी घेतलेला वाहतूक खर्च" यामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की,संस्थेने संचालकांना स्वत:ची गाडी दिलेली आहे. याबाबतीत असे म्हटलेले आहे की,"दिनांक 7-12-2006 रोजी संचालकांना इनोव्हा (एमएच-01-YA) ही नवीन गाडी देण्यात आलेली आहे." कारचे मॉडेल टाटा इस्टेट मेक टाटा असून, याच्या खरेदीची तारीख दि.11-2-1998 आहे. या गाडीची मूळ किंमत रु.5,80,824/-आहे. ही गाडी 87,000 कि.मी.धावलेली आहे. या गाडीच्या दुरुस्तीवर झालेला सरासरी खर्च रु.27,800/- आहे आणि सध्याच्या परिस्थितीत सदरहू वाहन आवारामध्ये पडून आहे. पुढे असे म्हटलेले आहे की,"संस्थेच्या लेखासंहितेमध्ये वाहन निरुपयोगी ठरविण्याबाबत कोणतेही मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली नाहीत."

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यामुळे शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वाचा आधार घेणे संयक्तिक ठरले असते असे असतानाही त्या वाहनाचा कोणताही वापर न करता हे वाहन विक्रीस काढले. त्यामुळे संचालकांनी राहण्याचे ठिकाण ते कार्यालय हा प्रवास टॅक्सीने केलेला आहे. या टॅक्सीचा जो खर्च लावलेला आहे तो किती लावला आहे? तो खर्च अहवालात देण्यात आलेला आहे. रुपये 90,867/- इतक्या टॅक्सी भाडयाची प्रतीपूर्ती संस्थेकडून झालेली आहे. सभापती महोदय, अहवालात पुढे असे म्हटले आहे की, "दि. 16-2-2006 ते 16-3-2006 या कालावधीत गाडी चालू असताना ती संचालकांनी वापरली नाही व वाहतूक खर्च घेतला असल्याचेही निदर्शनास आले आहे." सभापती महोदय, संस्थेची लूट करण्यासाठी संचालक नेमले आहेत काय? फ्री-शीपच्या बाबतीत तीच व्यथा आहे. "संचालकांचे वेतन व भत्ते" याबाबतीतही अशाच प्रकारची मनमानी केलेली आहे. मुद्दा क्रमांक 7. अभ्यागत अध्यापकांना द्यावयाच्या मानधानाच्या बाबतीत आहे त्यामध्ये देखील मनमानीप्रमाणे, मनात येईल त्याप्रमाणे कोणतेही निकष न वापरता त्यांना मानधन देण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, अहवालामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "संस्थेच्या लेखाधिकाऱ्याने आक्षेप घेऊनही संचालक, व्हीजेटीआय यांनी रु. 300/- प्रती तासिका या प्रमाणे रक्कम प्रदान करण्यासाठी लेखी आदेश दिलेले आहेत. हे आदेश कोणत्या अधिकारात दिलेले आहेत याची कारणमिमांसा समजत नाही." मी करेन तो कायदा अशा प्रकारे मनमानी करण्यात आलेली आहे. त्यानंतर "कार्यशाळा माध्यमातून संस्थेच्या संचालकांनी प्राप्त केलेले उत्पन्न रु. 82,000/- बाबतचा" भ्रष्टाचार या अहवालात आकडेवारीसह दिलेला आहे.

सभापती महोदय, अहवालाच्या पृष्ठ क्रमांक 9 वर मुद्दा क्रमांक 10 मध्ये "व्ही.जे.टी.आय.,मुंबई संस्थेमध्ये ग्रेस मार्कांमुळे विद्यार्थ्यांची चांदी झाली" असे म्हटले आहे. ग्रेस मार्क्स देऊन विद्यार्थ्यांना पास करण्याकरिता देखील भ्रष्टाचार. काय कौतुक करावयाचे? या महाराष्ट्रामध्ये आणि या देशामध्ये सर्वात अग्रगन्य असलेली ही मोठी संस्था आहे. या संस्थेला लयाला नेण्याचे काम चालू आहे. त्यांनी काय केले तर "संस्थेत पूर्वीपासून चालू असलेल्या पध्दतीनुसार अशा प्रकारे ग्रेस मार्क देणे नियमाधिन नसल्यामुळे तसेच या पध्दतीची पूर्ण तपासणी करुन या बाबत तज्ञ मंडळीचे अभिप्राय घेऊन अशा पध्दतीचा ठराव नियामक मंडळाकडून मंजूर

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

करुन घेण्यापूर्वीच संस्थेने संचालक स्तरावर हा निर्णय राबविला असल्याने संस्थेची ग्रेस मार्क्स देण्याची कार्यवाही आक्षेपार्ह आहे." सभापती महोदय, ज्ञानामध्ये कमी पडलेला नापास झालेला आणि तांत्रिक बाबीमुळे जो नापास होते तो पुढच्या वर्षी चांगले ज्ञान घेऊन आणखी चकाकून बाहेर पडतो. कारण शेवटी तो ज्यावेळी या महाविद्यालयातून डिग्री घेऊन बाहेर पडतो तो डॉक्टर असेल, इंजिनियर असेल त्याच्यावर या देशातील बऱ्याच गोष्टीचे भवितव्य अवलंबून असते म्हणून त्याचे ज्ञान अपुरे असता कामा नये. हा मूळ गाभा असताना अशा प्रकारे ग्रेस मार्क्स देण्याचा भ्रष्टाचार या अहवालामध्ये नमूद केलेला आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 12 वित्तीय बाबी सर्वसाधारण (अ) वार्षिक लेखे, यामध्ये असे म्हटले आहे की,"या संस्थेचे वार्षिक लेखे वित्तीय वर्ष 2000-2001 या कालावधीपासून प्रलंबित आहेत. ही बाब गंभीर आहे." भ्रष्टाचार केलेला असल्यामुळे ऑडिट केलेलेच नाही. सभापती महोदय,मुद्दा क्रमांक 12(ब) शासकीय अनुदाने निर्धारण न झाल्या बाबत यामध्ये असे महटले आहे की, "अनुदानाचे निर्धारण न झाल्यामुळे संस्थेस शासनाकडून आतपर्यंत किती कमी (-) व जास्त (+) अनुदान दिले आहे हे निश्चित करात येत नाही यामुळे सदर संस्थेस दरवर्षी तदर्थ अनुदानाचे वितरण होत नाही" या संस्थेचे केवळ ऑडिट न झाल्यामुळे नुकसान झालेले आहे की फायदा झालेला आहे? याचा काहीही हिशेब लागत नाही. हे शासनाचे अनुदान आहे. मुद्दा क्रमांक 12(क) बँक ताळमेळाबाबत व श्री. व्ही.एम.जठार, मुख्य लिपिक यांनी केलेल्या अफरातफरीबाबत सद्य:स्थिती असा आहे यामध्ये असे म्हटले आहे की, "पालन न झाल्याने रुपये दहा लाख रकमेची अफरातफर करण्याची संधी संस्थेतील कर्मचाऱ्याला प्राप्त झाली. आणि श्री. जठार हे दिनांक 19-08-2005 पासून परागंदा झालेले असल्याने त्याबाबतची तक्रार माटुंगा पोलीस स्टेशन येथे करण्यात आली. तथापि त्यांचा अजूनही तपास लागलला नाही. संस्थेने श्री. जठार यांच्या गैरहजेरीत (परागंदा असल्याने) विभागीय चौकशी केलेली असून त्यानुसार त्यांना दि 16-11-2005 रोजी बडतर्फ करण्यात आले आहे". सभापती महोदय, तो गायब झाला म्हणजे तो मेला आहे काय? तो आजही घरी आहे. पण आमच्या सारख्यांनी कुठे चुकूनमाकून गुन्हा केला आणि पोलिसांना सापडलो नाही तर पोलीस घरच्या लोकांना उचलून घेऊन जातात. आई-बाबा पासून

..3..

श्री. दिवाकर रावते...

बायका-पोरांपर्यंत उचलून नेतात आणि पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवतात. त्यांची परेड घेतात. या गृह खात्याला जठार यांना शोधता येत नाही काय? यांनी संस्थेचा दहा लाख रुपयाचा अपहार केलेला आहे. हा गांभीर्याचा विषय नाही काय? सभापती महोदय, प्रलंबित अग्रीम रक्कम 17,44,823 रुपयांचा हा विषय आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, "अग्रीम रकमा जुलै, 1981 ते मार्च, 2006 या कालावधीच्या आहेत तसेच बहुतेक अग्रीम हे पुरवठादारांना देण्यात आलेल आहे, ही बाब गंभीर आहे." म्हणजे ते पैसे दिलेले आहेत. पैसे दिले पण त्याचा काही हिशेब नाही. पुढे असे म्हटले आहे की, " अग्रिमांच्या बाबतची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे अग्रिमांची रक्कम वसूल करावयाची आहे का समायोजित करावयाची आहे याचा स्पष्ट उलगडा होत नाही." म्हणजे कामे झालेली आहेत, पैसे दिलेले आहेत हे काही समजावयास मार्ग नाही. अशा प्रकारचा हा काळे समितीचा अहवाल आहे. वीर जिजामाता तंत्रशिक्षण संस्थेच्या या प्रचंड भ्रष्टाचाराचा हा अहवाल आमच्या विधिमंडळाच्या माध्यमातून या ठिकाणी मांडला. हे संपूर्ण कारस्थान किंवा याची संपूर्ण जबाबदारी व्हीजेटीआयचे संचालक डॉ. के.जी.नारायणखेडकर यांची आहे आणि त्यांच्या बाबतीत या संस्थेकडून काहीही होत नाही. हा अहवाल मांडून तीन वर्षे झाली तरी त्यांच्या बाबतीत कोणतीही कारवाई झालेली नाही. त्याचा परिणाम म्हणजे त्या संस्थेमध्ये आता जे आहेत त्यांच्या छळ होण्यामध्ये होत आहे. ते काय करीत आहेत ? वीर जिजामाता तंत्रशिक्षण संस्थेमध्ये संचालक डॉ. नारायणखेडकर यांच्या गैरकारभाराच्या संदर्भात मोठी यादी निर्माण झालेली आहे. हे सगळे करण्याकरिता त्यांनी आतापर्यंत स्पेशल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफीसर नेमला. आतापर्यंत त्या संस्थेमध्ये अकाऊंटंट नेमलेला नाही. त्या ठिकाणी स्पेशल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफीसर नेमला आणि त्याला 60 हजार रुपये पगार दिलेला आहे. कोणाचीही मान्यता नसताना स्वत:च्या मर्जीने नेमलेला आहे. तो काहीच काम करीत नाही. त्याला काम करण्याचा आदेशच नाही. असे प्रकार आहेत. सभापती महोदय, ही यादी वाचावयास लागलो तर मला आणखी किती तरी वेळ लागेल अशा प्रकारची मोठी यादी आहे. हे सर्व वाचत बसण्यापेक्षा मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, यामध्ये मोठा भ्रष्टाचार आहे. बाकी मी आरोप करणे, अमूक वाचणे आणि कोणी दिले आहे त्याची माहिती काढण्यापेक्षाही काळे समितीचा अहवाल आपण आमच्या विधिमंडळाच्या पटलावर ठेवलेला आहे. त्यांनी काय भ्रष्टाचार केलेला आहे ते जाहीर झाले. मला माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करावयाची आहे की, त्याच्या संदर्भात काय झाले ते सांगावे. आता आपण श्री. नारायणखेडकर यांना किती दिवस पोसणार आहात, त्यांना सांभाळणार आहात, मनमानी करणार आहात,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

विद्यार्थ्यांचे नुकसान करणार आहात, बांधकामाच्या बाबतीत लूट करणार आहात, संस्थेचा भ्रष्टाचार चालू ठेवणार आहात, पगाराची उधळपट्टी करणार आहात,. प्राध्यापकांना मनमानी पध्दतीने छळण्याचे काम करणार आहात, स्वत:चा बंगला सजविण्यासाठी त्याला मुदत देणार आहात, भाड्याचे पैसे खाण्यासाठी मुदत देणार आहात काय ? हे सर्व थांबविणार की नाही आणि त्यांना आता घरी पाठविणार आहात की नाही ? नाही तर अशा विधेयकामधून योग्य व्यक्तिमत्व मिळत नाही म्हणून मुदतवाढ द्यावयाची. सकाळी आम्ही आणखी शोकांतिका ऐकली. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, आपल्या सरकारला मराठी भाषेसाठी संचालक मिळत नाही ही शोकांतिका ऐकली. मी आज टी.व्ही.च्या माध्यमातून महाराष्ट्राला आवाहन केले आहे की, आमच्या सरकारला मराठी एम.ए. झालेला माणूस पाहिजे. महाराष्ट्रामध्ये किती तरी मराठी विषय घेऊन एम.ए.,पीएच.डी झालेले लोक आहेत. यांना योग्य उमेदवार मिळत नाही. ज्यांची इच्छा आहे त्यांना सचिवाचा पगार मिळेल. हजारो अर्ज न मागता सरकारकडे पाठवा. महाराष्ट्रामध्ये एवढ्या तरी लायकीचे लोक आहेत की नाही हे बघू या. महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी येत नसलेल्या लोकांची आपण पात्रता सिध्द केली. सहा सहा वर्षे संचालक मिळत नाही. परत या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदया आम्हाला उत्तर देताना सांगतात की, अशी-अशी त्याची प्रक्रिया आहे. आपण प्रतिनियुक्तीवर घ्या. विद्यापीठामध्ये किती तरी स्कॉलर लोक आहेत. त्यांना सहा महिन्याकरिता प्रतिनियुक्तीवर घ्यावे. या ठिकाणी मराठीची आबाळ केली. याचे कारण काय तर आमचे सरकार मराठी लोकांवर अवलंबून नाही आणि नको त्या गोष्टीवर अवलंबून आहे त्यामुळे मराठीची आबाळ केली तरी चालेल. मग आमचे महाकवी कुसुमाग्रज यांना सांगावे लागते की, मराठी भाषा फाटकी वस्त्रे नेसून उभी आहे. तिला कोणी विचारणारा नाही. या ठिकाणी संचालकच नाही. ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. माननीय मंत्रिमहोदय, ही गंभीर बाब या माध्यमातून मी मांडलेली आहे. आज जर तुम्ही त्यांना धडा शिकविला नाही तर अशा प्रकारचे कायद्यात आपण कितीही बदल केले आणि योग्य माणूस आणण्याकरिता मुदतवाढ दिली तरी अशी माणसे आल्यानंतर त्यांना कळेल की या पदावर आल्यानंतर मी स्वायत्त आहे, मला काही केले तरी हे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

शासन काही करु शकत नाही. भविष्यामध्ये हे महत्वाचे क्षेत्र आहे. वैद्यकीय क्षेत्र आणि तंत्रशिक्षण क्षेत्र हे अत्यंत महत्वाचे आहे. तिथून निघणारा प्रत्येक माणूस जगाच्या पाठीवर जेथे असेल त्यांच्यात निर्मितीची क्षमता असते. त्यामुळे अशा संस्थेमध्ये तरी अशी भ्रष्टाचारी माणसे असता कामा नये. आज आपण निर्णय घेणे आवश्यक आहे. या काळे समितीच्या संदर्भात आलेला हा अहवाल आपण विधिमंडळात ठेवलेला आहे आणि त्याच्यावर जर कारवाई केलेली नसेल तर हा विधिमंडळाचा अधिक्षेप आहे. मघाशी बोलत असताना सत्ताधारी पक्षाकडून कोणी तरी सदस्य हे मंदिर आहे असे सांगत होते. या मंदिरामध्ये आपण अशा प्रकारचा भ्रष्ट कारभार चालविणार काय हा प्रश्न या ठिकाणी उभा राहिलेला आहे. ज्या समितीचा अहवाल आपण आम्हाला दिला त्या माध्यमातून भ्रष्टाचार झालेला आहे हे सिध्द झाले तरी ते महाशय अजूनही त्याच ठिकाणी कार्यरत असतील तर त्यांना आपण तात्काळ तिथून काढणार काय हा मूळ प्रश्न आहे. त्यांना तिथून काढावेच लागेल. अन्यथा हे सरकार भ्रष्टाचाऱ्याच्या पाठीमागे राहते अशा प्रकारचा संदेश स्कॉलर लोकांमध्ये, चांगल्या लोकांमध्ये जाईल.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आता हेच भविष्यामध्ये आम्हाला करावयाचे आहे. माझे काही वाकडे होऊ शकत नाही अशी बुध्दिमत्ता असलेला माणूस सापडला तर त्यातून भस्मासूर निर्माण होतो. म्हणून या भ्रष्टाचारामुळे श्री.नारायण-खेडकर यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे अशी माझी आग्रहाची मागणी आहे. मंत्रिमहोदयांनी या विधेयकाद्वारे दुरुस्ती सुचविली आहे. परंतु नवीन निवड समिती ज्या माणसांना घेईल त्यांना असे समजेल की, मला कोणत्या स्वरुपाचे काम करावयाचे आहे, शिक्षण क्षेत्रामध्ये मला उच्चतम काम करावयाचे आहे, भ्रष्टाचाराचे काम करावयाचे नाही, येथे खाण्यासाठी काही मिळणार नाही, अशाप्रकारचा संदेश जाईल यावर खूप बोलण्यासारखे आहे. परंतु मी सर्व आवरते घेतो. संसदीय माध्यमातून केलेल्या चौकशीच्या अहवालावर तातडीने कार्यवाही व्हावी अशाप्रकारची मी अपेक्षा व्यक्त करतो मी येथेच थांबतो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या विधेयकावर बोलत असताना मौलिक सूचना केल्या आहेत त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. ज्यावेळी एखाद्या कुलगुरुंचे पद रिक्त होते त्यावेळी सहा महिन्यांसाठी माननीय राज्यपाल प्रभारी कुलगुरुंची नेमणूक करतात. त्यासंदर्भात हे विधेयक मांडलेले आहे. यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या दोन विद्यापीठांमध्ये कुलगुरुंची पदे रिक्त झालेली आहेत, त्याठिकाणी माननीय राज्यपालांनी प्रभारी कुलगुरुंची नेमणूक केलेली आहे. सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छिते की, एक विधेयक सभागृहासमोर आल्यामुळे नवीन कुलगुरुंच्या नेमणुकीची प्रक्रिया वेगळया प्रकारे सुरु झालेली आहे. निवड समितीची सदस्य संख्या 5 ऐवजी 3 केलेली आहे. त्यात सर्वोच्च निवृत्त न्यायाधीश आणि अन्य चांगल्या व्यक्तींना घेतलेले आहे. कुलगुरुंच्या निवड प्रक्रियेमुळे व निवड समितीमुळे हे विधेयक मांडण्यास विलंब झाला आहे. प्रभारी कुलगुरुंचा कालावधी 6 महिने पण 12 महिन्यांपेक्षा अधिक काळ नसावा अशी दुरुस्ती करण्यासाठी हे विधेयक मांडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी व्हीजेटीआय कॉलेजसंबंधी म्हटले आहे त्याबाबत तपासून पाहिले जाईल...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काळे समितीचा अहवाल विधिमंडळाला सादर झालेला आहे. त्यानिमित्ताने शिक्षण क्षेत्रातील या गोष्टी सभागृहासमोर आणलेल्या आहेत. त्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी या अहवालात नमूद केलेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात शासन आपला निर्णय जाहीर करील असे मंत्रिमहोदयांनी सांगावे. या मुद्यासंबंधी मंत्रिमहोदय काही तरी सांगतील की नाही, या विधिमंडळाला काही सँक्टिटी आहे की नाही ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी व्हीजेटीआयबद्दल माहिती देते. जागतिक बँकेने टेक्निकल एज्यूकेशन क्वॉलिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्रॅम केला होता. त्याच्या अंतर्गत जी महाविद्यालये किंवा विद्यापीठे स्वायत्त होतील त्यांना जागतिक बँकेकडून निधी मिळणार होता...

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या विधेयकावर जवळपास 26-27 मिनिटे भाषण केलेले आहे. त्यांनी विधिमंडळाला सादर केलेल्या अहवालातील दाखले दिले आहेत. सन्माननीय सदस्यांनी अगदी रास्त मागणी केली आहे. विधिमंडळाचे हे अधिवेशन संपेपर्यंत हया ज्या बाबी त्यांनी सांगितल्या आहेत त्या तपासून त्यावर शासन काय निर्णय घेणार आहे का ? हे सांगण्यास हरकत नाही. मला वाटते की, मंत्रिमहोदयांनी तसे करावे.

प्रा.वर्षा गायकवाड : होय. सभापती महोदय, सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 13 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 13 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक

(RESOLUTION UNDER ARTICLE 368 OF THE CONSTITUTION OF INDIA FOR RATIFICATION OF THE CONSTITUTION
(ONE HUNDRED AND NINTH AMENDMENT) BILL BY HON. MINISTER OF STATE FOR GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT)

प्रा. फौजीया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील ठराव मांडते.

"संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केल्याप्रमाणे संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक, 2009द्वारे प्रस्तावित करण्यात यावयाच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 368 च्या खंड (2) मधील परंतुकाच्या खंड(घ) च्या कक्षेत येणा-या सुधारणेचे हे सभागृह अनुसमर्थन करीत आहे."

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. प्रथमतः हा ठराव मांडण्यास माझी हरकत आहे. आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील बाब क्रमांक सात "महाराष्ट्र विधानपरिषद नियम 156 अन्वये माननीय मुख्यमंत्र्यांचा ठराव" याप्रमाणे आहे. विधानपरिषद नियम 156 प्रमाणे हा ठराव येथे आणलेला आहे. या नियमाप्रमाणे कामकाज करताना नियम 155 वाचावा लागतो. नियम 155 असा आहे :

(1) संसद सभागृहाकडून संविधानातील सुधारणेसंबंधातील अनुसमर्थनाबाबत संदेश मिळताच, शक्य तितक्या लवकर सचिव विधेयकासह संदेशाची एक प्रत, सभागृहाच्या पटलावर ठेवतील."

म्हणजे कमाल जमीन धारणा कायदा रद्द झाल्यानंतर जी कार्यपध्दती अवलंबिली ती याबाबतीत देखील अवलंबावयाची आहे. पुढे असे म्हटलेले आहे,

(2) "सचिव, विधेयकासह, संदेशाची एक प्रत प्रथमतः योग्य संधी मिळताच, राज्य शासनाकडे पाठवतील."

या नियमाप्रमाणे ती प्रत आमच्याकडे आलेली आहे. नियम 156 पुढील प्रमाणे आहे :

(1) नियम 155 अन्वये संदेश पटलावर ठेवण्यात आल्यानंतर,केणत्याही सदस्यास, तीन दिवसांची सूचना देऊन विधेयकाद्वारे प्रस्तावित करण्यात आलेल्या संविधानाच्या सुधारणेचे अनुसमर्थन करण्यात यावे असा ठराव मांडता येईल."

(2) सभापती, सभागृहाच्या नेत्याशी विचारविनिमय करुन ठरावावरील चर्चेसाठी दिनांक निश्चित करतील."

सभापती महोदय, आजचा हा चर्चेचा दिनांक ठरविला तो सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करुन ठरविलेला आहे असे मी समजतो. या बाबतीत विरोधी पक्षनेत्यांशी विचारविनिमय केलेला असेल तर त्याची मला माहिती नाही. नियम 156 मध्ये पुढे असे म्हटलेले आहे :

(3) अशा ठरावासंबंधात कोणतीही सुधारणा प्रस्तावित करता येणार नाही.

(4) सभापतीना योग्य वाटेल तर,त्यांना भाषणासाठी कालमर्यादा विहित करता येईल." या विधेयकावर चर्चा घडवून आणण्याचे अधिकार माननीय सभापतींना आहेत. केन्द्राकडून आलेल्या घटनादुरुस्ती विधेयकामुळे राज्यावर काय परिणाम होतील यासंबंधी चर्चा करावयाची असेल तर त्याकरिता विरोधी पक्षाला विचारात घेऊन निश्चित वेळ देण्यासंबंधीची तरतूद नियम 155मध्ये आहे. नियम 157 पुढील प्रमाणे आहे :

(1) सभागृहाकडून ठराव संमत करण्यात आला तर नियम 155 मध्ये निर्दिष्ट केलेला संदेश ज्या संसद सभागृहाकडून आला असेल त्या संसद सभागृहाकडे विधानपरिषदेने सुधारणेचे अनुसमर्थन केले असल्याचा संदेश पाठविण्यात येईल."

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

चर्चेसहित संसदेकडे पाठवावयाचे आहे. ही चर्चा होत असताना आमचे मत व्यक्त करण्याचा अधिकार आपण आम्हाला द्यायचा आहे. त्याप्रमाणे सभागृहाचे जे मत झालेले आहे ते आपण पाठवावयाचे आहे. दोनमध्ये म्हटले आहे की, सभागृहाने ठराव फेटाळला असेल तर....हे सर्वात महत्वाचे आहे. हे आपल्यालाच लागू नाही. देशातील सर्व विधानसभा आणि विधानपरिषदांना संसदेमध्ये जो नियम केला तो लागू आहे. सभागृहाने ठराव फेटाळला असेल तर विधानपरिषदेने सुधारणेचे अनुसमर्थन केले नसल्यास त्या बाबतचा संदेश उपरोक्तपणे पाठविण्यात येईल. संसद सभागृहाचा संदेश ज्या अधिवेशनात पटलावर ठेवण्यात आला असेल त्या अधिवेशनात कोणताही ठराव मांडण्यात आला नाही तर सचिव ज्या संसद सभागृहाकडून संदेश आला असेल त्या संसदेस अशा पध्दतीने पाठविण्यात येईल. हे कशासाठी आले आहे? घटनेच्या कलम 368 नुसार हा प्रस्ताव आलेला आहे. घटनेच्या कलम 368 प्रमाणे अशा प्रकारचा प्रस्ताव संसद सभागृहात मंजूर करताना कशा पध्दतीने करावा हे मी वाचून दाखवित नाही. परंतु कशा पध्दतीने करावा, ठरावाच्या बाजूने किती बहुमत असावे, कोणत्या पध्दतीने बहुमत असावे, 2/3 बहुमत असेल तर, साधे बहुमत असेल तरी हा संदेश राज्यांकडे पाठवायचा आहे. अशाप्रकारे कलम 368 नुसार असा प्रस्ताव देशातील सर्व विधीमंडळांकडे गेला. देशातील 50 टक्के राज्यांनी तो फेटाळून लावला तर ती घटनेची दुरुस्ती बाद होते असा हा गंभीर प्रस्ताव आहे. फक्त आला, आम्ही मांडला हा विषय नाही. या देशामध्ये भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आली आहे. त्या त्या भागामध्ये प्रस्ताव पाठवित असताना संसदेच्या सुधारणेचे हे मूळ पुस्तक आमच्याकडे आले. संपूर्ण देशात ही पध्दत लागू आहे. संसदेमध्ये झालेली भाषणे यामध्ये छापलेली आहेत. ती सर्व भाषणे मी वाचून काढली आहेत. त्यामुळे संसदेतील सन्माननीय सदस्यांची मते समजली. देशातील विविध पक्षांचे या घटना दुरुस्तीवर काय मत आहे याचे मार्गदर्शन झाले. घटनेतील बदल आम्ही का मान्य करीत आहोत या संदर्भातील भाषणे वाचायला मिळाली. सगळ्यात महत्वाचे म्हणजे संसदेमध्ये जशी भाषणे झाली तशी शब्दश: यामध्ये छापून आलेली आहेत. शब्द लक्षात घ्या. सचिवांना मी सांगू इच्छितो. भाषण इंग्रजीमध्ये केले ते इंग्रजीत छापलेले आहे. हिंदीमधून भाषण केले ते हिंदीत छापलेले आहे. त्या भाषणांचे भाषांतर केलेले नाही. जसेच्या तसे छापून आलेले आहे. या प्रस्तावावर मतदान कसे झाले तेही नमूद केलेले आहे. मतदान करणाऱ्यांची नावेही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 18:40

श्री.दिवाकर रावते..........

नमूद केलेली आहेत. अशा प्रकारचा सुंदर प्रस्ताव वाचावयास मिळाल्यामुळे आम्हाला उचित मार्गदर्शन झाले. केंद्र सरकारकडून ठरावाचे कसे आयोजन केले जाते, नोंद कशी केली जाते तेही अनुभवयास मिळाले. कोणी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले, कोणी प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले त्यांचीही नावे नमूद केलेली आहेत. अशा प्रकारचा ठराव दोनवेळा पारित केला. असा प्रस्ताव या सभागृहात आल्यानंतर कार्यक्रमपत्रिकेवर तो दर्शविण्यात आला, नियमात काय तरतूद आहे हे मी सांगितले आहे. सदनाचा अधिकार काय हे मी सांगितले आहे. कोणाला तुम्ही विश्वासात घेतले नाही. प्रस्ताव मांडण्याची वेळ निश्चित केलेली नाही. ठीक आहे. मी समजू शकतो, ठरावाचे गांभीर्य लक्षात घेता ते क्षम्य समजतो. आरक्षण आणखी 10 वर्षे वाढवावे अशा प्रकारचा प्रस्ताव आहे. आम्ही त्यावर चर्चा करु शकतो. सरकारला वाटत असले तरी 10 वर्षेच का? एकदाच काय ती 25 वर्षांची तरतूद करा आणि मॅन्डेट करा. यापुढे या देशामध्ये जेवढे लोकसभेचे मतदारसंघ आहेत ते वाढणार नाहीत. 2030 पर्यंत वाढणार नाहीत. घटना दुरुस्ती झाली, निर्णय झाला. असतील ते मतदार कमी जास्त होतील. तसे नियोजन होईल. परंतु मतदारसंघ वाढणार नाहीत. त्यांची निर्मिती बदलणार नाही, आरक्षण बदलणार नाही. सभापती महोदय, लोकसभा किती गांभीर्याने काम करते?

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

आपण त्याचा विचार करुन घेतला पाहिजे. अन्यथा बिल घाईघाईने पास करायचे, गोंधळात पास करुन टाकायचे असेच सुरु असते. मी आज हे विधेयक लवकर घ्या असे सकाळीच सांगितले. कारण सकाळपासून रात्री उशिरापर्यंत आपण बसतो आणि सरकारला सहकार्य करतो याचेही शासनाने भान ठेवावे. अन्यथा नियमानुसार कामकाज चालविण्याचा विचार केला, त्यासाठी आग्रह धरला तर फक्त 6 तास सभागृह चालवा आणि कामकाजाचे दिवस वाढवा अशी परिस्थिती येऊ शकते.....अडथळा.....मी काही हिंदी द्वेष्टा नाही की इंग्रजी द्वेष्टा नाही. परंतु मला मराठीबद्दल अभिमान आहे. माझी मुले सुध्दा मराठी शाळेतूनच शिकली. तसा मी बहुभाषिक आहे. इतरही भाषा शिकण्याचा मी प्रयत्न केला. मी बंगाली भाषा तसेच जर्मन भाषा शिकण्याचा प्रयत्न केला याचा अर्थ आईचे ममत्व जात नाही. मूळ विषयावर येत असताना मला असे सांगावयाचे आहे की, लोकसभेमध्ये किती अत्युच्च परंपरा जतन केली जाते हे यावरुन दिसून येते. तेथे महिलांसाठी आरक्षण असावे असा नुसता विषयच आला तर सर्वच गोंधळून गेले की "अपना क्या होगा" आमचे काय होईल या भीतीपोटी सर्व हादरुन गेले होते. ते आरक्षण आजही मंजूर झालेले नाही. त्यावर तोडगा काढण्याचा मात्र प्रयत्न करण्यात आला होता. तो तोडगा तर अतिशय भयानक असा होता. त्यानुसार एकाच मतदारसंघात जेथे महिलांसाठी राखीव जागा असेल तेथे स्त्री आणि पुरुषांनी निवडणुकीला उभे रहावयाचे असा तो तोडगा होता. अशी तरतूद केली तर या देशावर आणखीच आक्रीत वेळ येणार. या महिला आरक्षणामध्ये मूळ आरक्षण दिले तर एकाच घरातील नवरा आणि बायको सुध्दा निवडणुकीसाठी उभे राहतील. म्हणजे संपूर्ण सत्ता आपल्या घरातच. अशीच सवय लागते हे आपल्याला माहीत आहे. परंतु महिलांच्या पदरात हे दान टाकण्याची सदिच्छा अजून तरी संसदेने दाखविली नाही. नुकतीच मतदारसंघांची पुनर्रचना झाली त्यात अशा प्रकारच्या भानगडी वगैरे त्यांनी केल्या नाही. या विधेयकाच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा झाली असती तर आम्ही सुध्दा म्हटले असते की, या आरक्षणासाठी दहाच वर्षे कशाला. प्रत्येक राज्याला आपण संधी देतो, कायद्याबद्दल घटनात्मक संधी देतो मग इतकी वर्षे हे चालत आले आहे आणि आता 10 वर्षेच कशाला 25 वर्षे एकदम लागू करुन टाका अन्यथा घटनेतील कलमानुसार राज्य बरखास्त करण्यात येईल, अशा प्रकारे कायद्याचा बडगा दाखविल्याशिवाय सत्ताधाऱ्यांचा माज उतरत नाही.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

अशी घटना दुरुस्ती आली असताना त्यावर बोलण्याची, विचार व्यक्त करण्याची संधीच नाही हे योग्य नाही. माननीय सभापतींच्या दालनात मला माननीय सचिवांनी मार्गदर्शन केले. परंतु मी आता सभागृहात केवळ माझा हक्क सांगण्यासाठी उभा राहिलो आणि यावर सुध्दा चर्चा होऊ शकते. अन्यथा हा देवाचा संदेश आलेला आहे तो वाचणार आणि पावला त्याला पावला नाही तर डुबला तो डुबून जाईल....

**उपसभापती** : मी देखील आपल्याला बोलण्याची संधी दिलेली आहे.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आमच्यासाठी तेथे बसला आहात याची आम्हाला जाणीव आहे. आपण जर तेथे नसता तर आम्हाला कोण सांभाळणार होते, हे सांभाळू शकत नाहीत. यांना तर राग आला की ते काहीच बघत नाहीत. कशासाठी झाले, काय झाले हे न पाहता आम्हाला निलंबित केले जाते. आम्ही आमचा अधिकार सांगण्याचा प्रयत्न केला तरी तो आम्हाला मिळत नाही. प्रत्येक राज्यामध्ये ही दुरुस्ती पाठवून त्या त्या राज्यांची मते त्यावर मागविली जातात. अशा प्रकारे या विद्यापीठावर एकमुखाने काहीही सांगू शकलो नाही, खरे तर आम्ही सांगू शकलो असतो परंतु महाराष्ट्र विधान परिषदेने नियम 156 अन्वये माननीय मुख्यमंत्र्यांचा ठराव येथे आणला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, संसदीय कार्यपध्दतीत सन्माननीय सदस्यांना अशा प्रकारची भिती आपण घालू नका. सगळेच तशा प्रकारचे आहेत असे आपण समजू नका. या सदनाचे सर्वच्या सर्व सदस्य संसदीय कार्यपध्दतीमध्ये ज्ञानी आहेत. या ठिकाणी आपण ठराव मांडला की, "संसदेच्या दोन्ही सभागृहाने संमत केल्याप्रमाणे संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक, 2009 द्वारे प्रस्तावित करण्यात यावयाच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 368 च्या खंड (2) मधील परंतुकाच्या खंड (घ) च्या कक्षेत येणा-या सुधारणेचे हे सभागृह अनुसमर्थन करीत आहे." हा जो ठराव मराठीतून दिलेला आहे तो सर्वांना समजला आहे असे मला वाटते. परंतु हा ठराव मराठीतून दिल्यानंतर या ठरावाचे इंग्रजी भाषांतर देण्यात आलेले आहे ? माझ्या आयुष्यात मी पहिल्यांदाच असे बघतो आहे. माझ्या कार्यक्रम पत्रिकेत या ठरावाचे इंग्रजी भाषेत ट्रान्सलेशन देण्याची काय गरज होती ? मराठीत ठराव मांडल्यानंतर हा ठराव पुन्हा इंग्रजी भाषेमध्ये का मांडला ? माझी राज्य भाषा मराठी आहे, या राज्याचा कारभार मराठी भाषेतून चालतो आणि विधी मंडळाचे कामकाज मराठीतूनच चालले पाहिजे असे असतांना माझ्या कार्यक्रम पत्रिकेत हा प्रस्ताव तुम्ही इंग्रजी भाषेत का दिला ? सचिवांचे कम्यूनिकेशन व्यवस्थित होत नाही असे यावरुन दिसते. हे कम्यूनिकेशन केंद्राचे सचिव आणि आपल्या सचिवांचे इंग्रजी भाषेतून म्हणजे त्रिभाषा सुत्राप्रमाणे कम्यूनिकेशन असू शकेल. परंतु विधी मंडळाच्या कार्यक्रम पत्रिकेवर मराठीत एकदा ठराव दिलेला असतांना हा ठराव इंग्रजी भाषेतून का आणला ? इंग्रजी भाषेतून हा ठराव आणण्याची गरज का पडली ? आपण कोणासाठी इंग्रजीमध्ये ट्रान्सलेशन केले ? या ठिकाणी असलेल्यांपैकी कोणाला मराठी समजत नाही म्हणून तुम्हाला इंग्रजीत ट्रान्सलेशन करावे लागले ? येथे बसलेल्या कोणत्या सदस्यांला मराठी समजत नाही ते एकदा सांगा. आम्हाला मराठी येत नाही म्हणून आम्ही इंग्रजी भाषेतून ठरावाचे ट्रान्सलेशन केले याबाबत सचिवांनी आम्हाला सांगितले पाहिजे. सचिवांनी आम्हाला सांगावे की, या सदनात असे दोन चार आमदार आहेत की, त्यांना मराठी समजत नाही म्हणून इंग्रजीत ट्रान्सलेशन करण्यात आले आहे ? आता आपण ही जी प्रथा सुरु केली आहे त्यामुळे आबू, साबू, बाबू सांगणार की, हमें उर्दु भाषा में दे दो, हिंदी में दे दो, तामिल में भी दे दो म्हणजे मराठी ऊपर और नीचे

....2...

श्री. दिवाकर रावते....

सब. सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे. विधानमंडळाच्या कार्यक्रम पत्रिकेवर इंग्रजी भाषांतर करुन मला आपण काय समाजावयाचा प्रयत्न करीत आहात ते मला एकदा कळले पाहिजे. माझी कार्यक्रम पत्रिका आपण बिघडवून टाकली आहे. महाराष्ट्र राज्याचे हे विधी मंडळ स्थापन झाल्यापासून कार्यक्रम पत्रिका मराठी भाषेतूनच छापण्याची प्रथा होती ती प्रथा बिघडविण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला ? अर्बन लँड सिलींगचा अशाच प्रकारचा एक केंद्राचा प्रस्ताव आला होता त्यावेळी इंग्रजी भाषेतून त्याचे भाषांतर करण्यात आले नव्हते. येथून हा प्रस्ताव मंजूर करुन केंद्राला पाठवायचा होता तरी त्यामध्ये इंग्रजीचा उल्लेख सुध्दा नव्हता. या प्रस्तावामध्ये तर खूप घोळ होता. त्यामुळे आम्हाला त्यावर बोलू सुध्दा दिले नाही. सचिव महोदय, मला आपण नियम दाखऊ नका. तुम्ही जर नियमाचा आधार घेतला तर उद्यापासून हे विधी मंडळ चालू शकणार नाही. हिंदी भाषेतून बीले सर्क्यूलेट केली जातात याची मला माहिती आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधीमंडळाची कार्यक्रम पत्रिका मराठी भाषेतूनच असली पाहिजे हा माझा आग्रह आहे आणि त्यासाठी तुम्ही आम्हाला नियमांचा दम देत असाल तर ते योग्य होणार नाही. तुम्ही या सभागृहातून आम्हाला आयुष्यभर जरी काढून टाकले तरी चालेल. मराठीची अस्मिता तुम्ही जर पायदळी तुडवायला निघाला असाल तर कोणाला येथे बसण्याची इच्छा आहे ? हे महाराष्ट्राचे विधीमंडळ आहे. आम्हाला आपण अशा प्रकारे ललकारु नका. आम्ही आमदारकीसाठी लालची नाही. आमदारकी ही आमच्या आयुष्याची कमाई नाही किंवा तो आमचा धंदा देखील नाही. मला सुध्दा नियमांची माहिती आहे. कार्यक्रम पत्रिकेत तुम्हाला इंग्रजी भाषेतून लिहिण्याची गरज काय होती ? या कार्यक्रम पत्रिकेवर कोणासाठी इंग्रजीमधून ट्रान्सलेशन करण्यात आले आहे ? या ठिकाणी आज जी बाब घडलेली आहे ती अत्यंत आक्षेपार्ह आहे. म्हणून हे विधेयक आम्हाला कळले की,नाही हे सांगण्याचा मी पहिल्यांदा प्रयत्न करीत होतो. माझे सांगण्यात काही चुकले असेल तर आपण ते दुरुस्त करु शकता. मी तेवढा ज्ञानी नसेनही. हे सर्व करीत असतांना आपण कार्यक्रम पत्रिकेवर मराठी प्रस्तावाचे इंग्रजीमध्ये भाषांतर का केले हा माझा मुळ मुद्दा आहे. विधेयक मांडण्याच्या अगोदर मी आपल्याला थांबण्याची विनंती केली ती एवढयासाठीच केली होती

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

की, माननीय मंत्रीमहोदय हे आम्हाला मान्य नाही, ही बाब अत्यंत निषेधार्ह आहे म्हणून. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर कार्यक्रम पत्रिकेतील सात नंबरच्या क्रमांकावरील प्रस्ताव असा असा होता असे आपण इंग्रजीत लिहिले असते तर त्यांना कळले असते. त्या सचिवांना हा विषय आमच्या कार्यक्रम पत्रिकेवर होता की, नाही याची नोंद करावयाची आहे ना. सचिव खात्याला मी सांगितल्या प्रमाणे करता आले असते. त्यामुळे त्यांनी त्याच्यावर रिमार्क्स लिहिले असते. कारण जी काही कागदपत्र आहेत ती कायमस्वरुपी तेथे जात असतात.

यानंतर श्री गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ SBT/ KGS/ ST/ प्रथम श्री.सुंबरे 19.00

श्री.दिवाकर रावते..

अशा प्रकारे मराठीची एवढया मोठया प्रमाणात अवहेलना होणार असेल तर ती असहय आहे, निषेधार्ह आहे, अत्यंत खेदजनक आहे, ती स्वाकारार्ह तर अजिबातच नाही, असे नमूद करतो आणि मी येथेच थांबतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4L2

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 156 अन्वये माडण्यात आलेल्या ठरावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सचिवांच्या बाबतीत एक आक्षेप घेतला आहे. मार्गदर्शन करीत असतांना या विधेयकावर चर्चा करता येणार नाही अशा प्रकारे ते बोलले आहेत. हे कायदेमंडळ आहे आणि या ठिकाणी एखादा अशिक्षित मनुष्यसुध्दा लोकशाहीमध्ये सभापती म्हणून बसू शकतो. ज्याला लिहिता वाचता येत नाही तो मनुष्यसुध्दा या ठिकाणी सभापती म्हणून बसू शकतो. माननीय सभापतीना मार्गदर्शन करण्याचे काम सचिवांचे आहे. नागपूरच्या अधिवेशामध्ये याच सभागृहामध्ये मागे विधि विभागाकडून एक विधेयक मांडण्यात आले होते. हायकोर्टाने असा असा कायदा बनवावा अशा प्रकारचे निदेश दिले होते असे त्यावेळी सांगण्यात आले होते .त्याला मी आक्षेप घेतला होता आणि दोन दिवस ते विधेयक रोखून धरले होते. हायकोर्टाने दिलेल्या निदेशाप्रमाणे या ठिकाणी कायदे बनविले जात नाहीत . अशा अशा प्रकारचा कायदा बनवावा असे हायकोर्ट कायदे मंडळाला निदेश देऊ शकत नाही. आम्ही बनविलेल्या कायद्याप्रमाणे हायकोर्टाने निर्णय द्यावयाचे आहेत ही भूमिका मी त्यावेळी मांडली होती.

सभापती महोदय सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि त्यांना धन्यवादही देतो. मी जवळजवळ सात वर्षापासून या सभागृहात आहे. तेव्हा आमच्या सारख्या नवीन सन्माननीय सदस्यांना त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. सभागृहामध्ये विधेयकावर जास्त वेळ चर्चा झाली पाहिजे असा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा नेहमीच असा आग्रह असतो परंतु आज त्याच्या उलट होत असून या चर्चेला दहा ते पंधरा मिनिटांचा वेळ दिला जातो..

प्रा.फौजिया खान : तसे नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा. सन्माननीय सदस्यांनी जे विचार मांडलेले आहेत त्यातील गाभा माझ्या लक्षात आला असून सन्माननीय सदस्यांचे म्हणणे पूर्ण झाल्यानंतर मी निर्णय देतो.

3...



VTG/ KTG/ SBT/ KGS/ ST/ प्रथम श्री.सुंबरे

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, या ठिकाणी कायदे तयार करण्यासाठी जी विधेयके मांडण्यात येतात त्यावर दिवसेदिवस चर्चा कमी व्हावयास लागली आहे. विधिमंडळाचे अधिवेशन नागपूरमध्ये पूर्वी पाच ते सहा आठवडे चालत होते परंतु ते आता सहा दिवसापर्यंत कमी व्हावयास लागले आहे. कायदे तयार करीत असतांना विधेयकावर जास्तीत जास्त चर्चा व्हावयास पाहिजे.त्या दृष्टीने कामकाज पत्रिका तयार करण्यात आली पाहिजे. सभापती महोदय, विधेयकावर बोलण्यासाठी एक दोन तास तरी मिळावेत अशा प्रकारे कामकाज पत्रिका तयार केली पाहिजे. अशी मी आपल्याला विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी धन्यवाद देतो की , त्यांनी चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन सचिवांना केले...

**उपसभापती** : असे म्हणणे बरोबर नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अनेकदा विधेयक घाई घाईने मंजूर केले जाते परंतुं त्या विधेयकावर आमचे विचार मांडण्यासाठी आम्हाला पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. विधेयकावर सन्माननीय सदस्य कितीही वेळ बोलू शकतात असे नियमात म्हटलेले आहे. एका एका विधेयकावर दोन दोन दिवस चर्चा झालेली आहे असे आम्ही लायब्ररीमधील जुन्या प्रोसिडींग्जमध्ये वाचलेले आहे.या ठिकाणी आम्ही चुकीचे काही बोलत असू वा चुकीचे वक्तव्य करीत असू तर आपण आम्हाला तसे सांगू श्ंकता की, हे कायद्यात नाही, नियमात नाही, तुम्ही चुकीचे बोलत आहात वगैरे वगैरे. त्यानंतर पुढच्या वेळी आम्ही त्यामध्ये जरुर सुधारणा करु. परंतु या ठिकाणी घाई गडबडीत ठराव मंजूर करीत आहात ते बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी सभागृहाला चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन केले असल्या मुळे मी त्यांना धन्यवाद देतो आणि ही चूक पुन्हा होता कामा नये अशा प्रकारची विनंती मी आपल्याला करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी संसदीय कार्यपध्दतीबद्दल अत्यंत मौलिक विचार मांडले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते.

सभापती महोदय, लोकसभेच्या महासचिवांकडून संविधान (एकशे नववी सुधारणा ) विधेयक, 2009 यासह संविधानातील सुधारणेच्या अनुसमर्थनार्थ आलेला संदेश दिनांक 8 डिसेंबर 2009 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला होता. त्याला मान्यता देण्यासाठी ते आता सभागृहासमोर सादर केले जात आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ...

मी मराठीमध्ये आता आपल्याला सायटेशन वाचून दाखविते. "संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केल्याप्रमाणे संविधान (एकशे नववी सुधारणा) विधेयक, 2009 द्वारे प्रस्तावित करण्यात यावयाच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 368 च्या खंड (2) मधील परंतुकाच्या खंड (घ) च्या कक्षेत येणाऱ्या सुधारणेचे हे सभागृह अनुसमर्थन करीत आहे."

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा याला आक्षेप आहे, तो मला येथे मांडू देण्यास आपण मला परवानगी द्यावी. ...

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण मला प्रथम हा ठराव वाचून प्रस्तुत करू द्यावा. मग पाहिजे असल्यास आपण आपले आक्षेप नोंदविण्यासाठी उद्या देखील बसू. ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी या ठरावाचे मराठीचे सायटेशन वाचले आहे. पण आम्हाला संसदेत जी मूळ दुरूस्ती झालेली आहे ती आम्हाला मराठी भाषेत पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. आम्हाला पूर्णपणे मूळ दुरूस्तीचे मराठीत रूपांतर करून मिळाले पाहिजे. संसदेत कोणताही कायदा पास झाल्यानंतर, हे संघराज्य असल्याने.. ही काही एका देशाची अशी राजवट नाही., ...

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण माझे एक मिनिट ऐकून घ्यावे. या प्रस्तावावर इतर सदस्यांना जेव्हा भाषण करण्याची संधी मिळेल तेव्हा मी आपणाला देखील संधी देईन. केवळ आपण आता एक मिनिट थांबावे. मी हा प्रश्न येथे प्रस्तुत करतो, तेवढे काम मला आपण करू द्यावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ही अतिशय महत्त्वाची दुरूस्ती आहे आणि ही दुरूस्ती आताच येथे सन्माननीय सदस्य श्री.रावतें यांनी सांगितल्याप्रमाणे जी मूळ दुरूस्ती आहे, जी संसदेने दोन्ही सभागृहात संमत करून घेतली आहे ती पूर्णपणे मराठी भाषेतून आम्हाला मिळाली पाहिजे, म्हणजेच मूळ दुरूस्तीचे मराठी रूपांतर आम्हाला मिळाले पाहिजे. ही एक बाब आहे. कारण ही काही छोटीशी सुधारणा नाही तर या देशाचा नकाशा बदलणारी सुधारणा आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर आजवर अनेक अन्याय या दुरूस्तीने ऑलरेडी केलेले

..... 4 एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

आहेत. त्या साऱ्या अन्यायाबाबत चर्चा करावयाची असेल तर त्यासाठी आपल्याला भरपूर वेळ मिळाला पाहिजे. विधेयकावर चर्चा करण्यासाठी भरपूर वेळ मिळाला पाहिजे, तसा आपला नियमच आहे. त्यावेळी सदस्यांना अडविता येत नाही. हा भाग तर आहेच. परंतु ही सुधारणा मांडण्यापूर्वी तिचा पूर्ण मराठी तर्जुमा आम्हाला उपलब्ध करून दिला पाहिजे तरच आम्हाला त्यावरील चर्चेत नीट सहभागी होता येईल. आम्हाला इंग्रजी कळते आहे पण मराठीत ते सारे मिळण्याचा आमचा हक्क आहे आणि मराठीत अधिक चांगले आम्हाला समजू शकेल असे मला वाटते म्हणून मूळ सुधारणा जी इंग्रजीमध्ये आहे तिचा मराठी तर्जुमा आपण आम्हाला अगोदर उपलब्ध करून द्यावा. केवळ वरचे सायटेशन येथे वाचून दाखवायचे एवढे पुरेसे नाही. पूर्णपणे तुम्ही मराठीत हे सादर करा. म्हणजे नेमकी सुधारणा काय आहे, 60 वर्षाची 70 वर्षे केलेली आहेत पण ती का केली ? कशी केली ? हे समजण्यासाठी जी मूळ सुधारणा आहे, जी संसदेने पारित केलेली आहे, ती सुधारणा कळण्याचा या विधीमंडळाला पूर्ण अधिकार आहे. तसेच ती फेटाळायची किंवा मंजूर करायची हे ठरविण्याचा देखील सभागृहाला पूर्ण अधिकार आहे. त्या आमच्या अधिकारापासून तुम्ही आम्हाला वंचित करू शकत नाही. तोपर्यंत वाटल्यास हे सारे काम स्थगित ठेवावे. या मूळ सुधारणेचे मराठीत भाषांतर आपण आम्हाला करून द्यावे, कारण आम्हाला या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे व विस्ताराने बोलावयाचे आहे. आम्ही तुम्हाला हे घाईघाईने मंजूर करू देणार नाही.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यातील पहिली गोष्ट अशी की, हे जे कामकाज सभागृहापुढे आज आले आहे तरी त्याबाबत आताच मंत्री महोदयांनी सांगितले आहे की हे यापूर्वी डिसेंबर 2008 मध्ये हा मसुदा सगळ्यांना वितरित केला होता. त्यानंतर कामकाज सल्लागार समितीमध्ये देखील आपल्या सगळ्या नेत्यांच्या उपस्थितीत हा विषय चर्चिला गेला. त्यानंतर आता सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी याबाबतची त्यांची भूमिका येथे मांडली. त्यासाठी आपण त्यांना पूर्ण परवानगी दिली. त्यानंतर मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनाही बोलण्याची संधी दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, आपल्याला देखील बोलण्याची मी संधी दिली आहे. आता तुम्ही म्हणत असाल की, याचा आम्हाला पूर्णपणे मराठीत तर्जुमा द्या तर ही तुमची मागणी रास्त आहे असे मी म्हणेनही परंतु ही मागणी तुम्ही त्यावेळीच करायला पाहिजे होती. ...मी कोठे चुकत असेल तर तुम्ही मला सांगा. पण प्रथम आपण सर्वांनी माझ
ो म्हणणे पूर्ण होऊ द्या. .... 4एम 3 ...



KBS/ KGS/ ST/ श्री. गायकवाड नंतर --- 19:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण अधिकारपदी बसला आहात. तेव्हा आपण ज्या पदावरून बोलत आहात त्या पदावरून आपण आम्हाला जे सांगाल तो आम्हाला आदेश आहे, आपण जो निर्णय द्याल तो आम्हाला मान्य असणार आहे. पण आपण या बाबत काही निर्णय घेण्यापूर्वी मी एकच गोष्ट आपल्याला सांगू इच्छितो. मी घटनेचे 368 वे कलम पूर्णपणे वाचले आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केल्यानंतर ते विधेयक राष्ट्रपतींना मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी देशातील 50 टक्के विधीमंडळांनी मंजूर केले पाहिजे. आता या देशामध्ये तीन लिस्टस् आहेत. एक स्टेट लिस्ट आहे, एक कंकरंट लिस्ट आहे आणि तिसरी सेंट्रल लिस्ट आहे. घटनेप्रमाणे राज्यांचे अधिकार अबाधित आहेत आणि फेडरल गव्हर्नमेंट, सेंट्रल गव्हर्नमेंट हे सुप्रीम आहे. पण ज्या अर्थी घटनेच्या निर्मात्यांनी पार्लमेंटने पास केल्यानंतर देशातील अर्ध्या विधीमंडळांचे समर्थन घ्या असे म्हटले आहे त्याचे स्पिरीट असे आहे की, आम्ही त्याला विरोध करून फेटाळले तरीदेखील तो अधिकार त्यांचा आहे. तसेच आम्ही देखील या सभागृहात काहीही मांडले आणि फेटाळले तरी विधानसभेमध्ये तुमची मेजॉरिटी असल्याने तेथे आपण हे पारित करून घेऊ शकता. तेव्हा प्रश्न हा याच्या मंजुरीचा वा नामंजुरीचा नाही. पण घाईघाईत यावर चर्चा न होता, यावर सर्व सदस्यांचे समाधान न होता हे पाठविणे हे लोकशाही मूल्यांच्या दृष्टीने योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचा मुद्दा एवढ्याचसाठी बरोबर आहे की, ...

( यानंतर श्री. सरफरे ....4एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

हिंदुस्थानच्या दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर झालेल्या घटना दुरुस्तीचा हा ठराव आहे. ज्या विषयाच्या अनुषंगाने ही सुधारणा करण्यात आली आहे, त्या विषयाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने आम्हाला डॉक्युमेंट दिले पाहिजेत. त्याबाबत फक्त विषय पत्रिकेवर विषय आला आहे. परंतु त्यासंबंधीचे ऑफिशिअल डॉक्युमेंट आम्हाला वितरीत केले नाही. कार्यक्रम पत्रिकेसुध्दा इंग्रजीमध्ये विषय मांडण्यात आला आहे...

**उपसभापती** : ऑफिशिअल डॉक्युमेंट आपणास दिले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ऑफिशिअल डॉक्युमेंट इंग्लिशमध्ये आहे. महाराष्ट्राच्या या सार्वभौम सभागृहाचे कामकाज मराठी भाषेमधून होते. याबाबतीत केंद्र सरकारचा अधिकार आहे हे आम्हाला मान्य आहे. आपण या सभागृहामध्ये कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करतो, त्या आधारावर त्या समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली नाही म्हणून या सदनातील सर्व माननीय सदस्यांचे अधिकार आता गेले आहेत, याबाबत आपले म्हणणे त्यावेळी मांडावयास पाहिजे होते असे याठिकाणी म्हणणे योग्य होणार नाही. ही कॉस्टिटयुशन अमेंडमेंट आहे,हिला एक सँटिटी आहे. या देशाची घटना सार्वभौम असल्यामुळे तिला या सभागृहामध्ये विरोध करण्याचा आपल्याला अधिकार नाही. याचे कारण ते फेडरल गव्हर्नमेंट आहे. आणि फक्त यामध्ये तरतूद अशी आहे की, फक्त 50 टक्के विधीमंडळानी हा ठराव मान्य केला पाहिजे अशी यामध्ये तरतूद आहे. त्यामुळे आमचे समाधान झाले पाहिजे. या सभागृहातील सत्ताधारी पक्षामधील सदस्य असो किंवा विरोधी पक्षामधील सदस्य असो याबाबतीत दोन्ही बाजूकडून सांगोपांग चर्चा झाली पाहिजे. आणि सभागृहाचे समाधान झाले पाहिजे. हा त्यांचा वैधानिक कॉस्टिटयुशनल अधिकार आहे. मी आपणास विनंती करतो की, या सभागृहामध्ये असे अनेक सदस्य आहेत जे कदाचित इंग्लिशमध्ये बोलू शकत नाहीत, किंवा इंग्लिशमध्ये लिहिलेले त्यांना समजू शकत नाही. सभापती महोदय, महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. मंत्रिमहोदय, हा ठराव आम्ही मंजूर करु. परंतु त्यावर आम्हाला बोलावयाचे असल्यामुळे या सुधारणेमध्ये असलेले इंग्लिशमधील स्पिरिट मी समजू शकलो नाही. त्याची डॉक्युमेंट मराठीमध्ये दिली तर त्याबाबत अभ्यास करुन आम्हाला बोलता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. नितीन गडकरी..

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

त्यामुळे त्यावर विचार व्यक्त करण्याचा त्यांना घटनात्मक अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये मराठीमधील अनुवादीत प्रत मागितली असल्यामुळे सरकार म्हणून यामध्ये कोणती सुधारणा केली आहे याबाबतची मराठीमध्ये अनुवादीत केलेली प्रत आम्हाला दिली पाहिजे. ती आपण देणार नसाल आणि आम्हाला इंग्लिश समजते अशी आमच्याकडून अपेक्षा करणार असाल तर आपण ठराव मांडावयाचा आणि आम्ही फक्त हात वर करावयाचे. या सभागृहामध्ये आम्ही फक्त हात वर करण्यासाठी आलो आहोत काय? त्यामुळे माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. तेव्हा या मूळ सुधारणेचा मराठीमध्ये अनुवाद देण्यात यावा. आपणास आता देता येत नसेल तर उद्या मराठीमध्ये प्रत उपलब्ध करुन त्यावर चर्चा करावी. परंतु आपण जर या सुधारणेची मराठीमध्ये प्रत उपलब्ध करुन देणार नसाल तर आणि त्यामध्ये काय आहे हे आम्हाला समजणार नसेल तर सन्माननीय सदस्यांना आपल्या अधिकारापासून आपण वंचित कां करता? या सभागृहामध्ये वैधानिक सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांस संसदेमध्ये संमत झालेल्या या सुधारणेवर काही बोलावयाचे असेल, आणि त्यांना जर इंग्लिशमध्ये काही समजत नसेल तर आपण त्यांचे अधिकार कुंठीत कां करता? त्यावर आपले काय उत्तर आहे? आणि म्हणून सभापती महोदय, या सुधारणेची प्रत आपण आम्हाला उपलब्ध करुन दिली पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या सुधारणेच्या संदर्भात मी मराठीमध्ये सविस्तरपणे निवेदन केले तर चालेल काय? याबाबत मला सभागृहाने अनुमती द्यावी.

श्री. दिवाकर रावते : बेसिक डॉक्युमेंट मराठीमध्ये पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण एखादा विषय या सभागृहामध्ये मंजूर करतो त्यावेळी तो आपल्या सद्सदविवेकबुध्दिला समजला पाहिजे. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. या सभागृहाचे कामकाज आपण मराठीमध्ये चालवीत असल्यामुळे माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना मराठीमध्ये अनुवाद मागण्याचा अधिकार आहे. आता आपणाकडे मराठीतील अनुवाद उपलब्ध नसेलतर तो उद्या सकाळी आपण आम्हाला द्यावा. आम्ही आपल्याला पाठिंबा देऊ, आम्ही याठिकाणी विरोध करण्यासाठी उभे नाहीत..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, या ठिकाणी आपण आम्हाला जे पुस्तक दिले आहे त्यामध्ये देशाच्या सर्वोच्च लोकसभेमध्ये या सुधारणेवर झ ाालेल्या मतदानाची माहिती दिली आहे. त्यामध्ये एकूण 588 सदस्य असलेल्या या देशाच्या लोकसभेमध्ये सुधारणेच्या बाजूने 343 सदस्यांनी व 1 विरोधी असे एकूण 344 सदस्यांनी मतदान केले. म्हणजे या देशाच्या सर्वोच्च लोकसभेत 244 खासदारांनी या विषयावर मतदान केले नाही. त्यामुळे या सुधारणेवर एक तृतियांश किंवा दोन तृतियांश असे मतदान नाही तर झालेल्या मतदानाचा आकडा दिलेला आहे. तेव्हा अशाप्रकारे त्या 244 सदस्यांच्या मनामध्ये काय असेल? या देशामध्ये क्रांती घडविणाऱ्या एका विषयासाठी घटनात्मक दुरुस्ती असतांना त्यावर 244 सदस्यांनी कां मतदान केले नाही? त्यावेळी हे सदस्य तटस्थ कां राहिले? असाही विषय यामध्ये आहे, ही सर्व घटनात्मक बाब आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, फक्त एक परिच्छेद आहे आणि तो मी वाचून दाखविते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, परिच्छेदाचा प्रश्न नाही. आम्हालाही तेवढे इंग्रजी वाचता येते, आम्हालाही तेवढे इंग्रजी कळते. ही अतिशय महत्वाची घटना दुरुस्ती आहे.मुद्दा आमच्या अधिकाराचा आहे. त्यानुसार आम्हाला मराठीतून माहिती कळली पाहिजे. कारण हे संघ राज्य आहे, हे केंद्रीय राज्य नाही की, दिल्लीमध्ये ठरल्यानंतर आपण त्याप्रमाणे सगळे केले. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी सांगितले, त्याप्रमाणे हे संघ राज्य आहे आणि संघराज्यामध्ये त्या-त्या राज्याची परवानगी 50 टक्के घ्यावी लागेल. असे जर असेल तर त्या-त्या भाषेमध्ये ते द्यावे लागेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाचे निर्णय आणि काही वेळेला पार्लमेंटचे झालेले जे निर्णय असतात, त्याची कॉमेंट्री लिहिली जाते. खरे म्हणजे विधीमंडळाचे आणि विधीमंडळाच्या सचिवांचे यामध्ये लक्ष घालणे हे काम आहे. ज्यावेळेला आपल्याकडे इंग्रजीमध्ये एवढा मोठा कॉन्स्टीट्युशनल विषय येतो आणि मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब जे बोलले, त्याच्याशी मी सहमत नाही. 344 जणांनी म्हणजे बहुमताने पास झालेला निर्णय असला, तुम्ही म्हणालात तसा एकमताने निर्णय झाला नाही, बहुमताने निर्णय झाला असला तरी तो केंद्र शासनाचा आणि पार्लमेंटचा निर्णय होतो. त्यावेळी कोणी किती विरोध केला याला महत्व नाही. शेवटी हा पार्लमेंटचा निर्णय आहे, तो एस्टॅब्लीश झाला. पण तो निर्णय 100 टक्के लोकांनी त्यांच्या बाजूने मतदान केले असे होत नाही. त्याबाबत आमचा आक्षेप नाही. माननीय मंत्री महोदया, तुमच्या डिपार्टमेंटचे जे प्रोसीजर आहे त्याहीपेक्षा, आमचा आक्षेप असा आहे की, अशा परिस्थितीमध्ये विधी मंडळाच्या सचिवालयाने जे लॉ सेक्रेटरीच्या पदावर आहेत, त्यांनी अशा प्रकारच्या कॉन्स्टीटयुशनल विषय आजच्या कामकाज पत्रिकेवर आलेला असताना, त्यांनी एक कॉमेंन्ट्री तयार करुन द्यावी किंवा डिपार्टमेंटने ती मराठीमध्ये तयार करुन द्यावी.आमच्या पैकी सगळयांना काय असेल ते असेल, आम्ही अभ्यास करु किंवा करणार नाही. पण आमचा याबाबतीत समजण्याचा अधिकार आहे, विचार करण्याचा अधिकार आहे, तो तरी कायम राहिला पाहिजे. ही बाब कमीतकमी विधीमंडळाने तरी करावयास पाहिजे होती.

**सभापती** : ठीक आहे.

. . . .4 ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले होते की,महाराष्ट्राच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची दुरुस्ती आहे. महाराष्ट्रातील दलित जनतेने याबाबतीत अत्यंत तीव्र आक्षेप घेतलेला आहे आणि त्यांच्या जनगणनेच्या संबंधात जो अन्याय झालेला आहे, तो यामध्ये प्रतिबिंबीत होत नाही. त्यामुळे ही जी दुरुस्ती आहे, त्यानुसार केवळ 10 वर्षांनी वाढ होण्याचा मुद्दा नाही म्हणजे याठिकाणी उद्दिष्ट आणि कारणे याचे जे स्टेटमेंट दिलेले आहे, आपण ते पाहिले तर या गोष्टीचे गांभीर्य तुमच्या लक्षात येईल. आपण जर हे गांभीर्य लक्षात घेतले तर मग तुमच्या लक्षात येईल. शेवटी आम्हाला कळण्या-न कळण्याचा मुद्दा नाही. आम्ही सार्वभौम जनतेच्यावतीने चर्चा करीत असतो.त्या जनतेपर्यंत ही चर्चा जावयाची असेल, त्यांनाही हे मुद्दे कळावयास हवे असतील तर घटनेमध्ये नेमकी काय दुरुस्ती झाली, कशासाठी झाली आणि का करण्यात आली हे समजले पाहिजे. हे संघ राज्य आहे आणि संघ राज्यामध्ये प्रत्येक राज्याला आपली भूमिका मांडण्याचा किंवा वेगळे मत मांडण्याचा किंवा सहमती देण्याचा अधिकार आहे. परंतु ते मत मांडत असताना त्याला हे कळले पाहिजे की, आपण मत कशासाठी देत आहोत. तुम्ही या अधिकारापासून त्याला वंचित करु शकत नाही. जर तुम्ही त्याला या अधिकारापासून वंचित करणार असाल तर संघ राज्याच्या भावनेलाच, एकात्मतेलाच तडा जातो आणि हा माझा मुख्य आक्षेप आहे. तुम्हाला जर असा तडा जाऊ द्यावयाचा नसेल तर तुम्हाला नीटपणे मराठीमध्ये मांडावे लागेल,द्यावे लागेल आणि मग त्यावरील चर्चेसाठी वेळ द्यावा लागेल. त्याशिवाय तुम्हाला पुढे जाता येणार नाही.

(सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

याठिकाणी नुसते मांडून चालणार नाही. संघ राज्याची भूमिका काय आहे ? जर तुम्ही त्या भावनेला तडा देत असाल तर ते बरोबर नाही. राष्ट्रीय एकात्मतेच्या बाता करावयाच्या आणि संबंधितांना न सांगता तुम्ही ते रेटून न्यावयाचे, असे चालणार नाही. संसदेमध्ये एखादी गोष्ट झाल्यानंतर त्याला 50 टक्के राज्यांनी मान्यता देण्याचा प्रश्न असतो, त्यावेळेला आम्हालाही वेगळे मत मांडण्याचा अधिकार दिलेला आहे. वेगळे मांडावयाचे की नाही हा भाग वेगळा आहे. परंतु तुम्ही आम्हाला या अधिकारापासून वंचित करु शकणार नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, संसदेमध्ये जे विधेयक मांडण्यात आलेले आहे. त्या विधेयकाची प्रत देखील मराठीमध्ये दिली पाहिजे हा मूळ मुद्दा आहे. या विधेयकामध्ये नक्की काय सांगितलेले आहे, त्याचे उद्देश व कारणे काय आहेत ? हे समजले पाहिजे. याठिकाणी इंग्रजी मध्ये

. . . .4 ओ-3



APR/ KGS/ ST/ 19:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . ..

प्रत दिलेली आहे. पण ती देखील सर्वांना मिळालेली नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी खास करुन जो मुद्दा मांडला आहे, तो मला जास्त महत्वाचा वाटतो की आपल्याकडे काही नियम आहेत. याठिकाणी नियम क्र.156 चा उल्लेख करण्यात आला. या नियमामध्ये आणि 157 च्या कलम (2) मध्ये जो उल्लेख केलेला आहे, तो मला जास्त महत्वाचा वाटतो. याठिकाणी चर्चा घडणे का आवश्यक आहे यासंबंधीचे कारण त्यामध्ये दिसून येईल. मघाशी सन्माननीय सदस्यांनी नियम 156 वाचला होता. त्यामुळे मी तो पुन्हा वाचत नाही. याची एक प्रत येणार, मग आम्हाला ती सचिव देतील. पण ती प्रत देताना सुध्दा मराठीमध्ये देण्यात आली पाहिजे. तशा प्रकारे जर मराठी मध्ये प्रत आली असती तर या विधेयकामध्ये काय मांडलेले आहे हे समजले असते. आता या विधेयकाची प्रत भाषांतर करु दिली जाईल. या विधेयकातील तरतुदीबद्दल नियम 155 अन्वये संदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर . . . .

यानंतर कु.थोरात . . . .

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

कोणत्याही सदस्यास तीन दिवसाची सूचना देऊन, विधेयकाद्वारे प्रस्तावित करण्यात आलेल्या संविधानाच्या सुधारणेचे अनुसमर्थन करण्यात यावे असा ठराव मांडता येईल.सभापती महोदय, तीन दिवसाची सूचना कधी दिली हे आम्हाला कळले नाही. आम्हाला फक्त हे पुस्तक मिळालेले आहे. नियम 156 (2) मध्ये असे म्हटले आहे की, "सभापती, सभागृहाच्या नेत्याशी विचारविनिमय करुन ठरावावरील चर्चेसाठी दिनांक निश्चित करतील." ती चर्चा या ठिकाणी होणे महत्वाचे आहे.नियम 156 (3)मध्ये असे म्हटले आहे की, "अशा ठरावासंबंधात कोणतीही सुधारणा प्रस्तावित करता येणार नाही." हे आम्हाला मान्य आहे. त्यानंतर नियम 156 (4) मध्ये असे म्हटले आहे की,"सभापतींना योग्य वाटेल तर, त्यांना भाषणासाठी कालमर्यादा विहित करता येईल." सभापती महोदय यापुढचा नियम मला जास्त महत्वाचा वाटतो.

नियम 157 (1) मध्ये असे म्हटले आहे की, "सभागृहाकडून ठराव संमत करण्यात आला तर, नियम 155 मध्ये निर्दिष्ट केलेला संदेश ज्या संसद सभागृहाकडून आला असेल त्या संसद सभागगृहाकडे विधानपरिषदेने सुधारणेचे अनुसमर्थन केले असल्याचा संदेश पाठविण्यात येईल." म्हणजे विधानपरिषदेत जर विधेयक मंजूर झाले तर आहे तसे अनुसमर्थन केले असे म्हणता येईल

परंतु त्यापुढे नियम 157 (2) मध्ये असे म्हटले आहे की,"सभागृहाकडून ठराव फेटाळण्यात आला असेल तर" याचा अर्थ विधेयक त्याठिकाणी जरी मंजूर झाले तरी संघराज्याची जी भावना आम्ही याठिकाणी मांडलेली आहे त्या भावनेनुसार आम्ही हा ठराव फेटाळू शकतो. तो ठराव जसा आहे तसाच परत पाठवता येतो. या सभागृहाने तो असंमत केला असे म्हणून विधानपरिषदेला तो ठराव परत पाठविता येईल. म्हणूनच नियम 157 (2) मध्ये असे म्हटले आहे की, सभागृहाकडून ठराव फेटाळण्यात आला असेल तर विधानपरिषदेने सुधारणेचे अनुसमर्थन केले नसल्याबाबतचा संदेश उपरोक्त प्रमाणे पाठविण्यात येईल." म्हणून या विधेयकाची मूळ प्रत इंग्रजीत आहे ती मराठीत देण्यात यावी. आणि मग या ठरावावर चर्चा करण्यात यावी. या ठरावावरील चर्चेसाठी एक दिवस आपण ठरवावा अशी विनंती मी या निमत्ताने शासनाला करु इच्छितो. एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद.

...2..

SMT/ KGS/ ST/

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, मी याठिकाणी जास्त बोलणार नाही परंतु एकूणच या चर्चेचा गोषवारा पाहता ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे की, कुठलीही अमेंडमेंट, कुठलीही घटनादुरुस्ती आल्यानंतर आपल्या प्रशासकीय यंत्रणेकडून त्याची संपूर्ण मराठी प्रत सदस्यांना माहिती करिता देणे आवश्यक आहे.जेणे करुन ते आपल्या मातृभाषेमध्ये त्याबाबतचा विचार उत्तमरीतीने करु शकतील. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, राज्याच्या या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये राज्याच्या भाषेमध्ये अशी प्रत द्यावी, अशी विनंती करावी लागावी ही देखील माझ्या सारख्याला वेदना देणारी गोष्ट आहे म्हणून माझी नम्र प्रार्थना आहे की, सभापती महोदय, आपल्याला याबद्दल काही निर्णय द्यावयाचा असेल तर तो आपण जरुर द्यावा.

**सभापती** : घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सभागृहासमोर जो ठराव आलेला आहे त्याबाबतीमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकरजी रावते, नितीन गडकरी, कपिल पाटील, उल्हास पवार या सर्व माझ्या सहकारी मित्रांनी या ठिकाणी चर्चा केलेली आहे. विशेषत: कपिल पाटील यांचे असे मत आहे की, अशा पध्दतीने घटनादुरुस्तीचा प्रस्ताव लोकसभेने, राज्यसभेने मंजूर केल्यानंतर तो ठराव त्या त्या राज्याच्या विधानसभा, विधानपरिषदांमध्ये रॅटिफिकेशनकरिता दाखल होतो. याठिकाणी जो ठराव आलेला आहे किंवा जे विधेयक आलेले आहे ते त्या राज्याच्या भाषेमध्ये सन्माननीय सदस्यांना मिळाले तर त्यावर सखोल चर्चा करता येईल. अन्य राज्याच्या अनुषंगाने अशा पध्दतीच्या अमेंडमेंटनंतर कोणते परिणाम होतील या दृष्टीनेसुध्दा त्यांनी याठिकाणी सूचना केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी याबाबतीत असे सांगितले की, हे विधेयक इंग्रजीत देण्यात आलेले आहे आणि या विधेयकामध्ये उद्देश व कारणे दिलेली आहेत ती सुध्दा इंग्रजीमध्ये दिलेली आहेत. या विधेयकाचा मराठीत अनुवाद करुन ते विधेयक याठिकाणी सन्माननीय सदस्यांना दिले तर नामदार सदस्य श्री. उल्हास पवार यांनी म्हटल्याप्रमाणे सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण एक नवा पायंडासुध्दा पाडू शकू. लोकसभा किंवा राज्यसभेकडून कोणत्याही पध्दतीचे डाक्युमेंट आल्यानंतर ते डॉक्युमेंट विधानमंडळ सदस्यांना देत असताना त्याचा मराठीत अनुवाद करुन देण्यात आले तर ते योग्य होईल, असा माझा निर्णय आहे.

यानंतर श्री. बरवड...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

मी शासनाला आणि विधिमंडळाला असे सांगेन की, उद्या अशा पध्दतीचे मराठी अनुवाद केलेले बिल पुन्हा द्यावे. सन्माननीय सदस्य त्यावर विचार करुन योग्य तो निर्णय घेतील अशी मला खात्री आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कार्यक्रमपत्रिकेवर ते इंग्रजीमध्ये आलेले आहे त्याबाबत मी मुद्दा मांडला होता.

**सभापती** : ते जर कंसात दिले असते तर स्पष्टीकरण म्हणून आपण ते समजू शकलो असतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्णय दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. जेव्हा अशा सुधारणा इंग्रजीमध्ये येतात तेव्हा विधिमंडळ सचिवालयाने आग्रह धरुन ते मराठीमध्ये केले पाहिजे.

**सभापती** : अशा पध्दतीची एखादी सुधारणा येत असताना विधिमंडळाच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा त्या अनुषंगाने काटेकोरपणे काळजी घेणे जरुरीचे आहे. कोणताही दस्तऐवज विधान परिषदेमध्ये येत असताना तो अचूक असावा यादृष्टीने पुढच्या काळात विधिमंडळ सचिवालय सुध्दा काळजी घेईल आणि शासनाने सुध्दा या अनुषंगाने एखादा प्रस्ताव येत असताना तो बिनचूक असेल याची काळजी घ्यावी असा मी निदेश देत आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : जीवनावश्यक वस्तूंची झालेली बेसुमार भाववाढ

मु. शी. : जीवनावश्यक वस्तूंची झालेली बेसुमार भाववाढ यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुडंकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, अरविंद सावंत, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री संजय केळकर, ॲड. अनिल परब, सर्वश्री किरण पावसकर, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, सय्यद पाशा पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत करण्यात आला )

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावरील चर्चा आता पुढे सुरु होईल. या प्रस्तावावर जवळजवळ सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत असे मला वाटते.

डॉ. दीपक सावंत : काही सन्माननीय सदस्यांची भाषणे राहिलेली आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांचे भाषण अपूर्ण होते. आज मी फक्त त्यांनाच बोलण्याची संधी देईन. अन्य कोणत्याही सदस्याला या प्रस्तावावर बोलण्याची परवानगी देणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये महागाईच्या संदर्भात जो प्रस्ताव सभागृहासमोर मांडलेला आहे त्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. काल या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली. मी देखील काल अनेक मुद्दे मांडले होते परंतु जे काही मुद्दे शिल्लक आहेत ते मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, माझ्या भाषणाला सुरुवात करताना काल मी असे म्हटले होते की, एका दृष्टीने महागाई हे एक फयान आहे. फयान दोन दिवस टिकते परंतु या महाराष्ट्रामध्ये आणि

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. संजय केळकर ....

देशामध्ये या महागाईच्या फयानने 365 दिवस गरीब माणसाचे, मागासवर्गीय माणसाचे कंबरडे मोडून टाकलेले आहे. अशा प्रकारचे हे महागाईचे संकट महाराष्ट्राच्या जनतेवर आलेले आहे. महागाई ही सामान्य माणसांशी निगडित आहे. आपण नेहमी म्हणतो की, सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून आपण निरनिराळ्या उपाययोजना करीत असतो, निरनिराळ्या योजना आखत असतो. परंतु या ठिकाणी या महागाईमुळे संपूर्ण कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त झालेली आहे. सामान्य गरीब माणूस उद्ध्वस्त झालेला आहे. त्याचे कंबरडे मोडलेले आहे, पेकाट मोडलेले आहे. या महागाईमध्ये 500 रुपयामध्ये पूर्वी जेवढे सामान आणत होतो ते आता अडीच हजार रुपयांमध्ये सुध्दा परवडत नाही. 100 रुपयांमध्ये पोतेभर भाजी मिळत होती परंतु आता 100 रुपयांमध्ये रुमालमध्ये सुध्दा भाजी मिळू शकत नाही अशी या महागाईची स्थिती आहे. निरनिराळ्या जीवनावश्यक वस्तूंच्या दरापासून जीवनाच्या प्रत्येक अंगामध्ये ही महागाई संचारलेली आहे. 32 वर्षाचा तक्ता माझ्याकडे आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी तूरडाळ, गहू, साखर, तेल इत्यादी सगळ्या वस्तूंच्या किमती या ठिकाणी मांडलेल्या आहेत. त्यामुळे मी ते पुन्हा मांडणार नाही. केवळ भाज्या, फळभाज्या किंवा तेल इथपर्यंतच ही महागाई थांबलेली नसून शिक्षणाच्या बाबतीत सुध्दा ही महागाई सामान्य माणसाला परवडणारी नाही.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे मुलांच्या जन्मापूर्वीच शाळांच्या प्रवेशांचे बुकिंग करावे लागते. प्रवेश घेताना पडेल ती फी, पडेल ते डोनेशन देऊन प्रवेशाचे बुकिंग करावे लागते. आपल्या मुलांना साक्षर केले पाहिजे, शहरातील शाळेत आपली मुले शिकली पाहिजेत, मग ती शाळा मराठी माध्यमाची असो की इंग्रजी माध्यमाची असो. या शाळांच्या बेसुमार फीवाढीमुळे संपूर्ण पालक वर्ग त्रस्त झालेला असतो हे दिसून येते. सध्या तर कर्ज काढून शिक्षण घेण्याची वेळ सामान्य माणसांवर आलेली आहे. ज्युनिअर के.जी.च्या प्रवेशासाठी हे कर्ज काढावे लागते असे नाही तर कॉलेजच्या प्रवेशासाठी, त्यानंतरचे शिक्षण घेण्यासाठी कर्ज काढावे लागते. त्या कर्जाच्या डोंगरामुळे सामान्य माणूस पिचून जातो. सभापती महोदय, अन्न, वस्त्र व निवारा या गरजेच्या वस्तू आहेत. त्याचप्रमाणे शिक्षण व आरोग्य देखील गरजेच्या बाबी आहेत. परंतु या प्राथमिक गरजेच्या बाबी सुध्दा सामान्य माणसांना महाग झालेल्या आहेत. या महागाईवर सरकारचे नियंत्रण असते असे नेहमी सांगितले जाते. नवीन सरकार अस्तित्वात आल्यावर नोव्हेंबर महिन्यामध्ये मंत्रिमंडळाची बैठक झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी 3 वस्तू स्वस्त धान्य दुकानातून ठराविक दरात दिल्या जातील, 55 रुपये दराने तूरडाळ दिली जाईल, 30 रुपये दराने पाम तेल दिले जाईल, 20 रुपये दराने साखर दिली जाईल असे घोषित केले होते. आता डिसेंबर महिना उजाडला पण या तीन वस्तूंच्या किंमती आटोक्यात आलेल्या नाहीत. सरकारकडून अशा घोषणा करुन जनतेची फसवणूक केली जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये वस्तूंच्या किंमती वाढल्या आहेत, अपुऱ्या वा अवेळी पडलेल्या पावसामुळे या किंमती वाढल्या आहेत असे सांगून लोकांची भलामण केली जात आहे. पण सरकारमधील जे साठेबाज आहेत त्यांच्यामुळे आणि सरकारच्या चुकीच्या नियोजनामुळे ही महागाई वाढली आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. सरकारने सर्वसामान्य माणसांना, गरीब माणसांना वाऱ्यावर सोडले आहे, त्यामुळे या महागाईचा भस्मासूर वाढत चालला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

NTK/ ST/ KGS/

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, शासनाने एस.टी.बसच्या भाडयात वाढ केलेली आहे. मी वेळोवेळी सांगत आलो आहे की, सर्वसामान्य जनता, ग्रामीण भागातील जनता या एस.टी.ने प्रवास करीत असते. या लोकांना बसच्या भाडयात सवलत दिली जात नाही. ज्येष्ठ नागरिकांना भाडयात सवलत दिली जात नाही. 1986 साली एस.टी.च्या भाडयात सवलत मिळण्याचा जी.आर.इश्यू झाला होता. त्यानंतर नवीन जी.आर.निघालेला नाही. मी सरकारच्या निदर्शनास आणून देतो की, मागील दोन वर्षात नवीन 610 कोर्सेस सुरु झाले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी एस.टी.ने प्रवास करुन या कोर्सेसचे शिक्षण घेत आहेत. परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एस.टी.च्या भाडयात सवलत दिली जात नाही. 1986 साली दिलेली सवलत आतापर्यंत सुरु आहे. या मुलांना एस.टी.चे तिकिट परवडत नाही आणि भाडयात सवलतही दिली जात नाही अशाप्रकारची स्थिती या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची झालेली आहे.

सभापती महोदय, आता पाणी देखील महाग झालेले आहे. शहरातील सोसायटयांना 2-2 दिवस पाणी मिळत नाही, त्यामुळे त्यांना टँकरने पाणी मागवून आपली गरज भागवावी लागते. नागरीकरण झालेल्या वस्त्यांमध्ये टँकरवाल्यांची लॉबी निर्माण झाली आहे. टँकरच्या पाण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागत आहेत, अशाप्रकारे पाणी महाग झालेले आहे. सामान्य जनतेच्या गरजेच्या वस्तू महाग झाल्यामुळे महागाई बेसुमार वाढत चालली आहे. या महागाईवर नियंत्रण ठेवण्यास सरकारला अपयश आलेले आहे हे त्रिवार सत्य आहे.

सभापती महोदय, रेशन दुकानाचा मुद्दा अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे. त्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही. पण शासनाने आतापर्यंत किती रेशन दुकानदारांवर, साठेबाजांवर कारवाई केली ते मंत्रिमहोदयांनी सांगावे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 19:35

(श्री. संजय केळकर ....)

सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये बोगस रेशनकार्डासंबंधी बोलताना मी सांगितले होते की, मुरुड-जंजिरामध्ये 100 बांगलादेशी नागरिकांना रेशनकार्डे देण्यात आलेली आहेत. त्याबाबतीत मी नावानिशी पुरावे सादर केलेले होते. अशा प्रकारे करोडो लोकांना बोगस रेशनकार्डे दिली गेली असून ते आता मतदार झालेले आहेत. या बोगस रेशनकार्डामुळे लोकशाही प्रकियेवर वाईट परिणाम झालेला आहे. एका बाजूला महागाई वाढत आहे आणि दुस-या बाजूला गरिबांना निकृष्ट दर्जाचे धान्य उपलब्ध करुन दिले जात आहे. लाल गव्हाच्या गोदामावर आम्ही छापे घालून तो गहू उघडकीस आणला. त्या गव्हाचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविल्यानंतर तो लाल गहू डुकरानेसुध्दा खाण्याच्या लायकीचा नाही अशा प्रकारचा रिपोर्ट प्रयोगशाळेने दिला. आज राज्यातील लोकांना खायाला चांगले अन्न मिळत नाही. जे आहे तेही अत्यंत महाग आणि निकृष्ट दर्जाचे आहे. जीवनासाठी आवश्यक असणा-या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या बाबी सर्वसामान्यांना मिळेनाशा झालेल्या आहेत. आरोग्य सुविधा घेणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरील बाब होऊन बसली आहे. सामान्य माणसाला औषधे घेणे परवडत नाही, ऑपरेशन करुन घेणे परवडत नाही. बीपीएलच्या लोकांना रुग्णालयातून काही जागा आरक्षित ठेवण्यासंबंधीचा कायदा आहे. परंतु त्यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जात नाही. तेथे देखील गरीब लोकांची परवड होते. जीवन जगणे किती भयानक असू शकते अशी परिस्थिती आज महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली आहे. तेव्हा या नियम 260 अन्वये आणलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात मी अशी मागणी करतो की, ही जी जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याबाबतीत राज्य शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे किंवा केलेली आहे यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढी संदर्भातील जो प्रस्ताव या ठिकणी आणलेला आहे त्यावर दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडून महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. आपणा सर्वांना याची कल्पना आहे की, महाराष्ट्रातील अनेक भागामध्ये अनियमित पाऊस झाला. काही भागामध्ये अतिवृष्टी झाली. परिणामी महाराष्ट्राच्या अनेक भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. सहाजिकच या परिस्थितीचा परिणाम अन्नधान्य उत्पादनावर झाला. अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये घट झाली. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या दरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, ज्या राज्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरकार असते त्या राज्यात भाववाढ होते. मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ही भाववाढ आणि अन्नधान्य टंचाईची परिस्थिती फक्त महाराष्ट्रामध्येच निर्माण झालेली आहे असे नाही तर ही परिस्थिती आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील निर्माण झालेली आहे. भारतातील गुजरात, कर्नाटक,उत्तरप्रदेश, बिहार अशा अनेक राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन घटलेले आहे. त्यामुळे अनेक राज्यांना भववाढीचा फटका बसलेला आहे. महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरकार असल्यामुळे भाववाढ होत आहे असा उल्लेख ज्या सन्माननीय सदस्यांनी केला त्यांनी माहिती घेतली तर त्यांच्या लक्षात येईल की, देशाच्या अन्य राज्यांमध्ये अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या आहेत. तांदळाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की,

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख..........

महाराष्ट्रामध्ये तांदळाचा प्रति किलो भाव 19.50 रुपये आहे. परंतु बाहेरच्या राज्यामध्ये असलेले भाव लक्षात घेतले तर कर्नाटक राज्यात तांदळाचा भाव प्रति किलो 36 रुपये आहे, गुजराथ राज्यामध्ये प्रति किलो 25 रुपये इतका भाव आहे. गुजराथ आणि कर्नाटक राज्यामध्ये कोणत्या पक्षाची सत्ता आहे हे मी सांगण्याची आवश्यकता नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यात कॉंग्रेस पक्षाचे सरकार आहे तेथे महागाई आहे असे मी म्हटलेले नाही. एकूणच केंद्र सरकारचे धोरणा चुकले आहे ते मी याठिकाणी मांडले.

श्री.अनिल देशमुख : आपण म्हटलेले नाही. काही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, ज्या राज्यामध्ये कॉंग्रेसची सत्ता येते तिथे भाववाढ होते. म्हणून मी उल्लेख करीत आहे. कर्नाटक राज्यात तांदळाचा भाव प्रति किलो 36 रुपये आहे. गुजराथमध्ये 25 रुपये प्रति किलो भाव आहे. आपल्याच पक्षाचे सरकार त्या राज्यामध्ये आहे. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये सुध्दा तांदळाचा भाव प्रति किलो 28.60 रुपये इतका आहे. तूरडाळीबद्दल सर्वच राज्यामध्ये परिस्थिती सारखीच आहे. 85 ते 90 रुपये किलो या भावाने तूरडाळ विक्री केली जात आहे. साखरेच्या बाबतीत बोलायचे झाले तर महाराष्ट्रामध्ये साखर 36.50 रुपये किलो या दराने विकली जात आहे. गुजराथमध्ये 42 रुपये किलो या दराने विकली जाते. कर्नाटक राज्यात 34 रुपये दराने विकली जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये साखरेचा भाव 30.50 रुपये किलो इतका आहे. प्रामुख्याने ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत त्यांच्या किंमती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितले की, अर्थशास्त्राचा नियम आहे की, अन्नधान्याची उपलब्धता प्रामुख्याने ज्या भागामध्ये पर्जन्यमान चांगले असते, चांगला पाऊस पडतो त्या भागामध्ये चांगले उत्पादन होते. त्याचबरोबर जागतिक बाजारपेठेमध्ये धान्याची उपलब्धता आणि जागतिक चलनवाढ या गोष्टी देखील भाववाढीस कारणीभूत असतात ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे. काही सन्माननीय सदस्यांनी राजकीय भाषणे केली. भाववाढ ही केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांच्यामुळे झाली असाही उल्लेख केला गेला. ही ग्लोबल सिच्यूएशन आहे. संपूर्ण देशामध्ये व आंतरराष्ट्रीय स्तरावर भाववाढ झालेली आहे. केंद्रीय कृषिमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी अतिशय महत्वाचे निर्णय घेतले. अन्नधान्याच्या बाबतीत जी आधारभूत किंमत होती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख..........

त्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणात श्री.शरद पवार साहेबांनी वाढ केली. त्यामुळे शेतक-यांना अन्नधान्याच्या बाबतीत चांगला भाव मिळण्यास मदत झाली. काही महत्वाच्या कृषि उत्पादनाच्या आधारभूत किंमती केंद्र शासनाने वाढविल्या. भाताची आधारभूत किंमत 645 रुपये होती ती 950 रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. ज्वारीची आधारभूत किंमत 600 रुपयावरुन 840 रुपये इतकी वाढविण्यात आली. बाजरीची आधारभूत किंमत 600 रुपयांवरुन 860 रुपये करण्यात आली. तुरीची आधारभूत किंमत 1400 रुपयावरुन 2300 रुपये करण्यात आली. उडदाची आधारभूत किंमत 1700 रुपयावरुन 2520 रुपये करण्यात आली. सोयाबीनची आधारभूत किंमत 1050 रुपयांवरुन 1390 रुपये करण्यात आली. याप्रमाणे आधारभूत किंमती वाढविल्यामुळे शेतकऱ्यांच्या सर्व कृषि उत्पादनांना चांगला भाव मिळू लागला. सन्माननीय विरोधी पक्षनेते हे कापसाच्या संदर्भात तज्ज्ञ आहेत. त्यांचा चांगला अभ्यास आहे. आपल्याला हेही माहिती आहे की, केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांनी कापसाची आधारभूत किंमत वाढविल्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना चांगला फायदा झाला. मागील वर्षी कापसाची आधारभूत किंमत 1930 रुपये होती. ती 3000 ते 3200 रुपये केल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ........

त्याचबरोबर खास करुन गहू आणि तांदळाच्या संदर्भात मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, या 15 दिवसांमध्ये राज्यात 68 लाख मे.टन गहू, 5 लाख मे.टन तांदूळ आपल्या राज्यासाठी पाठविणार असल्याचे माननीय केंद्रिय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी सांगितले. तसेच यानंतर देखील जेवढ्या धान्याची गरज भासेल तेवढ्या प्रमाणात धान्याचा साठा पाठविण्यात येईल. अशा प्रकारे गहू, तांदूळ, तूर डाळ, साखर अशा जीवनावश्यक वस्तुंच्या किमती वाढल्या आहेत त्यांच्यावर नियंत्रण कशा पध्दतीने ठेवता येईल आणि गरिबांना सवलतीच्या दरात त्या कशा उपलब्ध करुन देता येतील याबाबतही शासनाने पुढाकार घेण्याची भूमिका घेतली आहे. त्यानुसार गेल्या ऑगस्ट महिन्यापासून बाजारात 32-33 रुपये किलो दराने मिळणारी साखर शासनाने 20 रुपये, तूर डाळ जी बाजारात 80 ते 90 रुपये भावाने मिळते ती 55 रुपये, पाम तेलाचा बाजारभाव 30 रुपये अशा रास्त दरात या वस्तू उपलब्ध करुन देण्याची योजना शासनाने सुरु केली आहे. यावर आतापर्यंत 204 कोटीपर्यंत खर्च झालेला आहे. या योजनेचा फायदा एपीएल बीपीएल आणि अंत्योदय योजनेतील कार्डधारकांना होणार असून या चार महिन्यात जवळपास 4 लाख क्विंटल तूर डाळ, 40 हजार लिटर पाम तेल, साखर 11.50 लाख क्विंटल तसेच 21.10 लाख क्विंटल गहू आणि तांदूळ 12.96 लाख क्विंटल अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात या कार्डधारकांना वाटप करण्यात आले आहे. ज्या ज्या व्यापाऱ्यांकडून जीवनावश्यक वस्तुंचे साठे करण्यात येतात त्यांनाही वेळोवेळी आळा घालण्यासाठी आमच्या विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर धडक मोहीम राबविलेली असून अशा लोकांवर इसेन्शियल कमोडिटी ॲक्ट, 1957 च्या सेक्शन 3 आणि 7 नुसार धाडी टाकून जवळपास 47 साठेबाजांना अटक सुध्दा केली आहे. पुढील काळात देखील ही धडक मोहीम कडकपणे राबवून जे जे व्यापारी साठे करतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, अशी मी सभागृहाला ग्वाही देत आहे. तसेच साठेबाजांना साठा करुन ठेवण्याची जी मर्यादा ठरवून दिली आहे ती देखील कमी करण्याचा आमचा विचार आहे. जेणे करुन तेवढ्या प्रमाणात बाजारात धान्य उपलब्ध होऊ शकेल यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. केरोसीनच्या बाबतीत काळा बाजार करणाऱ्यांवर धाडी टाकून अनेक लोकांना अटक सुध्दा केलेली आहे. तसेच राज्यात जवळपास 50 हजार शिधावाटप दुकाने आहेत त्यापैकी ज्यांच्या ज्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्यांची

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .......

तपासणी करुन उचित कारवाई करण्याचे काम चालू आहे. अशा प्रकारे साठेबाजांच्या संदर्भात पुन्हा एकदा सांगतो की, अधिवेशन संपल्यानंतर मी स्वत: अनेक जिल्ह्यात जाऊन पाहणी करणार आहे आणि असे साठेबाज आढळून आले तर त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी जी मोहीम शासनाने सुरु केली आहे ती अधिक तीव्र करण्यात येईल, असेही सभागृहाला मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ....

सभापती महोदय, केंद्रीय कृषी मंत्र्यांनी सांगितले आहे की, संपूर्ण देशात जवळ जवळ 1.5 कोटी बोगस रेशनकार्ड आहेत. महाराष्ट्रामध्ये सुध्दा अशीच परिस्थिती आहे. बोगस रेशनकार्ड धारकांचा कशा शोध घेण्यासाठी आम्ही गेल्या 15 दिवसापासून एक मोहीम राबवित आहोत. मुंबईमध्ये गेल्या 1 डिसेंबर पासून या मोहिमेला सुरुवातही करण्यात आलेली आहे. जे रेशन कार्ड धारक आहेत त्यांना एक फॉर्म देण्यात आलेला असून तो त्यांच्याकडून भरुन घेतल्यानंतर दोन महिन्यात कार्यवाही करुन जे बोगस रेशनकार्ड धारक आहेत त्यांचे कार्ड रद्द करण्याची मोहीम सुरु केली जाईल असे मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आमच्या खात्यात मधील काळात संपूर्ण विभागाचे संगणकीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. यासाठी टेंडर सुध्दा निघाले होते, एका कंपनीला वर्कऑर्डर सुध्दा देण्यात आली होती परंतु नंतर ही कंपनी काम करु शकली नाही. आता संगणकीकरणामध्ये नवीन प्रगत तंत्रज्ञान आलेले आहे. आम्ही पहिले टेंडर बारकोड सिस्टीम प्रमाणे काढले होते परंतु आता बायोमेट्रीक सिस्टीममध्ये गावपातळी, तालुका, जिल्हा पातळीपासून ते राज्य पातळीपर्यंत बायोमेट्रीक सिस्टीम लवकरात लवकर केली जाणार आहे. "बायोमेट्रीक" पध्दतीमध्ये हाताचा ठसा घेतला जातो. त्याच्या पुढची पध्दत ही "आयरीश" पध्दत आहे परंतु "आयरीश" पध्दतीचा आम्ही अवलंब करणार नसून "बायोमेट्रीक" पध्दतीवरच संगणकीकरणाचे काम केले जाणार आहे. बायोमेट्रीकची सर्व माहिती एकाच ठिकाणी मॉनिटरींग करुन आपल्याला बोगस रेशनकार्डला आळा घालता येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी बीपीएलच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहेत. बीपीएलच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, 1997 मध्ये बीपीएलचा पहिल्यांदा सर्व्हे झाला होता. आजपर्यंत आपल्याला 1997 च्या सर्व्हे प्रमाणेच पिवळे शिधापत्रिका मिळतात व त्याच्यावरच आपण बीपीएल कार्ड धारकांना गव्हाचा आणि तांदुळाचा पुरवठा करीत असतो. 1997 नंतर 2002 मध्ये सर्व्हे झाला. 2002 चा सर्व्हे हा ग्रामीण भागात झाला. या सर्व्हेचे काम मुंबईतील व पुण्यातील काही भागामध्ये बाकी आहे. सन 2002 चा सर्व्हे लागू करावा अशी विधानसभेच्या आणि विधानपरिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांची मधील काळात मागणी होती.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ....

जो सर्व्हे बाकी आहे त्याचे काम आम्ही दोन महिन्यात पूर्ण करु आणि सन 2002 च्या सर्व्हेची यादी त्या निमित्ताने जाहीर करुन बीपीएल धारकांना फायदा देण्याचा प्रयत्न करु अशी ग्वाही मी या प्रसंगी देऊ इच्छितो. अंत्योदय योजनेच्या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अंत्योदय योजनेचे जवळ जवळ 24 लाख लाभार्थी संपूर्ण महाराष्ट्रात आहेत. अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना गहू दोन रुपये किलो आणि तांदूळ 3 रुपये किलो या दराने उपलब्ध करुन दिला जातो. अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना मालाचा नियमित पुरवठा शासनाकडून केला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यांनी जळगाव एमआयडीसीतील सुंदर पुरिया फ्लोअर मिलच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या मिलच्या मालकाला अटक करण्यात आलेली आहे एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो. नाशिकमध्ये द्वारपोच योजना राबवली जाते तीच योजना बाकीच्या जिल्हयामध्ये सुध्दा राबविण्यात यावी अशी सूचना देखील करण्यात आलेली आहे. त्यामुळे या सूचनेचा सुध्दा अवश्य विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी काल सडक्या गव्हाच्या संदर्भात विषय उपस्थित केला असून त्या गव्हाचे सॅंपलही त्यांनी दिलेले आहेत. हे सॅंपल आम्ही लॅबरोटरीकडे पाठविले असून लॅबरोटरीचा रिपोर्ट आल्यानंतर त्याची माहिती सदनाला आणि सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल. भात खरेदी केंद्राच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.पाटील साहेबांनी प्रश्न उपस्थित केला होता.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ KGS/ ST/ SBT/ प्रथमश्री.जुन्नरे 17.55

श्री.अनिल देशमुख ........

त्यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की़ दिनांक 1 ऑक्टोबर पासून साधारणपणे भात खरेदी केन्द्रे सुरु करतो परंतु मधल्या काळात राज्यामध्ये निवडणुका असल्यामुळे भात खरेदी केन्द्रे दिनांक 22 ऑक्टोबर पासून सुरु करण्यात आलेली आहेत. सभापती महोदय, या खात्याचा मंत्री म्हणून मी आपल्याला सांगतो की, या खात्याच्या माध्यमातून काम करीत असतांना गाव पातळीवर एक दक्षता समिती असून त्यामध्ये एकूण 13 सदस्य असतात, तालुका पातळीवरसुध्दा एक दक्षता समिती असून त्या समितीचे अध्यक्ष त्या भागातील आमदार असतात.. जिल्हयाच्या पातळीवरसुध्दा एक दक्षता समिती असते

डॉ.नीलम गोऱ्हे : त्या समित्यांमध्ये विधान परिषदेचे सदस्य नाहीत.

. **सभापती** : त्या समितीमध्ये विधान परिषदेचे सदस्य जर नसतील तर त्यांनासुध्दा समितीमध्ये घेण्यात यावे.

श्री.अनिल देशमुख :सभापती महोदय, गाव पातळीवरील दक्षता समितीमध्ये विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांना घेता येणार नसल्यामुळे तेथील सरपंचाना दक्षता समितीमध्ये अध्यक्ष म्हणून घेण्यात येते

श्रीमती मंदा म्हात्रे :तालुका पातळीवरील समितीमध्ये विधान परिषद सदस्यांना घेण्यात यावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, गाव पातळीवरील समितीमध्ये अध्यक्ष म्हणून सरपंचाना घेण्यात येते त्याचबरोबर तालुका पातळीवरील दक्षता समितीमध्ये त्या भागातील आमदारांना घेण्यात येते तसेच त्या भागातील विधान परिषद सदस्य जर त्या समितीमध्ये नसतील तर त्यांना देखील सदस्यत्व देण्यात येईल. त्याचबरोबर जिल्हा पातळीवरील समितीमध्ये सुध्दा विधान परिषद सदस्यांना सदस्य म्हणून घेण्यात येईल . नियंत्रण करण्याच्या कामामध्ये त्यांचासुध्दा सहाभाग रहावा या दृष्टीने विधान परिषद सदस्यांचासुध्दा समावेश करण्यात येईल.अशा प्रकारची मी ग्वाही देतो. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी ज्या काही मौलिक सूचना केल्या आहेत त्याची मी नोंद घेतली आहे. ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येईल अशीही मी ग्वाही देतो या उत्तरामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले असेल अशी़ अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण सपवितो.धन्यवाद.

----

VTG/ KTG/ KGS/ ST/ SBT/ प्रथमश्री.जुन्नरे

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, काल सभागृहात नियम 260 च्या प्रस्तावाखाली जवळजवळ अडीच तास चर्चा झाली असून आता माननीय मंत्रिमहोदयांनी त्या प्रस्तावाला उत्तर दिले आहे. या चर्चेमध्ये जे जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्या सर्व मुद्यांना उत्तरे देण्यात येतील अशी आमची अपेक्षा होती.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील गोर गरीब माणूस महागाईमध्ये होरपळत असल्यामुळे या माणसासाठी महाराष्ट्र शासन काय करणार आहे यासंबंधीचे उत्तर आम्हाला मिळेल अशी आमचवी अपेक्षा होती परतु त्या संबंधीचे उत्तर दिले गेले नाही. या ठिकाणी गुजराथ आणि कर्नाटक राज्याचे उदाहरण दिले गेले. मी काल असा मुद्दा उपस्थित केला होता की, आंध्र प्रदेशमध्ये तुमच्याच पक्षाचे सरकार आहे . ज्या प्रमाणे आंध्र प्रदेश मधील जनतेला स्वस्त दराने वस्तू उपलब्ध करुन दिल्या जातात त्याप्रमाणे महाराट्रातील जनतेला स्वस्त दराने वस्तू का उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत.? महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश दान्ही राज्यामध्ये कॉग्रेस पक्षाचेच राज्य आहे. सन्माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी गुजराथ आणि कर्नाटक राज्याची उदाहरणे दिली . त्या ठिकाणच्या गरीब माणसाला तेथील सरकाराकडून स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून अल्प दराने धान्याचा पुरवठा केला जातो परतु त्याचा उल्लेख माननीय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात केलेला नााही या संदर्भात केन्द्र सरकारची जी धोरणे चुकलेली आहेत त्या सबंधी अनेक सन्माननीय सदस्य बोलले आहेत परंतु केन्द्र सरकारच्या धोरणासबंधी या ठिकाणी चर्चा करुन काही उपयोागही नाही. महाराष्ट्र राज्यामध्ये गोर गरीब माणसाला महागाईची झळ पोहोचत असून आपण त्याचा उत्पादनाशी सबंध लावला आहे. परंतु महागाईच्या बाबतीत जे अनेक मुद्दे मांडले गेले त्याचे उत्तर दिले गेले नाही. अन्नधान्य, डाळी,साखर, तेल, भाजीपाला, फळे इत्यादी जीवनावश्यक वस्तुंचे वाढलेले दर त्याचप्रमाणे शाळा कॉलेजच्या फीची दरवाढ ,एस.टी आणि विजेची दरवाढ यासबंधी अनेक मुद्दे मांडले गेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री चंद्रकांत पाटील यांनी एक उदाहरण दिले की, आजारी पडल्यानंतर एक गोळी घ्यावयाचे ठरविल्यास त्या गोळीची मूळ किंमत 50 पैसे असतांना बाजारात दीड ते दोना रुपयास मिळते. सान्माननीय मंत्रीमहोदयांना मी सांगू इच्छितो की, आत्महत्या करण्यासाठी आता शेतकरी विषाचा वापर करत नाहीत...

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

कारण आता या राज्यामध्ये जहराची किंमत, कीटकनाशकाची किंमत देखील 2-3 हजार रूपये लीटर पर्यंत गेलेली आहे शिवाय त्यात भेसळ असते. त्यामुळे आत्महत्येसाठी देखील त्याला कीटक नाशक घ्यावयाचे म्हटले तरी ते जास्त प्रमाणात घ्यावे लागते. म्हणजेच मरायला तो शेतकरी कीटक नाशक देखील घेऊ शकत नाही इतके ते महाग झालेले आहे अशी परिस्थिती या राज्यात आहे. या राज्यामध्ये आता एकही वस्तू स्वस्त राहिलेली नाही. स्वस्त झाल्या आहेत त्या केवळ शेतकऱ्यांच्या आत्महत्या. त्यामुळे आमची आपल्या सरकारकडून अपेक्षा होती की, या राज्यातील गोरगरीब माणसाला पुढील कालखंडामध्ये, आमचे युती सरकार या राज्यात सत्तेवर आले तेव्हा युती सरकारने शपथ घेतल्याबरोबर एक बोर्ड लावला. 'कॉंग्रेस का हाथ, आम आदमी के साथ' असा तो बोर्ड नव्हता तर युती सरकार सत्तेवर असतानाच्या पाच वर्षाच्या काळात जीवनावश्यक अशा पाच वस्तूंचे भाव एकच राहतील, त्यात दरवाढ होऊ दिली जाणार नाही असे युती सरकारने जनतेला सांगितले होते आणि त्याप्रमाणे युती सरकारने करून दाखविले होते. आमचीही आपल्याकडून तशीच अपेक्षा होती. परंतु या ठिकाणी आपण तूरडाळीचा उल्लेख केला. आमच्या सन्माननीय सदस्य श्री.सावंत यांनी गव्हाचा मुद्दा उपस्थित केला, तूरडाळीच्याबाबतीत भ्रष्टाचार झाल्याचा मुद्दा उपस्थित केला पण आपण त्याहीबद्दल काही बोलला नाहीत. तुम्ही दिलेली तूरडाळ शिजत नाही असाही उल्लेख येथे आम्ही केला पण तूरडाळ आम्ही स्वस्त भावामध्ये दिली असा उल्लेख आपण केला पण चार महिन्यांपूर्वी पहिल्यांदा दोन महिने लोकांनी आपली स्वस्त केलेली तूरडाळ घेतली पण नंतर आज मात्र ती घेण्याची कोणाचीच इच्छा होत नाही अशी स्थिती आपल्या भाव कमी केलेल्या तूरडाळीची झालेली आहे. साठेबाजांबद्दल केलेल्या व करावयाच्या कारवाईबद्दलही आपण काहीच सांगितले नाही. म्हणून आपल्या या उत्तराने आमच्या अपेक्षा पूर्ण झालेल्या नाहीत, आमचे समाधान झालेले नाही म्हणून आम्ही आपल्या उत्तराचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

( विरोधी पक्ष सदस्य सभात्याग करतात. )

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

.... 4एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

आता यानंतरचा नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.छाजेड यांचा प्रस्ताव आहे, तेव्हा सन्माननीय सदस्यांनी आपला प्रस्ताव मांडावा त्यानंतर मग या प्रस्तावावरील चर्चेसाठी आपण किती वेळ बसायचे ते ठरवू.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, तत्पूर्वी मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊन विनंती करावयाची आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि विरोधी सदस्यांनी सभात्याग केला हा भाग वेगळा आहे. परंतु सभात्याग करण्यापूर्वी केलेल्या भाषणामध्ये माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी असे वाक्य म्हटले आहे की, राज्यात कीटकनाशके महाग झाल्यामुळे कीटकनाशक प्राशन करून शेतकरी आत्महत्या करू शकत नाहीत. याचा दुसरा अर्थ असाही होतो की, कीटकनाशके स्वस्त झाल्यास शेतकऱ्याला ते घेऊन आत्महत्या करणे सहज शक्य होईल. तेव्हा अशा प्रकारे ते जे बोलले आहेत ते वाक्य बरोबर नाही. तरी आपण ते रेकॉर्ड वरून काढून टाकावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

( विरोधी पक्ष सदस्य सभागृहात पुन्हा येतात ...)

**सभापती** : मी ते तपासून घेऊन, काढणे आवश्यक वाटले तर काढून टाकीन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या एका मुद्यावर उत्तर दिलेले नाही. ...

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आता आपण पुढे गेलो आहोत. ...

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांनी राईट ऑफ रिप्लायचे भाषण केल्यानंतर त्यांच्या वा अन्य सदस्यांच्या एखाद्या मुद्यावर मंत्री महोदयांना उत्तर द्यावयाचे असेल आणि तसे मला सांगितले असते तर मी त्यांना संधी दिली असती. अजूनही मी त्यांना तसे विचारतो. ..

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी माझ्या भाषणात सर्व मुद्दे कव्हर केलेले आहेत.

**सभापती** : मग ठीक आहे. आता यानंतर नियम 260 चा पुढील प्रस्ताव घेण्यात येईल.

***

..... 4एक्स 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील शासकीय दूध डेअऱ्या बंद पडत असल्याने शासकीय दूध योजना सुधारण्यासाठी करावयाची उपाय योजना.

**मु.शी.** : राज्यातील शासकीय दूध डेअऱ्या बंद पडत असल्याने शासकीय दूध योजना सुधारण्यासाठी करावयाची उपाय योजना याबाबत सर्वश्री जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, मोहन जोशी, जैनुद्दीन जव्हेरी वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो ..

"राज्यात सन 1958 मध्ये दुग्ध व्यवसाय विकास विभागाची स्थापना होणे, दुधाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होण्यासाठी राज्यातील अनेक भागात दुग्धशाळा निर्माण होणे, शहरी भागातील लोकांना दुग्ध व्यवसाय विकास विभागांतर्गत दूध पुरवठा करण्यात येणे, तसेच ग्रामीण भागातील लोकांचा शेती व्यवसायाबरोबरच गायी व म्हशी पालन दुग्धनिर्मितीचा पूरक धंदा विकसित होणे, मुंबई शहरात हजारो म्हशींद्वारे दुधनिर्मिती होणे, या व्यवसायात कोट्यवधी रूपयांची गुंतवणूक होणे, सदर दुधाचा पुरवठा शालेय विद्यार्थ्यांनादेखील होत असणे, देवतळे समितीच्या शिफारशीनुसार गाईच्या दुधाला शासनाने चांगले दर दिल्याने संकरित गाईंचे प्रमाण वाढणे व त्याद्वारे प्रचंड प्रमाणात दुधाचे उत्पादन होणे, उत्पादन झालेले मोठ्या प्रमाणावरील दूध शासन विकत घेऊ शकत नसल्याने अशा अतिरिक्त दुधाचे भुकटीत रुपांतर करणे त्याचबरोबर शालेय पोषण आहाराद्वारा राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना दूध पुरविणे, शासन मान्य दुग्ध शाळा व्यतिरिक्त अनेक खाजगी दुग्ध संघ निर्माण होऊन स्पर्धेपोटी दुधात प्रचंड प्रमाणात भेसळीचे आधार घेऊन दुग्ध निर्मिती करण्याचा सुरू केलेला प्रयत्न, सदर अराजक प्रवृत्ती भेसळीयुक्त दुध निर्मिती करीत असल्याने जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, दुधात भेसळीचे प्रमाण वाढत असल्याने शासकीय दूध योजनेतून पुरवठा होत असलेल्या दुधाबद्दलही जनसामान्यात उपस्थित होत असलेली शंका तसेच शासनाच्या अनेक दूध डेअऱ्या बंद पडल्या असून काही बंद पडण्याच्या मार्गावर असणे, भेसळयुक्त दुध बंद करण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता या भेसळयुक्त दुधामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष दूर करण्यासाठी व शासनाच्या दूध योजनेला सुधारण्याकरिता करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अध्यक्ष महाराज, ...

.... 4एक्स 4 ...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण आता येथेच थांबावे आणि उद्या जेव्हा हा प्रस्ताव चर्चेला घेतला जाईल त्यावेळी आपले भाषण पुढे सुरू करावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 16 डिसेंबर 2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 4 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 16 डिसेंबर 2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही